**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**१)क्रमांक-मुमाआ/५०३२५(अ)/अपील क्रमांक ६४२६/२०१०**

**श्री.आनंद सोपान पारगावकर,**
**१३५/३६६४, विशाल को.ऑप.हौ.सो.,**
**१ला मजला, पंतनगर, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७५. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग कार्यालय,**
**मंगतराम पेट्रोलपंपाजवळ, एल.बी.एस.मार्ग,भांडुप(प.), मंबई-७८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग कार्यालय,**
**मंगतराम पेट्रोलपंपाजवळ, एल.बी.एस.मार्ग,भांडुप(प.),**
**मंबई-७८. ...... उत्तरवादी**

2)**क्रमांक-मुमाआ/५०३२५(ब)/अपील क्रमांक ६४२७/२०१०**

**श्री.आनंद सोपान पारगावकर,**
**१३५/३६६४, विशाल को.ऑप.हौ.सो.,**
**१ला मजला, पंतनगर, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७५. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग कार्यालय,**
**९६, भाऊ दाजी मार्ग, माटुंगा(पूर्व), मुंबई-४०००१९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग कार्यालय,**
**९६, भाऊ दाजी मार्ग, माटुंगा(पूर्व), मुंबई-४०००१९. ...... उत्तरवादी**

**३) क्रमांक-मुमाआ/५०३२५(क)/अपील क्रमांक ६४२८/२०१०**

**श्री.आनंद सोपान पारगावकर,**
**१३५/३६६४, विशाल को.ऑप.हौ.सो.,**

१ला मजला, पंतनगर, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७५. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग कार्यालय,
जोबानपुत्र कंपाऊंड, नाना चौक,
ग्रँट रोड(प.), मुंबई-४००००७.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग कार्यालय,
जोबानपुत्र कंपाऊंड, नाना चौक,
ग्रँट रोड(प), मुंबई-४००००७. ...... उत्तरवादी

४)क्रमांक-मुमाआ/५०३२५(ड )/अपील क्रमांक ६४२९/२०१०

श्री.आनंद सोपान पारगावकर,
१३५/३६६४, विशाल को.ऑप.हौ.सो.,
१ला मजला, पंतनगर, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७५. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग कार्यालय,
जोबानपुत्र कंपाऊंड, नाना चौक,
ग्रँट रोड(प), मुंबई-४००००७.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग कार्यालय,
जोबानपुत्र कंपाऊंड, नाना चौक,
ग्रँट रोड(प.) मुंबई-४००००७. ...... उत्तरवादी

५)क्रमांक-मुमाआ/५०३२५(इ)/अपील क्रमांक ६४३०/२०१०

श्री.आनंद सोपान पारगावकर,
१३५/३६६४, विशाल को.ऑप.हौ.सो.,
१ला मजला, पंतनगर, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७५. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,

**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग कार्यालय,**
**९६, भाऊ दाजी मार्ग, माटुंगा(पूर्व), मुंबई-४०००१९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग कार्यालय,**
**९६, भाऊ दाजी मार्ग, माटुंगा(पूर्व), मुंबई-४०००१९. ...... उत्तरवादी**

**६)क्रमांक-मुमाआ/५०३२५(फ)/अपील क्रमांक ६४३१/२०१०**
**श्री.आनंद सोपान पारगावकर,**
**१३५/३६६४, विशाल को.ऑप.हौ.सो.,**
**१ला मजला, पंतनगर, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७५. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इमारत प्रस्ताव),**
**पश्चिम उपनगर-१, बृहन्मुंबई महानगरपालिका,भाभा हॉस्पीटलजवळ,**
**१ला मजला, आर.के.पाटकर मार्ग,**
**बांद्रा(प.), मुंबइ-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,एच विभाग,**
**पश्चिम उपनगर-१, बृहन्मुंबई महानगरपालिका,भाभा हॉस्पीटलजवळ,**
**१ला मजला, आर.के.पाटकर मार्ग,**
**बांद्रा(प.), मुंबइ-४०००५०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

वरील सर्व प्रकरणांमध्ये अर्जदार अपिलार्थी श्री.आनंद पारगावकर हेच असून उत्तरवादी वेगवेगळे आहेत. सर्व अपीले एकाच अर्जदाराची असल्यामुळे व उत्तरवादीसुध्दा एकाच प्राधिकरणातील परंतु वेगवेगळया विभागांतर्गत कार्यरत असल्यामुळे सर्व अपिलांची सुनावणी दोन्ही बाजूच्या संमतीने एकत्र घेण्यात आली व खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**अपील क्र.६४२६, ६४३० -** या अपिलांची सुनावणी एकत्रित घेण्यात आली. ही दोन्ही अपिले एकत्र निकाली काढण्यास दिलेल्या संमतीमुळे खालील निर्णय पारित करण्यात आला.

सदरच्या प्रकरणांमध्ये अर्जदाराने दि.९.३.२०१०च्या जोडपत्रानुसार मागीतलेल्या मुद्दा क्र.५च्या माहितीची त्यांना आवश्यकता नाही यास्तव अर्जदाराने Not pressed असे सांगितले. उर्वरित मुद्दा क्रमांक १,२,३ याबाबत जन माहिती अधिकारी व अर्जदार यांच्या संमतीने सदर प्रकरणी अर्जदाराला मूळ अभिलेखांचे निरिक्षण देण्याचे ठरले व त्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि.८.३.२०११ रोजी दुपारी ३.०० ही वेळ ठरविण्यात आली. सदर वेळेनुसार अर्जदार अपिलकर्ता हजर राहतील व जन माहिती अधिकारी त्यांना ३ मुद्यांच्या माहिती संदर्भातील मूळ अभिलेखांचे निरिक्षण देतील व सदरची माहिती विनाशुल्क पुरविण्याचे तसेच माहिती साक्षांकित करुन देण्याचेही कबूल केले आहे. सदर प्रकरणात त्यानंतरही अर्जदाराची काही तक्रार असेल तर

त्यांनी या आयोगासमोर लेखी तक्रार केल्यास त्यावर विचार करण्यात येईल. सदरची दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**अपील क्रमांक ६४२८,६४२९** - या दोन्ही प्रकरणांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यातआली. या प्रकरणी सुध्दा अर्जदाराला मूळ अभिलेख्यांचे निरिक्षण देण्याचे ठरले. मुद्दा क्र.५ बाबत Not Pressed असे अर्जदाराने म्हटले आहे. मुद्दा क.१,२,३ बाबतच्या माहितीसाठी अर्जदाराला निरिक्षण देण्यात यावे व त्यानुसार अर्जदाराला माहिती पुरवावी. परंतु सदर प्रकरणी मागीतलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची आहे. सहाय्यक अभियंता यांनी अर्जदाराला दि.२०.१०.२०१० च्या पत्रान्वये अपिल क्र.६४२९ मध्ये तक्रारीबाबतची संख्या ८४२३ दाखविली आहे व अनधिकृत बांधकामाबाबत डिमॉलिशनच्या प्रतींची संख्या ३४८१ अशी दाखविलेली आहे. अनधिकृत बांधकामाबाबत पाठविलेल्या एकूण ३५१ नोटीसच्या नक्कलप्रती २२५५ इतक्या आहेत. तसेच अपील क्र.६४२८ मध्ये तक्रारीच्या पृष्ठांची संख्या २१०६ , मुद्दा क्र.१बाबत तसेच मुद्दा क्र.२ बाबत ८७० व कलम ३५१ अनुसार पाठविलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या यादीनुसार एकूण ५६२ प्रती इतक्या प्रतींसाठी प्रति प्रत रु.२/- ची मागणी केलेली आहे. दोन्ही प्रकरणात अर्जदाराचा अर्ज २१.६.२०१० चा आहे व मागणी केलेली पत्रे २०.१०.२०१० ची आहेत. तसेच अपिल क्र.६४२९ मध्ये २०.१०.२०१० रोजी पैशांची मागणीबद्दल पत्र दिलेले आहे व अर्जदाराचा मूळ अर्ज दि.१.६.२०१० चा आहे.दोन्ही प्रकरणात माहिती देण्यासाठी येणारा खर्च काही हजारापर्यंत आहे. अर्जदारास पैशांची मागणी केलेले पत्र हे ३० दिवसांच्या नंतर पाठविलेले आहे हे जरी खरे असले तरी सार्वजनिक प्राधिकरणावर जास्त खर्चाचा बोजा पडणार नाही या दृष्टीकोनातून अर्जदाराने पाहिजे असलेली माहिती कमीत कमी प्रतीत मागीतल्यास अर्जदाराला ती पुरविता येईल. यास्तव अर्जदाराला जर संपूर्ण माहिती हवी असेल तर अर्जदाराने त्याबाबत पैशांचा भरणा करावा व माहिती मिळवून घ्यावी. या व्यतिरिक्त अर्जदारास काही अडचण असल्यास त्यांनी या आयोगापुढे तक्रारवजा अर्ज केल्यास त्याबाबत विचार करता येईल. असे आदेश देऊन सदरची अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**अपिल क्रमांक ६४३१** - या प्रकरणी अर्जदाराने मुद्दा क.३ बाबत Not Pressed असे म्हटले आहे व उर्वरित मुद्यांबाबत अर्जदाराने स्वतः निरिक्षणासाठी दि.७.३.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून प्राप्त करुन घ्यावी. सदर माहिती उपलब्ध करुन देण्यास जन माहिती अधिकारी तयार आहेत व त्यासाठी निरिक्षणाची वेळ व तारीख निश्चित करण्यात आलेली आहे.सदर प्रकरणी श्री.तळकर हे अपीलीय अधिकारी असून ते सदर दिवशी कार्यालयास हजर नसल्यास श्री.अगरवाल यांच्याकडून अपिलकारास ठरलेल्या वेळेवर माहिती पुरविण्यात येईल असेही कबूल करण्यात आले आहे. सदरची माहिती विनाशुल्क पुरविण्यात येईल. तरीही अपिलकारास काही अडचण असल्यास व त्यांनी या आयोगासमोर तक्रारवजा अर्ज केल्यास त्याबाबत विचार करण्यात येईल. सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अपिल क्रमांक ६४२७** - या प्रकरणी अर्जदाराने मुद्दा क्र.५ बाबत Not Pressed असे म्हटलेले आहे. उर्वरित ४ मुद्यांची माहिती १६ मार्च,२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन निरिक्षण घेऊन पुरविण्याचे कबूल करण्यात आले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार अर्जदाराने दिलेला कालावधी १.४.२००९ ते ४.६.२०१० असा आहे. सदर कालावधीत कोणत्याही प्रकारचे उद्यानांचे सुशोभीकरण करण्यात आलेले नाही व त्यामुळे मुद्दा क्र.३,४ ची माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.मुद्दा क्र.१ बाबत जन माहिती अधिकारी अर्जदाराला मूळ अभिलेख निरिक्षणासाठी दि.१६ मार्च,२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता देण्यास तयार आहेत.

त्यामुळे यांनी मुद्दा क्र.१ ची माहिती अर्जदाराला मूळ अभिलेख निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देऊन त्यांना हवी असलेली माहिती उपलब्ध असल्यास ती पुरविण्यात यावी.

वरील सर्व अपीले निकाली काढण्यात येत आहेत. वरील सर्व प्रकरणात अपिलकर्ता यांची काही तक्रार असल्यास व त्याबाबत त्यांनी या आयोगापुढे लेखी तक्रारवजा अर्ज केल्यास त्याबाबत विचार करण्यात येइल.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक १.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/५०३०३/अपील क्रमांक ६४३२/२०१०**

**श्री. जोंथन डिसिल्व्हा,**
**रा.१०, रहेना मंझील,**
**एल.जे.रोड, माहिम, मुंबई-१६. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियता(एन/पश्चिम विभाग),**
**बी.ई.एस.टी.,ग्राहक उपभोक्ता केंद्र(उत्तर/पश्चिम विभाग),**
**वाहतूक अभियांत्रिकी इमारत, २रा माळा, गेट नं.३,**
**लोकमान्य टिळक रोड, दादर, मुंबई-१४.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता(ई वार्ड),**
**बी.ई.एस.टी., न्यु एन्सीलरी इमारत,**
**टिळक रोड, एक्सटेन्शन, वडाळा डेपो,वडाळा,**
**मुंबई-४०००३१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २६.१०.२०१०**

**सुनावणीचा दिनांक : ३.३.२०११**

**अपिलकर्ता अनुपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

सदर प्रकरणी अर्जदाराने दि.२४.५.२०१० रोजी डिव्हीजनल इंजिनिअर, ई-वार्ड,टिळक रोड,वडाळा डेपो यांच्याकडे अर्ज करुन खालील ३ मुद्यांमध्ये माहिती मागीतली होती.

१) Has any electric connection been granted to the above gala? If yes, what is the meter number for the above gala? In whose name is the connection issued?
२) What is the type of connection? Is it domestic or commercial?
३) Please provide me with copies of electric bills along with meter reading and payment made the period १$^{st}$ January २००९ till २७$^{th}$ April २०१०?

मागीतलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असली तरी त्याबाबत दि.४.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा डिव्हीजनल इंजिनिअर यांनी अर्जदाराला पत्र देऊन त्याबाबत कळविलेले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदाराने ज्या मीटरबद्दल माहिती मागीतली आहे त्याचा बील नंबर,इन्स्टॉलेशन नंबर,सर्व्हीस नंबर,मीटर नंबर वगैरेबाबत तपशील दिल्यास माहिती पुरविणे सोयीचे होईल. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्याने अर्जदाराने प्रथम अपील दि.१८ जून,२०१० रोजी या अधिनियमाच्या कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केले. त्यात माहिती न मिळाल्याची तक्रार त्यांनी केली असून पुन्हा तीच माहिती मागण्यात आली आहे. सदर अपीलावर दि.३१ ऑगस्ट,२०१० रोजी प्रथम अपीला संबंधीची सुनावणी ठेवण्यात आली होती. प्रथम अपीलीयअधिकारी यांनी ३.९.२०१० रोजी सदर सुनावणीबाबत पुढीलप्रमाणे आदेश दिले - Appelent is requested to give above mentioned input. PIO is directed by Dy.Chief Engineer to look into the matter. Hence appeal disposed off. यास्तव अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात आले आहे.

त्यानंतर अर्जदाराने या आयोगासमोर द्वितीय अपील दाखल केले. अर्जदार आज सुनावणीस गैरहजर आहेत. प्रथम अपीलाच्या आदेशानुसार अर्जदाराला दिलेल्या उत्तरानंतर अर्जदाराने कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही त्यामुळे वर मागीतलेली मााहिती अर्जदाराने न पुरविल्यामुळे अर्जदाराला देणे शक्य नाही असे उत्तरवादीचे म्हणणे आहे, व अर्जदार सदर माहिती पुरवू शकतात किंवा नाही ते अर्जदाराने अकाऊंट नंबर न दिल्यामुळे उत्तरवादी त्याबाबत मत देऊ शकले नाहीत. यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक ३.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९४३३/अपील क्रमांक ६४३५/२०१०**

**श्रीमती शोभना वाय.सराफ,**
**अे/२, प्रसन्न जीवन सोसायटी,अेक्सर रोड,**
**बहाई, बोरिवली(प.), मुंबई-४०००९२. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**शिक्षण निरिक्षक पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**इस्माईल युसुफ कॉलेज,**
**जोगेश्वरी(पूर्व), मुंबई-४०००६०.**

**जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,**
**शिक्षण निरिक्षक पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**इस्माईल युसुफ कॉलेज,**
**जोगेश्वरी(पूर्व), मुंबई-४०००६०. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ७.८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक श्री.पगारे यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार यांनी जी माहिती मागीतली आहे ती सर्व माहिती भविष्य निर्वाह निधीसंबंधी आहे. त्यांचा अकाऊंट नंबर ७०११८ असा आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार संपूर्ण माहिती अर्जदार ज्या संस्थेमध्ये काम करीत आहेत त्या संस्थेस पुरविली आहे. त्यानंतरही अर्जदार यांना माहिती मिळाली

नसल्यामुळे ती त्यांनी उद्या दि.४.३.११ रोजी ११.०० वाजता श्रीमती पगारे, अधीक्षक वेतन व भ.नि.नि.पथक यांच्याशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावी. सदर माहिती त्यांना विनाशुल्क पुरविण्यात यावी. त्यानंतरही अर्जदाराला माहिती न मिळाल्यास अर्जदार या आयोगासमोर तक्रारअर्ज दाखल करु शकतात. वरीलप्रमाणे अर्जदारास माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केल्यामुळे व अर्जदाराचे याबाबत समाधान झाले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक ३.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०१२५/अपील क्रमांक ६४३३/२०१०**

**श्री.धवल बी. उद्देशी,**
**३४/४२९-ई, एस.व्ही.पी.रोड,**
**प्रार्थना समाज, मुंबई-४००००४. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**पश्चिम परिमंडळ, लोहमार्ग मुंबई कार्यालय, वरिष्ठ अनुभाग अभियंता(पॉवर),**
**जुनी इमारत,१ला मजला, घासबाजार, विभा.रेवे व्यवस्थापक,**
**पश्चिम रेल्वे, मुंबई सेंट्रल कार्यालयाचे जवळ,**
**मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस निरिक्षक,**
**पोलीस आयुक्त कार्यालय, लोहमार्ग,**
**मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई-४००००८. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.३.२०११**
**अपिलकर्ता अनुपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

सुनावणीस अपिलकर्ता अर्जदार गैरहजर असून उत्तरवादी यांच्यातर्फे सौ.मेगी एस.एम.,पोलीस निरिक्षक, मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीसठाणे उपस्थित आहेत. उत्तरवादी यांनी आयोगासमोरअसे सांगितले की, अर्जदार यांना दि.२९.९.२०१० रोजी सर्व कागदपत्र दिलेली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार यांच्या गळयातील सोन्याच्या साखळीची चोरी झाली होती व त्यासंबंधी अर्जदारानं प्रपत्र अ नुसार माहिती मागीतली आहे. त्या प्रकरणी चौकशी करुन संबंधीत आरोपीविरुध्द एफआयआर दाखल केलेला आहे. तसेच अर्जदाराची चेन गुन्हेगाराकडून हस्तगत करुन ती अर्जदारास सुपुर्द करण्यात आली आहे. त्यामुळेच अर्जदार आज सुनावणीस हजर राहिले नसावेत असे त्यांचे म्हणणे आहे. सदर गुन्हयाचा तपास करुन दोषारोपपत्र दाखल केले असल्यामुळे व अर्जदाराची चोरीस गेलेली वस्तु परत मिळाली असल्यामुळे अर्जदार सुनावणीस हजर राहिले नसावे असा निष्कर्ष काढण्यात येतो. त्याचप्रमाणे अर्जदारास माहिती पुरविण्यात आली आहे असे उत्तरवादी यांनी सांगितल्यावरुन सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई (भास्कर पाटील)
दिनांक ३.३.२०११ प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१६०/अपील क्रमांक ६४३६/२०१०

श्री. विलासराव पाटकर,
१५६/८, घरकुल हाऊसिंग सोसायटी,
गोराई-२, सुविधा हायस्कुलच्या मागे,बोरीवली(प.),
मुंबई-४०००९१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.म.न.पा. आयुक्त,

**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग कार्यालय,**
**प्रभात कॉलनी, सांताक्रुझ(पूर्व),**
**मुंबई-४०००५५.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग कार्यालय,**
**प्रभात कॉलनी, सांताक्रुझ(पूर्व),**
**मुंबई-४०००५५. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.३.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अर्जदाराने दि.१०.६.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,इमारत व कारखाने विभाग,एच/पूर्व म.न.पा. कार्यालय, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ(पूर्व), मुंबई यांच्याकडे अर्ज करुन ३ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. माहितीचा विषय सांताक्रुझ(पूर्व) येथील बसस्थानकासमोर असलेल्या टिफणीस रेस्टॉरंट अँड बार या हॉटेलच्या बेकायदेशीर वाढीव बांधकामाच्या कार्यवाहीची माहिती मिळणेबाबत असा आहे.अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदर बांधकाम बेकायदेशीर आहे व ते तोडण्यासाठी तक्रारदारांनी ज्या तक्रारी दाखल केल्या आहेत त्या तक्रारींच्या छायांकित प्रती तसेच मुंबई महानगरपालिका आयुक्त ते वार्ड अधिकारी यांना आजमितीपर्यंत कारवाई करण्याबाबत जे आदेश दिले असतील त्या आदेशांच्या छायांकित प्रती तसेच सदर हॉटेलच्या बेकायदेशीर वाढीव बांधकाम असलेल्या जागेवर किंवा हॉटेल मालकावर किंवा त्यांच्या इतर परवान्यावर जी कारवाई करण्यात आली त्या कारवाईच्या माहितीची छायांकित प्रत इत्यादीची मागणी करण्यात आलेली आहे.

अर्जदाराच्या अर्जानुसार माहिती न मिळाल्यामुळे अर्जदाराने या अधिनियमाच्या कलम १९(१) नुसार प्रथम अपील दि.६.८.२०१० रोजी सहाय्यक मनपा आयुक्त तथा अपिलीय अधिकारी,एच/पूर्व मनपा कार्यालय,प्रभात कॉलनी, सांताक्रुझ(पूर्व) यांच्याकडे दाखल केले. अर्जदाराने त्यात अशी तक्रार केली की, त्यांनी जोडपत्र अ नुसार जो अर्ज केला होता त्या अनुषंगाने संबंधित सार्वजनिक माहिती अधिका-यांनी त्यांना आजपर्यंत कोणतेही प्रत्युत्तर पाठविलेले नाही किंवा प्रत्युत्तर न पाठविण्याचे कारण देखील कळविलेले नाही. त्यानंतर अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदर प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१६.८.२०१० रोजी सुनावणी घेतली. सुनावणीत असे आदेश देण्यात आले की, जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता,इमारत व कारखाने यांनी अर्जदारास सदरची माहिती

दोन दिवसात देण्यात यावी. परंतु आज सुनावणी दरम्यान अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदारास अद्यापही कोणतीही माहिती मिळालेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार माहिती न मिळाल्यामुळे अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

वरील बाबींवरुन ही बाब निश्चित होते की, अर्जदाराचा मूळ अर्ज दि.११.६.२०१० रोजीचा असून प्रथम अपीलाच्या सुनावणीपर्यंत म्हणजे दि.१६.८.२०१० पर्यंत म्हणजे ज्यावेळी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाली तोपर्यंत अर्जदारास माहिती मिळालेली नव्हती म्हणूनच प्रथम अपीलीय अधिका-यांनी दोन दिवसात अर्जदारास माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहेत. अर्जदार अपिलार्थी आज सुनावणीस हजर आहेत परंतु उत्तरवादी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत. यावरुन असा निष्कर्ष निघतो की अर्जदाराला आजपर्यंत माहिती मिळालेली नाही. प्रथम अपीलीय अधिका-यांच्या आदेशाचे पालन करण्यात आलेले नाही व अर्जदाराचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम कलम ७ नुसार निकाली काढण्यात आला आहे म्हणून संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज नियमानुसार निकाली न काढल्यामुळे त्यांच्याविरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवाविषयक नियमाचा शिस्तभंग केल्याच्या कारणावरुन या अधिनियमाच्या कलम २०(२) नुसार कारवाईची शिफारस करण्यात यावी व सध्या कार्यरत असलेल्या जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येतात की, अर्जदाराला विनाशुल्क मागीतलेली माहिती हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी. त्यानंतरही अर्जदाराला माहिती न मिळाल्यास अर्जदार या आयोगासमोर अधिनियमाच्या कलम १८ खाली तक्रार करु शकतात. वरील आदेश देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक ३.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**<u>अपिल क्रमांक ६४३४</u>**

सदर प्रकरणात अर्जदाराला जन माहिती अधिकारी यांनी शनिवार दि.५.३.२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता त्यांच्या कार्यालयात अर्जदाराच्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध असल्यास ती पुरविण्याचे कबूल केल्यावरुन सदर पकरणी वरील बाबींची शहानिषा करण्यासाठी सदरचे अपील सोमवार दि.७.३.२०११ रोजी पुढील सुनावणीसाठी ठेवण्यात येत आहे.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३१४/अपील क्रमांक ६४३९/२०१०**

**श्रीमती ज्योतिका असवानी,**
**४४७, कृष्ण निवास, १४वा मार्ग,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.** **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता I/सी यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, विस्तारित इमारत,**
**४था मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (डेव्हलपमेंट प्लॅन)II,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, विस्तारित इमारत,**
**४था मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.** **......** **उत्तरवादी**

**क्रमांक-मुमाआ/५०००३/अपील क्रमांक ६४९१/२०१०**

**श्री.वरुण नरेश द्वारा जे.पी. घनशानी,**
**१००४-अे,पिरामल अपार्टमेंट्स, जुहू लेन,**
**अंधेरी, मुंबई-४०००४९.** **.....** **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता I(डेव्हलपमेंट प्लॅन),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, विस्तारित इमारत,**
**४था मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (डेव्हलपमेंट प्लॅन)II,**

**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, विस्तारित इमारत,**
**४था मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : अनुक्रमे ८.११.२०१०,२९.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

वरील दोन्ही प्रकरणांमध्ये अर्जदार अपिलार्थी यांनी मागीतलेली माहिती सारखीच आहे. अपिल क्रमांक ६४९१ मध्ये अर्जदाराने दि.१२.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(टी.पी.),२रा मजला,सी.एम.एस.ऑफीस इमारत, पालटर रोड, फोर्ट, मुंबई-४००००१, यांच्याकडे माहिती मागीतलेली आहे. सदरची माहिती ही Final & Original Entire file related to Plot No.४०२/CTS No. ६२,४०४/६०,४०६/५८ Prereirawadi, TPS III १५th Road,Bandra(W), Mumbai-५० व अपिल क्र.६४३९ मध्ये सुध्दा तीच माहिती मागीतलेली आहे. दोन्हीही प्रकरणात एकच जन माहिती अधिकारी आहेत व त्यामुळे सदर प्रकरणी संयुक्तपणे सुनावणी घेण्यात आली. सुनावणीदरम्यान असे निदर्शनास आले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही त्यामुळे अर्जदार यांनी या प्रकरणात प्रथम अपीलीय अधिका-यांकडे अपील दाखल केले आहे. त्याबाबत अपिल क्र.६४३९ मध्ये अपीलीय अधिका-यांनी दि.२४.९.२०१० रोजी आदेश पारित केले आहत. त्यात जन माहिती अधिकारी यांनी सर्व प्रयत्नांती फाईल शोधण्याचा प्रयत्न केला परंतु ती सापडली नाही. सदर फाईलचा कार्यालयात शोध घेण्याबाबत परिपत्रक काढून ते वेगवेगळया विभागांत पाठवण्यात आले परंतु त्यासंबंधात कुठल्याही प्रकारे उत्तर आलेले नाही. अशा परिस्थितीत अर्जदाराला डेप्युटी डायरेक्टर(टाऊनप्लॅनींग)/डायरेक्टर (टाऊन प्लॅनींग) जे टाऊन प्लॅनींगच्या रेकॉर्डच्याबाबत कस्टडीयन आहेत त्यांाच्याशी संपर्क साधण्याबाबत सांगण्यात आले व अपिल निकाली काढण्यात आले. त्याचप्रमाणे अपिल क्र.६४९१ मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाचे अवलोकन केले असता सुनावणीस अर्जदार अपिलार्थी गैरहजर आहेत. अर्जदाराने ७ जुलै,२०१० रोजी सदर प्रकरणी तारीख वाढवून देण्याबद्दल विनंती केली आहे. त्यावरुन अर्जदारास अपीलामध्ये इंटरेस्ट नाही असा निष्कर्ष काढण्यात येऊन अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात आले.

वरील दोन्हीही प्रकरणांमध्ये सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, सदरची माहिती ही डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनींग, पुणे यांच अखत्यारीत असू शकते व त्यासाठी दि.२१.१०.२०१० च्या पत्रान्वये डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनींग अँड व्हॅल्युएशन डिपार्टमेंट, सेंट्रल बिल्डिंग, ऑपोझीट ससून हॉस्पीटल,ससून रोड,पुणे स्टेशन यांना पत्र देण्यात आले आहे व त्यात त्यांना सदरची कागदपत्र पुरविण्याबाबत कळविण्यात आले आहे व यासंबंधी

प्लॅनींग सेक्शन,म्युनिसिपल कॉर्पोरेशन ग्रेटर मुंबई हे त्यांच्याशी यासंबंधी चर्चा करतील असेही म्हटले आहे.

वरील बाबी लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागीतलेल्या कागदपत्रांच्या मूळ अर्जाची प्रत डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनींग यांना पाठवावी व त्यानंतर दोघांनीही डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनींग,पुणे यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून अर्जदाराला विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्यासाठी ४ आठवडयांचा कालावधी दोघांतर्फे मान्य करण्यात आला त्यानंतरही अर्जदाराला माहिती न मिळाल्यास अर्जदार या आयोगासमोर अधिनियमाच्या कलम १८ खाली तक्रार करु शकतात.

डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनींग यांनी संबंधीत अधिकारी/कर्मचारी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदाराचा मूळ अर्ज आल्यास तशाप्रकारे कागदपत्रांचा शोध घेऊन कागदपत्र पुरविण्यासाठी उपलब्ध ठेवावीत व तसे जन माहिती अधिकारी यांना संबंधित अधिका-यांमार्फत सुचित करावे. वरील आदेश देउन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक ३.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

प्रत - डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनींग अँड व्हॅल्युएशन डिपार्टमेंट, सेंट्रल बिल्डिंग, ऑपोझ ीट ससून हॉस्पीटल,ससून रोड,पुणे

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

१)क्रमांक-मुमाआ/५०१७६/अपील क्रमांक ६४४०/२०१०

श्री.विश्वजीत चंद्रकांत चिंदरकर,
ऑफीस नं.५, निळकंठ शॉपिंग आर्केड,
विजया बँकेजवळ, आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई-४०००७१. ...... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त(दक्षता),
बृहन्मुंबई महापालिका मुख्यालय, विस्तारीत इमारत,
३रा मजला, महापालिका मार्ग,मुंबई-४००००१.

जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियंता(दक्षता),
बृहन्मुंबई महापालिका, अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प इमारत,
एन.एम.जोशी मार्ग, बकरी अड्डा, भायखळा(प.),
मुंबई-४०००११. ...... उत्तरवादी

२)क्रमांक-मुमाआ/५०१७८/अपील क्रमांक ६४३७/२०१०

श्री.विश्वजीत चंद्रकांत चिंदरकर,
ऑफीस नं.५, निळकंठ शॉपिंग आर्केड,
विजया बँकेजवळ, आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई-४०००७१. ...... अपिलकर्ता

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पश्चिम विभाग कार्यालय,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.

जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता(घ.क.व्य.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पश्चिम विभाग कार्यालय,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी

३)क्रमांक-मुमाआ/५०१७७/अपील क्रमांक ६४३८/२०१०

श्री.विश्वजीत चंद्रकांत चिंदरकर,
ऑफीस नं.५, निळकंठ शॉपिंग आर्केड,
विजया बँकेजवळ, आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई-४०००७१. ...... अपिलकर्ता

प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख अभियंता(घ.क.व्य.),
बृहन्मुंबई महानगरपालिका, छत्रपती शिवाजी मार्केट इमारत,

**४था मजला, पलटण रोड, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(घ.क.व्य.)**
**प.उ.कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका, सांताक्रुझ गॅरेज,**
**एस.व्ही.रोड, सांताक्रुझ बेस्ट डेपोसमोर, सांताक्रुझ(प.),**
**मुंबई-४०००५४. ...... उत्तरवादी**

## निर्णय

**द्वितीय अपीलाचा दिनांक : सर्व अपीले २१.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

वरील सर्व प्रकरणात अर्जदाराला प्रपत्र-अ नुसार माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेऊनही अर्जदाराला माहिती पुरविण्यात आल्याचे सांगण्यात आले. परंतु तीनही प्रकरणी अर्जदाराने या आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल करुन पुरविण्यात आलेल्या माहितीने समाधान झाले नाही असे म्हटलेले आहे. सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की. अर्जदाराची मूळ तक्रार जी आहे ती मुंबई महानगरपालिकेच्या अटी व शर्तीनुसार निविदांच्या आधारे पत्र कार्यादेश देवून व मंजूर नसलेल्या कोणत्याही बिलावर दंडात्मक कारवाई करण्यात येते का वगैरे माहिती मागण्यात आली होती. तसेच मुंबई महानगरपालिकेच्या अटी व शर्तीनुसार मंजूर झालेल्या निविदांच्या आधारे पत्र कार्यादेश दिल्यानंतर कंत्राटदाराने कामे पार पाडतांना कामात काही त्रुटी आढळल्यास त्यावर निविदातील अटी व शर्तीनुसार दंड आकारण्यात येतो. तसेच मंजुरी नसलेल्या निविदातील कोणत्याही बिलावर दंडात्मक कारवाई करण्यात येत नाही. अर्जदाराने प्रपत्र-अ मध्ये दिलेल्या कामासंबंधी अर्जदाराच्या म्हणण्यानुसार दंड(पेनल्टी) आकारण्यात येतो तो कोणत्या आधारावर आकारण्यात येतो? त्यासाठी काही अटी किंवा नियम आवश्यक आहे व त्यांना आकारण्यात आलेला जास्तीचा दंड किंवा पेनल्टी कशाच्या आधारावर लावला याबाबत त्यांनी अर्ज दिलेला आहे व त्याबाबत स्पष्टीकरण द्यावयास पाहिजे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार लावलेला दंड किंवा पेनल्टी नियमानुसार नाही. तरी यासाठी माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला तसे संबंधित लेखी स्पष्टीकरण मंगळवारी देण्याचे ठरले आहे व त्यासाठी अर्जदाराने सदर माहितीबाबतचे पत्र उपलब्ध करुन घ्यावे. तसेच यासंबंधी अर्जदाराला पेनल्टी किंवा दंड लावण्याच्या आधी कुठला पत्रव्यवहार, अर्जदाराशी किंवा विभागांतर्गत केलेला असेल तर त्याची प्रतही अर्जदाराला अर्जदाराने मागणी केल्यास निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी.

वरील आदेश देऊन तीनही अपिले निकाली काढण्यात येत आहे. अर्जदाराला यानंतरही माहितीबाबतची पूर्तता झाली नसेल तर अर्जदार या आयोगास अधिनियमाच्या कलम १८ खाली तक्रार करु शकतात.

मुंबई
दिनांक ३.३.२०११

(भास्कर पाटील)
प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०३२०/अपील क्रमांक ६४१४/२०१०

श्री.अनिल वेदव्यास गलगली,
२ जुना रबरवाला चाळ, काजूपाडा, साकीनाका,
मुंबई-४०००७२. ...... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,
मुख्य सचिवांचे कार्यालय,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,

**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ...... **उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी अर्जदार अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, मुख्य सचिव यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दि.२५.६.२०१० रोजी अर्ज दाखल केला असून सदर अर्जान्वये मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीनुसार दि.२७.७.२०१० रोजी अपिलकर्त्यास अवगत करण्यात आलेली आहे. तसेच या अधिनियमाच्या कलम २(च) मधील तरतुदीनुसार माहितीची व्याख्या निश्चित करण्यात आली असून प्राधिकरणाकडे प्रत्यक्षात असलेल्या स्वरुपातील माहिती अर्जदारास उपलब्ध करणे अभिप्रेत आहे. अर्जदाराने मागीतलेली माहिती ही कॅबीनेटच्या पेपर्स संबंधी आहे. अर्जदाराने दि.२४.९.२०१० च्या पत्राद्वारे राज्य मंत्रिमंडळ स्थापनेचा दिनांक,मंत्रिमंडळ बैठकीचा दिनांक,मंत्रिमंडळ बैठकांची संख्या इत्यादीबाबत तसेच मंत्रिमंडळ बैठकीचे इतिवृत्त कायम करण्याच्या पध्दती विषयी मागीतलेल्या माहितीबाबत दि.२७.७.२०१० च्या जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या पत्रानुसार समाधानकारक माहिती मिळाली असल्याचे कळविले आहे. परंतु प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळी खालील दोन मुद्यांची माहिती पुरविण्याची विनंती केली आहे.

१) मंत्रिमंडळ/मंत्रिमंडळ परिषदेतील उपस्थित/अनुपस्थित मंत्र्यांची माहिती.

२) बैठकीत कोणत्या मंत्री महोदयांनी कोणते विषय मांडले

याबाबत २२.१०.२०१०च्या पत्रान्वये प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय यांनी अर्जदाराला असे कळविले की, मंत्रिमंडळ बैठकीतील उपस्थित मंत्र्यांची नोंदविलेली उपस्थिती ही त्या बैठकीच्या इतिवृत्ताचाच भाग असते. मंत्रिमंडळ बैठकीशी संबंधित कागदपत्र देण्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८(i) दिलेल्या अपवादात बसत असल्यामुळे देणे बंधनकारक नाही. तसेच भारतीय घटनेच्या कलम १६६ अन्वये तयार करण्यात आलेल्या शासन कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार मंत्रिमंडळाशी संबंधित कागदपत्र व त्यामधील चर्चा ही गुप्त असते व त्यामुळे वरील सुनावणीच्यावेळी अपिलकर्त्यांनी मागणी केलेली वरील दोन मुद्यांची माहिती देता येत नाही असे कळविले.

सदर प्रकरणी सुनावणी दरम्यान अर्जदाराने फक्त मुद्दा क्र.१ बाबतचीच माहिती मिळण्याबद्दल आग्रह धरला. त्याबाबत मंत्रिमंडळ/मंत्रिपरिषदेतील उपस्थित वा अनुपस्थित मंत्र्यांची माहिती मागीतली व इतर माहितीबाबत समाधानी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. अर्जदाराने केलेला युक्तिवाद तसेच उत्तरवादी यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश यांचे अवलोकन केले असता या आयोगाच्या मते उत्तरवादी यांनी केलेला युक्तीवाद हा काही अंशी बरोबर नाही. मंत्रिमंडळातील सदस्यांची उपस्थिती वा अनुपस्थिती याबाबतची माहिती ही मंत्रिमंडळाच्या

कागदपत्रांचाच एक भाग असल्यामुळे अर्जदाराला ती पुरविता येत नाही हे म्हणणे बरोबर नाही. मंत्री मंडळातील कागदपत्रे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ८ (झ) मधील तरतुदीन्वये मंत्री मंडळाशी संबंधीत कागदपत्रे देण्यास माहिती अधिकारात सुट देण्यात आली आहे. मंत्री मंडळात सादर होणारे विषय किंवा त्यावर होणारी चर्चा व त्या अनुषंगाने होणारे इतिवृत्त याला या अधिनियमात संरक्षण देण्यात आलेले आहे. मात्र मंत्री मंडळाचे निर्णय झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जेव्हा संबंधीत विभागाकडुन आदेश काढण्यात येते ते आदेश व त्यावरील निर्णय मीमासा संबंधीत आदेशात नमुद करुन त्याला सर्वसाधारण कार्यप्रणालीत शासनाचे निर्णय असे संबोधीले जाते अथवा शासन आदेश संबोधीले जाते व ते मात्र जनतेस उपलब्ध होवु शकते अशी तरतुद ह्या अधिनियमाच्या कलम ८ (झ) च्या परंतुका मध्ये करण्यात आली नाही. मात्र मंडळाने घेतलेले निर्णयानंतर ते निर्णय उघड करणे आवश्यक आहे. तसेच ह्या आयोगाच्या मते मंत्री मंडळाच्या बैठकी काही आकस्मीक कारणांच्या निमित्त्याने होत असतात व त्याबद्दल ती माहिती सर्व सामान्यांना वर्तमानपत्राव्दारे होत असते त्यामुळे मंत्री मंडळाच्या निर्णयाच्या बाबत कागदपत्रे जोपर्यंत अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत माहिती न देणे व त्याबद्दल माहितीच्या अधिकारात माहिती मागता येत नाही. ही बाब सत्य असुन तरी मंत्री मंडळातील उपस्थिती सदस्य किंवा उपस्थितांची नावे ही बाब कलम ८ (झ) मध्ये येत नाही असे ह्या आयोगाचे मत आहे व म्हणुन बैठकीला उपस्थितांची संख्या, अन्य उपस्थितांची संख्या किंवा त्यांनी नावे ही बाब ह्या अधिनियमाच्या कलम ८(झ) चा भाग असु शकत नाही असे ह्या आयोगाचे मत आहे.

तसेच घटनेच्या तरतुदीमध्ये नमुद असलेल्या विशिष्ट तरतुदींच्या आधारे घटनेच्या कलम १६६ मा. राज्य पालांना शासनाचे कार्य व्यवहार कोणत्या पध्दतीने ह्याबाबत कार्य नियमावली करण्याचे अधिकार आहे, परंतु जी कार्य नियमावली तयार करण्यात आलेली आहे व त्यामधील भाग २ (सर्वसाधारण) वरील सुचना क्र. ३० प्रमाणे सुध्दा मंत्री मंडळात कागदपत्रे ही उक्त स्वरुपाची असतील असे स्पष्ट केले आहे व ही सुचना घटनेच्या कलम १६६ अन्वये असल्याने ह्या घटना उक्त तरतुदींच्या आधारे मंत्री मंडळाचे कागदपत्रे देणे बंधनकारक नाही. तसेच ह्या आयोगाच्या मते मंत्री मंडळाने घेतलेले निर्णय, चर्चा केलेले विषय त्याबाबतची घटनेच्या आधारे असुन कागदपत्रे देणे बंधकारक आहे. परंतु उपस्थितांची संख्या किंवा अनुपस्थित सदस्यांची संख्या किंवा त्यांची नावे हा भाग गोपनिय असु शकत नाही, असे ह्या आयोगाचे मत आहे व म्हणुन ह्या आयोगाच्या मते ती माहिती देण्यास अर्जदाराला देणे योग्य नाही. परंतु या आयोगाच्या मते मंत्रिमंडळाची बैठक ही बहुधा दर आठवडयाला असते तसेच काही महत्वाच्या कामानिमित्त आकस्मिक बैठक बोलावण्यात येते. तसेच मंत्रिमंडळात घेतलेले निर्णय प्रेस कॉन्फरन्स किंवा इतर माध्यमांद्वारे सर्वसामान्य जनतेसमोर मांडण्यात येतात व सार्वजनिकरित्या अवगत करण्यात येतात. त्यामुळे मंत्रिमंडळ बैठकीत उपस्थित असलेल्या मत्र्यांच्या उपस्थितीबाबत किंवा अनुपस्थितीबाबतची माहिती गोपनीय असू शकत नाही तसेच या अधिनियमाच्या कलम २२ नुसार शासकीय गुपिते अधिनियमाच्या १९२३ या कलमाच्या तरतुदीमुळे निष्प्रभ झालेली आहेत. या अधिनियमाच्या कलम २२ नुसार खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे -

या अधिनियमाच्या तरतुदी या शासकीय गुपिते अधिनियम, १९२३(१९२३ चा १९) यामध्ये, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाखेरीज कोणत्याही अन्य कायद्याच्या आधारे अंमलात असणा-या कोणत्याही संलेखामध्ये त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी अंमलात येतील.

अर्जदाराने सुनावणी दरम्यान या आयोगासमोर दि.२४ जून रोजीचे टाईम्स ऑफ इंडिया या न्यूज पेपरचे कात्रण दाखल केले असून त्याचे अवलोकन करण्यात आले. सदर कात्रणात केंद्रीय आयोगामार्फत मिळविलेल्या केंद्रीय मंत्रिमडळातील मंत्र्यांच्या उपस्थिती व अनुपस्थितीबाबतची माहिती देण्यात आली असून अर्जदाराच्या म्हणण्यानुसार जर केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री महोदयांची उपस्थिती/अनुपस्थिती याबाबतची माहिती या अधिनियमामार्फत उपलब्ध होऊ शकते तर राज्य मंत्रिमंडळाच्या सदस्यांची उपस्थिती बाबतची माहिती का उपलब्ध होऊ शकत नाही असा प्रश्न उपस्थित केला.

तसेच दि.२८.२.२०११ रोजी या आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेले अभिप्राय व त्यानुसार अर्जदाराने मागणी केलेली मंत्रिमंडळ सदस्यांची उपस्थिती वा अनुपस्थितीबाबतची माहिती नाकारणे योग्य नाही. म्हणून खालील आदेश पारित करुन सदरचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन ते निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, मुख्य सचिव यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई यांना असे आदेश देण्यात येतात की, हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसांच्या आज अर्जदाराने मागितलेली मुद्दा क्र.१ व दि.२५.६.२०१०(प्रपत्र अ नुसार)च्या माहितीच्या अर्जानुसार झालेल्या मंत्रीमंडळ बैठका व त्यात उपस्थित असलेल्या मंत्रिमंडळ सदस्यांची नावे व बैठकीस अनुपस्थित असलेल्या सदस्यांची नावे लेखी स्वरुपात  उपलब्ध असल्यास व अर्जदाराने ज्या कालावधीतील माहिती मागीतली आहे ती माहिती पुरवण्यात यावी.

वरील आदेशवजा सूचना देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे. तरीही अर्जदाराला सदरची माहिती वरील आदेशानुसार न मिळाल्यास ते या आयोगासमोर कलम १८ खाली तक्रार दाखल करु शकतात.

.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक ७.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०१९०/अपील क्रमांक ६४६१/२०१०**

**श्री. चेतन कोठारी,**
**५२ ओशियानिक अपार्टमेंट, डॉ.राजबली पटेल लेन,**
**बी.देसाई रोड, मुंबई-४०००२६. ...... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रबंधक,**
**महाराष्ट्र राज्य ग्राहक वाद निवारण आयोग,**
**प्रशासकीय महाविद्यालय इमारत रुम नं.१,२,५,६,**
**हजारीमल सोमाणी मार्ग, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,**
**महाराष्ट्र राज्य ग्राहक वाद निवारण आयोग,**
**प्रशासकीय महाविद्यालय इमारत रुम नं.१,२,५,६,**
**हजारीमल सोमाणी मार्ग, मुंबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २१.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ७.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी अर्जदार अपिलार्थी सुनावणीस हजर आहेत. अर्जदाराला त्याच्या म्हणण्याप्रमाणे संपूर्ण माहिती पुरविण्यात आलेली आहे. काही माहिती अप्राप्त होती ती सुध्दा या आयोगासमोर अर्जदारास उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अर्जदाराचे समाधान झाले आहे यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक ७.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३४४/अपील क्रमांक ६४६५/२०१०**

**श्री. इब्राहिम पीरमोहम्मद पटेल,**
**१४/६७ बी.डी.डी. चाळ, क्रॉस रोड,**
**शिवडी(प.), मुंबई-४०००१५.** ...... **अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा अवर सचिव(विधी),**
**अ शाखा, विधी व न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक(विधी),**
**अ शाखा, विधी व न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२.** ...... **उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ७.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

सदर प्रकरणी सुनावणीच्या वेळी अर्जदार अपिलार्थी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अर्जदाराने प्रपत्र-अ नुसार जी माहिती मागीतली होती त्यात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची प्रत तसेच सरकारी वकील, महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग(महाराष्ट्र सदन) नवी दिल्ली तसेच संबंधित सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्यात लेखी स्वरुपात झालेला पत्रव्यवहार व इतर माहिती मागीतलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक(विधी) विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपीलीय अधिकारी यांचेकडेही खुलासा दाखल केलेला आहे. या आयोगाच्या निदर्शनासही जन माहिती अधिकारी यांनी ती बाब आणून दिली आहे.सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली येथे अर्जदाराचे फौजदारी अपील क्र.९६२/१९८४ या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने दि.१५.७.९२ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द शासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष परवानगी याचिका न्यायालयाने दि.७.२.२००० रोजी फेटाळून लावली आहे व त्यासंबंधी वकीलामार्फन जन माहिती अधिकारी यांनी पहिल्यांदा केव्हा कळविण्यात आले, जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार

त्यांनी याबाबत सरकारी अभियोक्ता,सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली यांच्याकडे लेखी पत्राद्वारे चौकशी केली असता सदर संबंधी माहिती जास्त दिवस उलटून गेल्यामुळे उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे सदर माहिती अर्जदारास देता येत नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणात ॲडीशनल कमिशनर,एसीबी मुंबई वरळी युनिट यांच्याकडून सदर नस्ती मागवून ती अर्जदारास अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यासाठी अर्जदाराला २१.३.२०११ रोजी त्यांच्या कार्यालयात त्यांनी बोलावले आहे व तसे अर्जदारालाही अवगत केले आहे. सदर बाब अजदाराने मान्य केल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक ७.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०१८९/अपील क्रमांक ६४६२/२०१०**

**श्री. चेतन कोठारी,**
**५२ ओशियानिक अपार्टमेंट, डॉ.राजबली पटेल लेन,**
**बी.देसाई रोड, मुंबई-४०००२६. ...... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप अधिष्ठाता,**
**के.ई.एम. हॉस्पीटल,**
**डॉ.इ.बोर्जेस रोड,**
**परेल, मुंबई-४०००१२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिष्ठाता,**
**के.ई.एम. हॉस्पीटल,**
**डॉ.इ.बोर्जेस रोड,**
**परेल, मुंबई-४०००१२. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २१.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ७.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

सदर प्रकरणी अर्जदार अपिलार्थी यांनी माहितीसाठी केलेला अर्ज माहिती अधिकारी डॉ.अजय राणा, सहाय्यक अधिष्ठाता,आर.ए.स्मारक रुग्णालय,परळ, मुंबई-१२ यांच्याकडे प्राप्त झाला. सदर प्रकरणी ३.९.२०१० रोजी संबंधित विभागाने माहिती पैसे भरुन घेऊन जाण्याबाबत लेखी कळविले. परंतु अर्जदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रपत्र-ब नुसार अपील दाखल केले.

अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदाराला पथम अपीलाचा कुठलाही निर्णय न मिळाल्यामुळे अर्जदाराने २१.१०.२०१० रोजी सदरचे अपील या आयोगाकडे दाखल केले. तसेच अर्जदाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मान्य केलेली आहे. सदर प्रकरणी प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नाही त्यामुळे तसेच अर्जदारास कोणत्याही प्रकारची सुनावणीची नोटीस पाठविण्यात आलेली नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१४.३.२०११ रोजी दुपारी २.०० वाजता सदर प्रकरणी सुनावणी घेण्याचे मान्य केले. त्याचप्रमाणे अर्जदाराचा अर्ज या अधिनियमाच्या कलम ७ नुसार निकाली काढला आहे किंवा नाही तसेच जन माहिती अधिकारी यांचे सुनावणी दरम्यान स्पष्टीकरण घेऊन अर्जदाराला जी माहिती अजूनही अप्राप्त आहे ती माहिती उपलब्ध करुन देतील व झालेल्या विलंबाबाबत प्रथम अपीलीय अधिकारी या नात्याने त्यांचे अभिप्राय लेखी स्वरुपात आदेशात नमूद करतील. जर जन माहिती अध्णिकारी हे सदर प्रकरणी माहिती उशिरा देण्याबद्दल जबाबदार आढळले तर त्यांच्याविरुध्द या अधिनियमाच्या कलम २०(२) नुसार कारवाई करण्याबाबतची शिफारस या आयोगाने केलेली आहे असे गृहित धरुन योग्य ते आदेश पारित करतील व अर्जदाराला शक्य तेवढी उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देतील. सदर प्रकरणी अर्जदाराला आदेशाची प्रत

व्यक्तीश: अथवा टपालाने प्राप्त करुन देण्यात यावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास ते या आयोगाकडे ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करु शकतात.

वरील आदेशवजा सूचना देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक ७.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३४१/अपील क्रमांक ६४७६/२०१०**

**श्री. अर्जूनलाल एम. छाब्रिया,**
**बेला विस्टा,फ्लॅट नं.१५, ३रा मजला,**
**लेक आणि एल.आय.सी. ऑफीससमोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा, मुंबई-४०००५०.** **......** **अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**

**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ...... **उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ८.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी अर्जदाराच्य वतीने श्री.कापसे हजर होते. श्री.कापसे तसेच उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अर्जदाराचा अर्ज दि.१३.७.२०१० चा असून सदर अर्ज जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्राप्त झाला. अर्जदाराने मागीतलेली माहिती पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे सदर अर्ज त्यांच्याकडे पाठविण्यात आला व त्याच पत्रान्वये अर्जदारालाही कळविण्यात आले. अर्जदाराने त्यांच्या अर्जात श्री. अशोक शिवाजी खांडेकर यांनी पोलीस अधिकारी यांच्याकडे पाठविलेल्या तक्रार अर्जावर कोणती कारवाई केली याबाबतची माहिती मागीतली होती. सदरची माहिती संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये केलेल्या तक्रारीसंबंधीची असल्यामुळे अर्जदाराचा अर्ज मुंबई पोलीस आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आला परंतु अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदाराला आजपर्यंत कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही. यास्तव खालील आदेश पारित करुन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी,मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यांना अशा सूचना देण्यात येतात की, जन माहिती अधिकारी,गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अर्जदाराच्या दि.१३.७.२०१० च्या अर्जानुसार मागीतलेली माहिती अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाच्या आत विनाशुल्क पाठवावी.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक ८.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३४५/अपील क्रमांक ६४७७/२०१०**

**श्री. इब्राहिम पीरमोहम्मद पटेल,**
**१४/६७ बी.डी.डी. चाळ, क्रॉस रोड,**
**कॉ.आर.एम.पाटील मार्ग,**
**शिवडी(प.), मुंबई-४०००१५. ...... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिवांचे कार्यालय,**
**गृह विभाग, ७वा मजला,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिवांचे कार्यालय,**
**गृह विभाग, ७वा मजला,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ५.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ८.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी यांनी पब्लीक इर्न्फमेशन ऑफीसर,आफीस ऑफ द सेक्रेटरी, होम डिपार्टमेंट,एसीबी सेक्शन यांच्या कार्यालयात अर्ज करुन खालील २ मुद्यांची माहिती मागीतली होती.

१) ज्या कर्मचा-यांच्या बाबतीत अेसीबीच्या बाबत केसेस आहेत व ज्यांना न्यायालयात गुन्हा सिध्द न झाल्यामुळे सोडण्यात आले आहे त्यांच्याबाबत एनओसी किती दिवसात द्यावयास पाहिजे याबाबत शासन निर्णय किंवा परिपत्रक

२) एनओसी द्यावयाची झाल्यास ॲडीशनल कमिशनर/एसीबी, मुंबई यांनी किती दिवसात एनओसी द्यावयास पाहिजे याबाबत माहिती.

सदर प्रकरणी मुद्दा क्र.१ ची माहिती अर्जदाराला देण्यात आलेली आहे. मुद्दा क्र.२ बाबत माहिती उपलब्ध नसल्यामुळे सदरची माहिती अतिरिक्त आयुक्त, एसीबी(मुंबई) यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी असे अर्जदाराला कळविण्यात आले आहे. तसेच अर्जदाराचा अर्ज संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्याबाबत सहाय्यक जन माहिती अधिकारी यांना लेखी सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि सदर अर्ज हस्तांतरित करण्यात आलेला नाही. तसेच अर्जदाराला जन माहिती अधिकारी(पोल-२) यांनी कार्यासनात समक्ष भेट दिली त्यावेळी त्यांनी विचारलेली माहिती कार्यासनात उपलब्ध नाही व अर्जदाराला अतिरिक्त आयुक्त,एसीबी, मुंबई यांच्या कार्यालयात अर्ज करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले होते. अर्जदाराला याबाबत तोंडी मार्गदर्शन करण्यात आले लेखी स्वरुपात माहिती दिलेली नाही. वरील दोन मुद्यांच्या संदर्भात अर्जदाराला न्यायालयीन खटल्यातून निर्दोष मुक्तता झाल्यानंतर सेवेत पुनःस्थापित करण्याबाबत अद्यावत शासन निर्णयाची प्रत दि.७.५.२०१० रोजी देण्यात आली असून त्याची पोच घेण्यात आलेली आहे. तसेच मुद्दा क्र.२ बाबत सदरची माहिती ही अतिरिक्त आयुक्त,एसीबी(मुंबई) यांच्या कार्यालयाकडून उपलब्ध होईल असे अर्जदाराला सांगण्यात आले होते. सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झालेली दिसत नाही. वरील प्रकरणात सुनावणी घेतली तेव्हा असे निदर्शनास आले की, अर्जदाराला मुद्दा क्र.२ नुसार किती दिवसात निर्दोष मुक्तता झालेल्या कर्मचा-यांसंबंधीत एनओसी देणे अपेक्षित असते व त्यास काही कालमर्यादा आहे काय? याबाबतची माहिती अद्यापही मिळालेली नाही. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३) नुसार अर्जदाराचा अर्ज ॲडीशनल कमिशनर(एसीबी) वरळी, मुंबई यांच्या कार्यालयास हस्तांतरीत करुन अर्जदाराला माहिती देणे अपेक्षित होते परंतु तसे झालेले दिसत नाही. अर्जदाराने सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आणले की, अर्जदारासाखेच इतर सरकारी कर्मचारी ज्यांना दोषमुक्त करण्यात आलेले आहे त्यांच्याबाबत एनओसी लवकर देण्यात आली तर अर्जदाराच्या बाबत ती ७-८ वर्षानंतर देण्यात आली आहे. याबाबतचे स्पष्टीकरणसुध्दा जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे अर्जदाराला माहिती देतांना करावे. वरील सूचनावजा आदेश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

१)तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री.वसावे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.नवनाथ वाठ यांनी अर्जदाराचा दि.५.११.२०१० चा अर्ज,त्यात

मागीतलेली मुद्दा क्र.२ ची माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासाठी अतिरिक्त पोलीस आयुक्त(एसीबी), वरळी, मुंबई यांच्या कार्यालयास आठ दिवसाच्या आत पाठवावा.

२)अतिरिक्त पोलीस आयुक्त(एसीबी), वरळी, मुंबई त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराला मुद्दा क.२ ची माहिती व अर्जदारास जी एनओसी दिलेली आहे त्याबाबत लागलेल्या विलंबाबाबतचे स्पष्टीकरण या बाबतची माहिती १० दिवसात अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक ८.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

प्रत - अतिरिक्त पोलीस आयुक्त/एसीबी,पांडुरंग भुतकर मार्ग, पोस्ट सेंच्युरी मिल, वरळी, मुंबई.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**१) क्रमांक-मुमाआ/५०३४६/अपील क्रमांक ६४७८/२०१०**
**२) क्रमांक-मुमाआ/५०३४७/अपील क्रमांक ६४७९/२०१०**
**३) क्रमांक-मुमाआ/५०३४८/अपील क्रमांक ६४८०/२०१०**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,**
**२०४, राजबाग,दलुचंद को.ऑप.हौ.सो.लि.,**
**२७१, सर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई-१९. ...... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,**
**इ.प्र. शहर, ई विभाग महापालिका कार्यालय,**
**शेख हफीजद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इ.प्र. शहर, ई विभाग महापालिका कार्यालय,**
**शेख हफीजद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४००००८. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : अनुक्रमे ९.११,११.११,१०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ८.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

या तीनही प्रकरणांमध्ये अर्जदार श्री.प्रकाश नवाथे आहेत व जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता(इ.प्र.)शहर, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, म.न.पा.ई विभाग कार्यालय, भायखळा, मंबई-४००००८ हे आहेत. तीनही प्रकरणांत अर्जदार अपिलार्थी व उत्तरवादी साखेच असल्यामुळे एकत्रित सुनावणी घेण्यात आली व खालील निर्णय देऊन आदेश पारित करण्यात आले.

अर्जदार अपिलार्थी यांना प्रपत्र-अ नुसार मागीतलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे. दि.१०.११.२०१० रोजी अर्जदाराने अपिल क्रमांक ६४८० प्रकरणी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली आहे-

सकर्युलर नं.HE/५९/EEWW(O & R) ता.३०.१०.१९७५ प्रमाणे सहापेक्षा जास्त मजले असलेल्या इमारतींना २७०अ प्रमाणपत्र देण्याचा अधिकार असिस्टंट इंजिनिअरना नाही, तरीही

ता.१४.७.०५ रोजी अकरा मजली राजबागसाठी २७०ए प्रमाणपत्रावर असिस्टंट इंजिनिअरनी सही केलेली आहे. सदर प्रमाणपत्र अवैध ठरल्यास ता.१६.९.०४ चे बी.सी.सी. अवैध ठरणार किंवा कसे याची माहिती देण्यात यावी.

तसेच अपिल क्रमांक ६४७९ मध्ये अर्जदाराने दि.११.११.२०१० रोजी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली आहे-

१)क्र.सआएफउ/२२२३/इ.व का. दि.२५.५.०७

२) No.ACFN/३३९६१ BF dt.५.६.२००९

३) No.ALFN/८८७/AEBF dtd. १.११.२००७

वरील तीन पत्रावरुन असे दिसून येते की, ता.२९.१.०२ च्या सँक्शन्ड प्लॅनमध्ये फेरफार करुन राजबागचे बांधकाम करण्यात आले आहे. तसेच ता.१६.९.०४ च्या कंप्लिशन प्लॅनप्रमाणेही बांधकाम झालेले नाही. असे असतांना राजबागला दिलेल्या बी.सी.सी.च्या खरेपणाबाबत माहिती देण्यात यावी.

तसेच अपिल क्रमांक ६४७८ या प्रकरणात दि.९.११.२०१० रोजी अर्जदाराने खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली आहे-

विषयांकित कागदपत्रांचा इमारत प्रस्ताव, ई विभाग यांनी ता.५.९.०५ रोजी स्विकार केलेला आहे. सदर कागदपत्रातील नमूद झालेल्या सर्व गोष्टिंशी/मजकुराशी इमारत प्रस्ताव सहमत आहे किंवा कसे याची माहिती देण्यात यावी.

वरील तीनही प्रकरणी मागीतलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अर्जदाराची माहिती प्रश्न स्वरुपात आहे. तसेच अर्जदाराने सुनावणी दरम्यान अशी तक्रार केली आहे की, संबंधित अधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र बरोबर नाही तसेच दुस-या विभागाने यासंबंधी दिलेल्या प्रमाणपत्रासंबंधी चुका केलेल्या आहेत. म्हणून अर्जदाराच्या म्हणण्यानुसार या प्रकरणी वारंवार तक्रार करुनसुध्दा संबंधित अधिका-यांनी दखल घेतलेली नाही. उत्तरवादी यांच्या म्हणण्यानुसार मूळ अभिलेखावरुन जी माहिती उपलब्ध होती ती अर्जदाराला पुरविण्यात आलेली आहे. अर्जदाराच्या तक्रारीवरुन असे निदर्शनास आले की, दि.२९.४.२००२च्या सँक्शन प्लॅनमध्ये फेरबदल करुन राजबागचे बांधकाम करण्यात आले आहे. तसेच दि.१६.९.०४ च्या कंप्लीशन प्लॅनप्रमाणे बांधकाम झ ालेले नाही. असे असतांना राजबागला दिलेल्या बी.सी.सी.च्या खरेपणाबाबत माहिती देण्यात यावी. थोडक्यात अर्जदाराच्या म्हणण्यानुसार खोटे प्रमाणपत्र देण्यात आले व बी.सी.सी. देण्यात आली आहे.अर्जदाराने मागीतलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अर्जदाराला ही बाब समजावून सांगण्यात आली की अभिप्राय तसेच प्रश्नरुपात माहिती व केलेल्या तक्रारीवर कारवाई या बाबी माहितीच्या अधिकारात बसत नाहीत. अर्जदारास मूळ प्रमाणपत्राबाबत किंवा बीसीसीच्या दिलेल्या प्रमाणपत्राबाबत कोणत्याही प्रकारची कारवाई अपेक्षित असल्यास अर्जदाराने मुंबई महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे तक्रार करुन दाद मागावी. त्यानंतरही कोणतीही कारवाई न झाल्यास मुंबई उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल करुन जर सँक्शन प्लॅनप्रमाणे काम झाले नसेल किंवा दिलेले सर्टिफिकीट खोटे किंवा सत्यतेवर आधारीत नसेल तर ते दाद मागू शकतात. वरील सूचना वजा आदेश देऊन अर्जदाराची तीनही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

मुंबई (भास्कर पाटील)
दिनांक ८.३.२०११ प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-रामाआ/४९९८०/अपील क्रमांक ६६५०/२०१०

श्री. आत्माराम पुरुषोत्तम पाटील,
मु.पो.नांदगाव, द्वारा- तारापूर,
ता.पालघर, जि.ठाणे-४०१५०१. ...... अपिलकर्ता

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी,
तारापूर कार्यालय,तारापूर,
ता.पालघर, जि.ठाणे.

**जन माहिती अधिकारी तथा तलाठी,**
**साझा-नांदगाव, द्वारा-तारापूर,**
**ता.पालघर, जि.ठाणे-४०१५०१** ...... **उत्तरवादी**

## निर्णय

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २८.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १०.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी या आयोगासमोर दि.२८.९.२०१० रोजी द्वितीय अपील सादर केले आहे. सदर अपीलात त्यांनी श्री.बी.पी.सावंत, मंडळ अधिकारी,तारापूर व संबंधीत तलाठी यांच्यासंबंधात तक्रार केलेली आहे. सदर तक्रार सर्व्हे नं.४/२ क्षेत्र ६ गुंठे,सर्व्हे नं.४/३ क्षेत्र ७ गुंठे, सर्व्हे नं.४/४ क्षेत्र ७ गुंठे मौजे नांदगाव येथील जमिनीबाबतची आहे.या प्रकरणात अर्जदार अपिलकर्ता हे सदर जमिनीचे मालक असून त्यावर त्यांचा ताबा असून श्री.सुभाष मदन राउत व इतर यांनी या प्रकरणात त्यांच्यावतीने नोंद घेण्याबाबतची तक्रार केलेली आहे. तरी याबाबत तहसिलदार पालघर यांनी दि.३.७.०९ रोजी श्री.सुभाष राऊत यांना उत्तर देऊन असे कळविले आहे की, श्री.आत्माराम पाटील यांचा दावा फेटाळण्याबाबत हुकुमनामा झालेला आहे मात्र सदर हुकुमनाम्यामध्ये वरील मिळकतीबाबतची नोंद दाखल करता येणार नाही याबाबत आपण न्यायालयाकडून “विरुध्द कब्जाहक्काबाबात(Adverse position)”मालकी शाबीत करुन घ्यावी व तद्नंतरच आपले अर्जाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. तरी वरील विषयाबाबतचा आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे कळविले आहे. असे असूनसुध्दा सदर प्रकरणात दि.७.३.०९ च्या पत्राचा उल्लेख देऊन मंडळ अधिकारी यांनी यासंबंधी मालमत्तेसंबंधी नोंद रद्द असा शेरा मारलेला आहे व त्यास तालुका आदेश क्र.महसूल/आरटीएस/तक्रार रजि.नं.२/०८ दि.३.७.०९ कावि/२३४ अन्वये नोंद रद्द असे हक्काचे पत्रक गाव नं.६च्या नोंदीवरुन दिसते. त्यात नोंद रद्द असे म्हटले आहे.तरी तहसिलदार पालघर यांनी सदर प्रकरणी कागदपत्रांची योग्य ती चौकशी करुन घेतलेल्या नोंदी नियमानुसार व कायद्यानसार घेतलेल्या आहेत किंवा नाहीत याची चौकशी करावी व अर्जदाराला तसे लेखी कळवावे.

वरील आदेश देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक १०.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-रामाआ/४९९८४/अपील क्रमांक ६६५२/२०१०**

**श्री. चेतन कोठारी,**
**५२, ओशियानिक अपार्टमेंट,डॉ.आर.पटेल रोड,**
**बी.देसाई रोड विरुध्द बाजूस, मुंबई-४०००२६. ...... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरिक्षक(आ.),**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ उपसहाय्यक पोलीस महानिरिक्षक(आ.-१),**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १०.३.२०११**

**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेत असतांना अर्जदाराने जोडपत्र-अ नुसार जो अर्ज दिलेला आहे त्यातील मुद्दा (a)बाबतच्या माहितीची अर्जदाराला आवश्यकता नाही व सध्या त्यांना ती नको आहे. अर्जदाराला इतर माहिती मिळालेली आहे परंतु सदर अर्जातील मुद्दा(b) व (e) बाबतची माहिती अर्जदारास अजून मिळालेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी याबाबत दिलेल्या निर्णयानुसार अर्जदारास या अधिनियमाच्या कलम ८(५) नुसार सदर माहिती पुरविता येत नाही असे म्हटले आहे ते बरोबर नाही असे आयोगाचे मत आहे. कारण मुद्दा(b) व (e)मध्ये अर्जदाराला गेल्या १० वर्षातील जे पोलीस अधिकारी/कर्मचारी निलंबीत करण्यात आले त्यांची नावे व हुद्दे तसेच अँटी करप्शन डिपार्टमेंटने अँटीकरप्शनच्या भ्रष्टाचाराबाबत ज्या पोलीस अधिका-यांविरुध्द केसेस दाखल केलेल्या त्या अधिका-यांची नावे व हुद्दा याबाबतची माहिती हवी आहे व सदर माहिती देण्यास हरकत नाही असे या आयोगाचे मत आहे. म्हणून खालील आदेश पारित करुन अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात येत आहे

जन माहिती अधिकारी याना असे आदेश देण्यात येतात की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या वेगवेगळया विभागात अर्जदाराचा अर्ज पाठवून मुद्दा क्र.(b) व (e) या दोन मुद्यांची माहिती संकलीत करुन अर्जदाराला देण्याबाबत लेखी सूचना प्रत्येक जिल्हा व संबंधित मुख्यालय यांना कळवून सदरची माहिती अर्जदाराला विनाशुल्क,त्याने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत डाकेने उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यासाठी जन माहिती अधिकारी यांना हे आदेश मिळाल्यापासून ४ आठवडयांचा अवधी देण्यात येत आहे. ज्या विभागाकडून माहिती उपलब्ध होणार नाही त्याबाबात अर्जदाराला तसे सुचित करावे. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार या आयोगासमोर तक्रार करु शकतात.

वरील आदेशवजा सूचनादेऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक १०.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-रामाआ/४९९८१/अपील क्रमांक ६६५१/२०१०**

**श्रीमती डी.पी.कामथ,**
**सी-१०,विकास बिल्डिंग, रामचंद्र लेन,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४. ...... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण निरिक्षक,**
**शिक्षण निरिक्षक(पश्चिम) बृहन्मुबई,**
**इस्माईल युसूफ कॉलेज कंपाऊंड, जोगेश्वरी(पूर्व),**
**मुंबई-४००००६०.**

**जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**वेतन व भत्ते निर्वाह निधी पथक,**
**शिक्षण निरिक्षक(पश्चिम) बृहन्मुबई,**
**इस्माईल युसूफ कॉलेज कंपाऊंड, जोगेश्वरी(पूर्व),**
**मुंबई-४००००६०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : -**
**सुनावणीचा दिनांक : १०.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी अर्जदाराने प्रपत्र-अ नुसार मागणी केलेली माहिती उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी श्रीमती पगारे यांनी देण्याचे कबूल केले. तसेच सुनावणी दरम्यान अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांची शिफारस देणारे व परिचित असे ३ अर्जदार आहेत त्यांनीही याच प्रकारची माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागीतली आहे व या आयोगासमोर त्याचप्रमाणे

द्वितीय अपीलेही दाखल केलेली आहेत. सदर माहिती त्यांनाही उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्या तक्रारींचे निवारण होईल. सदर ३ अर्जदारांची नावे खालीलप्रमाणे आहेत-

१) श्री.बी.एच. दोशी

२) श्री.रागेन भावसार

३) श्रीमती सुवासिनी कामत

माहिती अधिकारी यांनी कबूल केल्याप्रमाणे अर्जदारांस सदर माहिती पुरविण्यासाठी ८ दिवसांचा कालावधी मागीतलेला आहे.अर्जदाराने सहाव्या वेतन आयोगाच्या ॲरीअर्स संबंधी व डीपॉझीट संबंधीही माहिती मागीतलेली आहे. सदर माहितीही जन माहिती अधिका-यांनी अर्जदाराला देण्याचे कबूल केले. तरी माहिती अधिका-यांनी वर नमूद केल्याप्रमाणे सर्व माहिती अर्जदारांस त्यांनी दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने आठ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**

**दिनांक १०.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-रामाआ/४९९८२/अपील क्रमांक ६६५३/२०१०**

**श्री. क्लारेन्स मॉंटेरो,**
**३०३-A,आवर लेडी ऑफ वलेकनी,**
**मेरीनगर, ऑपोझीट माहिम रेल्वे स्टेशन,**
**माहिम(प.), मुंबई-४०००१६. ...... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,**
**जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर(प.), मुंबई-४०००२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,**
**जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर(प.), मुंबई-४०००२८. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १०.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी अर्जदार अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इमारत व कारखाने)जी-उत्तर विभाग यांच्याकडे माहिती मागीतलेली दिसून येते. सदर प्रकरणी माहिती न दिल्यामुळे अर्जदाराने प्रथम अपील दि.१०.६.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी अर्जदार व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून असे आदेश दिले की, माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या तक्रारीनुसार अनधिकृत व नियमबाहय बांधकाम आढळून आल्यास नियमाप्रमाणे योग्य ती कारवाई करावी व अर्जदारास तसे उत्तर द्यावे. अर्जदाराची मूळ तक्रार ही पहिल्या व दुस-या मजल्यावरील स्ट्रक्चरल चेंजेसबाबत होती व त्याबाबत अर्जदारास रु.२७/- चा भरणा करुन माहिती घेऊन जावी असेही कळविले आहे.त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यामुळे अर्जदाराने या आयोगाकडे अधिनियमाच्या १९(३)नुसार द्वितीय अपील दाखल केले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार प्रथम अपीलीय

अधिकारी यांनी योग्य ते आदेश पारित करुनही नियमबाहय बांधकामाबाबत ॲक्शन व रिप्लाय दिलेला नाही व यासंबंधी ते माहिती अधिका-यांना जवळपास १४ वेळा भेटूनही योग्य ती कारवाई झाली नाही व आदेशानुसार योग्य ते उत्तरही मिळालेले नाही.

दि२४.९.२०१० रोजी श्री.यु.एस.वर्टी,आर्किटेक्ट यांना डेप्युटी चिफ इंजिनिअर(बिल्डिंग प्रपोझल्स)शहरे यांनी असे उत्तर दिले की,Flat No.१०३/२०३ at building A known as OUR LADY OF WAILNKANNI TOWER is hereby regularized व सदर पत्राची प्रत मालक श्रीमती नीना बाबुराज व श्री.बाबुराज कनकप्पन यांना व असिस्टंट कमिशनर जी/नॉर्थ वार्ड यांना दिली. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर(बिल्डिंग प्रपोझल)शहरे-III,स्टेट पब्लीक इन्फर्मेशन ऑफीसर यांनी सदरच्या नस्तीचे अवलोकन केले असता असे आढळून आले की, यासंबंधी असे कुठलेही प्रपोझल मिळालेले नाही व पहिल्या व दुस-या मजल्यावरील फ्लॅटच्याबाबतीत असा कुठलाही प्रस्ताव नाही. यासंबधी असे कळविण्यात येते की, After perusal of the records no flats from १st to २nd floor are approved as connected to each other or any separate proposl for connecting १st and २nd floor flat is received by this office. सदरचे पत्र जन माहिती अधिकारी तथा एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर(बिल्डिंग प्रपोझल)शहरे-III यांनी अर्जदाराला ३.३.२०१० नुसार पाठविलेले आहे व त्याची प्रत अर्जदाराने रेकॉर्डवर ठेवली आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार दिलेली माहिती ही दिशाभूल करणारी आहे. एका अधिका-यांनी प्रस्तावास मान्यता दिलेली आहे तर दुस-या अधिका-यांनी अशाप्रकारचे कोणतेही पेंडींग प्रपोझल किंवा त्यासाठी दिलले ॲप्रुव्हल त्यांच्या नस्तीत नाही असे कळविले आहे. या प्रकरणी अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार १ महिन्याच्या आत कोणतीही कारवाई झालेली नाही व ही बाब सत्य आहे. तसेच सदर प्रकरणी अर्जदाराला डेप्युटी चिफ इंजिनिअर यांनी दिलेले पत्र दि.२४.९.२०१० चे असून त्यासही २ महिन्यांचा अवधी झालेला आहे. तसेच अर्जदार बरेच वेळा स्वत: जाऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कुठलीही माहिती दिलेली नाही. सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) नुसार निकाली काढलेला नाही. तसेच वरील प्रकरणावरुन जन माहिती अधिकारी यांची ॲप्रुव्हल दिल्यानंतरच माहिती देऊ अशा प्रकारची प्रवृत्ती लक्षात येते. तसेच जर डेप्युटी चिफ इंजिनिअर यांनी दि.२४.९.२०१० रोजी सदर प्रकरणी दुरुस्तीला मंजुरी दिलेली असल्यास(नकाशाला) दिनांक ३.३.२०१० रोजी अर्जदाराला कुठल्याही प्रकारचे असे प्रपोजल किंवा ॲप्रुव्हल प्रलंबित नाही हे कळविणे म्हणजे उपलब्ध असलेली माहिती न कळविल्यासारखेच आहे.

वरील बाबी लक्षात घेता संबंधीत जन माहिती अधिकारी यांना सदर प्रकरणी दोषी ठरविण्यात येऊन त्यांच्याविरुध्द त्यांना लागू असलल्या सेवाविषयक नियमांचा भंग केल्याच्या कारणावरुन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस या अधिनियमाच्या कलम २०(२) प्रमाणे करण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश मिळाल्यापासून सद्यपरिस्थिती काय आहे, २४.९.२०१० चे पत्र खरे आहे की ३.३.२०१० चे पत्र खरे आहे याबाबतचा अहवाल अर्जदाराला लेखी स्वरुपात कळवून त्याची १ प्रत या आयोगाला पाठवावी.

प्रथम अपीलीय अधिकारी यांना असे सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणी कार्यरत असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्यावर वर शिफारस केल्यानुसार व त्यांना लागू असलेल्या नियमानुसार कारवाई करुन ३ महिन्याच्या आत अहवाल या आयोगाला सादर करावा. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि.३.३.२०१० चे दिलेले पत्र व डेप्युटी चिफ इंजिनिअर यांनी दिलेले

२४.९.२०१० चे पत्र यातील तफावतीबाबतचे पत्र या आयोगाला पाठवावे व सदर पत्राची प्रत अर्जदाराला हे आदेश मिळाल्यापासून ८ दिवसाच्या आत पाठवावी.

वरील आदेश पारित करुन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक १०.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-रामाआ/४९९८३/अपील क्रमांक ६६५४/२०१०**

**सर्वश्री. दत्ताराम पेडामकर,रामलाल पाल व रमेश हूडगीकर,**
**मरीअम्मा नगर, रुम नं.एम-२२३, नेहरु सेंटर मागे,**
**डॉ.ए.बी. रोड, वरळी, मुंबइ-१८.** ...... अपिलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,**
**जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**ना.म. जोशी मार्ग, मुंबई-४०००१३.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,**
**जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**ना.म. जोशी मार्ग, मुंबई-४०००१३. ...... उत्तरवादी**

## निर्णय

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १०.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणी अर्जदार अपिलार्थी यांनी मागीतलेली माहिती त्यांनी अर्ज केला तेव्हा उपलब्ध नव्हती. त्यानंतर अन्य कार्यालयाकडून दि.२१.८.२०१० रोजी सदर माहिती प्राप्त झालेली आहे व ती अर्जदाराला देण्यास जन माहिती अधिकारी तयार आहेत. तसेच उत्तरवादी यांच्या म्हणण्यानुसार ज्या अर्जदाराने मूळ अर्ज दाखल केला त्यांच्याऐवजी दुस-याच व्यक्तीने द्वितीय अपील दाखल केलेले आहे. परंतु मूळ अर्जदार व द्वितीय अपील दाखल करणारे अर्जदार हे दोघेही आज हजर असल्यामुळे मूळ अर्जदाराला माहिती देऊन त्यांची स्वरक्षरी घ्यावी असे आदेशित करण्यात आले. यास्तव अर्जदाराने याबाबत केलेली तक्रार शिल्लक रहात नाही व मूळ अर्जदारास माहिती दिलेली असल्यामुळे अर्जदाराचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक १०.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-रामाआ/४९९७५/अपील क्रमांक ६६४५/२०१०**

**श्री.सुधाकर निट्टेकर/श्री.जयंतीलाल शाह,**
**शॉप नं.४०, शास्त्री नगर म्युनिसिपल मार्केट, संत ज्ञानेश्वर मार्ग,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ...... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त(बाजार),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक आयक्त(बाजार) यांचे कार्यालय,**
**महात्मा ज्योतिबा फुले मार्केट,१ला मजला,डॉ.डी.एन.रोड,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(बाजार),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक आयक्त(बाजार) यांचे कार्यालय,**
**महात्मा ज्योतिबा फुले मार्केट,१ला मजला,डॉ.डी.एन.रोड,**
**मुंबई-४००००१.**

**बृहन्मुबई महानगरपालिका, बाजार विभाग(प.उपविभाग),**
**सहाय्यक अधिक्षक बाजार(प.उपविभाग), ३रा मजला,**
**आर.के.पाटकर मार्ग,भाभा हॉस्पीटलजवळ,बांद्रा(प.),**

**मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

## निर्णय

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १०.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अर्जदार अपिलार्थी यांनी सदर प्रकरणात प्रपत्र अ नुसार दि.१४.१०.०९ रोजी एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती, माहिती अधिकारी तथा असिस्टंट सुपरिंटेंडेंट ऑफ मार्केट(वेस्टर्न सबर्ब),भाभा हॉस्पीटल बिल्डिंग, बांद्रा(प.), मुंबई-५० यांच्याकडे मागीतलेली दिसून येते. सदर माहिती न मिळाल्यामुळे अर्जदाराने प्रपत्र ब नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे या अधिनियमाच्या कलम १९(१) नुसार प्रथम अपील दि.२६.४.२०१० रोजी दाखल केले. त्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे आदेश दिले की, दोन्हीही अपिलार्थी व दोन्ही जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकन घेतल्यावर दि.२२.१२.०९ रोजी दाखल केलेल्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जात तेच मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यासंबंधी सहाय्यक अधीक्षक(बाजार)पश्चिम,उप-४ तसेच जन माहिती अधिकारी श्री.रा.म. डांगे, सहाय्यक अभियंता(बाजार) यांनी या विषयीची संपूर्ण पत्रे त्यांच्या निरिक्षणासाठी ४ दिवसात उपलब्ध करुन द्यावी तसेच निरिक्षण केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य पुरवाव्यात. तसेच शास्त्री नगर महापालिका मंडईत असलेल्या अनुज्ञापत्रधारकांची नावे,त्यांच्या गाळयांचे क्षेत्रफळ व व्यवसाय या विषयीची कागदपत्रे तसेच शास्त्रीनगर महापालिका मंडई संबंधी अधिक काही माहिती उपलब्ध असल्यास त्याचा शोध घेऊन त्या माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती दोन्ही अपिलार्थींना विनामुल्य देण्यात याव्यात तसेच या आदेशाची पूर्तता १ महिन्याच्या आत करण्यात यावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले.

तसेच या संबंधात अर्जदाराच्या म्हणण्यानुसार या आयोगाने दि.११.५.२०१० रोजी अर्जदाराला पत्र क्र.रामाआ-तक्रार-२०१०/५१८/०२ दि.११.५.२०१० द्वारे असे कळविले होते की, दि.१.२.२०१० रोजी अर्जदाराच्या तक्रारीच्या संदर्भात सुनावणी आयोजित करण्यात आली होती. गैरतक्रारदार तथा सहाय्यक आयुक्त(बाजार) यांनी सदर प्रकरणाी सहाय्यक अभियंता, महानगरपालिका,एच(पूर्व) विभाग कार्यालय तसेच सहाय्यक आयुक्त(इस्टेट) यांच्याकडून माहिती गोळा करुन सहाय्यक आयुक्त(बाजार) यांनी तक्रारदारास माहिती पुरवावी असे दि.१५.२.२०१० रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. तरी कृपया तक्रारदाराला आयोगाच्या आदेशानुसार आवश्यक ती माहिती तात्काळ पुरवावी असे सह सचिव,राज्य माहिती आयुक्त यांच्याद्वारे कळविण्यात आले होते. त्यासंबंधीच्या तक्रारीची प्रत अर्जदाराने या रेकॉर्डवर दाखल केलेली आहे.

अर्जदाराच्या म्हणण्यानुसार या प्रकरणी वारंवार विनंती करुनही अर्जदाराला माहिती पुरविण्यात आलेली नाही. सहाय्यक आयुक्त(बाजार) व जन माहिती अधिकारी सहाय्यक आयुक्त(बाजार यांनी दि.१०.३.११ रोजी या आयोगासमोर लेखी निवेदन दाखल केलेले आहे. त्यात असे नमूद केले आहे की, मागीतलेली माहिती या कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नसल्याबाबत

त्यांना ११.१.२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यावर त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(बाजार) यांच्याकडे दि.२६.४.२०१० रोजी अपिल सादर केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश पारित केले की,संपूर्ण विषयासंबंधीची कागदपत्र निरिक्षणासाठी चार दिवसात सहाय्यक अधिक्षक बाजार-४, जन माहिती अधिकारी श्री.रा.म. डांगे,सहाय्यक अभियंता(बाजार) यांना उपलब्ध करुन द्यावी. निरिक्षण केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या अनुज्ञपत्रधारकांची नावे, त्यांच्या गाळयाचे क्षेत्रफळ व व्यवसाय या विषयीची माहितीची कागदपत्रे व अधिक काही माहिती उपलब्ध असल्यास त्यांचा शोध घेऊन त्या माहितीच्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थींना विनामुल्य द्याव्यात. पुढे असेही म्हटले आहे की, सहाय्यक आयुक्त(बाजार) यांच्या दि.३.६.२०१० च्या आदेशाची पूर्तता करण्यासाठी श्री.सुधाकर नितेकर वश्री.जयंतीलाल शहा हे या कार्यालयात अद्यापपर्यंत आलेले नसून याबाबत कार्यालयाशी संपर्कसुध्दा त्यांनी साधलेला नाही. परंतु अर्जदाराला यापूर्वी हजर रहाण्याबाबत केव्हा सूचना देण्यात आल्या यासंबंधात कुठेही उल्लेख लेखी निवेदनात सादर करण्यात आलेला नाही. तसेच ४ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश असतांना त्यानंतरही माहिती देण्यात आली किंवा प्राप्त झाली याबाबतचाही उल्लेख दिसत नाही. तसेच सुनावणी दरम्यान अर्जदाराच्या म्हणण्यानुसार या माहितीसाठी ते २-३ वर्षापासून मागणी करीत आहेत परंतु त्यांची मागणी पूर्ण करण्यात आलेली नाही व म्हणून संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आहे. सुनावणी दरम्यान अर्जदाराच्या म्हणण्यानुसार कमीतकमी मुद्दा क्र.३-क (C) ची माहिती मिळणे आवश्यक आहे व ती त्यांना आजतागायत देण्यात आलेली नाही. अर्जदाराचा अर्ज या अधिनियमाच्या कलम ७(६) नुसार निकाली काढण्यात आलेला दिसत नाही असे या आयोगाचे स्पष्ट मत झाले आहे.यास्तव संबंधीत जन माहिती अधिकारी(दोन्ही) तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्देशित केलेले इतर कर्मचारी यांच्याविरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवा विषयक नियमानुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांना अशा आदेशवजा सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी संबंधीत कर्मचा-यांविरुध्द त्यांना लागू असलेल्या नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करुन ३ महिन्यांच्या आत अहवाल या आयोगास सादर करावा व त्याची प्रत अर्जदारास नोंदणीकृत टपालाने निरिक्षणासाठी अपिलातील मुद्दा क्र.क(C) नुसार विनाशुल्क पाठविण्यात यावी. तसेच अर्जदार अपिलार्थी यांना झालेल्या शारिरिक व मानसिक हानीबद्दल संबंधित प्राधिकरणाने दोन्हीही अर्जदार यांना रु.५,०००/-(रुपये पाच हजार फक्त) इतकी नुकसान भरपाई देण्यात यावी. सदरची नुकसानभरपाई संबंधित प्राधिकरणाने सोसावयाची किंवा जे अधिकारी/कर्मचारी याबाबत जबाबदार असतील त्यांच्याकडून वसुल करावयाची याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. अर्जाराला प्राधिकरणातर्फे ६ आठवडयांच्या आत रु.५,०००/- चा चेक किंवा डी.डी. देण्यात यावा व तसा अहवाल या आयोगाला १५ दिवसाच्या आत दाखल करावा. तसेच अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिका-यांकडून सदर आदेशाची, या आयोगाने दिलेल्या आदेशाची पूर्तता व माहिती देण्यासंबंधी, प्रामुख्याने अपिलकर्ता यांच्या अर्जातील मुद्दा क्र.क(C) बाबत अर्जदाराला माहिती पुरविणेबाबत शहानिषा करुन तसा अहवाल या आयोगाला सादर करावा.

वरील आदेशवजा सूचना देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक १०.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-रामाआ/४९९७७/अपील क्रमांक ६६४७/२०१०**

**श्री. अर्जुनलाल एम.छाब्रिया,**
**बेला व्हिस्ता,फ्लॅट नं.१५, ३रा मजला,**
**लेक व एल.आय.सी.आफीस समोर,एस.व्ही.रोड,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.** **......** **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**उपमुख्य अभियंता यांचे कार्यालय,**
**इमारत प्रस्ताव विभाग, आर.के.पाटकर मार्ग,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,(इमारत प्रस्ताव),**
**W.S. के वार्ड,म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**उपमुख्य अभियंता यांचे कार्यालय,**
**इमारत प्रस्ताव विभाग, आर.के.पाटकर मार्ग,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.** **......** **उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १०.३.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी यांनी ॲनेक्शचर-अ नुसार कार्यकारी अभियंता(बिल्डिग प्रपोजन्ल) वेस्टर्न सबर्ब,के वार्ड,म्युनिसिपल ऑफीस भाभा हॉस्पीटल म्युनिसिपल बिल्डिंग, आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा(प.), मुंबई यांच्याकडे २८ मे,२०१० रोजी अर्ज करुन Occupation Certificate of the building known as Silver Soil Co.Op.Hsg.Soc., situated at plot bearing C.T.S.No.२५D,२५/D१ to १९ of village Bandivali, behind Raj Nagar, Jogeshwari(West), Mumbai-४००१०२ आणि श्रीमती ताहिया हाफीजी यांनी

विकसित केलेल्या प्लॉटच्या संबंधात बी.सी.सी.,आय.ओ.डी.,कंप्लीशन सर्टिफिकेट आणि ॲप्रुव्हड प्लॅन इत्यादीबाबत माहिती मागीतलेली दिसून येते.

अर्जदाराला सदरच्या माहितीच्या संबंधात जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी २८ मे,२०१० रोजी मागीतलेल्या माहिती संबंधात फाईल मिळत नसून या संबंधी शोध घेऊनसुध्दा ती मिळाली नाही म्हणून माहिती देता येणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अर्जदार अपिलार्थी यांनी सदर प्रकरणात प्रपत्र-ब नुसार प्रथम अपीलीय अधिकारी तथा डेप्युटी चिफ इंजिनिअर,बिल्डिंग प्रपोजल,वेस्टर्न सबर्ब यांच्या कार्यालयात दि.७ जुलै,२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल करण्याच्या कारणासंबंधी अर्जदाराने असे म्हटले आहे की,जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे पत्र क्र.DY.CH.ENG/BP/CRIA/७४७/W.S.I. dtd.१५.६.२०१० द्वारे जे उत्तर देण्यात आले ते बरोबर नसून चुकीचे व टाळाटाळीचे दिसते. तसेच ते स्टीरीओ टाईप व एस.आर.ए. अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराशी विसंगत दिसते. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.६ ऑगस्ट,२०१०रोजी असे आदेश पारित केले की, जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या माहितीबाबत एस.आर.ए. अधिका-यांच्या दि.२२.६.२००९च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे सदर फाईलचा पुन्हा शोध घेऊन अर्जदाराला ३ आठवडयाच्या आत माहिती द्यावी. त्यानंतर अर्जदार अपिलार्थी यांनी या आयोगासमोर दि.४ ऑक्टोबर,२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केलेले आहे व त्यात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.६.८.२०१० रोजी दिलेल्या निर्णयाचे पालन जन माहिती अधिकारी यांनी आजपर्यंत म्हणजेच द्वितीय अपील दाखल केल्याच्या तारखेपर्यंत केलेले नाही व माहिती दिलेली नाही, फाईल मिळत नाही म्हणून माहिती देण्यात आली नाही असे कारण नमूद केलेले आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार ३ आठवडयाचा कालावधी दिला असतांनाही २ महिने उलटून गेला तरी जन माहिती अधिकारी मुद्दाम ज्या फाईलमध्ये कागदपत्र आहेत त्या फाईलचा शोध घेत नाहीत व हे सर्व बिल्डर M/S ताहिया हाफिझी यांच्या सूचनेवरुन चालू आहे. कारण सदर बिल्डरचे सी.टी.एस. २५/डी,२५/डी १ ते १९, व्हिलेज बांदिवली, जोगेश्वरी(प.),मुंबई येथे बांधकाम चालू आहे.

सदर प्रकरणी सुनावणी दरम्यान अर्जदार अपिलार्थी हजर नव्हते. अर्जदाराने दाखल केलेल्या द्वितीय अपीलाचे अवलोकन करण्यात आले. त्यात कार्यकारी अभियंता(बिल्डिंग प्रपोजल) यांनी डेप्युटी चिफ इंजिनिअर(एस.आर.ए.),बांद्रा(पूर्व), मुंबई यांना दि.२८ जानेवारी,२०११ रोजी सदर प्रपोजलला एस.आर.डी.स्कीम खाली मान्यता देण्यात आलेली आहे यास्तव सदर प्रपोजल M.C.G.M.च्या कार्यक्षेत्रात येत नाही म्हणून सदरच्या फाइल्स परत करण्यात येत आहेत असे कळविले आहे. यास्तव सदरच्या फाईल ज्यातून अर्जदाराने माहिती मागीतलेली आहे त्यासंबंधी अपीलीय अधिकारी तथा डेप्युटी चिफ इंजिनिअर यांच्याशी संपर्क साधावा, अर्जदाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे कळविले.

अर्जदार अपिलार्थी यांना दि.१४ जून,२०१० रोजी जन माहिती अधिकारी,एस.आर.ए. यांनी अर्जदाराचा अर्ज दि.२८.५.२०१० च्या अनुषंगाने असे पत्र दिले की, S.R. Scheme in the records of SRA has been recorded with file bearing No. K-W/PVT/००१२/१९९४०१०७. These files have been sent back to the Executive Engineer Building Proposals(W.S.) on २२.६.२००९ on the request of the Executive Engineer (Building Proposals). व सदर पत्राची झेरॉक्स प्रत माहितीसाठी सोबत जोडली आहे असे म्हटले आहे.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय व अर्जदार अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलातील कारणे यांचे अवलोकन केले असता अर्जदाराचा अर्ज या अधिनियमाच्या ७(१) नुसार निकाली काढण्यात आल्याचे दिसत नाही म्हणून संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्यावर त्यांना लागू असलेल्या सेवाविषयक नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतची शिफारस करण्यात येत आहे. तरी अपीलीय अधिकारी तथा डेप्युटी चिफ इंजिनिअर(बिल्डिंग प्रपोजल),वेस्टर्न सबर्ब, बांद्रा, मुंबई यांनी सदर प्रकरणात नियमानुसार कारवाई करुन ३ महिन्याच्या आत अहवाल या आयोगास सादर करावा. तसेच अर्जदाराने मागीतलेली खरी व बिनचुक माहिती अर्जदाराला उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना बाध्य करावे. सदर प्रकरणी अर्जदाराला हे आदेश मिळाल्यापासून ४ आठवडयाच्या आत माहिती न मिळाल्यास ते कलम १८ खाली या आयोगासमोर तक्रार दाखल करु शकतात.

**आदेश**

**१) उपमुख्य अभियंता, बांद्रा(प.) यांनी जन माहिती अधिकारी यांना लागू असलेल्या सेवाविषयक नियमानुसार वर शिफारस केल्यानुसार ३ महिन्याच्या आत कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल या आयोगास पाठवावा.**

**२) जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार व या आयोगाने दिलेल्या आदेशानुसार संबंधित कागदपत्रांचा शोध घेउन अर्जदाराला प्रपत्र-अ नुसार माहिती विनामुल्य नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन द्यावी.**

**३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणात फाईल उपलब्ध का होत नाही याबाबत सक्षम अधिकारी यांचेमार्फत चौकशी करुन अहवाल प्राप्त करावा व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यविरुध्द नियमानुसार योग्य ती कारवाई करावी.**

**मुंबई** **(भास्कर पाटील)**
**दिनांक १०.३.२०११** **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०८०१/अपील क्रमांक ६३७०/२०१०**

**श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील,**
**एन९, एच१६४/०३, अहिंसा रोड, श्रीकृष्ण नगर,**
**टिव्ही सेंटर चौकाजवळ, सिडको,औरंगाबाद(म.रा.) ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरिक्षक(आ.),**
**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपसहाय्यक पोलीस महानिरिक्षक(गोपनीय),**
**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा-४०० ००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ६.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२७.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,सचिव,गृह विभाग,मंत्रालय मुंबई यांच्या कार्यालयात त्यांचे वकील श्री.रामनाथ चोभे,औरंगाबाद यांनी पाठविलेल्या नोटीसवर मा.सचिव,गृह विभाग,मंत्रालय मुंबई यांनी घेतलेला निर्णय कळविण्यात यावा तसेच सन्माननीय राज्यपाल,महाराष्ट्र राज्य यांच्या दि.१६.८.२०१० च्या पत्राच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीची माहिती व मा.श्री.एकनाथ खडसे,विरोधी पक्षनेता यांच्या दि.४.८.२०१० रोजीच्या पत्रावर झालेल्या कार्यवाहीची माहिती व संबंधितांवर प्रशासकीय दंडात्मक कारवाई झाली असल्यास त्याबद्दलची माहिती टपालाद्वारे स्पीड पोस्टने देण्यात यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप सहाय्यक पोलीस महानिरिक्षक(गोपनीय) यांनी दि.१९.१०.२०१० रोजी सदर अर्जातील नमूद बाबी या पोलीस अधीक्षक- लातूर यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्या अर्जाची प्रत या कार्यालयाचे पत्र दि.१९.१०.२०१० अन्वये पोलीस अधीक्षक, लातूर यांच्याकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे आपल्या माहितीसाठी आपण त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे कळविण्यात आल्याचे दिसून येते. तसेच दि.६.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,गृह विभाग यांनी सुध्दा त्यांच्या माहितीच्या अर्जात उल्लेख केलेल्या दि.१६.८.२०१० च्या पत्राच्या संदर्भात पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पुढील कार्यवाहीस्तव दि.२४.८.२०१० रोजी पाठविण्यात आला आहे व त्या संदर्भात दि.२७.९.२०१० चा मूळ अर्ज पुढील कार्यवाहीकरीता पोलीस महासंचालक,मुंबई यांच्याकडे पाठविण्यातआला आहे असे कळविले आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झ ाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१.११.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा उपसहाय्यक पोलीस महानिरिक्षक(गोपनीय),पोलीस महासंचालक यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि.१८.११.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने दि.२.८.२०१० रोजीची नोटीस तसेच विरोधी पक्ष नेता श्री.एकनाथ खडसे यांचे पत्र कार्यालयास प्राप्त झाले नसल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते. तसेच पोच आहे असे सांगितले असल्यामुळे सदर पत्राच्या व मिळालेल्या पोचपावतीची प्रत या कार्यालयास उपलब्ध करुन दिल्यास आपणास आवश्यक असलेली माहिती

उपलब्ध करुन देता येणे शक्य होईल. तसेच सदर प्रकरणी पोलीस अधिक्षक,लातूर यांना आपणास आवश्यक असलेली माहिती पुरविण्याबाबत कळविण्यात येत असून आवश्यक असलेल्या माहितीबाबत आपण कृपया त्यांच्याशी संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२४.११.२०१० रोजी पाठविलेल्या पोचपावतीची झेरॉक्स त्यांना पाठवित आहे असे कळविलेले दिसून येते. तसेच दि.२६.११.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री.खोमणे यांनीसुध्दा त्यांना एकूण ७ मुद्यांचे पत्र दिलेले दिसून येते. त्यात त्यांना पाठविलेल्या नोटीसच्या संदर्भात आक्षेप घेतलेले दिसून येतात. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात अर्जदाराची दिशाभूल करण्यासाठी तसेच त्यांना चुकीच्या वाटेला लावून माहिती मिळू नये व विलंब होऊन कळवावी या जाणीवपूर्वक उद्देशाने तो अर्ज लातूर पोलीस अधीक्षक कार्यालयास पाठविल्याचे कळविले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा माहिती देऊ नये, त्यास काहीतरी अडथळा करावा या हेतुने दि.२.८.२०११ ची नोटीस माहिती अधिका-यास प्राप्त झाली नाही असा नवीनच मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. मात्र ती नोटीस प्राप्त झाली याबद्दलचा पुरावा त्यांनी दिलेला आहे. अशाप्रकारे त्यांना माहिती उपलब्ध होऊ नये या कारणास्तवच त्यांनी अर्ज कोणत्याही प्रकारचे आकलन न करता वेगवेगळया ठिकाणी पाठवून त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केला. मात्र राज्य माहिती आयोगाकडून नोटीस प्राप्त झाल्यानतर श्री.किरण उपासनी, जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी,पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी दि.५.२.२०११ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तीच माहिती त्यांना सुरुवातीला विहित मुदतीत उपलब्ध करुन देता आली असती व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ व विलंब केलेला असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी त्यांनी आयोगापुढे विनंती केलेली आहे. पोलीस महासंचालक कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी यांनीसुध्दा माहिती अधिकारी तथा उप सहाय्यक पोलीस महानिरिक्षक(गोपनीय) यांनी काळजीपूर्वक अर्जाचे आकलन करुन अर्ज योग्य त्या माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पाठविला असता तर दि.५.२.२०११ रोजी जी माहिती आता उपलब्ध करुन देण्यात आली आहे तीच माहिती त्यावेळेस उपलब्ध करुन देता आली असती असे सांगितले. यावरुनप श्रीमती कुंदा ताडीलकर, उपसहाय्यक,पोलीस निरिक्षक(गोपनीय) यांनी जन माहिती अधिकारी म्हणून अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात विनाकारण पोलीस अधीक्षक,लातूर यांच्या कार्यालयातून माहिती उपलब्ध होईल व त्याकरीता सदरचा अर्ज त्यांच्या कार्यालयास हस्तांतरीत केला ते अनावश्यक होते. यावरुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांचा माहितीचा अर्ज हा अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध होऊ नये याकरीताच दिशाभूल करुन

पाठविण्यात आलेलाआहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी या शास्तीस पात्र आहेत. शास्तीबद्दल त्यांना विचारले असता त्यांनी अनवधानाने तसे घडले, माहिती उपलब्ध होऊ नये असा कोणताही उद्देश नव्हता व त्याबद्दल त्यांनी दिलगीरी व्यक्त केलेली आहे. त्यांनी दिलगीरी व्यक्त केलेली असली तरी त्यांच्या दि.१९.१०.२०१०च्या पत्रावरुन स्पष्टपणे दिसून येते की, त्यांनी कोणत्याही प्रकारे मागीतलेल्या माहितीचे अवलोकन न करता अर्ज हस्तांतरीत केलेला आहे व त्यामुळे त्या शास्तीस पात्र आहेत. सदर बाब जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी कार्यासन/१४ व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनीही मान्य केली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांच्या दि.२७.९.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उपसहाय्यक पोलीस महानिरिक्षक(गोपनीय) पोलीस महासंचालक कार्यालय यांनी योग्य ती कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.**

**२) सदरची कार्यवाही पोलीस महानिरिक्षक(गोपनीय) यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची १ प्रत पोलीस महानिरिक्षक(गोपनीय) पोलीस महासंचालक कायालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१ यांच्याकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची १ प्रत पोस्टाने पाठवण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १५.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/१३१/अपील क्रमांक ६३६९/२०१०**

**श्री. रामदास खंडुजी जाधव,**
**बॅक कॉलनी, सिरसो दर्यापूर रोड,**
**मुर्तिजापूर, जि. अकोला. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२५.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, प्रधान सचिव,सामान्य न्याय विभाग यांच्या कार्यालयात श्री.रामदास जाधव सन २००७-०८ समाजकल्याण संचालनालय, पुणे यांच्या दि.२३ सप्टेंबर च्या पत्रानुसार कर्मवीर दादासाहेब पुरस्कार मिळणेबाबत शासनास प्रस्ताव सादर केला असून त्याची माहिती मिळणे तसेच दि.३०.३.२०१० रोजी दिलेल्या निवेदनावर काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.२३.९.०८ राजी सदरचा प्रस्ताव शासनास सादर केलेलाआहे असे अर्जदारास कळविण्यात यावे असे उपसंचालक यांनी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना

कळविण्यात आले होते व ही माहिती अपिलकर्ता यांना कळविलेली आहे. परंतु त्यामुळे त्यांचे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२२.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दि.३०.८.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दि.११.६.२०१० रोजी विहित मुदतीत योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे विचारले की, त्यांनी शासनाकडे दिलेले निवेदन व तत्पूर्वी सादर झालेले प्रस्ताव आत्तापर्यंत का मंजूर करण्यात आले नाही व त्यांना पुरस्कार का देण्यात आलेला नाही. त्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे सदरचा प्रस्ताव हा समितीकडे सादर केलेला आहे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना तसे कळविले असल्यामुळे त्यांना पुरस्कार का मिळाला नाही किंवा विलंब का होत आहे याबद्दलचे कारण माहितीच्या अधिकारात देता येणार नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष निघाल्यामुळे सदरचे अपीलनिकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने पाठवण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १५.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०८०३/अपील क्रमांक ६३६८/२०१०**

**सौ.श्वेता सुनिल खरे,**
**प्लॉट नं.४८-बी, न्यु शांती निकेतन कॉलनी,**
**जवाहर कॉलनी, औरंगाबाद ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**राज्य गुप्त वार्ता विभाग,महाराष्ट्र राज्य,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा अप्पर उपआयुक्त,**
**राज्य गुप्त वार्ता विभाग,नाशिक घटक जेल रोड,**
**नाशिक-४२२००१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ९.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.३.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. अपिलकर्ता यांनी दि.९.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,अप्पर उपआयुक्त, राज्य गुप्त वार्ता विभाग यांच्याकडे श्री.सुनिल किशराव खरे,सहाय्यक आयुक्त,राज्य गुप्त वार्ता विभाग, मालेगाव,जि.नाशिक यांच्या संदर्भात वेतनप्रमाणपत्र,बँकेकडून घेतलेल्या कर्जाचे आदेशाची छायांकित प्रत, श्री.खरे यांची बदली कोणकोणत्या ठिकाणी झाली होती,कामाचा तपशील, सेवापुस्तकातील अर्जित रजेच्या नोंदी,कार्यालयाचा व निवासाचा पत्ता, श्री.खरे यांनी सन २००३-०४ च्या दरम्यान बेकायदेशीर दुसरे लग्न केले त्यांच्या दुस-या पत्नीचे नांव, मुलांची नांवे, दुस-या सासू-सास-यांची नावे व राहण्याचा पत्ता, कार खरेदी केल्याची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२०.३.२०१० रोजी अपिलकर्ता यांना अप्पर उप आयुक्त, राज्य गुप्त वार्ता विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली तसेच मुंबई मुख्यालयातून जी माहिती उपलब्ध होऊ शकते ती माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी आयुक्त, राज्य गुप्त वार्ता विभाग यांच्याकडे दि.१२.३.२०१० रोजी पत्र दिले व त्यांच्या कार्यालयातील माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने तयांनी दि.२२.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या पूर्वी दि.८.५.२०१० रोजी मुंबई कार्यालयातून आलेल्या माहितीच्या आधारे त्यांना मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने दि.२२.७.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपीलाच्या संदर्भात दि.३०.९.२०१० रोजी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती शासकीय माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असून उर्वरित माहिती ही व्यक्तीच्या वैयक्तिक माहितीशी संबंधित असल्याने व्यक्तीच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन होईल व त्यात कोणतेही जनहीत नाही व त्यामुळे माहिती देणे उचित नाही असा निर्णय देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्या निर्णयामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता व श्री.सुनिल खरे यांच्यामध्ये घटस्फोट झालेला आहे व त्या संदर्भातच अपिलकर्ता यांनी श्री.सुनिल खरे यांची संपूर्ण माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु त्यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयातील संपूर्ण माहिती अपिलकर्ता यांना देण्यात आलेली आहे. व त्यांनी मागीतलेली वैयक्तिक माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देण्यात आलेली नाही. तसेच त्यांनी जे आक्षेप घेतलेले आहेत त्या आक्षेपांच्या संदर्भातसुध्दा त्यांना उत्तर देण्यात आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी लेखी खुलासा दाखल केलेला आहे व त्या खुलाशाचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने पाठवण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १५.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/५०७९९/अपील क्रमांक ६३६७/२०१०**

**श्री.दे.म. अकोलकर,**
**३३(अ), रेणुका, छत्रपती नगर,**
**गारखेडा परिसर, औरंगाबाद-४३१००५.** **.....** **अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी,,**
**रोजगार व स्वयंरोजगार विभाग,**
**नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**रोजगार व स्वयंरोजगार विभाग,**
**नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-३२. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ९.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.३.२०११**
**जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,रोजगार व स्वयंरोजगार विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ यांच्याकडे अर्ज करुन माहिती मागीतलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.१८.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अर्जदार सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचा दि.३०.८.२०१० चा माहितीचा अर्ज तसेच दि.१८.१०.२०१० चा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त नाही. अपिलकर्ता यांनीही सदरचा अपील अर्ज कार्यालयास पाठविल्याचा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तसेच त्यांच्या दि.३०.८.२०१० च्या अर्जावर कोर्ट फी स्टँप लावलेला आहे किंवा नाही ते आढळून येत नाही कारण छायांकित प्रतीवर याबाबत काहीही आढळून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अपिलकर्ता यांच्या अर्जानुसार प्रथम अपील अर्ज दि.३०.६.२०१० रोजी दाखल झालेला होता व त्यामध्ये सुनावणीस त्यांना बोलावण्यात आले होते. त्या अर्जाच्या अनुषंगानेसुध्दा त्यांचा दि.१०.७.२०१० च्या माहितीचा अर्ज प्राप्त झालेला नव्हता व ते प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर न राहिल्यामुळे प्रथम अपील निकाली काढण्यात आले होते. अर्जदार यांची तक्रार ते शासकीय सेवेत असतांना पदोन्नतीच्यावेळी त्यांची वेतननिश्चिती करतांना विकल्प न दिल्याने अन्याय झाल्याबाबतची आहे. तथापि या विभागाच्या दि.१८.५.१० च्या पत्रान्वये श्री. अकोलकर यांना त्यांनी उपस्थित केलेल्या बाबींवर संचालनालयातील स्तरावरुन खुलासा मागवून त्यांच्यावर कोणताही अन्याय होत नसल्याचे स्पष्ट झाल्याने कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता दिसून येत नसल्याने सदर प्रकरण बंद करण्यात येत असल्याबाबत कळविण्यात आले आहे. यापूर्वीसुध्दा राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्यासमोर दि.३१.८.२०१० रोजी सुनावणी झाली असून त्यांची वैयक्तिक बाब असल्याने व त्याचा कोणत्याही जन हितार्थ संबंध नसल्याने अपील निकाली काढण्यात आले होते. सदरच्या निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात आली

आहे. यावरुन अपिलकर्ता यांना यापूर्वीही या संपूर्ण तक्रारीबद्दल निर्णय कळविलेला असूनसुध्दा ते वारंवार अशाप्रकारचे अर्ज करुन प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करतात व विनाकारण कार्यालयास वेठीस धरत आहेत व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचा गैरवापर करीत आहेत असा निष्कर्ष काढून सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने पाठवण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १५.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/५०७९८/अपील क्रमांक ६३६६/२०१०**

**श्री. माधव शंकरराव विभूते,**
**मु.मानसपूरी, पो.बहाद्दरपुरा,**
**ता.कंधार, जि.नांदेड. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**विशा-८, ७वा मजला, गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी गृह मंत्रालय,**
**महाराष्ट्र राज्य, गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.३.२०११**
**जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता, उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, गृह विभाग यांच्याकडे दि.१९.८.२००४,२१.३.०७ रोजी मा. गृह मंत्री यांच्याकडे दिलेल्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती एकूण ३ मुद्यांमध्ये मागीतलेली दिसून येते. मुद्दा क्र.४ मध्ये त्यांनी दिलेल्या अर्जामधील तक्रारीच्या संदर्भात पुन्हा तक्रार करुन नुकसान भरपाईची माहिती मिळावी अशी विनंती केलेली आहे. तसेच होमगार्ड संघटनेकडून कमी करण्याचे काय कारण आहे, दोषी अधिका-यांविरुध्द काय कार्यवाही करण्यात येणार आहे याबद्दलची सन २००० ते ३०.४.२०१० पर्यंतच्या कालावधीची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१६.६.२०१० रोजी सहाय्यक माहिती अधिकारी यांनी विषयांकित प्रकरणाबाबत आपणास कंधार पोलीस स्टेशन येथे नोंदविण्यात आलेल्या गुन्हयासंदर्भात महासमादेशक होमगार्ड, मुंबई यांच्या आदेशानुसार जिल्हा समादेशक होमगार्ड, नांदेड यांनी होमगार्ड संघटनेतून कमी केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब याबाबतच्या कार्यवाहीसाठी संदर्भाधीन अर्जाची, तसेच दि.२३.२.२०१०च्या अर्जाची छायांकित प्रत सोबतच्या सहपत्रांसह महासमादेशक होमगार्ड तथा संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात येत आहे व या संदर्भात पुढील पत्रव्यवहार उक्त कार्यालयाशी करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.७.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.९.९.२०१० रोजी देण्यात आला असून महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुबई यांनी त्यांच्या दि.४.१.२००८ च्या पत्रानुसार शासनास पाठविलेल्या अहवालामध्ये कंधार पोलीस स्टेशन येथे आपल्या विरुध्द गुन्हा नोंदविला गेल्याने आपणास दि.१६.१२.२००० रोजी संघटनेतून कमी करण्यात आले होते. न्यायालयाने सदर गुन्हयातून आपणास दोषमुक्त केल्यानंतर होमगार्ड सदस्य म्हणून पुन्हा नियुक्ती देण्याबाबतच्या अटीनुसार आपण वयाच्या अटीत बसत नसल्याने आपणास पुन्हा संघटनेत घेणे शक्य नसल्याचे महासमादेशकांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे. महासमादेशक, मुंबई यांच्या दि.४.१.०८च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. तसेच आपला दि.१९.८.०४ व २१.३.०७ चा अर्ज जन माहिती अधिकारी महासमादेशक होमगार्ड यांच्याकडे पाठविण्यात येत आहे व त्यांना माहिती देण्याबद्दल निदेश देण्यात येत आहेत असेही त्यांना प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये कळविण्यात आले होते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मा.गृहमंत्री यांच्याकडे जो तक्रार अर्ज केला हाता तो न्याय मिळण्याच्यादृष्टीने केला होता. तसेच त्यांनी आयोगाकडे लेखी खुलासा दाखल केलेला आहे. त्या खुलाशामध्ये त्यांनी त्यांच्यावर झ

ालेल्या कारवाईच्या संदर्भात गुणवत्तेच्या व त्यांच्याविरुध्द दाखल केलेल्या गुन्हयाच्या संदर्भात खुलासा केलेला आहे. परंतु अशाप्रकारच्या अर्जाच्या संदर्भात काय कार्यवाही झ ाली ते कळविण्यात आले होते असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. अपिलकर्ता यांनी जरी न्यायाकरीता मा.गृहमंत्री किंवा शासनाकडे तक्रार केली होती तरी सदरच्या तक्रारीच्या संदर्भात अहवाल किंवा अभिप्राय मागविल्यानंतरच निर्णय घेतले जातात व त्या संदर्भात अपिलकर्ता यांना स्पष्टपणे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याचप्रमाणे दि.१६.९.२०१० रोजी सुध्दा अपिलकर्ता यांना स्पष्टपणे कळविण्यात आलेले दिसून येते. असे असले तरी अपिलकर्ता यांची मागणी ही गुणवत्तेच्या निकषावर दिसून येते व माहितीच्या अधिकारात कोणत्याही प्रकारणातील गुणवत्तेच्याबाबतीत चौकशी करता येत नाही किंवा निर्णय देता येत नाही. जशी कार्यवाही झालेली आहे त्याच स्वरुपात त्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे व तशी ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने पाठवण्यात यावी.**

**मुंबई**
**दिनांक १५.३.२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०१३७/अपील क्रमांक ६३८३/२०१०**

**क्रमांक-मुमाआ/५०१३८/अपील क्रमांक ६३८४/२०१०**

**श्री. अल्ताफ यू. बाटलीवाला,**
**२५, मेमनवाडा रोड, मौलवी हाऊस, २रा मजला,**
**रुम नं.६, मुंबई-४००००३. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार,**
**मुंबई विद्यापीठ,**
**फोर्ट, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार(ॲफिलिएशन),**
**रुम नंबर २०६, २रा मजला, मंबई विद्यापीठ,**
**फोर्ट, मबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार,**
**एलिजिबिलिटी अँड मायग्रेशन सर्टिफिकेट युनिट,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ(पूर्व),**
**मुंबई-४०००९८. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १६.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित,प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

**अपिल क्रमांक ६३८३-**

अपिलकर्ता यांनी दि.१७.७.२०१० रोजी(दि.९.८.२०१० रोजी पोस्टाने पाठविलेला व दि.२३.८.२०१० रोजी प्रत्यक्षात प्राप्त झालेला) जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे अर्ज करुन शरमीन उस्मान बाटलीवाला यांनी केलेल्या ३ अर्जांच्या संदर्भात

काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.८.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि.१५.९.२०१० रोजी व दि.१५.१०.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या दि.९.८.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांना दि.१५.१०.२०१० रोजी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना आत्तापर्यंत मौखिकरित्या जी एलीजिबीलीटीची माहिती हवी होती ती समजावून सांगितलेली आहे. अपिलकर्ता यांनी ज्या अर्जाच्या संदर्भात प्रक्रियेबद्दल माहिती मागीतली होती त्या समितीची बैठक विलंबाने झाल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. अर्थतच विलंबाचे कारण हे समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर कळवावे असे आदेश होते व त्या संदर्भात त्यांनी आयोगापुढे संपूर्ण खुलासा दाखल केलेला आहे तो पुढीलप्रमाणे आहे -

श्री.अल्ताफ यु.बाटलीवाला यांनी दि.२९.५.२०१० रोजी माहितीचा कायदा २००५ अन्वये माहिती मागितली होती. त्याप्रमाणे त्यांना हवी असलेली माहिती देण्यात आली.(प्रत पताका अ जोडत आहोत) श्री.अल्ताफ यू. बाटलीवाला यांनी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविण्या आधी विद्यापीठाच्या पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभागाला ब-याच वेळा भेट दिली होती. अर्जदार श्री.अल्ताफ यू बाटलीवाला यांना प्रत्येक वेळी त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यांनी माहितीचा कायदा २००५ अन्वये मागवलेली माहिती त्यांना वेळेवर देण्यात आली आहे.

त्यानंतर श्री.अल्ताफ यू बाटलीवाला यांनी दि.१७.८.२०१० रोजी माहितीचा कायदा २००५ अन्वये माहिती मागीतली या माहितीचा मजकुर हा आधी मागितलेल्या माहितीनुसारच होता. पुन्हा श्री.अल्ताफ यू.बाटलीवाला यांना दि.१५.९.२०१० रोजी माहिती देण्यात आली.(प्रत पताका ब जोडत आहोत.)श्री.अल्ताफ यू बाटलीवाला यांनी दि.३०.८.२०१० रोजी माहितीचा कायदा २००५ अन्वये माहिती मागितली या अर्जात त्यांनी श्रीमती शर्मिन उस्मान बाटलीवाला यांनी समकक्षतासाठी दिलेल्या अर्जाविषयी विचारणा केली आहे. समकक्षतेचा अर्ज हा विद्यापीठाच्या विद्याशाखेचे प्रमुख यांच्याकडे पाठविण्यात येतो. त्याप्रमाणे श्रीमती शर्मिन उस्मान बाटलीवाला यांचा अर्जदेखील विद्याशाखेच्या विषयाच्या प्रमुखांकडे नेऊन विचारणा करण्यात आली आणि त्यांनी हा अर्ज विद्यापीठाच्या समकक्षता समितीपुढे ठेवण्यास सांगितले त्याप्रमाणे २४ सप्टेंबर,२०१० रोजी श्रीमती शर्मिन उस्मान बाटलीवाला यांचा अर्ज विद्यापीठाच्या समकक्षता समितीपुढे ठेवण्यात आला आणि नंतर समकक्षता समितीने त्या अर्जावर निर्णय घेऊन श्रीमती शर्मिन उसमान बाटलीवाला या वाणिज्यशाखेच्या प्रथम वर्षास पात्र आहेत असा ठराव करण्यात आला. त्याप्रमाणे श्री.अल्ताफ यू बाटलीवाला यांना समकक्षता समितीचा निर्णय कळविण्यात आला(प्रत पताका क जोडत आहोत)

वरील निर्णय घेण्याआधी श्री.अल्ताफ चु बाटलीवाला यांनी अपीलीय अधिका-यांकडे लेखी अर्ज केला. त्याप्रमाणे अपिलीय अधिका-यांनी मुंबई विद्यापीठाच्या पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभागाचे उपकुलसचिव आणि श्री.अल्ताफ यू बाटलीवाला यांची भेट घडवून आणण्यासाठी दि.२०.७.२०१० रोजी अपिलीय अधिका-यांच्या दालनात संध्याकाळी ४.४५ वाजता बैठक

बोलावली परंतु त्या बैठकीस श्री.अल्ताफ यू बाटलीवाला हे गैरहजर राहिले त्यामुळे त्यांच्या अर्जावर निर्णय होवू शकला नाही(प्रत पताका ड जोडत आहोत)

त्यानंतर पुन्हा मुंबई विद्यापीठाच्या अपिलीय अधिका-यांनी दुस-यांदा पुन्हा दि.८.९.२०१० रोजी अर्जदार व मुंबई विद्यापीठाच्या पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभागाचे उपकुलसचिव यांची बैठक बोलावली परंतु त्या बैठकीला देखील श्री.अल्ताफ यू बाटलीवाला गैरहजर राहिले.

पुन्हा अपिलीय अधिका-यांनी दि.२२.१०.२०१० रोजी श्री. अल्ताफ यू बाटलीवाला यांच्या विनतीनुसार बैठक बोलावली परंतु त्या बैठकीलादेखील श्री.अल्ताफ यू बाटलीवाला हजर राहिले नाहीत. त्यामुळे कुठल्याच प्रकारचा निर्णय त्यांच्या अर्जावर घेण्यात आला नाही.(प्रत पताका इ जोडत आहोत) सदर अर्जदाराच्या असहकारामुळे विद्यापीठास अनावश्यक त्रासास सामोरे जावे लागले व कार्यालयीन वेळेचा अपव्यव पण झाला असे नमूद करावेसे वाटते.

श्री अल्ताफ यू बाटलीवाला यांना मुंबई विद्यापीठाच्या नियमांची प्रत त्याचप्रमाणे तंत्र शिक्षण विभागाने घेतलेल्या निर्णयाची प्रत देण्यात आली आहे. श्रीमती शर्मिन उस्मान बाटलीवाला याच्या समकक्षतेच्या अर्जामुळे यापुढे तीन वर्षाचा डिप्लोमा केलेले विद्यार्थी हे आता वाणिज्य, विधी आणि विज्ञान शाखेतील  पहिल्या वर्षाला प्रवेश घेऊ शकतात. तसे अर्जदारासपण कळविण्यात आलेले आहे.

वरील खुलाशाचे अवलोकन केले असता माहिती जरी उपलब्ध करुन दिली असली तरी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.९.८.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा क्र.१,२,३ ची माहिती पुन्हा दि.१५.१०.२०१० च्या पत्राप्रमाणे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**अपील क्रमांक ६३८४-**

सदर अपिलात अपिलकर्ता यांनी दि.२९.५.२०१० रोजी Equivalent for admission to B.Com. of Mumbai University for students of Yashwantrao Maharashtra Open Universityच्या संदर्भात एकूण ४ मुद्यांमध्ये जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले दिसून येतात. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.५.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते.परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.११.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१०.११.२०१० रोजी देण्यात आला असून सदर अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना मुंबई विद्यापीठाच्या बी.कॉम.च्या अभ्यासक्रमासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या अर्हतेच्या संदर्भात एकूण ४ मुद्यांवर युक्तीवाद केला व त्याबाबत माहिती मिळाली नाही असे आयोगापुढे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की,माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च)मध्ये माहिती व कलम(त्र) मध्ये माहितीचा अधिकार या व्याख्येप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित नाहीत व त्यामुळे त्यांना उत्तर देण्यात आलेले नाही. परंतु त्यांनी दि.१५.९.२०१० रोजी व १.७.२०१० रोजी या संदर्भात व त्यांच्या अनेक अर्जांच्या संदर्भात त्याबाबतची वस्तुस्थिती विषद केलेली आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता केव्हाही उपस्थित राहिलेले नाहीत त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे. परंतु मुळातच अपिलकर्ता यांच्या दि.२९.५.२०१०

च्या अर्जामध्ये प्रत्येक मुद्याच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी यांचे सदरच्या प्रकरणातील गुणवत्तेच्याबाबत अभिप्राय विचारलेले असल्यामुळे व अशाप्रकारे अभिप्राय व्यक्त करणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिल क्र.६३८३ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांच्या दि.९.८.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१५.१०.२०१० रोजी उत्तर दिलेले आहे त्याचप्रमाणे पुन्हा उत्तर रजिस्टर पोस्टाने देण्यात यावे.**
**२) अपिल क्रमांक ६३८४ निकाली काढण्यात येत आहे.**
**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १६.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/५०११७/अपील क्रमांक ६३७८/२०१०**
**क्रमांक-मुमाआ/५०१२०/अपील क्रमांक ६३८०/२०१०**
**क्रमांक-मुमाआ/५०१२१/अपील क्रमांक ६३८१/२०१०**

**श्री. अर्जुन गणपत तांबे,**
**नायब तहसिलदार, जिल्हाधिकारी मुंबई शहर कार्यालय,**
**जुने जकात घर,फोर्ट, मुंबई-४००००१. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी मुंबई शहर,**
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर,**
**जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा रचना व कार्यपध्दती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर,**
**जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १२.१०.२०१०,११.१०.२०१०,१२.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १६.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित,प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

**अपिल क्रमांक ६३७८-**

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी दि.२८.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,मुंबई यांच्याकडे सन २००३-२०१० पर्यंत आरक्षण पदांच्या संदर्भात एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.१४.७.२०१० रोजी अर्जातील मुद्दा क्र.५ मधील क्र.१ व ३ ची माहिती पुरविण्यासाठी एकूण शुल्क रु.१७२/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली परंतु मुद्दा क्र.२-गोपनीय अहवालाच्या संदर्भात समितीपुढे सादर करण्यात आलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.६.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.३१.८.२०१० रोजी जी माहिती उपलब्ध केलेली नाही ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरवावी व जी माहिती उपलब्ध नसेल त्याबाबत स्पष्टपणे कळविण्यात यावे अशाप्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, पदोन्नतीकरीता उमेदवारांचे जे गोपनीय अहवाल सादर केले जातात त्या गोपनीय अहवालांची माहिती त्यांना अपेक्षित आहे. परंतु अद्यापपर्यंत ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, गोपनीय अहवाल उपलब्ध करुन द्यावे किंवा नाही याबद्दल शासनाकडे मार्गदर्शन मागितले आहे परंतु अद्यापपर्यंत ते प्राप्त झालेले नाही व त्यामुळे त्यांना सदर मुद्याच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी सुनावणीस हजर नाहीत. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा जो निर्णय दिला आहे तो निरर्थक दिसून येतो.अपिलार्थी यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही ती माहिती पुरवावी व जी

माहिती उपलब्ध नसेल त्याप्रमाणे स्पष्टपणे कळविण्यात यावे अशाप्रकारचा निर्णय निवासी उप जिल्हाधिकारी यांनी द्यावा यावरुन त्यांाच्या कामाचा स्तर दिसून येतो. त्यामुळेच अपिलार्थी यांनी त्यांच्या प्रथम अपीलात काय मागणी केली आहे याची तपासणी न करताच निरर्थक निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे त्यांनी आयोगापुढे द्वितीय अपील सादर केले आहे. अपिलकर्ता यांनी विभागीय पदोन्नती समितीकडे ज्या उमेदवारांचे गोपनीय अहवाल सादर झाले असतील त्याची माहिती मागीतलेली आहे व ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. कर्मचा-यास गोपनीय अहवाल ज्या स्वरुपात कळविले जातात त्याच स्वरुपातील माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**अपिल क्रमांक ६३८० -**

या अपिलात अपिलकर्ता यांनी दि.११.५.१० रोजी जन माहिती अधिकारी,जिल्हाधिकारी कायालय यांच्याकडे साप्रवि यांच्या परिपत्रक क्र. एसआरव्ही-२००३/सीआर-१८/२००३/१२ दिनांक २२.९.०३ नुसार किती कर्मचा-यांना ११ महिन्यांकरीता पदोन्नती दिली, त्यासाठी मंजुरीकरीता सादर केलेल्या टिप्पणीची प्रत व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांनी दि.५.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.३१.८.२०१० रोजी देण्यात आला असून त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणेसुध्दा कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना अद्यापपर्यंत उपलब्ध करुन लिेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील इतर अर्जांची माहिती उपलब्ध करुन दिली परंतु सदर अर्जाची माहिती दिलेली नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता अतिशय निरर्थक व कोणत्याही मुद्याचे आकलन न करता निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.अपिलकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणे माहिती तसेच शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही/२००३/सीआर-१८/२००३/१२ दि.२२.९.०३ नुसार ऑक्टोबर-२००३ ते एप्रिल-२०१० पर्यंत दिलेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांच्या पदोन्नतीबाबतच्या टिप्पणीबाबतची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**अपिल क्रमांक ६३८१ -**

सदर अपीलात अपिलकर्ता यांनी दि.२८.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय- मुंबई यांच्याकडे जिल्हाधिकारी-मुंबई शहर कार्यालयातील शाखांमध्ये वर्ग २,३,४ मध्ये किंती कर्मचारी त्याच शाखेत ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता अद्याप कार्यरत आहेत या संदर्भात त्यांनी एकूण ९ मुद्यांवर मााहिती मागीतलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१६.७.२०१० रोजी मुद्दा क्र.४ मधील १ ते ७ ची माहिती उपलब्ध नाही, मुद्दा क्र.८च्या संदर्भात अभिलेख्यांच्या प्रती २६ असल्यामळे प्रति पृष्ठ रु.२/- प्रमाणे रु.५२/- चा भरणा करावा असे कळविले असून इतर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झ ााल्याने अपिलकर्ता यांनी दि.५.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय

दि.३१.८.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांचे त्यामुळे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना मुद्दा क्र.८ व ९ ची माहिती मिळाली परंत मुद्दा क्र.१ ते ७ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, मुद्दा क्र.१ ते ७च्या संदर्भात त्यांनी विचारलेली वस्तुस्थिती खरी आहे परंतु त्याबाबत कोणत्याही प्रकारची यादीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध नाही म्हणून ती देण्यात आलेली नाही व सदर माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही व त्यामुळे ती देण्यात आलेली नाही. परंतु ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता अनेक कर्मचारी कार्यरत आहेत याचा अर्थ यादी जरी तयार नसली तरी आस्थापना शाखेकडे त्याबाबतची माहिती असणे अपेक्षित असल्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते. प्रथम अपीलाचा निर्णय निरर्थक आहे. जी मााहिताी उपलब्ध आहे ती द्यावी व जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत स्पष्टपणे कळविण्यात यावे अशा स्वरुपाच्या निर्णयावरुन निवासी उप जिल्हाधिकारी यांच्या कामाचा स्तर कळून येतो. यास्तव अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील क्र.६३७८ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना दि.१८.२.२०१०च्या इतिवृत्ताप्रमाणे जातीनिहाय माहितीनुसार २००३ ते २०१० पर्यंतच्या समितीपुढे सादर झालेल्या गोपनीय अहवालांच्या प्रती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

**२) अपिल क्र.६३८० मध्ये अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.११.५.२०१० च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती टिप्पणीच्या स्वरुपात उपलब्ध असल्यास विनामुल्य व्यक्तीशः पुरविण्यात यावी.**

**३) अपिल क्रमांक ६३८१ मध्ये अपिलकर्ता यांच्या दि.२८.६.२०१० च्या माहितीच्या अर्जात मागीतलेल्या मुद्दा क्र.१ ते ७ च्या संदर्भात जी माहिती मागीतलेली आहे ती विनामुल्य व्यक्तीशः कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याबाबतची नोंद जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना सद आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १६.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१२२/अपील क्रमांक ६२५७/२०१०
क्रमांक-मुमाआ/५०११०/अपील क्रमांक ६२५८/२०१०
क्रमांक-मुमाआ/५०१६४/अपील क्रमांक ६३६५/२०१०

श्री. आनंद सोपान पारगावकर,
१३५,/३६६४, विशाल को.ऑप.हौ.सो.,
पंतनगर, घाटकोपर(पूर्व), मुंबई-७५. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
डी विभाग यांचे कार्यालय,बृहन्मुंबई महानगरपालिका,
जोबनपुत्र कंपाऊंड, नाना चौक,
ग्रँट रोड(प.), मुंबई-४०० ००७.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण)(पूर्व),
डी विभाग यांचे कार्यालय,बृहन्मुंबई महानगरपालिका,
जोबनपुत्र कंपाऊंड, नाना चौक,
ग्रँट रोड(प.), मुंबई-४०० ००७.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण)(पश्चिम),
डी विभाग यांचे कार्यालय,बृहन्मुंबई महानगरपालिका,
जोबनपुत्र कंपाऊंड, नाना चौक,
ग्रँट रोड(प.), मुंबई-४०० ००७. ...... उत्तरवादी

## निर्णय

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १७.३.२०११**
**जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी वर नमूद केलेल्या ३ अपिलांमध्ये दि.२१.६.२०१० रोजी जन माहितीी अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण) डी विभाग कार्यालय यांच्याकडे १) कंत्राटदार/ठेकेदार यांना दि.१.४.०७ ते १९.७.२०१० या कालावधीत लावण्यात आलेल्या पेनल्टीच्या संदर्भात तसेच २) प्रभाग क(सर्व प्रभाग) बाबत दिनांक १.४.२०१० व १९.६.२०१० या कालावधीतील सर्व वार्डांमध्ये सुरु असलेल्या नवीन कामांची पूर्ण यादी असलेली नक्कत प्रत द्यावी
३) प्रभाग क(सर्व प्रभाग) येथे दि.१.४.०९ ते ३०.३.२०१० या कालावधीतील सर्व वार्डांमध्ये सुरु असलेल्या नवीन कामांची पूर्ण यादी असलेली नक्कल प्रत द्यावी अशी मागणी केलेली आहे.

सदरच्या तीनही अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक १५.७.२०१० रोजी आपणास हव्या असलेल्या माहितीकरीता या कार्यालयास दुपारी ३ ते ५ या वेळेत खालील सही केलेल्या माहिती अधिका-यांची भेट घ्यावी व उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन संबंधित माहितीची कागदपत्र प्रत्येकी रु.२/- प्रती प्रत प्रमाणे शुल्क भरुन घेण्यात यावी. आपल्याला हव्या असलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या प्रती माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत मंजूर केलेला आकार भरल्यानंतर आपणास पुरविण्यात येतील. माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत माहिती अधिका-यांनी फक्त आपण मागितलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रच पुरविणे आवश्यक असते तथापि सदर माहितीची कागदपत्र तपासण्याकरीताआपण या कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे.माहिती अधिका-यांचे दूरध्वनी क्रमांक वगैरे पत्रात कळविलेले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झ ााल्याने अपिलकर्ता यांनी दि.२०.७.२०१० रोजी ३ अपीले सादर केली. तीनही अपीलांच्या संदर्भात दि.४.९.२०१० रोजी निर्णय देण्यात आलेला आहे. त्यामध्ये अपिलकर्ता यांना हव्या असलेल्या माहितीबाबत एकूण किती शुल्क/रक्कम द्यावी लागेल ते (तपशीलासहीत)व कामाची पहाणी करणा-या अधिका-यांच्या नावाबद्दलची माहिती हे आदेश प्राप्त झ ााल्यापासून ४ आठवडयांच्या आत कळवावी. आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्यात असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दि.२५.९.२०१० रोजी व दि.६.१.२०११ रोजी उपरोक्त माहितीच्या खर्चाकरीता प्रत्येक अर्जाची मिळून एकूण रक्कम रु.३१८६/- कळविण्यात आली होती. परंतु अपिलकर्ता यांनी सदरच्या रकमेचा भरणा न करता असमाधानकारक

उत्तर दिले या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे ३ द्वितीय अपीले दाखल केलेली दिसतात.

आज सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही संपूर्णपणे मोघम स्वरुपाची माहिती आहे व ती सर्व वार्डातील व २ वर्षांच्या कालावधीची असल्यामुळे ती अतिशय विस्तृत प्रमाणात आहे. तसेच सर्व कामांची माहिती याचा कोणताही अर्थबोध होत नसल्यामुळे अपिलकर्ता यांना निरिक्षणाकरीता कळविण्यात आले होते. परंतु अपिलकर्ता निरिक्षणाकरीता हजर झाले नाहीत व त्यांनी असमाधानकारक उत्तर असे कारण देऊन प्रथम अपीले दाखल केली. प्रथम अपीलांच्या सुनावणीसही ते हजर राहिलेले नाहीत व प्रथम अपीलांमध्ये त्यांनी अंदाजित पृष्ठ संख्येप्रमाणेआराखडयाचा खर्च भरणा करावा असे कळविण्यात आले तरीसुध्दा त्यानंतरही त्यांनी खर्चाचा भरणा केलेला नाही व ते कार्यालयातसुध्दा उपस्थित झाले नाहीत व आयोगाकडे मात्र पुन्हा असमाधानकारक उत्तरे अशाप्रकारचे कारण देऊन ३ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी केव्हाही माहिती देण्यास नाकारलेले नाही व ती त्यांना मुदतीत कळविलेली आहे त्यामुळे अपिलकर्ता यांची अपीले निकाली काढण्यात यावी अशी त्यांनी आयोगापुढे विनंती केलेली आहे.

अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सदर माहिती निश्चित वर्णन करणारी नाही व साधारणतः एका वर्षाच्या कालावधीतील सर्व वार्डातील कामाच्या संबंधात किंवा ठेकेदारांना केलेल्या पेनल्टीच्या संदर्भात मोघम अशी माहिती मागीतलेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनीसुध्दा निश्चित अशा खर्चाचा भरणा करावा असे सांगता येण्यासारखे नसल्यामुळेच त्यांनी निरिक्षणाकरीता यावे असे कळविलेले दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(त्र)मध्ये माहितीचा अधिकार याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे व त्यामध्ये १)एखादे काम,दस्तऐवज,अभिलेख यांची पहाणी करणे २)दस्तऐवजांच्या किंवा अभिलेख्यांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे इत्यादी अशी तरतूद आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी मोघम माहिती असल्यामुळे अभिलेखे निरिक्षणाकरीता कळविलेले आहे ते अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणेच आहे. अर्जदाराने माहिती मागीतल्यावर सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता उपरोक्त खर्च येणार असला तरी कलम ७(१) मध्ये विहित करण्यात आलेल्या फी चे प्रदान केल्यानंतर माहिती देणे अशी तरतूद आहे व पोट कलम ३ मध्ये माहिती देण्याचा खर्च दर्शविणारी कोणतीही जादा फी प्रदान केल्यावर माहिती देण्याचा निर्णय घेण्यात आला असेल तर त्याबाबत फीनुसार ती जादा रक्कम त्यांनी कशाच्या आधारे ठरविली त्या हिशोबासह माहिती पुरविण्याचा व त्यांनी निर्धारित केलेला खर्च दर्शणिारा जादा फीचा

तपशील नमूद करणारी सूचना पाठवेल व त्याद्वारे फी भरण्याची विनंती करेल अशी तरतूद आहे व त्याप्रमाणेच जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली आहे व ती विहित मुदतीत केलेली आहे त्यामुळे असमाधानकारक उत्तर दिले असे जे अपिलकर्ता यांची प्रथम अपीलाचे किंवा द्वितीय अपीलात कारण दिलेले आहे ते योग्य नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी या ज्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणास लागू आहेत तशा त्या अर्जदार अपिलकर्ता यांनासुध्दा लागू आहेत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेल्या खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. यास्तव सदरची तीनही अपीले निकाली काढण्यास पात्र आहेत.

**आदेश**

**१) वरील ३ अपिले निकाली काढण्यात येत आहेत.**

**२) सदर आदेशाची प्रत अपिलकर्ता व उत्तरवादी यांना पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १७.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०११८/अपील क्रमांक ६२५९/२०१०**

**श्री. सुनिल काशिनाथ जाधव,**
**म्युनिसिपल चाळ नं.४६८, रुम नं.१२,**
**बकरी अड्डा, ना.म. जोशी मार्ग, मुंबई-४०००११. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(घ.क.व्य.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय इमारत,**
**१०, शेख हफिजुद्दिन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(घ.क.व्य.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय इमारत,**
**१०, शेख हफिजुद्दिन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १७.३.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.५.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, मुख्य पर्यवेक्षक(घ.क.व्य.) यांच्याकडे अर्ज करुन श्रीमती सुरेखा काशिनाथ जाधव यांचे अनुकंपा(पी.टी.) प्रकरण निकाली काढण्याबाबत, कालावधी जुलै-१९७६ ते आत्तापर्यंत, का निकाली काढले नाही याबद्दलची माहिती द्यावी, माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसते. सदरचा अर्ज सहाय्यक अभियंता(घ.क.व्य.) ई विभाग कार्यालय इमारत यांच्याशी संबंधित असल्यामुळे तो त्यांच्याकडे मुख्य पर्यवेक्षक यांनी हस्तांतरित केला. परंतु अपिलकर्ता यांनी दि.१६.७.२०१० रोजी कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर दि.१६.८.२०१० रोजी श्रीमती द्रौपदी भानू जाधव यांचे अपील क्र.ईई/०१/१४९ आणि ईई/०४/८४ या दोन अनुकंपा प्रकरणी नोंदी आढळत नाही असे कळविलेले दिसून येते.त्यानंतर श्री.सुनिल काशिनाथ जाधव यांनासुद्धा२४.८.२०१० रोजी आपण केलेल्या माहितीच्या अधिकारांतर्गत विचारलेली माहिती आपणास पाठविण्यात आलेली आहे व त्यामध्ये नोंदी आढळून येत नाही असेच त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता हजर आहेत, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी श्रीमती सुरेखा

काशिनाथ जाधव यांचे अनुकंपा(पी.टी.) प्रकरण अजून निकालात का काढण्यात आले नाही याबाबतची माहिती मागीतली होती. परंतु त्यांना श्रीमती द्रौपदी भानू जाधव किंवा श्रीमती द्रौपदी इ ाानु जाधव यांच्या संदर्भात उत्तर कळविण्यात आलेले आहे. तसेच आयोगाची नोटीस आल्यानंतर विभागाचे अधिकारी त्यांच्या घरी येऊन त्यांना काही कागदपत्र देऊन गेलेले आहेत. सदरची कागदपत्र अपिलकर्ता यांनी आयोगाच्या निदर्शनास आणली व त्या कागदपत्रांवरुन कोणताही अर्थबोध होत नाही. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या प्रकरणात सखोल चौकशी करुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती उपलब्ध असल्यास ती पुरविण्यात यावी व माहिती उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे कळवण्यात यावे.**

**२) राज्य माहिती आयोगाच्या दि.२१.१२.२०१० च्या नोटीसप्रमाणे आज सुनावणीसाठी हजर न राहिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई का करण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत करावा अन्यथा त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे करावी लागेल याची नोंद त्यांनी घ्यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १७.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९८७३/अपील क्रमांक ७०१९/२०१०**

**श्री. संतोष दत्ताराम सावंत,**

**न्यु बॉडीगार्ड पोलीस लाईन, १मजला,**
**खो.क.२४, डॉकयार्ड रोड रेल्वे स्टेशन समोर,**
**माझगाव, मुंबई-४०००१०. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अभियंता,**
**मध्य मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**गणपतराव कदम मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**मध्य मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**गणपतराव कदम मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १७.३.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदरचे अपील दि.१७.१२.२०१० रोजी सुनावणीस ठेवण्यात आले होते त्याचवेळेस अपिलकर्ता यांनी गेल्या १० दिवसांपासून मलेरीयाने आजारी असून दोन्ही पायांना सूज आलेली आहे तरी सुनावणीची पुढील तारीख मिळावी अशी विनंती केली.त्याचवेळेस जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यांचे समाधान झालेले आहे तरी तक्रार नाही असे त्यांनी दि.१८.१२.२०१० रोजी लेखी लिहून दिलेले असून ते आयोगाच्या निदर्शनास आणले. म्हणजे एका बाजूला माहिती मिळाली तक्रार नाही असे लेखी लिहून द्यायचे व आयोगाकडे मात्र अपिलाच्या सुनावणीस मुदत मागावयाची असा दुटप्पी व्यवहार अपिलकर्ता करीत असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे,

**<u>आदेश</u>**

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १७.३.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२३२/अपील क्रमांक ६२२३/२०१०

श्री. जगदिश माधवदास आहुजा,
लिटिल हट, प्लॉट नं.५०१, प्लॉट नं.२३८,
२७वा रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ..... अपिलकर्ता

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था(३)मुंबई,
गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९, तळ मजला,
बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,एच/प. विभाग,
सहकार बाजार, ४था माळा, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी

# <u>निर्णय</u>

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २१.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.३.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी , प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.३०.६.२०१० रोजी (१.७.२०१०) रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक एच(डब्ल्यू)वार्ड,बांद्रा(प.), मुंबई यांच्याकडे त्यांनी दि.१८.१०.२००८, १८.८.२००९,२.२.२०१० व ९.२.२०१० रोजी सहकारी संस्थेला दिलेल्या अर्जांच्या संदर्भात तसेच व्यवस्थापन समितीच्या बैठकीची माहिती उपलब्ध करुन दिली नाही ती उपलब्ध करुन द्यावी तसेच मुंबई डिस्ट्रीक्ट को-ऑपरेटीव्ह हौसिंग फेडरेशन लिमिटेड यांच्या दि.७.६.२०१० च्या संदर्भातील बैठकीचे इतिवृत्त तसेच बंधपत्राची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.८.७.२०१० रोजी उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी मुद्दा क्र.A व B बाबत विशिष्ट अशा कोणत्याही कागदपत्रांच्या नकलांची मागणी केल्याचे दिसून येत नाही सबब त्याकरीता समक्ष संपर्क साधावा व माहितीबाबत चर्चा करावी, उपलब्ध कागदपत्रानुसार आपणास माहिती देण्यात येईल. तसेच मुद्दा क्रमांक सी बाबातही आपण या कार्यालयात समक्ष येवून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१२.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२४.९.२०१० रोजी देण्यात आला असून अपिल अर्जाचे व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, उपनिबंधक, सहकारी संस्था एच(प.) विभाग, मुंबई यांनी अर्जदाराला उत्तर दिलेले आहे. मुद्दा क.१ व २ बाबत माहिती संस्थेच्या स्तरावरील असून, उपनिबंधक सहकारी संस्था,एच(प.) विभाग, मुंबई यांचे कार्यालयाचे स्तरावरील नाही. सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.केंमाअ-२००८/प्र.क्र.९३/०८/सहा(माअ) दि.६ सप्टेंबर,२००८ नुसार माहिती पुरवितांना सार्वजनिक प्राधिकरणाकडे कलम २(च)मध्ये व्याख्या केलेली व उपलब्ध असलेली माहितीच पुरविणे अभिप्रेत असून जेथे वेगळयाने माहितीचे संकलन, संशोधन व पृथःकरण करणे आवश्यक आहे अशा स्वरुपातील माहिती पुरविणे अभिप्रेत नाही. त्यामुळे सदरची माहिती देता येत नाही. मुद्दा क्रमांक ३ हा बंधपत्राबाबत आहे. बंधपत्र स्विकारले आहे किंवा नाही याबाबत माहिती देणे अपक्षित आहे व त्यामुळे मुद्दा क्र.१ व २ अमान्य करीत आहे व मुद्दा क्र.३ मान्य करीत आहे व बंधपत्राची माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आह.

जन माहिती अधिकारी सुनावणीस गैरहजर आहेत. अपिलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी संस्थेकडे जी पत्रे दिलेली आहेत त्या पत्रांच्या संदर्भात त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यांच्या द.१.७.२०१०च्या अर्जामध्ये सदर पत्रांचा उल्लेख त्यांनी केलेला आहे व त्या पत्रांच्या प्रमाणे संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी त्यांनी मागणी केलेली आहे. तसेच मुंबई डिस्ट्रीक्ट कोऑपरेटीव्ह हौसिंग फेडरेशन लि. यांच्या दि.७.६.२०१० च्या बैठकीच्या इतिवृत्ताची व बंधपत्राची माहितीही मागितलेली आहे.जन माहिती अधिकारी यांच्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराच्या मुद्दा क्र.१ व २ मध्ये कागदपत्रांची माहिती त्यांनी मागीतलेली नाही. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, संस्थेला जे पत्र दिले त्यात संस्थेच्या बैठकीचे इतिवृत्त त्यांनी मागितलेले आहे व ते जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तसेच बंधपत्रही त्यांना देणे आवश्यक होते. असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च) (त्र)मध्ये माहिती व माहितीचा अधिकार या दोन संज्ञांची व्याख्या केलेली आहे. माहितीचा अधिकार या संज्ञेप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली असलेली माहिती उपलब्ध करुन देता येते. परंतु माहिती या संज्ञेप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणास एखाद्या खाजगी निकायाकडून एखाद्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अधिकार असतील तर त्या माहितीचासुध्दा समावेश होतो. त्यामुळे अपिलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते.यास्तव सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत त्यांच्या दिनांक १.७.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा A, Bव C ची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १८.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२२३/अपील क्रमांक ६२२५/२०१०**

**श्री. दिपक एल. फुरीया,**
**ए-१०५, श्रीयोग को.ऑप.हौ.सो., जयराज नगर,**
**न्यू अशोक नगर जवळ, वझिरा नाका, बोरीवली(प.),**
**मुंबई-४०००९१. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था(३)मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९, तळ मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३),मुंबई यांचे कार्यालय,**
**गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९, तळ मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी , प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयातील राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडे Information regarding rules,regulations,instruction mauals,criteria,guidelines,circulars, etc. received by Dist.Deputy registrar

for allotment of certificate of Deemed Conveyance to the societies and other information as follows अशी माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.४.६.२०१० रोजी, आपण अे ते जी या मुद्यांबाबत डिम्ड कन्व्हेअन्स बाबत माहितीची मागणी केलेली आहे. आपणास कळविण्यात येते की, शासनाकडून डिम्ड कन्व्हेअन्स ॲक्टमधील कलम ५अे अन्वये या कार्यालयास अधिकार प्रदान केलेले असले तरी त्या अनुषंगाने शासनाकडून नियमावली तयार झालेली नाही. त्यामुळे या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२६.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.५.८.२०१० रोजी श्री.एस.पी.घोरपडे,अपीलीय अधिकारी,जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था-३ यांनी दिला असून, माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक यांनी अर्जदारांना उत्तर दिलेले आहे. दिलेले उत्तर बरोबर असले तरी मुद्देनिहाय उत्तर देणे आवश्यक आहे. माहिती अधिकारी यांनी अजदारांना मुद्देनिहाय उत्तर द्यावे व त्याकरीता अपिल अंशतः मंजूर करण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतर मुद्देनिहाय उत्तर दिलेले नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता व उत्तरवादी सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर बरोबर असले तरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१)अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.९.५.२०१०च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या मुद्यांच्या संदर्भात मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची त्यांनी नोंद घ्यावी.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक १८.३.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२२४/अपील क्रमांक ६२२४/२०१०**

**श्री. दिपक एल. फुरीया,**
**ए-१०५, श्रीयोग को.ऑप.हौ.सो., जयराज नगर,**
**न्यू अशोक नगर जवळ, वझिरा नाका, बोरीवली(प.),**
**मुंबई-४०००९१. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था(३)मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९, तळ मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,आर विभाग,ए/१ बिल्डिंग,**
**रुम नं.३१५/३१६ , ३रा मजला, वडाळा ट्रक टर्मिनल, वडाळा(पूर्व),**
**मुंबई. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २६.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.३.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.९.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,आर विभाग यांच्याकडे उपनिबंधक सहकारी संस्था आर विभाग यांच्या कार्यालयात १ जुलै,२००९ ते आजपर्यंत झालेल्या सुनावणी व पारीत केलेल्या आदेशांविषयी नोंदणी ज्या रजिस्टरमध्ये केली जाते त्या रजिस्टरची माहिती मागीतलेली दिसून येते. त्याचप्रमाणे सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या विविध कलमान्वये १ जुलै,१००९ ते ९.५.२०१० पर्यंत दाखल केलेल्या दाव्यांसंबंधी दावे दाखल केल्याचा

दिनांक,सुनावणीचा दिनांक,आदेशाकरीता बंद केले असल्यास तो दिनांक, आदेश पारीत झाले असल्यास तो दिनांक, सुनावणी झाल्यानंतर आदेशाकरीता बंद केलेले दावे, संबंधीत आदेश पारीत केले नसल्यास त्याकरीता रजिस्टर मध्ये नोंदलेली कारणे इत्यादी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२८.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.५.८.२०१० रोजी देण्यात आला असून प्रथम अपीलअंशतः मान्य करण्यात आले असून मागणी केलेली माहिती पुरवावी अशाप्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परतु त्यानतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली आहे ती अतिशय विस्तृत व मोघम स्वरुपाची आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे माहिती संकलीत करुन उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. तसेच सदरची माहिती संकलित करण्याकरीता त्यांच्या कार्यालयात १ महिन्याचा कालावधी एका कर्मचा-यास लागेल. कलम ७(९) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्यास माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. परंतु अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही विविध प्रकारची असून मोघम स्वरुपाची व विस्तृत प्रमाणात असल्यामुळे सदरची माहिती ३० दिवसात उपलब्ध करुन देणे शक्य नव्हते व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दि.१६.८.२०१० रोजी त्यांनी मागीतलेल्या माहितीच्या आवश्यक त्या पानांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात असे त्यांना कळविण्यात आले होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च)(त्र) पमाणे माहिती व माहितीचा अधिकार या दोन संज्ञांच्या व्याख्या केलेल्या आहेत व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली असलेली माहिती एखादे काम,दस्तऐवज, अभिलेख यांची तपासणी करणे व तपासणी अंती छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी आहे व त्यामुळेच अपिलकर्ता यांना १६.८.२०१० रोजी प्रत्यक्ष पहाणी करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविण्यात आले होते. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता कार्यालयात आलेले नाहीत. माहिती नाकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. परंतु विस्तृत प्रमाणातील माहिती होती व अंतिमतः ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलली आहे. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १८.३.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२३४/अपील क्रमांक ६२२६/२०१०
-मुमाआ/५०२३६/अपील क्रमांक ६२२७/२०१०

डॉ.के.शिवराजमनी,
सी-१६, यमुना (बी.ए.आर.सी.),
अणूशक्ती नगर, मुंबई-४०००९४. ..... अपिलकर्ता

<u>विरुध्द</u>

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा समादेशक,होमगार्डस,बृहन्मुंबई,**
**जुने सचिवालय विस्तारगृह, एम.जी. रोड,**
**फोर्ट जवळ, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी,उपमहासमादेशक होमगार्डस,बृहन्मुंबई,**
**जुने सचिवालय विस्तारगृह, एम.जी. रोड,**
**फोर्ट जवळ, मुंबई-४०००३२.** ...... **उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २७.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

**अपिल क्रंमांक-६२२६-**

अपिलकर्ता यांनी दि.२०.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, होमगार्डस यांच्याकडे एकूण १७ मुद्यांमध्ये श्री.एम.एच.हकीम व डॉ.के.एस.मणी(S.O.Adm.Mumbai)यांच्या संदर्भात सन १९८४ ते २०१० या कालावधीतील माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१.१०.२०१० रोजी एकूण १७ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने तयांनी दि.२३.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली परंतु ती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नाही व माहिती उपलब्ध करुन देतांना कोणत्याही प्रकारची कागदपत्र दिलेली नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ज्या मुद्यांच्या संदर्भात आदेश नाहीत त्याबाबत कोणतीही कागदपत्र उपलब्ध करुन देता येत नाहीत. तसेच अपिलकर्ता यांनी काही मुद्यांमध्ये जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागीतलेले आहेत. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांचे प्रकरणातील निर्णयाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे अभिप्राय अपेक्षित नाहीत व त्यामुळे ते त्यांनी दिलेले नाहीत. तसेच विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली याचे कारण अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती माहिती १९८४ पासूनची आहे व त्यामुळे त्या संपूर्ण माहितीचा शोध घेतांना विलंब झालेला आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्या मुद्यांच्या संदर्भात जे कागदपत्र उपलब्ध असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**अपिल क्रमांक ६२२७ -**

सदर प्रकरणी अपीलकर्ता यांनी दि.२०.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,होमगार्डस यांच्याकडे एकूण एकूण १४ मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते. माहितीचा कालावधी सन २००५ ते २०१० असा आहे व माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मदतीत मााहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२३.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र दिनांक ११.१.२०११ रोजी अपिलकर्ता यांना मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतु ती विलंबाने उपलब्ध झाली व काही मुद्यांच्या संदर्भात जी कागदपत्र मागीतलेली होती त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती अतिशय जुनी म्हणजे १९८४ पासूनची मागीतलेली दिसून येते व तिचा शोध घेतांना विलंब झालेला आहे. तसेच त्यांना दि.४.९.०९ रोजी त्यांच्या दि.६.४.०९च्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.असे असले तरी अपिलकर्ता यांनी त्यांच्या प्रत्येक मुद्यामध्ये जर कागदपत्र मागीतलेली असतील तर ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जर त्यांनी मुद्यांमध्ये प्रकरणाच्या निर्णयाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागीतले असतील तर अशाप्रकारचे अभिप्राय अपेक्षित नाहीत. अपिलकर्ता यांनी पुन्हा युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी आयोगापुढे ॲफेडेव्हीट दाखल केलेले आहे. त्यांच्या ॲफेडेव्हीटमधील एकूण १० मुद्यांचे अवलोकन केले असता त्यांना कागदपत्र उपलब्ध न झाल्याच्या संदर्भात त्यांनी कोणतीही तक्रार केलेली नाही. मात्र त्यांच्या ॲफेडेव्हीटमधील सर्व मुद्यांमध्ये त्यांना पदोन्नतीपासून कशाप्रकारे वंचित ठेवण्यात आले याबद्दलचे मुद्दे त्यांनी उपस्थित केलेले आहेत.परंतु माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या तरतुदींप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्या संदर्भात निर्णय करण्याचे अधिकार आयोगास नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(च) मध्ये व (त्र) मध्ये माहिती व माहितीचा अधिकार या संज्ञांची व्याख्या केलेली आहे व त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असलेले अभिलेख,कागदपत्र,दस्तऐवज यांच्या स्वरापात जी माहिती उपलब्ध आहे त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा आयोग कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात निर्णय/अभिप्राय देण्यास सक्षम नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२०.८.२०१० च्या अर्जातील मुद्यांच्या संदर्भात जी कागदपत्र छायांकित प्रतींच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली नसतील ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१) अपिलकर्ता यांचे अपील क्र.६२२६/०२ व ६२२७/०२ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांच्या दि.२०.८.२०१० च्या दोन्ही अर्जांमधील मुद्यांच्या संदर्भात ज्या मुद्यांमध्ये कागदपत्र मागीतलेली आहेत त्यांच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १८.३.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१०२/अपील क्रमांक ६२६८/२०१०

श्री.नरेंद्र रामभाऊ पाटील,
मु.सालवड पो.टी.ए.पी.पी.,
ता.पालघर, जि.ठाणे. ..... अपिलकर्ता

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी ,
राज्य उत्पादन शुल्क भवन, १ला मजला,
चेंदणी कोळीवाडा, मिठबंदर रोड, ठाणे(पूर्व)

जन माहिती अधिकारी,
राज्य उत्पादन शुल्क विभाग, बोईसर,
ता.पालघर, जि.ठाणे. ...... उत्तरवादी

<u>निर्णय</u>

द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १९.३.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यानी दि.५.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी राज्य उत्पादन शुल्क, विभाग बोईसर यांच्याकडे अर्ज करुन मु.सालवड,शिवाजीनगर येथे असलेले हिराबाई मेस्त्री यांचे देशी दारुचे दुकान व संतोषी बार ही दोन्ही दुकाने(बार) अधिकृत की अनधिकृत जागेवर आहेत, ती जागा कोणत्या सर्वे नंबर व हिस्सा नंबर वर आहेत, ती जागा एन.ए. आहे का? याची तालुका अभिलेख कार्यालयातून जागेच्या नकाशासह माहिति द्यावी अशी माहिती मागीतलेली आहे. सदरची महिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.१९.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,उप अधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क, ठाणे यांनी अपिलकर्ता यांना मुक्काम सालवड शिवाजीनगर येथे असलेले हिराबाई मिस्त्री यांचे देशी दारुचे दुकान व संतोषी बार ही दोन्ही दुकाने अधिकृत की अनधिकृत जागेत आहेत, ती जागा सर्व्हे नं.६० व हिस्सा नं.३ वर आहेत ती जागा एन.ए. असून जमिनीचा गट क्र.२२७ झालेला असल्याचे तलाठी कोलवडे ता.पालघर जि.ठाणे यांनी कळविलेले आहे. याबाबत त्यांनी सादर केलेल्या ६०/३ व गट क्र.२२७ चा ७/१२ च्या उता-याची सत्यप्रत जोडून पाठविण्यात येत आहे. तसेच दुय्यम निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, डहाणू क्र.२ यांनी तलाठी कोलवडे ता.पालघर, जि.ठाणे यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती सादर करण्यात येत आहे असे कळविले व त्यासोबत तलाठी कोलवडे यांनी दि.३०.४.२०१० रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत व नकाशाची प्रत सोबत जोडून दिलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२८.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलामध्ये सदरचा बार अधिकृत की अनधिकृत याचा कोणताही स्पष्ट खुलासा करण्यात आलेला नाही व दिलेले उत्तर संदिग्ध स्वरुपातआहे व अशाप्रकारे दिलेली माहिती खोटी आहे असे कारण दिलेले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात अर्जदाराने प्रथम अपील दाखल केलेले नाही असे आवक रजिस्टर तपासले असता दिसून येते असा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा केलेला आहे. परंतु त्यानंतर अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकारी राज्य उत्पादन शुल्क, विभाग ठाणे यांना मागीतलेली माहिती ही संपूर्ण खोटी व संभ्रमावस्थेत टाकणारी आहे असे त्यांनी आयोगापुढे स्टँप पेपरवर लेखी दिलेले आहे तसेच तोंडी युक्तीवाद करतांनासुध्दा त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरचा सर्व्हे नं.६० व हिस्सा नंबर३ ही जमिन त्यांचे काका कै.जिवन वामन पाटील यांच्या मालकीची असून ते १९५५-५६ पासून सदर जमिनीचे कुळधारक आहेत. त्यांनी किंवा त्यांच्या वारसांनी कोणीही जमिन विकलेली नाही. सदर जमिनीवर अतिक्रमण करुन दारु दुकानाचे बांधकाम केलेले आहे ते बेकायदेशीर आहे. तरी माननीयांनी सदर ६०/३ च्या जागेचे खरेदी खत तालुका अभिलेख कार्यालयाकडून जागेचा नकाशा,जागेचे रजिस्ट्रेशन,जागेच्या एन.ए.चे संपूर्ण कागदपत्र यासह माहिती द्यावी अशी विनंती त्यांनी आयोगापुढे केली. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तलाठी कोलवडे यांनी दिलेली माहिती ही अपिलकर्ता यांना कळविण्यात आलेली आहे. दुकान किंवा बार अधिकृत आहेत किंवा अनधिकृत याबाबत दुकानांना परवाना आहे किंवा नाही यावरुन ठरविण्यात येते. अपिलकर्ता यांनी परवाना मागितलेला नाही तर जमिनीबाबत माहिती मागितलेली आहे व जमिनीच्या बाबतची माहिती ही फक्त महसूल विभागाकडूनच मिळू शकते म्हणूनच तलाठी यांच्याकडील माहिती मागवून ती देण्यात आली आहे. तसेच चुकीचे खरेदी खत, चुकीचा नकाशा, चुकीचे रजिस्ट्रेशन व चुकीच्या एन.ए.ची पूर्ण कागदपत्र ही माहिती राज्य उत्पादन शुल्क या विभागात नसते. ही माहिती अपिलकर्ता यांनी म्हटल्यापमाणे तालुका अभिलेख कार्यालयातील माहिती आहे व त्या कार्यालयात अर्ज करुन ती माहिती त्यांनी

उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक झाले असते. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना पुन्हा असे सांगितले की, देण्यात आलेली माहिती खोटी आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांची अपेक्षा ही कारवाई करण्याची दिसून येते. परंतु जमिनीच्या मालकीच्या संदर्भात किंवा फेरफारीच्या संदर्भात उपलब्ध झ ालेल्या माहितीवरुनअपिलकर्ता यांना जरी अनियमितता आढळून येत असली तरी त्यांनी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता-१९६६ च्या कलम २४७ प्रमाणे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल करणे व न्याय मिळविणे संयुक्तिक राहील. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे जशी माहिती आहे ती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १९.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०१००/अपील क्रमांक ६२६७/२०१०**

**श्री.समीर झवेरी,**
**१२७, मुंबादेवी रोड,**
**दया मंदिर बिल्डिंग, ३रा मजला,**
**मुंबई-४००००३. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप अधिष्ठाता,**
**लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय,**
**शीव, मुंबई-४०००२२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिष्ठाता,**
**लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय,**
**शीव, मुंबई-४०००२२. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १९.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

सदर अपीलात अपिलकर्ता यांनी दि.३.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी सायन हॉस्पीटल,सायन यांच्याकडे दि.२२.६.२०१० रोजी कुर्ला रेल्वे स्टेशन कडून जो अपघाती रुग्ण दाखल झाला त्याबद्दलची माहिती खालीलप्रमाणे मागीतलेली दिसून येते-

१)Furnish me admission time of the aforesaid victim at Sion Hospital

२) Kindly provide me certified copies of the admission records of Sion Hospital

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२१.८.२०१० रोजी उपरोक्त संदर्भानुसार रुग्ण श्री.अहमदअली खान यांच्या रुग्णालयीन अभिलेखाच्या छायांकित प्रती रुग्ण किंवा त्यांच्या पत्नीने सदर माहिती मागविल्यास फक्त त्यांना दिली जाते व इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीस देता येत नाही असे कळविलेले दिसून येते.परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी

दि.२४.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय अपिलकर्ता गैरहजर असल्यामुळे दिलेला नाही व त्यामुळेच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, दि.२३.जून,२०१० च्या मिड-डे मध्ये सदरच्या रुग्णाबद्दलची माहिती आलेली असल्यामुळे त्यांनी त्यांचा रुग्ण म्हणून स्विकार करुन घेण्याबद्दलची माहिती मागीतली आहे. सदरच्या बातमीमध्ये रुग्णास ५ ते ६ तास कोणत्याही प्रकारे दाखल करुन घेतलेले नव्हते व त्यामुळे सदरचा रुग्ण मृत्यू पावलेला आहे व म्हणून रुग्ण हॉस्पीटलमध्ये आल्यापासून तो दाखल करुन घ्यावयाच्या वेळेच्या संदर्भात माहिती मागीतलेली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे सदरची माहिती गोपनीय नाही व ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यावर जन माति अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मेडीकल कौन्सिलच्या नियमाप्रमाणे तसेच रुग्णालयामध्ये घेतलेल्या निर्णयाप्रमाणेसुध्दा कोणत्याही रुग्णाची मााहिती ही फक्त रुग्ण किंवा त्याच्या पत्नीसच उपलब्ध करुन दिली जाते, त्रयस्थ व्यक्तीस ती उपलब्ध करुन दिली जात नाही व त्याकरीताच ही माहिती गोपनीय आहे असे कौन्सिल ऑफ इंडियाच्या नियमामध्ये आहे व त्याप्रमाणे अपिलकर्ता त्रयस्थ व्यक्ती असल्यामुळे त्यांना ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी फक्त रुग्णास दाखल करुन घेतल्याच्या प्रवेशाची छायांकित प्रत मागीतलेली आहे. परंतु त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की ॲडमिशन रेकॉर्डवर वेळ असते तसेच रुग्ण कोणत्या अवस्थेत आलेला आहे व त्यास कोणत्या ट्रीटमेंटची आवश्यकता आहे वगैरे माहितीही त्यात नमूद केलेली असल्यामुळेच ती गोपनीय माहिती समजली जाते  ती देता येणार नाही. मात्र अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी रुग्ण कोणत्या वेळेस दाखल झ ाला ती माहिती मागीतलेली असल्यामुळे व सदर माहिती गोपनीय असू शकत नाही यास्तव ती माहिती स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या रुग्णाच्या संदर्भात ॲडमिशन किती वाजता झाले याबद्दलची माहिती त्यांना माहिती अधिकारी यांनी हॉस्पीटलच्या सही शिक्क्यानिशी रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १९.३.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१४३/अपील क्रमांक ६२६९/२०१०

श्री.अजय जगदिश तलरेजा,
९, डिसोजा चाळ, दत्तमंदिर रोड,
बाणडोंगरी, मालाड(पूर्व),
मुंबई-४०००९७. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
सहा.आयुक्त, आर/साऊथ कार्यालय,

**कांदिवली(प.), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहा.आयुक्त, आर/साऊथ कार्यालय,**
**कांदिवली(प.), मुंबई. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १९.३.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.७.२०१० रोजी जन महिती अधिकारी आर/साऊथ कार्यालय, कांदिवली(प.),यांच्याकडे मुंबई महानगरपालिकेच्या उद्यानामधील बोरवेलची माहिती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, समता नगर,कांदिवली(पूर्व), मुंबई, दादोजी कोंडदेव खेळाचे मैदान कांदिवली(पूर्व) मुंबई इत्यादी एकूण ७ उद्यानातील बोरवेलची माहिती तपशिलात मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे मिळण्याबाबत नमूद केले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२१.८.२०१० रोजी आपणास हवी अलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध आहे, कार्यालयाशी दुपारी ३.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन सुट्टीव्यतिरिक्त संपर्क साधल्यास सदर माहिती प्रति प्रत रु.२/-चा भरणा केल्यास आपणास मिळेल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.३.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १६.९.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता परिरक्षण पूर्व/पश्चिम,आर/द. यांनी माहिती व्यवस्थित दिलेली नाही, रु.२/- प्रत्येकी प्रति प्रत भरावे व माहिती घेऊन जावी ही माहिती होऊ शकत नाही. एकूण किती प्रती आहेत व प्रत्येक प्रतिस रु.२/- प्रमाणे एकूण रक्कम कळविण्यात यावी व रक्कम मिळताच १ महिन्याच्या कालावधीत माहिती देणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी याची नोंद घेणे आवश्यक आहे व असे उत्तर भविष्यात पाठविले जाणार नाही याची खबरदारी घ्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. परंतु अपिलकर्ता यांनी सहाय्यक आयुक्त यांच्याकडे दाखल केलेल्या निवेदनामध्ये दि.५ ऑक्टोबर पासून माझा कार्यकर्ता श्री.संजीव भोसले समक्ष पत्र घेउन कार्यालयात गेल्यावर पेपरची मागणी केली. पहिले श्री.एन.वी. वेंगुर्लेकर यांनी ३० दिवस आज ये उद्या ये असे केले मग श्री.संजय भोसले यांना हे प्रकरण माझ्याकडे नाही असे सांगून श्री.प्र.सा.देसाई यांच्याकडे पाठविले व त्यांनीदेखील आज ये उद्या ये असे ३० दिवस काढले. दि.७डिसेंबर,२०१० रोजी श्री.वेंगुर्लेकर व श्री.देसाई या दोघांनी सांगितले की, तुम्हाला हवी असलेली माहिती देण्यात येणार नाही, आम्ही कॉन्ट्रॅक्टरचे बिल घेत नाही व मुंबई महानगरपालिकेकडून स्वतःचे पेमेंट सर्टिफिकेटवर पेमेंट करण्यात येते. त्या दोघांनी मिळून श्री. के.के.पिसाळ यांच्याकडे

नेले व त्यांनी देखील हेच उत्तर दिले की, तुम्हाला हवी असलेली माहिती आम्ही देऊ शकत नाही व आमच्या कार्यालयातून काही लेखी तुम्हाला देण्यात येणार नाही हे स्पष्टपणे सांगण्यात आले होते.अर्ज केलेले पत्र व कार्यालयातून प्राप्त झालेले पत्र सोबत जोडण्यात येत आहे अशाप्रकारे त्यांनी निवेदन दिलेले आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही हे निश्चित दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दि.१०.१.२०११ रोजी माहिती उपलब्ध आहे ती घेऊन जावी असे पत्र दिलेले दिसून येते. त्यापूर्वीसुध्दा दि.१६.१२.२०१० रोजी सहाय्यक अभियंता यांनी उपलब्ध असलेल्या माहितीचे निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलकर्ता यांना माहिती नाकारलेली नाही. परंतु अपिलकर्ता हे माहिती घेण्यास आलेले नाहीत. परंतु जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे त्या पत्राच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्पष्टपणे, दिलेले उत्तर योग्य नाही असा निर्णय दिलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यांची तपासणी करुन माहिती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद माहितीचा अधिकार या व्याख्येप्रमाणे असली तरी मागीतलेली माहिती याबद्दलची पृष्ठ संख्या व प्रति पृष्ठ रु.२ याप्रमाणे विवरण अधिनियमाच्या कलम ७(१) प्रमाणे कळविणे आवश्यक असते व त्याप्रमाणे कळविल्या नंतरच अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. परंतु स्पष्टपणे कोणत्याही पकारे किती पृष्ठे आहेत व किती रुपयांचा भरणा करावा ते विवरण न देता महानगरपालिकेमध्ये सर्वच विभागांमधील माहिती अधिकारी हे कोणत्याही अर्जदाराने निश्चीतपणे माहिती मागीतलेली असली तरी त्यास कार्यालयात यावे तपासणी करुन प्रति पृष्ठ रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती घेऊन जावी असे कळवितात. या प्रकरणातसुध्दा तसेच कळविण्यात आलेले दिसून येते. मात्र त्यानंतर अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.संजीव भोसले यांना महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी त्यांना कशाप्रकारची वागणून दिलेली आहे व माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे ते त्यांनी सहाय्यक आयुक्त यांना लिहिलेल्या पत्रावरुन स्पष्ट होते. म्हणजे प्रत्येक अर्जदाराने कार्यालयात यावे व तपासणी करुन माहिती घ्यावी असे कळविल्यावर अर्जदार जर कार्यालयात आले तर त्यास कोणत्याही प्रकारचे अभिलेख दाखविण्यात येत नाहीत व त्यांना दिवसेंदिवस फिरवले जाते.जन माहिती अधिकारी यांची तशाप्रकारचे उत्तर देण्याची प्रवृत्तीच झालेली दिसून येते. म्हणजे माहिती नाकारायची नाही व ती उपलब्धसुध्दा करुन द्यायची नाही अशाप्रकारे महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी एक तंत्र आत्मसात केलेले दिसून यते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२३.७.२०१० रोजी त्यांच्या अर्जात मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.२३.७.२०१०च्या अर्जात मागीतलेली माहिती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) सदरच्या निर्णयाची १ प्रत आयुक्त, महानगरपालिका यांच्या अवलोकनार्थ व योग्य त्या कार्यवाहीसाठी स्वतंत्रपण पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १९.३.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०११९/अपील क्रमांक ६३७९/२०१०

श्री.समीर सॉलोमन लालझरे,
बि.नं.१२, रुम नं.०६, देवनार म्युनिसिपल कॉलनी,
गोवंडी, मुंबई-४०००४३. ..... अपिलकर्ता

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय घनसावंगी,
ता.घनसावंगी, जि. जालना.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय घनसावंगी,
ता.घनसावंगी, जि. जालना. ...... उत्तरवादी

<u>निर्णय</u>

द्वितीय अपीलाचा दिनांक : १४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १९.३.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार घनसावंगी यांच्याकडे अर्ज करुन १)मौजे अंतरवालीराठी गट न.१३३ मधील फेरफार क्र.१०४८ ची मुळ संचिका २)फेरफार क्र.१०४८ च्या मंजूर कालावधीतील तलाठी यांचे नाव व ते केव्हापासून त्या सजावर होते ३) २००६ पासून ते सन २०१० पर्यंत वर्षनिहाय पीकफे-यांच्या नोंदीचा तपशील ४)गट नं.१३३ चे सन २००६ पासून ते आजपर्यंत विविध कारणास्तव झालेले सर्व पंचनामे वर्षनिहाय पंचनाम्याच्या सत्यप्रती ५)सन २००० ते आजपर्यंतचे गट नं.१३३ चे ७/१२च्या प्रती , सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. त्यांनी त्यांचा पत्ता पुढीलप्रमाणे दिला आहे- घर नं.११३,म्हाडा कॉलनी,शिवाजी नगर,भोकरदन रोड,जालना, जि.जालना ४३१२०३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी तहसिलदार घनसावंगी यांच्याकडे भोकरदन रोड, जालना येथील पत्ता देऊन माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केलले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलली दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी जालना येथील पत्ता देऊन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकाडे अर्ज दाखल केला परंतु मुंबई येथील पत्ता देऊन द्वितीय अपील मात्र मुंबई येथे दाखल केले आहे. त्यामुळेच तहसिलदार घनसावंगी यांना या अपिलाच्या सुनावणीकरीता मुंबई येथे राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात उपस्थित रहावे लागले. वास्तविक हा माहितीच्या अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींचा गैरवापर आहे. अपिलकर्ता यांनी सदरचे अपील औरंगाबाद खंडपीठाकडे दाखल करणे आवश्यक होते जेणेकरुन जालना येथील जन माहिती अधिकारी यांना औरंगाबाद खंडपीठातच सुनावणीसाठी उपस्थित रहाता आले असते. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे परंतु ती चुकीची आहे. तसेच मुद्दा क्र.४ च्या पंचनाम्याच्या प्रती मिळालेल्या नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, फेरफाराच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती त्यांना दिलेली आहे ती बरोबर आहे किंवा चूक याबद्दल कोणताही निर्णय माहितीच्या अधिकारात देता येत नाही. त्याकरीता त्यांना महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६च्या प्रमाणे उपविभागीय अधिकारी आरटीएस यांचेकडे अपील दाखल करावे लागेल. पंचनाम्याच्या संदर्भात तक्रार केलेली असल्यासच पंचनामा संहितेप्रमाणे पंचनाम्याची छायांकित प्रत देता येईल.अपिलकर्ता यांच्या म्हणण्याप्रमाणे पूर्वी तक्रार केलेली आहे व पंचनामा सुध्दा आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्याकडे पंचनाम्याच्या प्रती उपलब्ध असल्यास तशा सत्य प्रती निश्चितच उपलब्ध करुन देता येतील व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी अपिलकर्ता यांच्या दि.३.५.२०१०च्या अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात गट नं.१३३ चे सन २००६ पासून विविध कारणास्तव झालेल्या सर्व पंचनाम्यांच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १९.३.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५००९९/अपील क्रमांक ६२६६/२०१०**

**श्री. अन्सारी अहमद मो.युसूफ,**
**अंजुमन इस्लाम, अहमद सेलर हायस्कुल,**
**१२५, दिनतिमकर रोड, नागपाडा, मुंबई-४०० ००८. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण निरिक्षक(एन झेड),**
**चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई-४०००७१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**अंजुमन इस्लाम अलाना गर्ल्स हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज,**
**एस.जी. बर्वे मार्ग,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १९.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १९.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०१०५/अपील क्रमांक ६२७०/२०१०**

**श्री.समीर सॉलोमन लालझरे,**
**बि.नं.१२, रुम नं.०६, देवनार म्युनिसिपल कॉलनी,**
**गोवंडी, मुंबई-४०००४३.**

**.....        अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय घनसावंगी,**
**ता.घनसावंगी, जि. जालना.**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय घनसावंगी,**
**ता.घनसावंगी, जि. जालना.        ......        उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १९.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई        (विलास पाटील)**
**दिनांक १९.३.२०११        राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल**
**झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/६०५/तक्रार क्र. १५६/का.१**

**श्री. मोहम्मद अफझल,**
**सी/५०८आकार, कल्याण कॉप्लेक्स,**
**यारी रोड,अंधेरी(प.),**

मंबई-४०००६१. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
इमारत प्रस्ताव विभाग(WS),
म्युनिसिपल ऑफीस, आर.के.पाटकर मार्ग,
भाभा हॉस्पीटलच्या पुढे, बांद्रा(प.),
मुंबई-४०००५०. .... गैरतक्रारदार

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २३.३.२०११
तक्रारदार, गैरतक्रारदार यांचे प्रतिनिधी उपस्थित.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि.१९.३.२०११ रोजी केलेल्या अर्जाच्या संदर्भात ४८ तासात जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमाच्या कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, पॅरडाईज हाईल, व्हिलेजओशिवरा, मिलाट नगर, अंधेरी(प.) या इमारतीतील रहिवाशांच्या संदर्भात सहाय्यक अभियंता,बीपीडब्ल्यूएस,आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा(प.), यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५३(अ)प्रमाणे दि.१४.३.११ रोजी सर्व सभासदांनी सदनिका रिकाम्या कराव्यात अशी नोटीस दिली असल्यामुळे व त्यामध्ये सदनिका धारकांचा कोणताही दोष नसल्यामुळे त्यांना रस्त्यावर यावे लागेल अशाप्रकारे युक्तीवाद केला. महानगरपालिकेने जी नोटीस दिलेली आहे ती नोटीस सदरच्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिले नसल्यामुळे दिलेली आहे. परंतु मुंबईमध्ये अशा हजारो इमारती आहेत ज्यांना भोगवटा प्रमाणपत्र नाही, असे असतांना पॅरडाईज हाईट या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र नसल्याचे कारण देऊन नोटीस दिली असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी व विभाग यांच्या कार्यक्षेत्रात अशा भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या किती इमारती आहेत तसेच तत्संबंधी इतर अनुषंगिक माहिती त्यांनी मागीतलेली आहे. सदर माहिती त्यांनी एकूण ९ मुद्यांमध्ये, पोस्टाने मागीतलेली आहे. सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही व ४८ तास संपल्यावरसुध्दा त्यांनी ती दिलेली नाही. सदरची माहिती उपलब्ध करुन घेऊन सदनिका धारकांना न्यायालयात त्यांच्याविरुध्द का नोटीस काढण्यात आली याबद्दलची दाद मागता येईल. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महानगरपालिका कलम ३५३(ए) प्रमाणे जी नोटीस देण्यात आली आहे ती अवैध बांधकामाच्या संदर्भात देण्यात आलेली आहे व अवैध बांधकाम जर असेल तर त्यामध्ये भोगवटा प्रमाणपत्र नसतांना रहिवास असल्यास त्यांच्या विरुध्द फौजदारी केस दाखल करावी लागते. तसेच त्यापूर्वी त्यांना इमारत रिकामी करावयाची आहे अशा

प्रकारची नोटीस देण्यात आली आहे.त्याबाबत मात्र जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण दिलेले नाही. अशाप्रकारची नोटीस दिल्यानंतर महानगरपालिकेच्या विधी विभागाकडे प्रकरण पाठवले जाते असे त्यांनी सांगितले. जन माहिती अधिकारी आज आयोगापुढे सुनावणीस हजर नाहीत व ते दोन दिवसांच्या रजेवर गेले आहेत असे उपस्थित असलेल्या प्रतिनिधींनी सांगितले. तसेच जबाबदार अधिकारीसुध्दा हजर नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल झ ालेले नाही हे स्पष्ट आहे. परंतु दोन्हीही जबाबदार अधिकारी नसल्यामुळे त्याबाबत कोणत्याही प्रकारे सहाय्यक अभियंता हे माहिती देऊ शकले नहीत. असे असले तरी संबंधित निवासी गाळेधारकांना इमारत रिकामी करावयाची नोटीस दिलेली असल्यामुळे व त्यांना न्यायालयात त्या संदर्भात दाद मागावयाची असल्यामुळे सदरच्या माहितीची त्यांना आवश्यकता आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतु उपस्थित प्रतिनिधी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मागीतलेल्या माहितीचे स्वरुप पाहिले असता त्यामध्ये १०-१५ हजार इमारतींपेक्षाही जास्त इमारती असतील व त्या सर्व इमारतींच्या संदर्भात प्रत्येक नस्ती शोधून त्यात ओसी दिलेली आहे किंवा नाही, नोटीस इश्यु केलेली आहे किंवा नाही ही बाब शोधून काढावी लागेल व त्याकरीता २-३ महिन्यांचा कालावधी लागेल कारण माहिती ही ५ वर्षांची मागीतलेली आहे. परंतु तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, २ महिन्यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदरच्या निवासी गाळे धारकांविरुध्द काढलेल्या नोटीसची कारवाई स्थगित करणे संयुक्तिक राहील आणि तसेही अधिनियमाच्या कलम ४ प्रमाणे संपूर्ण माहिती ही प्रसिध्द करणे आवश्यक असल्यामुळे आता ५ वर्षानंतर सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास बराच कालावधी लागेल हे सांगणे याचा अर्थ अधिनियमाच्या कलम ४ ची अंमलबजावणी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी केलेली नाही व ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखांची जबाबदारी आहे. परंतु महानगरपालिकेच्याच अधिका-यांनी आयोगाकडे माहिती देतांना सांगितले होते की, प्रत्येक विभागातील इमारतीच्या संदर्भात आयओडी पासून ते ओसी पर्यंतच्या नोंदी एकाच रजिस्टरमध्ये असतात. तशा त्या आहेत किंवा नाहीत याबद्दल आयोगाकडे Affidavit करणे संयुक्तिक राहील व तसे नसल्यास त्याप्रमाणे रजिस्टर तयार करुन त्या इमारतीचे संस्थेचे नावाने सुध्दा नोंद करावी अशी आयोगानेच सूचना केली होती. परंतु आयोगाच्या कोणत्याच सूचना सार्वजनिक प्रमुखांकडे पाठविल्या जातात किंवा नाही त्याबद्दल आयोगास शंका आहे किंवा पाठविल्या जात असतील तर त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही हे निश्चित दिसून येते. असे असल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी कोणत्याही इमारतीस बांधकामाची परवानगी देतांना आयओडी पासून भोगवटा प्रमाणपत्र मिळेपर्य सर्व कागदपत्र प्रत्येक इमारतीच्या दर्शनी भागामध्ये लावणे हे बंधनकारक केल्यास आत्ता जो जीवनमरणाचा प्रसंग निवासी गाळेधारकांवर आलेला आहे

तो या पुढे येणार नाही याची नोंद आयुक्त,महानगरपालिका यांनी घेतल्यास त्याप्रमाणे कार्यवाही होण्यास विलंब होणार नाही.

असे असले तरी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता किंवा कार्यकारी अभियंता,इमारत व प्रस्ताव विभाग, महानगरपालिका कार्यालय,आर.के.पाटकर मार्ग, भाभा हॉस्पीटलच्यापुढे, बांद्रा(प.), यांनी तसेच मागीतलेली माहिती ही इतर विभागांशी संबंधीत असली तरी त्या विभागांकडे सदरचा अर्ज हस्तांतरीत करुन तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत २ वर्षांची माहिती(२००९-१० व २०१०-११ या कालावधीतील) त्यांच्या कार्यक्षेत्रातील ज्या इमारतींच्या संदर्भात भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही तसेच ज्या इमारतींच्या संदर्भात भोगवटा प्रमाणपत्र नसून अधिनियमाच्या कलम ३५३(ए) प्रमाणे नोटीस दिलेली आहे किंवा नोटीस दिलेली नाही अशा सर्व इमारतींची माहिती छायांकित प्रतींच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच तक्रारदार यांच्या दि.१९.३.२०११ च्या माहितीच्या अर्जात मुद्दा क्र.६ मध्ये एकूण ९ मुद्यांच्या संदर्भात जी कागदपत्र उपलब्ध असतील ती सर्व कागदपत्र छायांकित प्रतींच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.१९.३.११ च्या माहितीच्या अर्जात मुद्दा क्र.६ मधील वर्णन केल्याप्रमाणे (a) to (i) या मुद्यांच्या संदर्भात कागदपत्रांच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्याच्या छायांकित प्रती प्रति प्रत रु.२/-चा खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जे जे जन माहिती अधिकारी माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असतील असतील त्या जन माहिती अधिका-यांविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद त्यांनी घ्यावी.**

**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**

**दिनांक २८.३.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१६३/अपील क्रमांक ६३५१/२०११

श्री. भवन जी.कटारीया,
फ्लॅट नं.२६ व २७, ७वा माळा,
अरिहंत कृपा, व्ही.पी.रोड,
मुलुंड(प.), मुंबई-४०००८०. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा धर्मादाय आयुक्त,
३रा मजला, ८३,डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई-१८.

जन माहिती अधिकारी,
धर्मादाय आयुक्त कार्यालय,
३रा मजला, ८३,डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई-१८. ...... उत्तरवादी

निर्णय

| | | |
|---|---|---|
| द्वितीय अपीलाचा दिनांक | : | १८.१०.२०१० |
| सुनावणीचा दिनांक | : | २८.३.२०११ |

**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी,धर्मादाय आयुक्त कार्यालय यांच्याकडे दि.९.८.२०१० रोजी बाफना चॅरीटेबल ट्रस्ट P.T.R.No.E/३८८१(Mumbai) च्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१६.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामळेअपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

जन माहती अधिकारी सुनावणीस गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा प्रतिनिधीही पाठविलेला नाही किंवा कागदपत्र दाखल केलेले नाहीत. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, सार्वजनिक विश्वस्त संस्था ही एकाच मालमत्तेचे २ वेळा हस्तांतर करते व त्यास दोन्हीही वेळेस धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून परवानगी मिळते व त्याच संदर्भात त्यांनी माहिती मागीतलेली होती. अपिलकर्ता यांनी माहिती अधिकारी,धर्मादाय आयुक्त कार्यालय यांच्याकडून मिळालेल्या उत्तराची प्रत आयोगाच्या निदर्शनास आणली. दि.१६.९.२०१० रोजी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०च्या कलम ३६(१)(अ) अर्ज क्र.११६/२००८ प्रकरणाबाबत मागणी केलेली माहिती सध्या देता येत नाही कारण सदर प्रकरण न्यायालयीन कामाकरीता दि.१६.२.२०१० च्या पत्रान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे वर्ग केले असून प्रलंबित आहे. तसेच आपण मागणी केलेल्या उर्वरित माहितीचे स्वरुप व्यापक असल्यामुळे, आपण किंवा प्रतिनिधींमार्फत या कार्यालयात हजर राहून, उपलब्ध नोंद वहयांचे निरिक्षण घ्यावे, जेणेकरुन आपणास हवी असलेली माहिती देणे सोयीचे होईल. आपल्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे न्यासाचे एकच स्थावर मालमत्ता दोन पक्षकारांना विकलेली आहे असे दिसून येते. तेव्हा ही बाब न्यायिक स्वरुपाची असल्यामुळे आपण कायदेशीर सल्ला घेणे उचित होईल.परंतु सदरच्या पत्रावर माहिती अधिकारी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची सही नाही. अपिलकर्ता यांनी तोंडी युक्तीवाद करतांना या दोन्ही व्यवहाराच्या संदर्भात गुणवत्तेच्याबाबत युक्तीवाद केला. परंतु गुणवत्तेच्याबाबत कोणताही निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे देता येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कायदेशीर सल्ला घ्यावा असे कळविलेले दिसून येते. अपिलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी निश्चित कागदपत्रांचे वर्णन करुन कोणतीही माहिती मागीतलेली नाही तर सार्वजनिक विश्वस्त संस्थेच्या संपूर्ण व्यवहाराच्या संदर्भात व कार्यपध्दतीच्या संदर्भात टिप्पणी तयार केलेली दिसून येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे असे दिसून येते. अपिलकर्ता यांना निश्चित कोणती माहिती मागीतली आहे ते त्यांनी त्यांच्या अर्जातून आयोगाच्या निदर्शनास आणावे असे सांगितले. अपिलकर्ता यांना सुध्दा निश्चित कोणती माहिती त्यांनी मागीतली ते आयोगाच्या निदर्शनास आणता आलेले नाही.परंतु त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे जे द्वितीय अपील दाखल केलेले आहे त्या द्वितीय अपीलामध्ये मात्र आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन केलेले आहे व त्यांनी आयोगास स्पष्टपणे सांगितले की, त्यांना दि.२९.४.९३ रोजी चॅरीटी कमिशनर यांनी जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयाची प्रत त्यांना हवी आहे. त्याकरीता त्यांना खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले -

a)In respect of the application No.११६-०८ under section ३६(१)(a) of Bombay Public Trust Act,१९५०-In the matter of Bafna Charitable Trust,Mumbai.P.T.R.No.E-३८८१(Mumbai).JUDGEMENT:Delivered on २९.४.२००९.(unsigned copy of reply to be replaced by duly signed reply)

b) In respect of Application No.J-४/२६७-९२.In the matter of Bafna Charitable Trust, P.T.R.No.APPLICATION No.J-४/२६७-९२ dated २९.४.१९९३ granting necessary sanction under Section ३६( )of the B.P.T. Act,१९५० to Bafna Charitable Trust to transfer part of its immovable Property to Jan Kalyan Housing & Public Charitable Trust.

Certified copy of the aforesaid Judgement Order as well as certified copy of application along with certified copy of all annexures annexed to the application of Bafna Charitable Trust., to be provided by the Office of Charity Commissioner, Maharashtra State, Mumbai.

याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपीलकर्ता यांना त्यांच्या दि.९.८.२०१० च्या अर्जात मागीतलेली माहिती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**

**दिनांक २८.३.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ि्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९८५८/अपील क्रमांक ६१८४/२०११**

**श्रीमती वंदना एम.ठक्कर,**
**हाऊस नं.८३,फादर पिटर परेरा मार्ग,**
**व्हिलेज वार्ड, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**एल वार्ड, म.न.पा. कार्यालय,**
**एस.जी.बर्वे मार्ग, कुर्ला,**
**मुंबई-७०**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इमारत व कारखाने),**
**एल वार्ड, म.न.पा. कार्यालय,**
**एस.जी.बर्वे मार्ग, कुर्ला,**
**मुंबई-७०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २०.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : २८.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१७.११.०९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

a) Give certified copies of the letter dated 31.10.2009 along with all the annexure sent along with it by the Chief Officer DMP & CCRS date on which received by you, its inward number and all other relevant information along with the inspection of all the papers.
b) Give certified copy of the reply, action taken if any, outward number, name and designation of the signing authority and all other relevant information forwarded to the Chief Officer, DMP & CCRS.
c) Give information about the names and designations of the concerned officers supposed to take action in the matter.
d) Give information about the time period provided to file reply to the complaint received from Disaster Cell.
e) Give information about the reason for not filing the reply or not taking action in the present case.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.२२.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अपीलाच्या संदर्भात कोणताही निर्णय झालेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या दि.१७.११.०९च्या अर्जात त्यांनी जी कागदपत्र मागीतलेली आहेत ती निरिक्षण करुनच उपलब्ध व्हावीत अशी मागीतलेली आहेत व माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले होते. परंतु निरिक्षणाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना काहीही कळविलेले नाही त्यामुळे त्यांना व्यक्तीशः निरिक्षण घेण्यास उपस्थित रहाता आलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.१५.१२.०९ रोजी U.P.C. ने माहिती पाठविण्यात आली होती. श्रीमती ठक्कर यांनी त्यांच्या अर्जात सदरची माहिती त्या स्वतः व्यक्तीशः घेतील असे नमूद केले होते परंतु दि.१४.१२.०९ पर्यंत श्रीमती ठक्कर विभागात माहिती घेण्यासाठी आल्या नाहीत म्हणूनच दि.१५.१२.०९ रोजी म्हणजेच विहित वेळेत कार्यालयीन पत्र क्र.एसी.एल/सीआरटीआय/१०९५/एइबीएफएल द्वारे त्यांना पोस्टाने माहिती पाठविण्यात आली होती. परंतु श्रीमती ठक्कर यांनी आजपावेतो सदर कागदपत्रांच्या प्रती नेलेल्या नाहीत. श्रीमती ठक्कर यांनी अक्षय निकेतन या इमारतीबद्दल या कार्यालयात आजपावेतो सुमारे ५ माहिती अधिकाराचे अर्ज केलेले आहेत व प्रत्येक वेळेस त्यांना विहित कालावधीत योग्य ती माहिती देण्यात आली आहे. तसेच त्यांना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे अक्षय निकेतन या इमारतीबाबतचे अभिलेख अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तरी सदरच्या प्रकरणात या विभागाकडून विहित वेळेत सविस्तर उत्तर पाठविण्यात आले आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी पुन्हा आक्षेप घेतले व जन माहिती अधिकारी यांनी

पोस्टाने माहिती पाठविली त्या संदर्भातील जावक नोंदवहीची तपासणी व्हावी व त्यानंतरच निर्णय व्हावा अशी विनंती आयोगाकडे केली. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तसेच संबंधित प्रथम अपीलीय अधिकारी यांना व्यक्तीशः उपस्थित रहण्यासाठी व जावक नोंदवही आयोगाच्या निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी नोटीस काढण्यात आली होती. त्याप्रमाणे आज जावक नोंदवही ही जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणली. जावक नोंदवहीच्या संदर्भात अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.१२.०९ रोजी क्र.१०९५ प्रमाणे पोस्टाने माहिती पाठविली असे आयोगापुढे सांगितले असले तरी प्रत्यक्ष पोस्टाने सदरची माहिती दि.२७.१.२०१० रोजी पाठविण्यात आली आहे. जावक वहिचे निरिक्षण केल्यावर ही बाब सत्य आहे असे दिसून येते. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती ही संबंधित लिपिकाकडे दि.१५.१२.०९ रोजी पाठविण्यात आली होती. परंतु प्रकरणाची जावक नोंद वही तपासल्यावर पुन्हा सदरचे पत्र हे दि.२२.१.२०१० रोजी पाठवले असे दिसून येते. यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दि.२२.१२.०९ रोजी त्यांनी प्रथम अपील दाखल केले व दि.२२.१.२०१० रोजी प्रथम अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली त्याच दिवशी दिनांक १५.१२.०९ ही मागील तारीख टाकुन माहिती मुदतीत पाठविण्यात आली असे दाखवण्यात आलेले दिसून येते. अन्यथा दि.२२.१.२०१० रोजीच प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.१२.०९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे  हे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणले असते. तसे न करता संबंधीत अधिकारी रजेवर आहेत असे कारण दाखवून प्रथम अपीलाची सुनावणी पुढे ढकलण्यात आली व त्यामुळे त्यांनी दि.२२.१.२०१० रोजीच आक्षेप घेतलेला आहे. तसेच प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा त्यांनी सुनावणी घेतलेली नसल्यामुळे २२.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली नसल्यामुळे त्यांनी आक्षेप घेतलेले आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनासुध्दा आज त्याबाबत सुनावणीस हजर रहाण्यासाठी आदेश देण्यात आले होते परंतु आज ते हजर राहिलेले नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे ते अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये दोषी आढळून येतात व ते शास्तीस पात्र आहेत. शास्तीच्या संदर्भात त्यांना विचारणा करण्यात आली असता त्याबाबत ते कोणतेही समाधानकारक उत्तर देऊ शकलेले नाहीत व त्यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे अशाप्रकारे आयोगापुढे पुन्हा सांगितले. जन माहिती अधिकारी यांचे शास्तीबद्दलचे म्हणणे समाधानकारक नसल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.१७.११.०९च्या अर्जाप्रमाणे मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात निरिक्षण देऊन कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्यउपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता यांनी त्याकरीता जन माहिती अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत निरिक्षणाकरीता उपस्थित रहाण्याकरीता कामकाजाच्या दिवसाची तारीख व**

वेळ कळवून त्या दिवशी संबंधीत नस्तीचे निरिक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्यात.

३) जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु.५०००/-ची शास्ती लादण्यात येते.सदरची शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून करण्यात येऊन ती लेखाशीर्ष क्र.००७-इतर प्रशासनिक सेवा ६०,इतरसेवा,८००,इतर जमा रकमा(१८) माहितीचा अधिकार(००७००१६-१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी.

४)अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक २८.३.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ार्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/४९८५८-अ/अपील क्रमांक ६१८५/२०११

श्रीमती वंदना एम.ठक्कर,
हाऊस नं.८३,फादर पिटर परेरा मार्ग,
व्हिलेज वार्ड, कुर्ला(प.),
मुंबई-४०००७०. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
एल वार्ड, म.न.पा. कार्यालय,

**एस.जी.बर्वे मार्ग, कुर्ला,**
**मुंबई-७०**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इमारत व कारखाने),**
**एल वार्ड, म.न.पा. कार्यालय,**
**एस.जी.बर्वे मार्ग, कुर्ला,**
**मुंबई-७०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २०.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : २८.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२२.१२.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,इमारत व कारखाने यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते -

a) Total information notices issued u/s 351 & 488 of MMC Act in the month of Nov, 2008 by the Assistant Municipal Commissioner of L Ward with its inspection and full details, particulars i.e. name of the notices date of notices, replies received, in how many matters final order passed by the Asst MC, further action taken in all the matters with present status of all the notices and how many notices, orders have been challenged in the Court with its all particulars like suit number, name of the plaintiffs and defendants, court room numbers, name of the courts, present status of the case etc.
b) Give inspection of the Demolition Register of the year 2008 & 2009 and certified copies which may require after taking inspection of the same.
c) Give information with all particulars about the demolition carried by you during period of 10.11.2008 to 15.11.2008 and in the month of Nov-Dec, 2009 with its inspection and certified copies of the same.
d) Give information-what action provided under the MMC Act in respect of an unauthorized construction which was demolished by you earlier and re-erected / reconstructed again within the period of one year from its demolished without obtaining any permission of the concerned authority?

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.२७.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल करण्यात आले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला नसल्यामुळे दि.२०.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी आक्षेप घेतलला दिसून येतो व त्यानंतरच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, दि.२२.१२.०९ च्या अर्जाप्रमाणे अद्यापपर्यंत त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जात त्यांनी म.न.पा. अधिनियमानुसार निष्कासन कारवाई करीता असलेल्या पध्दतीबद्दल माहिती विचारण्यात आली असल्या कारणाने सदरचा अर्ज विधी विभागाकडे वर्ग करण्यात आला असल्याचे श्रीमती ठक्कर यांना दि.२१.१.२०१० रोजी कळविण्यात आले. सदरचा अर्ज दि.२२.१.०९ रोजी कार्यालयास प्राप्त झाला. सदर अर्ज श्री.अढांगळे(दुय्यम निबंधक) यांना २४.१२.२००९ रोजी अर्जदारास विहित मुदतीत आवश्यक असलेली माहिती देण्यास वर्ग करण्यात आला. त्यांनी त्याबाबतची माहिती न देता तो कनिष्ठ अभियंता श्री.गव्हाणे यांना दि.२९.१२.०९ रोजी वर्ग केला असता त्याबद्दलची माहिती श्री.गव्हाणे व श्री.कुडतरकर(कनिष्ठ अभियंता) यांनी २१.१.२०१० रोजी सादर केली. तरी झालेल्या विलंबनास दुय्यम अभियंता श्री.अढांगळे व कनिष्ठ अभियंता श्री.गव्हाणे जबाबदार आहेत. एल विभागाचे कार्यक्षेत्र मोठे असून मी एकटाच जन माहिती अधिकारी इमारत व कारखाने विभागासाठी आहे. तथापी परिरक्षण विभागामध्ये दोन जन माहिती अधिकारी आहेत. इमारत व कारखाने विभागात एक महिन्यात जवळ जवळ १५० पेक्षा जास्त माहिती अधिकाराचे अर्ज दाखल होतात. त्याशिवाय दैनंदिन कामाची व्याप्ती/बैठका/न्यायालयीन प्रकरणे यांची व्याप्ती सुध्दा मोठी आहे. त्यामुळे मला दुय्यम अभियंत्यांकडून त्याबाबतची माहिती घेतल्याशिवाय पर्याय नाही व त्यामुळे कोणत्याही प्रकारची शास्ती लादण्यात येऊ नये असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु दि.१७.२.२०१० च्या सुनावणीच्या दिवशी कागदपत्र सादर करण्यासाठी साक्षीदार तपासण्यासाठी समन्स इश्यू करावे अशी विनंती अपीलकर्ता यांनी केल्यामुळे आज सदरच्या अपीलाची सुनावणी घेण्यात आली असून आयोगाच्या कार्यालयात आयोगापुढे संबंधित अधिकारी हजर झाले आहेत. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा अर्ज सुरुवातीला ५ दिवसांच्या आतच हस्तांतरीत करणे आवश्यक होते. परंतु तो तसा हस्तांतरित करण्यात आला नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. सदरच्या अर्जामध्ये निष्कासना संदर्भात माहिती जरी मागीतलेली असली तरी ती माहिती सहाय्यक अभियंता यांनीच उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. विधी विभागाकडे सदरचा अर्ज विलंबाने हस्तांतरीत केलेला आहे व पुन्हा विधी विभागाने अर्जदार यांना जे पत्र दिलेले आहे त्यामध्ये माहिती ही सहाय्यक अभियंता यांच्याकडूचन घ्यावी असे कळविले आहे. त्यामुळे काय माहिती मागीतलेली आहे याचे आकलन करुन न घेताच अर्जाचे हस्तांतरण केले जाते व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तसेच त्यांचे दुय्यम अभियंता हे दोषी

आढळून येतात व त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरचा अर्ज दि.२४.१२.०९ रोजी दुय्यम अभियंता यांच्याकडे हस्तांतरीत केलेला होता म्हणजे तो विहित मुदतीत हस्तांतरीत केलेला होता. दुय्यम अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी विहित मुदतीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती सादर करणे आवश्यक असते परंतु ते मुदतीत माहिती सादर करीत नसल्यामुळेच माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब होतो. तसेच जन माहिती अधिकारी यांना प्रत्येक अर्ज तपशीलात जाऊन तपासणे शक्य नसते. त्यामुळे दुय्यम व कनिष्ठ अभियंता यांचे सहाय्य घ्यावे लागते. यावरुन अधिनियमाच्या कलम ५(पोट कलम ४) प्रमाणे जन माहिती अधिकारी यानी दुय्यम अभियंता व कनिष्ठ अभियंता यांचे सहाय्य, माहिती उपलब्ध करन देण्याकरीता घेतलेले दिसून येते व त्यामुळे दुय्यम अभियंता व कनिष्ठ अभियंता यांना अधिनियमाच्या कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यास हरकत नाही. त्यांना जन माहिती अधिकारी समजल्यावर माहिती जर विलंबाने प्राप्त झाली असेल तर त्या विलंबास ते जबाबदार आहेत असा निष्कर्ष काढावा लागतो. पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी सदरचा अर्ज हा विधी विभागाकडे हस्तांतर केला असेही म्हटलेले आहे. परंतु विधी विभागाने मात्र ही माहिती सहाय्यक अभियंता यांच्याकडूनच घ्यावी म्हणून सदरचा अर्ज दि.४.२.२०१० रोजी अपिलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यावरुन अर्जामध्ये काय माहिती मागीतलेली आहे याबद्दल कोणतेही अधिकारी आकलन करुन घेत नाही व अर्जाचे मात्र विनाकारण हस्तांतरण केले जाते असे दिसून येते. सदरच्या नोटीसप्रमाणे मूळ जावक नोंदवहया या आयोगाकडे सादर करण्यात आल्या आहेत व त्यावरुन असे दिसून येते की, अर्ज विलंबानेच हस्तांतरीत केलेला दिसून येतो. तसेच अर्ज विधी विभागाकडे हस्तांतरीत करण्याचीसुध्दा आवश्यकता नव्हती असे त्या विभागाच्या पत्रावरुन दिसून येते. असे असले तरी दुय्यम अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती मुदतीत मिळालेली नाही असा जन माहिती अधिकारी यांनीच आयोगापुढे खुलासा केलेला असल्यामुळे त्यांना माहिती अधिकारी समजण्यात येऊन ते अधिनियमाच्या कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येतात व ते शास्तीस पात्र आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेत नाहीत व निर्णय देत नाहीत असे दिसून येते. त्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(१) प्रमाणे ते दोषी आढळून येतात व ते शास्तीस पात्र आहेत. त्यामुळे या अधिनियमाप्रमाणे अर्धन्यायिक पध्दतीने निर्णय द्यावयाचे आहेत व निर्णय कारणमिमांसा देऊन घ्यायचे असल्यामुळे व त्या अधिनियमामध्ये शास्तीची तरतूद केलेली असल्यामळे कोणतीही कार्यपध्दती ही लेखी करणे आवश्यक असते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी वेळोवेळी फोनवरुन मुदत मागीतली असे जे म्हटलेले आहे त्यापेक्षा त्यांनी अपीलाचा

निर्णय देणे योग्य झाले असते. यापुढे त्यांनी कोणत्याही प्रकारे अशी तोंडी कार्यवाही करु नये अशा सूचना प्रथम अपीलीय अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामळे त्यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.२२.१२.०९च्या अर्जात मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात निरिक्षण द्यावे. निरिक्षणाकरीता अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी निरिक्षणास उपस्थित रहावे. अपिलकर्ता यांना पुन्हा मुदत देऊ नये.**

**२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता दुय्यम अभियंता तथा कनिष्ठ अभियंता यांची अधिनियमाच्या कलम ५(४) प्रमाणे सहाय्य घेतले असल्यास अधिनियमाच्या कलम ५(५) प्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी समजण्यात येते व त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला असल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये प्रत्येकी रु.५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून करण्यात येऊन ती लेखाशीर्ष क्र.००७-इतर प्रशासनिक सेवा ६०,इतरसेवा,८००,इतर जमा रकमा(१८) माहितीचा अधिकार(००७००१६-१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक २८.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०११/६०४/तक्रार क्र. १५५/का.१**

**श्री. मोहम्मद अफझल,**
**सी/५०८आकार, कल्याण कॉप्लेक्स,**
**यारी रोड,अंधेरी(प.),**
**मंबई-४०००६१. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**वन विभाग, संजय गांधी नॅशनल पार्क,**
**बोरीवली(पूर्व), मुंबई-४०००६६. .... गैरतक्रारदार**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक : २२.३.२०११**
**तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

तक्रारदार यांनी त्यांच्या दि.८.३.२०११ च्या अर्जाच्या अनुषंगाने ४८ तासाच्या आत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अधिनियमाच्या कलम १८(१) प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दि.२८.३.२०११ रोजी घेण्यात आली. त्यात तक्रारदार यांनी त्यांना माहिती स्पीड पोस्टाने मिळालेली आहे असे आयोगापुढे सांगितले. तसेच वनक्षेत्रपाल-तुळशी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनीही माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात यावी अशी विनंती केलेली असल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई (विलास पाटील)**
**दिनांक २८.३.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०८०९/अपील क्रमांक ६३५२/२०११**

**श्री.अे.हमीद नाचण,**

**मा.सभासद जिल्हा परिषद,**
**ठाणे-१०९८, पार्क अव्हेन्यू आरीफ गार्डन,**
**वंजार पार्ट नाका,मु.पो.भिवंडी-४२१३०२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**ता.शहापूर कार्यालय,**
**मु.पो.ता.शहापूर,जि.ठाणे.**

**जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी,**
**शहापूर मु.पो.ता.शहापूर,जि.ठाणे. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : २८.३.२०११**
**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२४.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी शहापूर यांच्याकडे मौजे साखरोली,ता.शहापूर येथील जमीन गट नं.१४५अ, १४५क या जमीनीबाबत श्री.जयवंत कचरु तारमळे,काउ टाऊन लँड डेव्हलपमेंटचे मालक श्री.विलास मधुकर सामंत व इतर तक्रारी अर्जांच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती तसेच गाव नंबर ७/१२ व सर्व संबंधीत फेरफार, जमीनीच्या गट बुक नकाशाची प्रत व सहाय्यक संचालक नगर रचना ठाणे यांनी मंजूर केलेल्या आदेशाची प्रत,मा.जिल्हाधिकारी ठाणे यांनी मंजूर केलेली औद्योगिक वापरासाठी सनद ६/अ व ६/ब ची प्रत, व्यवस्थापक जिल्हा औद्योगीक केंद्र ठाणे यांचेकडील प्रमाणांची प्रत इत्यादी माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.३०.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्यात आले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी श्री.एस.एस.जाधव व नायब तहसिलदार तथा प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे तोंडी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, सदरचे अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेले नाहीत. मात्र आता आयोगाच्या नोटीसबरोबर सदरचे अर्ज प्राप्त झाले असल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. असे असल्यास अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी,शहापूर यांनी अपिलकर्ता यांच्या दि.२४.८.२०१०च्या अर्जामध्ये मागीतलेल्या माहितीची कागदपत्र व चौकशीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक २८.३.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०८११/अपील क्रमांक ६३५४/२०११

**श्री. किशोर विष्णू घाडीगांवकर,**
**४३८/२६ शिवाई को.ऑप.हौ.सो.,**
**सेक्टर-४, चारकोप कांदिवली(प.),**
**मुंबई-४०००६७.** ..... **अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिलदार कार्यालय, मालवण,ता.मालवण,**
**जि.सिंधुदुर्ग.**

**जन माहिती अधिकारी,**
**तलाठी कार्यालय, मु.पो. त्रिंबक** ...... **उत्तरवादी**
**ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग.**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : २८.३.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.९.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी,तलाठी कार्यालय,मु.पो.त्रिंबक, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग यांच्याकडे अर्ज करुन आंबा कलम नुकसान भरपाई संदर्भात लाभार्थीच्या(पात्र) अनुदानासंबंधी यादीची झेरॉक्स प्रत, एकूण लाभार्थी, प्राप्त रक्कम, चेक नंबर, लाभार्थीचे नाव, गट क्रमांक, एकूण कलमांची संख्या इत्यादी, आंबा कलम नुकसान भरपाई संदर्भात संपूर्ण माहिती मिळावी वर्ष वर्गवारीनुसार, माहितीचा कालावधी सन २००० ते २००९, माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२.२.२०१० रोजी प्रथम अपील तहसिलदार कार्यालय, मालवण यांच्याकडे दाखल केले. प्रथम अपीलाचे आदेश दि.२६.३.२०११ रोजी देण्यात आले असून त्यात माहिती तहसिलदार कार्यालय मालवण येथेच उपलब्ध असल्यामुळे ती उपलब्ध करुन दिलेली नाही असे म्हटलेले आहे त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल कलेले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा तलाठी हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, अर्जात मागीतलेली माहिती तहसिलदार कार्यालय, मालवण यांच्याकडे उपलब्ध आहे व ती अपिलकर्ता यांना आठ दिवसात देण्यात येईल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीस तलाठी श्री.त्रिंबक उपस्थित होते व त्यांच्याकडे माहितीचा अर्ज प्राप्त झाला नाही असे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना सांगितले. त्यावर तलाठी यांना आदेश देण्यात आले होते तरी त्यांना ते उशीरा प्राप्त झाल्यामुळे व माहिती तहसिलदार कार्यालयात उपलब्ध

असल्याने अर्जदारास माहिती मिळण्यास विलंब झाला आहे. परंतु अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देता येइल असे त्यांनी आयोगापुढे निवेदन केलेले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना त्यांनी मागीतलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना तहसिलदार कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी अन्यथा जन माहिती अधिकारी तसेच महसिलदार कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येइल याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक २८.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/५०३१९/अपील क्रमांक ६४५५/२०११**

**श्री. महम्मद हमीद शेख(समाजसेवक-सतर्क नागरिक),**
**नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,**
**संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय कार्यकारी अभियंता,**

**एफ/दक्षिण विभाग कार्यालय,**
**रुम नं.३२, दुसरा मजला, डॉ.बी.ए. रोड, परळ,**
**मुंबई-४०००१२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),**
**एफ/दक्षिण विभाग कार्यालय, डॉ.बी.ए.रोड,**
**परळ, मुंबई-४०००१२.** ...... **उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : निरंक:१०.११.१० रोजी प्राप्त**
**सुनावणीचा दिनांक : ३१.३.२०११**
**जन माहिती अधिकारी , प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, परिरक्षण खाते,एफ दक्षिण, परेल, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन विभागातील परिसरात होणारे सिव्हील काम, ३१.३.२००८ ते ३१.४.२०१० या कालावधीतील, एन.के.शाह, मेसर्स हिरेल अँड कंपनी व राम बिल्डर्स या तीनही कंपनीच्या कामाबाबत चौकी कशी व कोठे आहे, डिपॉझीट भाडे इत्यादीबाब तपशीलवार माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.९.९.२०१० रोजी देण्यात आला असून सार्वजनिक माहिती अधिकारी, सहाय्यक अभियंता-२(परिरक्षण व दुरुस्ती) एफ/दक्षिण विभाग यांनी माहितीच्या अधिकाराखाली केलेल्या अर्जास विहित कालावधीत उत्तर देणे अपेक्षित आहे. तसेच अर्जदाराने भरावयाची विहित रक्कम, छायांकित प्रतींची संख्या, विहित रक्कम भरावयाचे ठिकाण याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. माहितीच्या अधिकाराखाली आलेला अर्ज २२.७.२०१० रोजी देण्यात आलेला आहे. दिलेल्या उत्तराप्रमाणे अर्जदारास विहित रक्कम भरण्यास कळविण्यात आलेले आहे. अर्जदारास उत्तर प्राप्त झाल्यानतर त्यांनी रक्कम भरणा करण्याचा दिवस यामध्ये ३० दिवसाच्या कालावधीचा व्यय होऊ शकतो या कारणास्तव अर्जदाराने विचारलेल्या सर्व माहितीच्या छायांकित प्रती १५ कार्यालयीन दिवसाच्या आत विनामुल्य देण्यात याव्यात असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना माहिती दि.२९.९.२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रथम

अपीलाचा निर्णय दिल्यानंतरच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अर्जाच्या संदर्भात जे उत्तर दिलले दिसून येते ते माहितीच्या अधिकाराखालील विहित कालावधी संपण्याच्या एकच दिवस आधी दिलेले आहे व त्यामध्येसुध्दा कोणत्याही प्रकारे निश्चित असे काहीही कळविलेले नाही. तसेच दिलेल्या उत्तराच्या संदर्भात कोणत्या अधिका-याने उत्तर दिले त्याबद्दल पत्रावर काहीही नमूद केलेले नाही किंवा कोणाही अधिका-याची त्यावर सहीसुध्दा नाही. यावरुन संबंधित विभागातील जन माहिती अधिकारी तसेच सहाय्यक अभियंता, परिरक्षण खाते अतिशय बेजबाबदार आहेत असे दिसून येते. तसेच सहाय्यक अभियंता आहेत याचा अर्थ ते शिकलेले आहेत असा काढावयास हरकत नाही व असे असूनसुध्दा त्यांना कोणतीही कायद्याची माहिती आहे असे त्यांच्या कार्यपध्दतीवरुन दिसून येत नाही. आयोगापुढेसुध्दा त्यांनी तशाचप्रकारची बेजबाबदार उत्तरे दिलेली आहेत. दि.२१.८.२०१० रोजी त्यांनी जे उत्तर दिलेलेआहे त्या उत्तराच्या संदर्भातसुध्दा माहिती निश्चित मागीतलेली असूनही निश्चित अशी कोणतीही पृष्ठ संख्या व किती खर्चाचा भरणा करावा ते सुध्दा कळविलेले नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असे अपीलकर्ता यांनी त्यांच्या प्रथम अपीलात व द्वितीय अपीलात नमूद केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय स्वयंस्पष्ट आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता हे निश्चितपणे माहिती उपलब्ध करुन देण्यासंबंधी टाळाटाळ करतात किंवा उदासीन आहेत असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(२) अन्वये विभागीय चौकशीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण)एफ/दक्षिण विभाग यांनी माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(२) अन्वये त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही सक्षम प्राधिकारी यांनी करावयाची आहे.**

**२) सदरच्या निर्णयाची १ प्रत आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ३१.३.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१८४/अपील क्रमांक ६४४९/२०११

श्री. वीरकुमार एस.दोशी,
ए/८, बोनान्झा इंडस्ट्रियल इस्टेट,
अशोक चक्रवती रोड, कांदिवली(पूर्व),
मुंबई-४००१०१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, आर/दक्षिण,
एस.व्ही.पी. तरण तलावाजवळ,
एम.जी. क्रॉस रोड नं.२,
कांदिवली(प.), मुंबई-४०००६७.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,
सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, आर/दक्षिण,
एस.व्ही.पी. तरण तलावाजवळ,
एम.जी. क्रॉस रोड नं.२,
कांदिवली(प.), मुंबई-४०००६७. ...... उत्तरवादी

निर्णय

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३१.३.२०११**
**जन माहिती अधिकारी , प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१.१२.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इमारत व कारखाने) यांच्याकडे अर्ज करुन Alteration in the basic structure of Building passages of all wing of above society A/८ जय बांनांझा इंडस्ट्रिअल इस्टेट, कांदिवली(पूर्व) च्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना त्यांनी दि.१.१२.०९रोजी मागीतलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे नाही असे कळविलेले दिसून येते. अपिलकर्ता यांचे त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.१५.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.८.९.२०१० रोजी देण्यात आला व त्यामध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे- As complained by Appllicant, it is understood that the passage portion is reduced due to the alteration and construction of the room. P.I.O.is directed if the information is available of this complaint inform accordingly, if not state so. As regards sanction plan Appellant has to approach Ex.Engineer(Building Proposal) W.S.R ward. सदरच्या निर्णयामुळै समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलामध्ये अपिलकर्ता यांनी Nature and subject matter of the information required मध्ये Society says they have got the plan saction for alteration from Municipality,R/South by paying Rs.३०,००,०००/-. This was detected by Inspector of Department of Co-operation no proof was shown of sanctioned. Municipality avoids joint measuremet and no reply. Name of the office or department to which information relates अशी मागणी केलेली आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, ते माजी सैनिक असून त्यांच्या कारखान्यासमोर सोसायटीने जेअनधिकृत बदल केलेले आहेत ते बदल केल्यामुळे त्यांना त्यांच्या गाळयामध्ये काम करणे अशक्य आहे. त्यासाठीच त्यांनी सोसायटीने जे अनधिकृत बदल केलेले आहेत किंवा अतिक्रमण केलेले आहे त्या संदर्भात सोसायटीने आराखडे मंजूर करुन घेतले आहेत असे सांगितल्यामुळे मंजूर आराखडयाची त्यांनी माहिती मागीतलेली आहे. परंतु अशी माहिती त्यांना इमारत व प्रस्ताव या विभागाकडे मिळेल असे कळविलेले आहे. माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा अपिलकर्ता यांना त्यांच्या औद्योगिक गाळयाच्यासमोर पॅसेजमध्ये जे अनधिकृत बदल केलेले आहेत त्या संदर्भात कारवाई होण्याची अपेक्षा आहे व ती महानगरपालिकेचे अधिकारी म्हणून

कारवाई करीत आहेत व यापुढेही त्यांना तशाप्रकारची कारवाई करुन देण्याची अपेक्षा आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांची कारवाई करण्याची अपेक्षा असल्यामुळेच त्यांना कारवाई करणे हे माहितीचा अधिकार-२००५च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही असे कळविले होते.परंतु त्यांनी तक्रार केल्याप्रमाणे कारवाई केलेली सुध्दा आहे व पुढेही कारवाई सुरु राहील. यावरुन योग्य ती कारवाई महानगरपालिकेकडून करण्यात येत असल्यामुळे व मागीतलेल्या माहितीबद्दल विहित मुदतीत कळविलेले असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३१.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ र्णियाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३०४/अपील क्रमांक ६४४८/२०११**

**श्री. जग्गय्या रामय्या जक्कनी,**
**इमारत क्र.३०/४८०, कन्नमवार नगर नं.१,**
**विक्रोळी(पूर्व), मुंबई-८३. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ-६, चेंबूर,**
**मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३१.३.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.११.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,मा.सचिव उर्जा विभाग, डिपार्टमेंट इलेक्ट्रिकल, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे ill legal supply given at Kanamwar Nagar १,Opp.Kinnary Hall,seven story newly build tower for residential purpose च्या संदर्भात माहिती एकूण ६ मुद्यांमध्ये मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाची प्रत अपिलकर्ता यांनी पोलीस स्टेशन विक्रोळी(पूर्व), लोक अधिकार डिपार्टमेंट, सचिवालय- एनर्जी डिपार्टमेंट,बी.एम.सी. मेन ऑफीस तसेच म्हाडा मेन ऑफीस यांना दिलेली दिसून येते. उर्जा विभागाने माहिती दिलेली दिसून येत नाही व त्यासाठी कोणताही पत्रव्यवहार अपिलकर्ता यांनी आयोगापुढे दाखल केलेला नाही. मात्र वरिष्ठ पोलीस निरिक्षक,विक्रोळी(पूर्व) यांनी दि.४.६.२०१० रोजी केलेल्या अर्जाच्या संदर्भात ९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी आपण मागीतलेली माहिती ही महानगरपालिका,म्हाडा व इतर तत्सम विभागाशी

संबंधित असल्याने सदरबाबत विक्रोळी पोलीस ठाणे कडून निरंक अहवाल आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दि.१२.८.२०१० रोजी अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या अपीलाच्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या तक्रारीबाबत न्याय मिळण्याबाबत विनंती केली आहे व त्यामुळे अपिलार्थी यांच्या तक्रारीची दखल घेतली जात नसल्यास तसेच त्यांच्या अर्जाच्या चौकशीबाबत त्यांना शंका असल्यास त्यांनी संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे दाद मागावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

द्वितीय अपीलाच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा केलेला आहे व त्यामध्ये अपिलार्थी यांनी पोलीस ठाण्यास दिलेल्या तक्रारीबाबत न्याय मिळणेबाबत विनंती केलेली आहे व त्यामुळे त्यांचे प्रथम अपीलसुध्दा निकाली काढण्यात आले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात अपिलकर्ता यांनी ज्या इतर तक्रारींच्या प्रती दाखल केलेल्या आहेत त्या संदर्भात अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांची मूळ तक्रार ही ते अर्जात नमूद केलेला पत्ता इमारत क्र.३०, रुम नं.४८०,कन्नमवारनगर नं.१ विक्रोळी(पूर्व), मुंबई-८३ येथे रहावयास होते. सदरची इमारत विरेंद्र व्होरा या बिल्डरला पुर्ननिर्माण करण्याकरीता दिलेली होती. त्याप्रमाणे सन २००७ मध्ये सदरच्या इमारतीचे काम सुरु करुन २००९ मध्ये इमारत पूर्ण झालेली आहे. परंतु सदर बिल्डरने अद्यापपर्यंत त्यांना त्यांच्या रुमचा ताबा दिलेला नाही. म्हणून त्यांनी महानगरपालिका, म्हाडा,रिलायन्स एनर्जी,माहिती अधिकारी,पोलीस आयुक्त, लोक आयुक्त व कलेक्टर ऑफीस यांना लेखी अर्ज केलेले आहेत. सदरचा अर्ज त्यांनी माहितीकरीता परत पाठविलेला आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध होण्यापेक्षा कारवाईची अपेक्षा दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत निर्णय देणे अपेक्षित नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३१.३.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ र्णियाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२९४/अपील क्रमांक ६४४७/२०११**

**श्री. मेहमूद शेख,**
**रुम नं.७, दोस्त महमूद चाळ,**
**नित्यानंद नगर, घाटकोपर(प.),**
**मुंबई-४०००८६. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख अभियंता(रस्ते),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**६वा मजला, एम.सी.जी.एम. हेड ऑफीस,**
**महापालिका मार्ग, मुंबई-१**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता(रस्ते)शहर,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, कमार को.ऑप.हौ.सो.,**
**१ला मजला, पट्टे बापुराव मार्ग, नवजीवन को.ऑप.सोसायटीच्या समोर,**
**ग्रँट रोड(पूर्व), मुंबई-४००००७. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३१.३.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.७.३.२०११ रोजी अपिल क्र.६४५७,६४५६ आणि ६४४७ मध्ये माहिती पुरविण्यात आली असल्यामुळे व त्यामुळे समाधान झालेले आहे असे लेखी निवेदन आयोगाकडे दिले असल्यामुळे तसेच सदरचे अपील रद्द करुन दफ्तरी दाखल करण्याबाबतही त्यांनी कळविले आहे. यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(विलास पाटील)**

दिनांक ३१.३.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१८८/अपिल क्र. ६४६३/२०१०

श्री. सुभाष एन.पुत्रन, ....अपिलकर्ता
रुम नं.३१, बि.एम.सी.स्टाफ कॉलनी,
दुसरा मजला, यारी रोड, कल्याण कॉम्प्लेक्स समोर,
वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०६१.

----विरुध्द----

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
कार्यकारी अभियंता बृ.म.न.पा.यांचे कार्यालय,

**पहिला मजला, के/पूर्व विभाग कार्यालय,**
**गुंदवली, आझाद रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**कार्यकारी अभियंता बृ.म.न.पा.यांचे कार्यालय,**
**पहिला मजला, के/पूर्व विभाग कार्यालय,**
**गुंदवली, आझाद रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९. ... उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - २१/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ०७/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता हजर आहेत, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

अर्जदाराने ह्या आयोगासमोर असे सांगितले की, प्रथम अपिलामध्ये आर्डर झालेली असताना अजूनही मागणी पुर्ण करण्यात आलेली नाही म्हणून अपिल दाखल करण्यात आलेले आहे. सदरचे अपिल दिनांक २१-१०-२०१० रोजी अर्जदार / अपिलार्थीने दाखल केलेले आहे व त्याची सुनावणी आज रोजी दिनांक ०७-०३-२०११ रोजी ठेवण्यात आली असून जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी सुध्दा गैरहजर आहेत. अर्जदाराने अशी तक्रार केलेली आहे की, अर्जदाराला अजून माहिती मिळालेली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०८-२०१० रोजीला जन माहिती अधिकारी यांनी ३ दिवसांच्या आत अर्जदाराला माहिती देण्यात यावी असा आदेश करुन सुध्दा जवळजवळ ५ महिन्यांचा कालावधी झाला असून अर्जदाराला माहिती मिळालेली नाही व त्यामुळे अर्जदाराचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(१) नुसार निकाली काढले नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (SWM), के/पूर्व विभाग यांच्या विरुद्ध अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे त्यांना लागू असलेल्या सेवा विषयक नियमांचा भंग केल्याच्या कारणावरुन शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येते व अपिलीय अधिकारी यांना असे सुचित करण्यात येते की, त्यांनी नियमानुसार जन माहिती अधिकारी यांच्या विरुद्ध अपिलीय अधिकारी यांनी ३ महिन्याच्या आत कार्यवाही करावी व तसा अहवाल आयोगाला पाठवावा. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (SWM), के/पूर्व विभाग यांना निर्देश देण्यात येतो की, हा आदेश मिळाल्यापासून ८ दिवसांच्या आत पंजीबद्ध डाकेने त्यांनी दिलेल्या पत्त्यावर माहिती विनाशुल्क पाठवावी व तसा अहवाल आयोगाला पाठवावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**----आदेश----**

१) अपिल निकाली काढण्यात येते.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(श्री. भास्कर पाटील)
प्रभारी, राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक :- ०७/०३/२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक/मुमाआ/नोंदणी क्र./५०१८३/अपिल क्र. ६४६४/२०११**

**श्री.जैसवार आर.ॲलेक्स जोसेफ,**
**४/१२ आंबेडकर नगर, समाज मंदिर सभागृहाजवळ,** ....**अपिलकर्ता**
**टागोर नगर - ८अ, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०० ०८३.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक,**
**बृहन्मुंबई उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,**
**बृहन्मुंबई उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.** .... **उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - २१/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ०७/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

सदर प्रकरणात अर्जदार / अपिलार्थी यांच्या म्हणण्यानूसार व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या म्हणण्यानूसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला दिलेल्या माहिती मुळे समाधान झाले नाही म्हणून अर्जदाराने द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानूसार अर्जदार हा संबंधित शाळेत (प्रयोगशाळा परिचर ह्या पदासाठी) पदोन्नतीसाठी पात्र असून व संबंधित शाळा सुद्धा अर्जदाराला पदोन्नती देण्यास तयार असून शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग यांचे कार्यालय,चेंबूर, मुंबई ४०० ०७१ अर्जदाराच्या पदाला मान्यता देण्यास तयार नाहीत.

उत्तरवादी यांच्या म्हणण्यानूसार दिनांक २५-११-२००५ चे शासन निर्णयानुसार अर्जदाराचे पद मान्य नसल्यामुळे त्या पदावर अर्जदाराला पदोन्नती देण्याबद्दल मान्यता देण्यात येत नाही. अर्जदार / अपिलार्थी यांच्या म्हणण्यानूसार शासन निर्णय दिनांक ६ फेब्रुवारी, २००९ नुसार दिनांक २५ नोव्हेंबर, २००५ शासन निर्णय रद्दबातल होवून त्या जागी दिनांक ६ फेब्रुवारी, २००९ सुधारित शासन निर्णय काढण्यात आलेले आहे. त्यानुसार राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः / पूर्णतः अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग / कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकेतर पदे अनुज्ञेय करण्याबाबत सुधारित निकष विहित करण्यात आले होते. परंतु काही

कारणस्तव या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीत अडचणी निर्माण झालेल्या आहेत. मात्र, सद्यस्थितीत शाळामधील दैनंदिन कामामध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदामुळे मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे. तसेच शिक्षेकेतर कर्मचाऱ्यांसाठी माध्यमिक शाळा संहितेनुसार पद अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचारधीन आहे. शासन निर्णय दिनांक २५-११-२००५ नुसार व माध्यमिक शाळा संहितेमधील निकषानुसार या दोन्ही देय व अनुज्ञेय पदे ठरत असतील व ती पदे मंजूर व रिक्त असेल तर ती मंजूर असलेली रिक्त पदे भरण्यास व भरलेल्या पदाना मान्यता देण्यास शासनाची मान्यात देण्यात येत आहे. म्हणून अर्जदाराच्या म्हणण्यानूसार या शासन परिपत्रकानुसार दिनांक ०६-०२-२००९ नुसार अर्जदाराला ह्या परिपत्रकाचा लाभ मिळण्याची गरज आहे. परंतु उत्तरवादी यांच्या म्हणण्यानूसार तरीही अर्जदाराला ह्या शासन निर्णयाचा लाभ घेता येत नाही. ह्यासाठी अर्जदाराला जन माहिती अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग यांचे कार्यालय,चेंबूर, मुंबई यांनी लेखी देण्याचे ठरविलेले आहे व त्यासाठी अर्जदाराला दुपारी २.०० वाजता शिक्षण निरीक्षकांशी संर्पक साधुन त्यांना लेखी पत्र अर्जदाराला देण्याचे कबूल केलेले आहे.

वरील आदेश व सुचना देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**----आदेश----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(श्री. भास्कर पाटील)**
**प्रभारी, राज्य मुख्य माहिती**

**आयुक्त**
**मुंबई**
**दिनांक :- ०७/०३/२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त,**

**मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२८८/अपिल क्र. ६४६६/२०१०**

**श्री. शैलेश आर. घेडिया, ....अपिलकर्ता**
**बी / २०२, लाभ आशिष, जुनी पोलीस क्वार्टर्स लेन,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी,**
**मुंबई शहर जिल्हा, जूने जकात घर**
**श.भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.**

**जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग -२ (अभिलेख विभाग)**
**मुंबई शहर जिल्हा, जूने जकात घर**
**श.भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - २९/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ०७/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

श्री. शैलेश आर. घेडिया विरुद्ध सह जिल्हा निबंधक वर्ग -२ (अभिलेख विभाग) मुंबई शहर ह्या प्रकरणात जन माहिती अधिकारी आहेत. अर्जदार / अपिलार्थी हे आज गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या खुलासा दिनांक ०७-०३-२०११ चे अवलोकन करण्यात आले. त्यांच्या म्हणण्यानूसार अर्जदाराला पाहिजे असलेले मुळ दस्त क्र. बबज /३३८३ / ९५ बाबत करण्यात आलेल्या व येणाऱ्या कार्यवाहीची माहिती पुरविण्यात यावी या स्वरुपात आदेशपारित करण्यात आले आहेत. सदर यादी शासकीय छायाचित्रण कार्यालयाने दिनांक १४-०२-२०११ रोजी स्वीकारली असून मुळ दस्त अद्यापपर्यंत छायाचित्रण होऊन परत आलेला नाही. परंतु सदर प्रकरणी पाठपुरावा करुन मुळ दस्त अपिलकर्ता यांना लवकरात लवकर देण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्यांना सुनावणी दरम्यान विचारले असता अर्जदाराला ४ आठवड्याच्या आत सदर दस्तऐवज येणे अपेक्षित आहे व त्यासाठी पाठपुरावा करुन अर्जदाराला सदर दस्तऐवज उपलब्ध झाल्यानंतर लेखी कळवून उपस्थित करुन देण्याबाबत कळवतील.

वरील बाबी लक्षात घेवून ४ आठवड्याच्या आत अर्जदाराला दस्त उपलब्ध करुन देण्यात येईल असे आयोगासमोर कबूल केल्यामुळे अर्जदाराचे अपिल निकाली काढले आहे. त्यानंतरही अर्जदाराला ह्या संबंधीत काही तक्रार असल्यास अर्जदार कलम १८ खाली तशी ह्या आयोगासमोर तक्रार करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**----आदेश----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(श्री. भास्कर पाटील)**
**प्रभारी, राज्य मुख्य माहिती**

**आयुक्त**
**मुंबई**
**दिनांक :- ०७/०३/२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त,**

**मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०१६९/अपील क्र.६३६२/२०१०**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०१६७/अपील क्र.६३६३/२०१०**

**श्रीमती अर्चना श्रीवास्तव,** **...अपिलकर्ता**
**रुम नं. २, घनश्यामदास की चाळ,**
**संत रोहीदास मार्ग, कालाकिल्ला,**
**धारावी, मुंबई ४०० ०१७.**

**----विरुद्ध-----**

**१) प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**जी/उत्तर विभाग कार्यालय, बृमनपा,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर (पश्चिम ), मुंबई ४०० ०२८.**
**२) प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (एफ / उत्तर ),**
**एफ / उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**भावूदावी रोड, मांटुगा रोड, मुंबई ४०० ०१९.**
**१) जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**जी/उत्तर विभाग कार्यालय, बृमनपा,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर (पश्चिम ), मुंबई ४०० ०२८.**
**२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण ) (एफ / उत्तर ),**
**एफ / उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**भावूदावी रोड, मांटुगा रोड, मुंबई ४०० ०१९.**
**...उत्तरवादी**

**----निर्णय----**

**द्वितीय अपीलांचे दिनांक -२०-१०-२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १५-०३-२०११**

**अपिल क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०१६९/अपील क्र.६३६२/२०१०**

**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.**

अपिल क्रमांक ६३६२ मध्ये अपिलकर्ता यांनी दिनांक ०१-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, धारावी पुनवर्सन प्राधिकरण के लिए धारावी झोपडपट्टी धारको का सर्वेक्षण मशाल संस्था द्वारा किया गया है | Sector no. ५, location plan & Annexure - II , की

नकल प्रती दे | तथा सेक्टर नं ५, कहा से कहॉतक के झोपडपट्टी वासीयों कि जानिनपर विकास कार्य किया जानेवाला है उसका पुर्ण विवरण अहवाल दे | तथा सेक्टर नं.५ के झोपडपट्टी धारको के पुनवर्सन के लिए ट्रान्झिस्ट कॅम्प, कि व्यवस्था कहा कहा कि गयी है | और सेक्टर नं.५, के झ ोपडपट्टी को अस्थाई रुपसे ट्रान्झिस्ट कॅम्प में कहा कहा और कैसे हस्तांतरी किये जायेंगे व किन किन झोपडपट्टीया के सेक्टर ५ मे समावेश है इसकी पुर्ण जानकारी और अहवाल दे | अशी माहिती मागितलेली दिसून येते.

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २७-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २३-०९-२०१० रोजी देण्यात आला असून धारावी पुनर्वसन प्रकल्प हा विशेष कार्यकारी अधिकारी, धारावी पुनर्वसन प्रकल्प यांचे मार्फत राबविण्यात येत असल्यामुळे अपिलकर्त्यास सदरहू माहिती देता येत नाही व त्यामुळे प्रथम अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या संदर्भामध्ये माहिती मागितली परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या संदर्भामध्ये अंतिमः कोणताही निर्णय झालेला नाही. मात्र धारावी पुनर्वसन प्रकल्प हा विशेष कार्यकारी अधिकारी धारावी पुनर्वसन प्रकल्प यांचे मार्फत राबविण्यात येत असल्यामुळे सदरहू माहिती देता येत नाही असे त्या निर्णयात म्हटले आहे. ते विसंगत दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय माहिती अधिकारी वरिष्ठ वसाहत अधिकारी, सहाय्यक मनपा आयुक्त, जी / उत्तर विभाग यांच्याकडे माहिती मागितली. माहिती उपलब्ध नसेल तर त्यांना तसे कळविणे आवश्यक होते. परंतु प्रकल्प अन्य अधिकारी राबवित आहेत म्हणून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही व आयोगापुढे मात्र अंतिम मंजूरी झाली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही अशी विसंगत उत्तर देणे ही योग्य नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये योजना कार्यान्वित झाली असेल तर मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. योजनेस मंजुरी झाली नसेल तर त्याप्रमाणे कळविणे संयुक्तिक राहील किंवा योजना ही प्राधिकरण राबवित असेल तर त्यांच्याकडे अर्ज हस्तांतरण करणे संयुक्तिक झाले असते व तसे कळविणे संयुक्तिक राहील व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०१६७/अपील क्र.६३६३/२०१०**

**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.**

अपिल क्रमांक ६३६३ मध्ये अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०५-२०१० रोजी यांच्याकडे, दिनांक ०२-०३-२००६ ते माहिती मिळेपर्यंत या कालावधीतील वार्ड क्र. १७०,१७१ ची नगरसेविका श्रीमती नियाज अहमद फरीदा बानू यांचा विभाग क्षेत्रात निधी वापरुन लादीकरण,गटारे, शौचालय, समाजसेवा हॉल व जी काही कामे ठेकेदारामार्फत रिपेंरिग व नविनरीकरण करुन सुरु आहेत किंवा झाली आहेत त्या सर्व कामाबाबत एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने

अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २७-०८-२०१० रोजी (निरंक तारीख ) प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २०-०९-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी संबंधित विषयाबाबतची सर्व कागदपत्रे दाखविण्यात यावीत व अपिलकर्त्यांनी निर्देशित केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विहित शुल्क भरल्यानंतर द्याव्यात असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्या निर्णयाने सुद्धा समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय मोघम स्वरुपाची व विस्तृत प्रमाणात होती व त्यामुळे अपिलकर्तो यांना विहित मुदतीतच दिनांक १४-०६-२०१० रोजी मागितलेली माहिती कार्यालयामध्ये सॅप प्रणालित उपलब्ध असून विस्तृत स्वरुपात असल्याने आपण या कार्यालयास कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष भेट देऊन उपलब्ध माहितीची पाहणी करु शकता व आवश्यक त्या कागदपत्रांचे रु.२/- प्रती प्रत प्रमाणे भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेवू शकता असे कळविलेले होते. परंतु तसे त्यांनी न करता प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पत्र पाठविलेले होते ही बाब निर्दशनास आणण्यात आलेली होती व त्यामुळे प्रथम अपिलाचा निर्णय हा योग्य आहे असे दिसून येते. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०१-२०१० रोजी प्रत्यक्ष येऊन कार्यालयीन दस्ताऐवज दाखविण्यात आले, त्यांनी तपासून पाहिले व त्यांचे समाधान झाले असे त्यांनी लेखी दिलेले आहे व त्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिल क्रमांक ६३६२ हे अंशतः मंजूर करण्यास पात्र असून अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात प्रकल्प मंजूर झाले असेल किंवा अन्य प्राधिकरण राबवित असेल तर व अंतिम मंजूरी झाली नसल्यास त्याप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत विनाशुल्क रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावी.**

**२) अपिल क्रमांक ६३६३ हे निकाली काढण्यात येते.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १५-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा**

**अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**
**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१६६/अपिल क्र. ६३६४/२०१०**

**ॲड.पल्लवी अ. कुलकर्णी,**
**केनि निवास, नवघरपाडा, पहिली गल्ली, ....अपिलकर्ता**
**मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०८१.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय कार्यकारी अभियंता,**
**एफ / दक्षिण विभाग कार्यालय, बृमनपा,**
**रुम नं. ३२, दुसरा मजला, डॉ.बी.ए.रोड,**
**परळ, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पर्यावरण),**
**एफ / दक्षिण विभाग कार्यालय, बृमनपा,**
**रुम नं. ३२, दुसरा मजला, डॉ.बी.ए.रोड,**
**परळ, मुंबई ४०० ०१२.**
**...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १९/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १५/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक (निरंक ) रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, एफ / दक्षिण विभाग यांच्याकडे, एफ / दक्षिण विभागात विद्युत / यांत्रिकी स्वरुपाच्या पार पाडण्यात आलेल्या कामाबाबत तपशीलात दिलेल्या तक्तानुसार सन २००८-२००९ व २००९-२०१० या दरम्यान कामे जसे - विद्युत कामे, हाय मास्ट, पोल्स, बोअर वेल्स, खेळाची साहित्ये, उद्यानातील कामे व इतर याप्रमाणे अतिशय तपशिलात माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. मात्र अर्ज कोणत्या तारेखेला दाखल केला किंवा अर्जाचा उर्वरित भाग छायांकित प्रती आयोगाकडे दाखल केलेल्या नाहीत. अर्जदार वकील आहे व वकील अशाप्रकारचे कागदपत्रे दाखल न करणे हा बेजाबदारपणा आहे. अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ०२-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २६-०७-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केलेला आहे. त्यांच्या प्रती त्वरीत द्याव्यात तसेच उर्वरित सर्व प्रती उपलब्ध करुन द्याव्यात असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्याही मुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिल दाखल केले.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती मोघम, विस्तृत प्रमाणात आहे व वेगवेगळया विषयांची आहे व त्यांनी तक्तात माहिती मागितलेली आहे. त्या तक्तात माहिती उपलब्ध करुन देणे याचा अर्थ माहिती तयार करुन देण्याचे आहे व तसे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही व त्यामुळेच त्यांना दिनांक २६-०५-२०१०

रोजी विहित मुदतीत रु.१३०/- भरणा करावा असे कळविलेले होते. परंतु अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत खर्चाचा भरणा केला तरी जन माहिती अधिकारी यांना पावती दाखविलेली नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नव्हती. प्रथम अपिलाची सुनावणीमध्ये खर्चाचा भरणा केला असे सांगण्यात आले परंतु स्वतः अपिलकर्ता हे हजर नव्हते व त्यांनी प्रतिनिधी पाठविलेला होता.परंतु प्रतिनिधी यांनी कोणतेही प्राधिकृत पत्र व त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुद्धा त्याबाबत काहीही कळविलेले नव्हते व त्यामुळेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिला तरी माहिती उपलब्ध करुन देणे अधिकार पत्राशिवाय माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नव्हते व त्यानंतरही मात्र अधिकार पत्रात नमुद केलेल्या प्रतिनिधीस श्री. खेमराज ना. सोळंखी यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे उर्वरित सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २(च)** मध्ये **"माहिती"**व . **कलम २ (ञ)** मध्ये **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या मध्ये **सार्वजनिक प्राधिकरणात** साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज, शासन निर्णय या स्वरुपाची माहिती उपलब्ध आहे त्यांचे निरिक्षण करुन व छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. कोणतीही माहिती संकलित करुन तयार करुन देणे हे अपेक्षित नाही व त्यामुळे तक्तामध्ये माहिती तयार करुन देणे हे अपेक्षित नाही. तसेच माहिती ही मोघम, विस्तृत व अनेक विषयांची असल्यामुळे त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे सुद्धा अपेक्षित नाही. अर्जदाराने एका अर्जामध्ये एकाच विषयाची निश्चित वर्णन करुन माहिती मागणे अपेक्षित असल्यामुळेच ती ३० दिवसांत उपलब्ध करुन देणे शक्य होते. मोघम, विस्तृत प्रमाणात व अनेक विषयांची माहिती एकाच अर्जात व ती ही विशिष्ट तक्यात मागितल्यास ती सार्वजनिक प्राधिकरण अधिनियमाचे **कलम ७ (९)** प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागेल व त्यामुळेच अशाी माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. परंतु सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे व आज अपिलकर्ते व प्रतिनिधी गैरहजर असल्यामुळे सदर अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १५-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत :-**

**१) निवडनस्ती,**
**२) श्री. चौरे.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१७१/अपिल क्र. ६३६१/२०१०**

**श्री. नामदेव सु.अहिरे,**
**..अपिलकर्ता**
**सुंदरलाल अहिरे चाळ, रुम नं.१, मकरानी पाडा,**
**जितेंद्र रोढ,मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता, इमारत प्रस्ताव (पश्चिम उपनगरे),**
**बृमनपा पी विभाग, लॉरेन्स हाईस्कूल समोर, संस्कृती कॉम्पलेक्स,**
**९० फिट रोड,कांदिवली (पूर्व ), मुंबई ४०० १०१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव (पश्चिम उपनगरे),**
**बृमनपा पी विभाग, लॉरेन्स हाईस्कूल समोर, संस्कृती कॉम्पलेक्स,**
**९० फिट रोड,कांदिवली (पूर्व ), मुंबई ४०० १०१.**
**...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - निरंक**
**सुनावणीचा दिनांक - १५/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १४.०६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी इमारत प्रस्ताव (पश्चिम उपनगरे ) कांदिवली (पूर्व ) यांच्याकडे, नगर भूमापन क्र. ७३A, ७३A/१ ते ३, ७३A/४A आणि ५A, विलेज-चिंचोली, गोरेगांव सदर ठिकाणी प्रस्तावित केलेल्या फाईल मधून मला (१) अप्रुवड प्लानची आणि (२) सी.सी. ची सर्टीफाय कॉपी देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी सन २००० ते आजमितीपर्यंतचा आहे. माहिती साध्या टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १२-०७-२००९ रोजी विकासकाने हरकत घेतली म्हणून उपलब्ध करुन देता येणार नाही असे अपिलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०५.१०.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे असा निर्णय देवून अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे तारीख न टाकत द्वितीय अपिल दाखल केलेले दिसून येते. सदरचे अपिल हे राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयामध्ये २०.१०.२०१० रोजी स्वीकरलेले दिसून येते.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, विकासकाने हरकत घेतल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. एकूणच जन माहिती अधिकारी यांचे उत्तर व प्रथम अपिलाचा निर्णय यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, विकासकाला विचारणा करण्यात आलेली दिसून येते. परंतु मागितलेल्या माहितीच्या स्वरुपात पाहिले असता महानगरपालिकेकडुन बांधकामास जी परवानगी देण्यात आली त्याकरीता मंजूर केलेले आराखडे व बांधकामाच्या परवानगीचे प्रमाणपत्र ही विकास नियमावली प्रमाणे मंजूर करण्यात येत असल्यामुळे व तसे करणे हे महानगरपालिकेस बंधनकारक असल्यामुळे मंजूर आराखडे व बांधकामाची परवानगी ही सार्वजनिक अभिलेखांचे भाग होते. ते विकासाशी संबंधित किंवा विकासकाची माहिती नाही म्हणजेच ती त्रयस्थ पक्षाची माहिती, आराखडे किंवा प्रमाणपत्र हे पडताळणी करुन दिलेले नसेल तर ती जबाबदारी महानगरपालिकेची आहे व त्यावरुन ती सार्वजनिक प्राधिकरणाची जबाबदारी असेल, सार्वजनिक अभिलेखाचा भाग असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणेही संयुक्तिक झाले असते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा जो निर्णय दिलेला आहे तो निर्णय ही अत्यंत चुकीचा आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांनी त्यांचे दिनांक १४-०६-२०१० च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२) सदर निर्णयाची एक प्रत आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना स्वतंत्रपणे पोस्टाने अवलोकनार्थ पाठविण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १५-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४९२४७/अपिल क्र. ६३८५/२०१०**

**श्री.विलास आसाराम साळवे,** **...अपिलकर्ता**
**शिवनेर टुडे, पोस्ट बॉक्स नं. ११८८२,**
**भांडुप (पूर्व), मुंबई ४०० ०४२.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
**पंचायत समिती सिंदखेड राजा,**
**ता. सिंदखेड राजा, जिल्हा- बुलढाणा.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत उमरद,**
**ता.सिंदखेड राजा, जिल्हा- बुलढाणा.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १०/०७/२०१०**

**सुनावणीचा दिनांक - १६/०३/२०११**

**अपिलकर्ता - उपस्थित.**

**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी आयोगासमोर सुनावणीच्या वेळेस माहिति उपलब्ध झालेली आहे असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यात येते.

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १६-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४८५६४/अपिल क्र. ६३८८/२०१०**

**श्रीमती समिक्षा सुधाकर चौधरी,** **...अपिलकर्ता**
**अे-१०३, मोहक चेंबर्स, मनवेलपाडा रोड,**
**विरार (पूर्व),ता.वसई, जिल्हा - ठाणे ४०१ ३०३.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (परि.क्र.४),**
**बजाज रोड, महानगरपालिका शालेय इमारत, १ला मजला,**
**कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),**
**आर / उत्तर विभाग, जयवंत सावंत मार्ग,**
**दहिसर (पश्चिम ), मुंबई ४०० ०६८.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १५/१०/२००८**
**सुनावणीचा दिनांक - १६/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा), आर / उत्तर विभाग, दहिसर (पश्चिम), मुंबई ४०० ०६८ यांच्याकडे, पुर्वीचा म.वि.क्र.२९ चे विभाग निरीक्षक श्री. राऊत देत असलेल्या शाररीक, मानसिक जाचासंबंधी जून २००५ ते मार्च २००७ कालावधीतील तपशील, १) चौकशी समिती नियुक्ती केल्याबाबतचा आदेश, २) चौकशी समितीने ज्या व्यक्तींची साक्ष घेतली अथवा जबाब घेतले त्या व्यक्तींची नावे, साक्षीसंबंधी कागदपत्रे आणि जबाबाच्या प्रती, ३) चौकशी समितीने काढलेल्या निष्कर्षाच्या प्रती, ४) चौकशी समितीच्या कार्यवाही संबंधीची सर्व कागदपत्रे (रोजनाम्यासहित ) माहिती स्वहस्ते घेणार अशी माहिती मागितलेली दिसुन येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १८-०३-२००८ रोजी प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांनी आपण मागितलेली माहितीची चौकशी या कार्यालयामार्फत दिलेली नसल्याने त्याबाबतची कागदपत्रे या कार्यालयात उपलब्ध नाहीत असे कळविलेले दिसून येते. दिनांक १९-०३-२००८ रोजी अपिलकर्ता यांना माहिती बद्दल वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०४-२००८ रोजी प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांना मुख्यध्यापक श्री.रणछोडदास मराठी यांना प्रशिक्षिका श्रीमती चौधरी यांच्या संदर्भामध्ये सदर चौकशी कोणत्या कार्यालयात झाली व चौकशी अधिकारी कोण होते त्यांचे नांव या

कार्यालयाला कळविण्याबाबत श्रीमती चौधरी यांना कळवावे असे पत्र दिलेले दिसून येते व त्या नंतर अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०६-२००८ रोजी प्रथम अपिल दाखल केले. परंतु प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य मुख्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखले केलेले आहे. द्वितीय अपिलाचा निर्णय दिनांक २५-०९-२००९ रोजी देण्यात आला असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय द्यावे असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे पुन्हा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१०-२००८ प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती दिनांक २२-०२-२००८ रोजी मागितली त्या संदर्भामध्ये माहितीच उपलब्ध नाही असे त्यांना कळविण्यात आले व त्यानंतर कार्यस्थळी महिला अत्याचार लैगिक छळवणूक समिती बृहन्मुंबई विभाग, शिक्षण विभाग यांनी तक्रार समिती कडून कार्यकारी समितीकडे व त्यानंतरही स्वयंसेवी संस्था सदस्यासह पुन्हा चौकशी करण्यास सूचित केल्याविरुद्ध अशा प्रकारची माहिती व त्यात प्रथम अपिलीय अधिकारी कोण आहे हे काहीही कळविलेले नव्हते. माहिती त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिल दाखल करुन मागितले. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा काहीही निर्णय दिलेला नाही. आयोगाने आदेश देवून ही प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई त्याबाबतीत केली नाही व त्यामुळे पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल करणे भाग पडले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही असे सांगितले अशा प्रकारची चौकशीही प्रशासकीय अधिकारी यांच्या कार्यालयात होत नाही तर ती तक्रार समितीकडे होते व त्यानंतर संपुर्ण बृहन्मुंबई करीता कार्यकारी समिती स्थापन केलेली असते त्या कार्यकारी समितीकडे उपलब्ध होते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला नाही असे दिसून येते व आयोगाचा आदेशानंतरही दिलेला नाही असे दिसून येते म्हणजे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर निर्णयाबाबत टाळाटाळ केलेली आहे. वास्तविक शिक्षण अधिकारी याबाबत वरील अधिकाऱ्यांना जबाबदारीने अर्जदारास योग्य ती माहिती उपलब्ध करुन देणे किंवा त्याबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक असते. परंतु या प्रकरणामध्ये तत्कालिन शिक्षण अधिकारी (दिनांक ०६-०८-२००८) यांनी अपिलाची प्रक्रीया करण्याची टाळाटाळ केलेली आहे असे दिसून येते. मात्र राज्य माहिती आयोगाची नोटीस दिनांक १५-०१-२०११ रोजी निर्गमित केल्यानंतर विद्यमान शिक्षण अधिकारी यांनी सदर प्रकरणातील संपुर्ण माहिती उपलब्ध करुन घेवून ती आयोगापुढे सादर केली. आयोगापुढे माहिती सादर झाली, ती माहिती अद्यापपर्यंत अपिलकर्ता यांना उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. विद्यमान शिक्षण अधिकारी यांनी सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. त्याप्रमाणे ती त्यांना आज आयोगापुढे उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती अधिकाऱ्याने त्यांची माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले होते ते योग्य होते व त्यामुळे त्यांच्या विरुद्ध कारवाईची आवश्यकता नव्हती. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्याबाबत मार्गदर्शन किंवा माहिती कोणत्या कार्यालयात उपलब्ध होईल असे जरी सांगितले असले तरी अपिलकर्ता यांनी २ वेळेचे द्वितीय अपिल दाखल करण्याची आवश्यकता राहिली नसती व त्यामुळे दिनांक ०६-०७-२००८ रोजी जे माहिती अधिकारी होते त्यांच्या विरुद्ध योग्य ती प्रशासकीय कारवाई महानगरपालिका प्रशासनाकडून होणे आवश्यक आहे. परंतु माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----<u>आदेश</u>-----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**

**२) सदर निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १६-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांजकडे योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रषित.**
**२) निवडनस्ती,**
**३) श्री.चौरे, सहाय्यक.**

**श्री. महम्मद हमीद शेख,** **...अपिलकर्ता**
**नेहरु नगर, चाळ क्र. ५, शॉप नं.११,**
**संत ज्ञानेश्वर नगर,**
**बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष ),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, टी विभाग कार्यालय,**
**लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुंलुंड (पश्चिम), मुंबई ४०० ०८०.**
**जन माहिती अधिकारी तथा साहय्यक अभियंता (परिरक्षण),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, टी विभाग कार्यालय,**
**लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुंलुंड (पश्चिम), मुंबई ४०० ०८०.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १४/१०/२००८**
**सुनावणीचा दिनांक - १७/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी राज्य मुख्य माहिती आयोगाकडे, टी विभाग कार्यालयाकडून मागितलेली माहिती मिळालेली असल्या कारणाने दिनांक १७-०३-२०११ रोजी ठरविण्यात आलेली सुनावणी रद्द करुन, अपिल रद्द करण्यात यावे. अपिल अर्जाबाबत माझी कुठलीही तक्रार नाही असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यात येते.

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१७९/अपिल क्र. ६३८६/२०१०**
**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१८०/अपिल क्र. ६३८७/२०१०**

**श्री. चतुरसेन टी. डावरे,** **...अपिलकर्ता**
**रमजान भटार चाळ २६३/५,**
**डॉ.आंबेडकर चौक, तक्यावाडी,**
**कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग कार्यालय,**

**लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, ४ था मजला, स.गो.बर्वे मार्ग,**
**कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जलकामे),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग कार्यालय,**
**लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, ४ था मजला, स.गो.बर्वे मार्ग,**
**कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - २१/१०/२००८**
**सुनावणीचा दिनांक - १६/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१७९/अपिल क्र. ६३८६/२०१०**

अपिल क्रमांक ६३८६ मध्ये दिनांक ०९-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, पाणी खाते यांच्याकडे, आंबेडकर चौकातील किती बैठ्या चाळीना घरामध्ये नळाचे कनेक्शन घेण्याबाबत कायदेशीर कागदपत्रांची माहिती मिळणेबाबत, माहितीचा कालावधी सन २००५ ते आजतागायत आहे, अशा प्रकारची माहिती अनेक मुद्या संदर्भामध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०८-२०१० रोजी खर्चाचा भरणा करावे असे कळविण्यात आले होते. परंतु खर्चाचा भरणा न करता अपिलकर्ता यांनी दिनांक ११-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, आंबेडकर चौकी या भागामध्ये अनेक अवैध पाण्याची जोडणी आहे व त्यामुळेच त्या संदर्भामध्ये त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०७-०८-२०१० रोजी खर्चाचा भरणा करावा व माहिती पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल असे त्यांना कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी अद्यापपर्यंत खर्चाचा भरणा केलेला नाही. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ते खर्चाचा भरणा करण्यास तयार होते परंतु त्यांना संपुर्ण माहिती उपलब्ध होवू शकेल का? असे विचारले असता त्यांनी योग्य ते उत्तर न मिळाल्यामुळे त्यांनी खर्चाचा भरणा केलेला नाही. परंतु खर्चाचा भरणा केल्याशिवाय व माहिती उपलब्ध करुन घेतल्याशिवाय माहिती संपुर्ण आहे किंवा नाही हे ठरविता येत नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. खर्चाचा भरणा हा अधिनियमाचे कलम ७ (३) अन्वये देण्याची तरतूद आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना आधी खर्च भरावा व माहिती उपलब्ध

करुन घेणे संयुक्तीक राहील. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय दिला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लघंन केलेले आहे. तसेच शासन निर्णयाचे परिपत्रकाचे उल्लघंन केले असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. मात्र सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१८०/अपिल क्र. ६३८७/२०१०**

अपिल क्रमांक ६३८७ मध्ये जन माहिती अधिकारी पाणी खाते, एल विभाग यांच्याकडे दिनांक २४-०५-२०१० रोजी सन २००९ ते आजतागायत पर्यंत डॉ.आंबेडकर चौक या विभागातील कायदेशीर व बेकायदेशीर कनेक्शनच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २४-०५-२०१० रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये रु.२८४ इतका खर्च अपेक्षित आहे असे कळविलेले होते. परंतु खर्चाचा भरणा न करताच अपिलकर्ता यांनी दिनांक ०९-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १०-०८-२०१० रोजी अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो व तसेच फेरुल साफ करण्याचा आदेश दिलेला होता. त्यावर समाधान न झ ााल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. मात्र प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर एका पृष्ठावर त्रोटक माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना रु.२८४ इतका अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे विहित मुदतीत कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी खर्चाचा भरणा न केल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र प्रथम अपिलामध्ये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती संपुर्ण माहिती नाही व त्यामुळे खर्चाचा भरणा केल्यास त्यांना संपुर्ण कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील. यावरुन अपिलकर्ता यांनी प्रथम खर्चाचा भरणा करावा व नंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्यामुळे सदर अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिल क्रमांक ६३८६ व अपिल क्रमांक ६३८७ हे निकाली काढण्यात येते.**

**२) सदर निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १६-०३-२०११**

मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४९५३६/अपिल क्र. ६३८२/२०१०

श्री.शशिकांत विठ्ठल मोरे, ...अपिलकर्ता
एन.एल.-१-४-१२/५, सेक्टर -१०,
नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती जावली,
मेढा, जिल्हा - सातारा.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्राम पंचायत कुसुंबी,
ता.जावली, जिल्हा - सातारा. ...उत्तरवादी

---निर्णय---

**व्दितीय अपिलाचा दिनांक - २७/०८/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १६/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक २१-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती मार्फत राबविले जाणाऱ्या बोअर वेल मंजुरीच्या सविस्तर माहिती बाबत, मौजे.कुसुंबी (बालदारवाडी) येथे टंचाईग्रस्त गांव म्हणून पंचायत समिती मार्फत बोअरवेल मंजूर करण्यात आली त्याची ग्रामपंचायत ठरावासह सविस्तर माहिती मिळीवी अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने / स्पीड पोस्टाने मिळावी अशी विनंती केलेली दिसून येते. मात्र माहितीच्या अर्जामध्ये अपिलकर्ता यांनी त्यांच्या स्वतःचा पत्ता मु.पो.कुसुंबी (बालदारवाडी) ता. जावली, जिल्हा सातारा व त्याच पत्त्यावर दिनांक ०१-०६-२०१० रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जावली (मेढा) यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २१-०६-२०१० रोजी ग्रामविकास अधिकारी सो. ग्रामपंचायत- कुसुंबी, ता.जावली, जि.सातारा यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले. परंतु अपिलकर्ता हे सुनावणी साठी हजर झाले नाही म्हणून प्रथम अपिलाचा निर्णय त्यांना पोस्टाने पाठविण्यात आला परंतु अपिलकर्ता सदर ठिकाणी नसल्याने पाठविलेला निर्णय उलट टपाली माघारी आला असे विस्तार अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी जावली यांनी आयोगापुढे सांगितले आहे व यावरुन प्रथम अपिलाचा निर्णय दिला नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. मात्र द्वितीय अपिलामध्ये त्यांनी एन एल -१-अे-१२/५, सेक्टर १०, नेरुळ - ७०६, नवी मुंबई ४०० ७०६ असा पत्ता दिलेला असल्यामुळे सदरचे अपिल हे राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात त्यांनी दाखल केले व त्यामुळे आज या कार्यालयामध्ये ग्रामसेवक, ग्राम पंचायत कुसुंबी, ता.जावली, जिल्हा सातारा, विस्तार अधिकारी / गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी मुंबई कार्यालयामध्ये सुनावणीस हजर राहावे लागले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती मिळाली परंतु मंजूरीचे पत्र मिळाले नाही. त्यावर गट विकास अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ती जागा पांदणची आहे मुळातच ती सरकारी जागा आहे व त्यामुळे मंजूरी पत्राची आवश्यकता नाही. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ती जागा त्यांच्या मालकीची आहे म्हणून त्यांना मंजूर पत्राची मागणी माहिती मागितलेली होती अर्थातच या गुणवत्तेबाबत माहिती आयोगात चौकशी करण्याचा अधिकार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेले त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. माहिती उपलब्ध नसेल त्याबाबत तसे स्पष्टपणे कळविणे आवश्यक असते व तसे मंजूर पत्र नाही असे त्यांना कळविलेले आहे. अपिलकर्ता यांनी मात्र माहितीचा अर्ज हा गट विकास अधिकारी यांच्याकडे केला, स्वतःचा पत्ता हा गावाकडचा दिला. प्रथम अपिल करताना त्यांच्या पेक्षा कनिष्ठ अधिकारी ग्राम सेवकांकडे केला व त्यावरील पत्ता गावचा दिला. मात्र द्वितीय अपिल करताना स्वतःचा पत्ता हा मुंबईचा दिला. यावरुन अपिलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचा वापर स्वतःच्या सोयीनुसार केला आहे व हे गैर आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदर अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

१) अपिल निकाली काढण्यात येते.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १६-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.
क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१११/अपिल क्र. ६२५३/२०१०

श्री.महंमद हमीद शेख, ...अपिलकर्ता
नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (दक्षता),
३ रा मजला, विस्तारीत इमारत, बृहन्मुंबई मनपा. कार्यालय,
महानगरपालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियंता (दक्षता),
बृहन्मुंबई महानगरपालिका, ५४६, अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प इमारत,
सिमेंट गोडाऊन इमारत, २ रा मजला, बकरी अड्डा,
एन.एम.जोशी मार्ग, भायखळा,मुंबई ४०० ०११.
...उत्तरवादी

---निर्णय---

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १४/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १७/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०२-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियंता (दक्षता) अधिकारी यांच्याकडे, टी वार्ड, विभाग कार्यालय, मुंलूड, परिरक्षण खात्यातर्फे झालेल्या कामाचे सर्व इनस्पेक्शन चौकशी करुन मराठीत लेखी स्वरुपात मला माहिती द्यावी. तसेच आपल्या दक्षता खात्यातर्फे आपण जे वार्ड, विभागवार प्रत्येक वर्षाला कामाची चौकशी करीता (विजीलंस राऊड) त्याप्रमाणे दिनांक ०१-०४-२००८ ते १९-०४-२०१० पर्यंत कामाची तपासणी कार्यपद्धती कशा प्रकारी केली आहे त्याबाबत मला प्रत्येक बीटमधील एका वर्क ऑर्डरचे तपासणी इनस्पेक्शन केलेली लेखी स्वरुपात तुमच्या सहीसह संबंधीत अधिकारी, वरीष्ठ अधिकारी यांच्या सहीसह मराठीत लेखी स्वरुपाची माहिती देण्यात यावी. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०७-२०१० रोजी टी विभागतील विविध भागांच्या दिनांक ०१-०४-२००८ ते १९-०४-२००८ पर्यंत केलेल्या पाहणीबाबतचे अभिलेखे आपणास पूर्वसूचना देऊन या कार्यालयात पाहता येतील व सदर पाहणीनंतर ज्या कागदपत्रांच्या प्रति आपणांस हव्या असतील त्या विहित शुल्क रु.२/- प्रति प्रत भरुन उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु कर्तव्यावर असणारे अधिकारी जागेवर भेटत नाही असे कारण देवून अपिलकर्ता यांनी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक ०३-०९-२०१० रोजी दिलेला असून अपिलकर्ता यांनी तपासणी केलेली आहे आणि त्यांना प्रती सुद्धा दिलेल्या आहेत. परंतु त्यांना आणखी अधिक माहिती पाहिजे आहे. ती जन माहिती अधिकारी यांनी द्यावी व आवश्यक ते शुल्क आकारावे असा आदेश देवून सदरचे अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. मात्र अपिलकर्ता यांनी त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. द्वितीय अपिल मेमो मध्ये त्यांना माहिती मिळाली परंतु मराठी भाषेत मिळाली नाही व ती मराठी भाषेत द्यावी. याकरीता माहिती मराठीत द्यावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

अपिलकर्ता हे आज गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महानगरपालिके तर्फे जो तपासणी अहवाल तयार होता तो इंग्रजी भाषेत आहे व त्यामुळे तपासणी अहवाल मराठीत करुन देणे अपेक्षित नाही. माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असते त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (च) (ञ)** प्रमाणे अपेक्षित आहे व त्यामुळे इंग्रजी भाषेत माहिती असल्यास तशीच उपलब्ध होईल. त्याचे कोणत्याही प्रकारे भाषातंर करुन देता येणार नाही.

जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे **"माहिती"** या संज्ञेची व्याख्या व **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या तपासली असता असे दिसून येते की, कागदपत्रे ज्या स्वरुपात उपलब्ध असतील त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्यामुळे महाराष्ट्र राज्याची राजभाषा ही मराठी असल्यामुळे महानगरपालिकेने सुद्धा त्यांचे सर्व कामकाज मराठी भाषेमध्ये करणे आवश्यक आहे व पुढील कामकाज त्यांनी मराठी भाषेत करण्याचा प्रयत्न करावा. मात्र या अर्जाच्या तारखेस ज्याप्रमाणे माहिती उपलब्ध असले त्याप्रमाणे ती उपलब्ध होईल. माहिती उपलब्ध झाली नाही असे अपिलकर्ता यांची तक्रार नाही. त्यामुळे सदरच अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

१) अपिल निकाली काढण्यात येते.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिति आयुक्त

मुंबई
दिनांक : १७-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिति आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०११६/अपिल क्र. ६२५४/२०१०
क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१३५/अपिल क्र.
६२५५/२०१०
क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१३४/अपिल क्र. ६२५६/२०१०

श्री.उत्तमकुमार वालजीभाई पटेल, ...अपिलकर्ता
द्वारा, श्रीमती अरुणा के. टांक,
पन्हाळ गड, व्ही-७, २ रा मजला, रुम नं. २०२,
अशोक वन, बोरीवली (पूर्व),मुंबई ४०० ०६६.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,
हरिश्चंद्र येलवे मार्ग,दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता नगर रचना (I),
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,

**हरिश्चंद्र येलवे मार्ग,दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८.**
**...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १३/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १७/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०११६/अपिल क्र. ६२५४/२०१०**

अपिल क्रमांक ६२५४ मध्ये अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (नगर रचना) यांच्याकडे, Reference Letter No. Asst/gn/१५०६०/Estate dt. ३०-०७-२०१०, माहितीचा कालावधी १९९७ ते आजतागायत अशा प्रकारीची माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जा सोबत अपिलकर्ता यांनी प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता), जी / उत्तर यांना दिनांक ३०-०७-२०१० रोजीची प्रत जोडलेली आहे. परंतु त्यांनी दिनांक १९-०७-२०१० रोजी जो माहितीचा अर्ज केला होता त्याबाबतची प्रत जोडलेली नाही. सदर अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०४-०९-२०१० रोजी उत्तर दिले असून मागितलेली माहितीचे वर्णन स्पष्ट नाही. त्यामुळे ती देता येत नाही असे त्यांनी कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १३-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ११-१०-२०१० रोजी देण्यात आला असून सुनावणी मध्ये अपिलकर्ता यांचे दिनांक १७-०७-२०१० रोजीच्या संदर्भामध्ये जो मुळ अर्ज त्यांनी अग्निशामक दल यांच्याकडे केलेला होता. त्याबद्दलची माहिती घेवून Equation Record जर उपलब्ध नसेल त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना कळवावे असा आदेश देवून सदरचे अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जो माहितीचा अर्ज केलेला आहे त्या अर्जांमध्ये स्पष्टपणे कोणत्याही प्रकारे माहितीचे वर्णन केलेले नाही. त्यांनी अग्निशामक दलाकडे पूर्वी जो अर्ज केला होता त्या संदर्भामध्ये प्रशासकीय अधिकारी ( मालमत्ता) यांनी जे उत्तर दिलेले आहे त्याचा फक्त संदर्भ दिलेला आहे व त्या अर्जात सुद्धा काय माहिती मागितली याबद्दल कोणताही उल्लेख नाही असे असून सुद्धा अपिलकर्ता हे अधिकार फिरवतात म्हणून आरोप करतात. अपिलकर्ता यांनी स्पष्टपणे मागितलेल्या माहितीचे वर्णन केल्यास माहिती उपलब्ध आहे किंवा नाही हे तपासून देता येईल व माहिती उपलब्ध नाही त्याबद्दल स्पष्टपणे कळविल्यावर सुद्धा अपिलकर्ता हे विनाकारण आरोप करत असतात. एकाच विषयाच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांचे वेगवेगळ्या पद्धतीने केलेले अनेक अर्ज त्यांच्याकडे आहेत. माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. माहितीचा अर्ज किती ही केला तरी तयार करुन उपलब्ध होवू शकत नाही. अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती मुळात सन १९६३ च्या T.P.Scheme च्या प्रमाणे आहे. त्या वेळीचा सध्याच्या अंमलात असलेल्या नगर रचना कायदा सुद्धा नव्हता असे असेल तर पूर्वीच्या सन १९५० च्या नगर रचना कायद्याप्रमाणे T.P.Scheme तयार झालेला असेल व

त्यात आरक्षण दाखविण्यात आलेले असेल तर आरक्षित भूखंड हा कशाप्रकारे संपादित करण्यात आलेला आहे. या बद्दल महानगरपालिकेत जर माहिती उपलब्ध नसल्यास संचालक नगर रचना, पुणे किंवा सह संचालक नगर रचना, बृहन्मुंबई यांच्याकडे संर्पक साधुन पूर्वीच्या संबंधित माहिती उपलब्ध आहे किंवा नाही याबद्दल विचारणा करणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१३५/अपिल क्र. ६२५५/२०१०**

अपिल क्र.६२५५ मध्ये अपिलकर्ता यांनी दिनांक १०-०८-२००८ रोजी जन माहिती अधिकारी आयुक्त महानगरपालिका यांच्या कार्यालयामध्ये, घरंदाज बिल्डर्स यांना श्री. गणसिद्धिविनायक, एस.आर.ए. को.ऑप.हौ.सो.लि., TPS II, माहिम डिव्हिजन, ओरिजनल प्लॉट नं.९०. लेट. दिलीप गुप्ते मार्ग, माहिम यांनी दिलेला भूखंड नं.९५ किंवा ९५ (pt) (Rehab Bldg. No.२C and १B) under DCR ३३(१०) च्या संदर्भात संपुर्ण कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदर अर्जांच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १३-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ११-१०-२०१० रोजी देण्यात आला असून सदर विषय हा मुख्य कार्यकारी प्राधिकरण ( झोपडपट्टी पुनर्वसन) यांचा असल्यामुळे त्यांच्याकडे पाठविलेला आहे व तसे अपिलकर्ता यांना असे कळविलेले आहे. त्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, झापेडपट्टी प्राधिकरणाकडून त्यांना दिनांक १८-११-२०१० रोजी माहिती उपलब्ध झाली. परंतु प्लॅाट नं. ९५ च्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे झ ोपडपट्टी पुनवर्सन म्हणून कोणतीही आधी सुचना दिलेली नाही असे त्यांना कळविण्यात आले व त्यामुळे त्यांनी पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, भूखंड नं.९५ वर झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरणाने कोणत्याही प्रकारे आधिसूचना दिलेली नाही असे सांगितले परंतु त्या भूखंडावर दोन इमारती उभ्या आहेत. याचा अर्थ महानगरपालिकेकडुन त्या इमारती संदर्भामध्ये निश्चितच बांधकाम परवानगी दिलेली असावेत म्हणून त्यांना त्याबद्दलची माहिती महानगरपालिकेकडून मिळणे अपेक्षित आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, म्हणून भूखंड नं.९२ वर महानगरपालिकेकडून कोणत्याही बांधकामाची परवानगी देण्यात आलेली नाही. तसे असल्यास अपिलकर्ता यांना स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१३४/अपिल क्र. ६२५६/२०१०**

अपिल क्र. ६२५६ मध्ये अपिलकर्ता यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, जी / एन वार्ड ऑफिसर यांच्याकडे, भूखंड नं. अवैध बांधकाम केल्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कारवाई केली त्या संदर्भात SRA यांच्याकडून आलेला

दिनांक ३१-०७-२०१० रोजीची प्रत व दिनांक १८-०२-२०१० चे पत्र त्यांनी जोडलेले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही असे दिनांक ३१-०८-२०१० रोजी कळविले. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १३-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ११-१०-२०१० रोजी देण्यात आला असून सदर विषय हा कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन यांचे असल्यामुळे त्यांचा अर्ज हा त्या प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे व महानगरपालिके तर्फे कोणत्याही प्रकारे कारवाई केलेली नाही हे सुद्धा त्यांना दिनांक ३१-०८-२०१० च्या पत्रात कळविलेले आहे व त्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, भूखंड नं.९७ वर जे SRA Scheme अवैध आहे व त्या संदर्भामध्ये महानगरपालिकेने कारवाई करणे आवश्यक होते व त्यामुळेच तशी माहिती मागितली परंतु माहिती अधिकारी यांनी त्याबाबत काहीही माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, भूखंड नं.९७ वर झोपडपट्टी जाहीर झाल्यानंतर त्या करीता नियोजन प्राधिकरण आहे व त्या बाबतचे सर्व अधिकारी हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास असल्यामुळे व महानगरपालिकेचा कोणताही अधिकार नसल्यामुळे कारवाई करता येत नसल्यामुळे ती करण्यात आलेली नाही व ही बाब अपिलकर्ता यांना दिनांक ३१-०८-२०१० च्या पत्रान्वये स्पष्टपणे कळविण्यात आलेले असल्याने सदरचे अपिल हे निकाली काढण्याची विनंती केली आहे. दिनांक ३१-०८-२०१० च्या पत्राचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिल क्र. ६२५४ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांना १९६३ चे T.P.Scheme योजनेप्रमाणे आरक्षित भूखंड संपादन करण्याच्या संदर्भामध्ये जे अभिलेखे, दस्तऐवज मागितले जातात त्याकरीता संचालक नगर रचना, पुणे व सह संचालक, बृहन्मुंबई विभाग यांच्याकडे संदर्भ करुन सदरचे अभिलेखे उपलब्ध असल्यास ती महानगरपालिकडे उपलब्ध करुन देण्यात यावीत अशी विचारणा करावी व त्याप्रमाणे अभिलेखे उपलब्ध झाल्यास अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत व उपलब्ध न झाल्यास तसे अपिलकर्ता यांना स्पष्टपणे कळविण्यात यावी.**

**२) अपिक क्र. ६२५५ मध्ये भूखंड नं. ९५ च्या संदर्भामध्ये बांधकाम परवानगी दिल नसल्यास तसे स्पष्टपणे अपिलकर्ता यांना कळवावे.**

**३) अपिल क्र.६२५६ हे निकाली काढण्यात येते.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुंबई
दिनांक : १७-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०११६/अपिल क्र. ६२६५/२०१०

श्री.मुस्तफा याकूब बागलकोटे, ...अपिलकर्ता
१६६/१०, प्लेझंट पार्क, ३ रा माळा,
A विंग फ्लॅट क्र. ३०२, जव्वाद हॉटेलसमोर,
४ था निजामपूर, २रा बौद्ध वाडा, भिंवडी, जि. ठाणे - ४२१ ३०२.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन - विभागीय कार्यालय, ठाणे.

जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक (वरिष्ठ),
रा.प.भिंवडी आगार, भिंवडी - ४२१ ३०२.
जि. ठाणे.
...उत्तरवादी

---निर्णय---

व्दितीय अपिलाचा दिनांक - १३/१०/२०१०
सुनावणीचा दिनांक - १९/०३/२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित. (प्रतिनिधी)**

अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०२-२०१० रोजी जन माहिती अधिकारी आगार व्यवस्थापक, भिंवडी आगार यांच्याकडे, त्यांचा मुलगा जावेद मुस्तफा बागलकोटे याचे सन २००७ व २००९ मध्ये वय २५ वर्षे पेक्षा जास्त असल्याने त्याला कॉलेजच्या सुट्टीमध्ये गावी जाण्याकरीता प्रवास सवलत नाकारण्यात आली होती. परंतु माझ्या मुलाचे सन २००७ मध्ये वय २५ वर्षे असताना व प्रवास सवलत लागू असताना ती का नाकरण्यात आली याबद्दलची माहिती व या संदर्भात त्यांनी एकूण ३ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १३-०३-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०४-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक निरंक रोजी देण्यात आलेला दिसून येतो व त्यानंतरही अपिलकर्ता यांना संबंधित आदेशाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली तरी सुद्धा अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे दिशाभूल करणारी माहिती दिली या कारणास्तव द्वितीय अपिल दाखल कलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांचा मुलगा वय २५ वर्षांच्या आत असताना सवलत नाकरण्यात आली होती. त्याबाबतची माहिती विचारलेली आहे. माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी नाकरण्याच्या प्रकीयेबद्दल कारणमिमांसा विचारलेली आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध होते तसे त्यांना आगार व्यवस्थापक यांनी दिनांक १३-०७-२०१० रोजी कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना प्रचलित नियमाची प्रती सुद्धा उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळेच माहिती अधिकारात माहिती उपलब्ध झालेली आहे. गुणवत्तेच्या बाबत माहिती अधिकारात कोणत्याही प्रकारे तपासणी करता येत नाही. अपिलकर्ता यांना मुलगा सवलत नाकरण्याचा आदेश, त्या वेळेस त्यांच्या मुलाचे असलेले वय व नियमाची प्रती यावरुन अपिलकर्ता यांना संबंधित योग्य त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात येईल. माहिती मिळाली असल्यामुळे सदर अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १९-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.**

**क्रमांक : मुमाआ२०११/२५७-अ/तक्रार क्र.१३४**
**क्रमांक : मुमाआ२०११/२५७-अ/तक्रार क्र.१३५**
**क्रमांक : मुमाआ२०११/२५७-अ/तक्रार क्र.१३६**
**क्रमांक : मुमाआ२०११/२५७-अ/तक्रार क्र.१३७**

**श्री. राजन रामचंद्र गेरा,**
**७१८/२, राधा निवास, ५ वा मजला,**
**पी.डी. हिंदुजा मार्ग,**
**खार (पश्चिम), मुंबई -४०० ०५२. ----तक्रारदार**

**---विरुद्ध---**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**एच / पश्चिम वार्ड, सेंट मार्टिनस रोड,**
**बांद्रा (पश्चिम),मुंबई -४०० ०५०. ----गैरतक्रारदार**

**---निर्णय----**

**सुनावणीचा दिनांक :१९.०३.२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारी सोबत त्यांनी माहितीचा अर्जाची प्रत दाखल केलेली नाही. प्रथम अपिल केलेले दिसून येते. प्रथम अपिल मेमोची प्रत दाखल केलेली नाही. मात्र प्रथम अपिलाचा आदेश दाखल केलेला दिसून येते. प्रथम अपिल दाखल केलेले असून प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला असला तरी त्या निर्णयाविरुद्ध अधिनियामाचे कलम १९ (३) प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल करावे लागते. परंतु अपिलकर्ता यांनी कलम १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (१) अन्वये अर्जाप्रमाणे ३० दिवसांत माहिती उपलब्ध झाली नाही तर माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम १८ प्रमाणे तक्रार दाखल करणे संयुक्तीक असते. प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर कलम २१ प्रमाणे द्वितीय अपिल दाखल करणे कायदेशीर असते. या सर्व तक्रारीच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांनी कोणत्याही प्रकारे अधिनियमाचे पालन केलेले नाही.

तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी ज्या तक्रारी आयोगापुढे दाखल केलेल्या आहेत त्या त्यांचे दिनांक २४-०२-२०१० च्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये विभागाने कोणत्या प्रकारे कारवाई केली याबद्दलची माहिती मागितलेली होती व माहिती मिळाली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार केलेली आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे ४ ही अर्जांच्या संदर्भामध्ये विभागाने त्यांचे दिनांक ०९-०२-२०१० रोजी गॅरेजच्या भिंती तोडण्याच्या संदर्भामध्ये जी नोटिस दिनांक १७-०१-२००५ आणि आदेश दिनांक २५-०२-२००५ रोजी देण्यात आला होता. कोणत्या प्रकारची कारवाई केली ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच दिनांक १५-०१-२०१० रोजी तक्रार केली. इलेक्ट्रीक कॅबीन ही दुकानामध्ये रुपातंर केल्याच्या संदर्भामध्ये आणि ते अनधिकृत फेरफार केलेले आहे. त्या फेरफारीच्या संदर्भामध्ये जी कारवाई करण्यात आलेली आहे त्या कारवाईची माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच दिनांक २९-०८-२००५ रोजीच्या गॅरेज संदर्भामध्ये Change of user ची तक्रार केलेली आहे. त्या संदर्भामध्ये कोणत्या प्रकारची कारवाई केली ती सुद्धा त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच दिनांक ०९-०२-२०१० रोजी तक्रार केलेली आहे. त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये सुद्धा कोणत्या प्रकारची कारवाई केली याबद्दलची माहिती उपलब्ध करुन देता येईल जन माहिती अधिकारी यांनी असे आयोगापुढे सांगितल्यामुळे या निर्णयापासुन १० दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना वरील प्रमाणे त्यांच्या ४ ही तक्रारीच्या संदर्भामध्ये केलेली कारवाई कागदपत्रांच्या स्वरुपात छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे त्या कारवाईच्या संदर्भामध्ये अंतिम कारवाई ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगितले. सदर कारवाई ३० दिवसांच्या आत करुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याकरीता तक्रारदार यांचे ४ ही तक्रार ही मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) तक्रारदार यांची तक्रार क्रमांक १३४, १३५, १३६ व १३७ ह्या मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांचे दिनांक २४-०२-२०१० च्या ४ ही अर्जांमध्ये त्यांनी केलेल्या दिनांक ०९-०९-२०१०, १५-१०-२०१०, ०९-०८-२००५ व १८-०१-२०१० रोजी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेल्या कारवाईची माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात**

**छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावीत. तसे झ ालेल्या कारवाईच्या संदर्भात ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १९-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०२२५/अपिल क्र. ६२२८/२०१०**

**श्री.दिलीप बी. नेवाटिया, ...अपिलकर्ता**
**शशी दीप, ५-ए, वरळी, सी फेस,**
**मुंबई ४०० ०३०.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(संरक्षण व सुरक्षा)**
**२८, वजू कोटक मार्ग,**
**बॅलार्ड पियर, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सह पोलीस आयुक्त (प्रशासन),**
**२८, वजू कोटक मार्ग,**
**बॅलार्ड पियर, मुंबई. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२८/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १८/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यसन अधिकारी मुख्य सचिवांचे कार्यालयामध्ये, Information on vehicles coming to Mantralaya and

new Administrative Builing which are fitted with Red / Amber lights and vechicles fitted with sirens / multi-tones horns. List of vechicles या सर्व वाहनांच्या संदर्भामध्ये त्यांनी वाहन नोंदणी क्रमांक, वाहनाचे मॉडेल इत्यादी माहिती तसेच त्यांना मंजूरी नाही अशी वाहने तसेच माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २८-०७-२०१०रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरची माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना सुरक्षितेच्या दृष्टिने लाल किंवा अंबर बत्ती व सायरन व विविध आवाजाचे वाहनांना अधिकृतरित्या परवानगी आहे किंवा नाही. तसेच मंत्रालयामध्ये जी वाहने येतात त्यांना अधिकृतरित्या परवानगी आहे किंवा नाही व नवीन प्रशासकीय भवनामध्ये जी वाहने येतात त्यांना अधिकृतरित्या परवानगी आहे किंवा नाही याबद्दलची माहिती मागितलेली होती. त्यांच्या निरीक्षणाप्रमाणे बहुतांश वाहनांना लाल किंवा अंबर दिवाच बसविण्यात आलेला आहे त्या वाहनांनी ही अधिकृतरित्या परवानगी घेतलेली नाही. त्यांनी परिवहन विभागाकडून त्याबाबतची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे व त्यानंतर ज्या ज्या वाहनांवर लाल किंवा अंबर बत्ती आहे त्याचे निरीक्षण करुन क्रमांकासहित नोंद केलेली आहे व त्या वाहनांची त्यांनी परिवहन आयुक्तांच्या कार्यालयातून पडताळणी सुद्धा केलेली आहे. त्यात त्यांना अशा बरीच वाहने आहेत की त्यांचे पुर्वी ॲटोरिक्षा किंवा स्कूटर किंवा मोटार सायकला जो क्रमांक दिला होता त्यांचा क्रमांक हा बहुतांश वाहनांना दिलेला आहे असे आढळून आले व त्यांनी ती माहिती मागितलेली होती. त्याप्रमाणे त्यांना जी माहिती मिळाली ती अपुर्ण मिळाली. त्यांनी माहिती मागितलेली होती मुख्य सचिवांच्या कार्यालयात परंतु माहिती ही मंत्रालय सुरक्षा कार्यालयातून दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, अपिलकर्ता यांनी मुळात मंत्रालय, नवीन प्रशासन भवन येथे येणाऱ्या लाल व अंबर गाड्याचे वाहतूक आयुक्तांचे कार्यालयाने मान्यता दिलेल्या काळात माहितीसह उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच मंत्रालयात जे शासकीय वाहने येतात त्यांना मंत्रालयातील सुरक्षिता विभागातुन दिलेले Speaker असणे आवश्यक आहे. अंबर किंवा लाल दिवा अधिकृत आहे किंवा नाही यापेक्षा मंत्रालयात प्रवेश करणाऱ्या वाहनांवर मंत्रालय सुरक्षा विभगात Speaker असल्याशिवाय प्रवेश करता येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती तपशीलात मंत्रालय सुरक्षा विभगात देता येत नाही. नवीन प्रशासकीय इमारतीत अशी कोणतीही Speaker ची तरतूद नाही व त्यामुळे नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये दाखल केलेल्या वाहनांच्या बाबतीत तशी पडताळणी केली जात नाही व त्याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. असे असल्यास अपिलकर्ता यांना मंत्रालयात प्रवेश करणाऱ्या वाहनाची तशी माहिती दिलेली आहे. तसे नवीन प्रशासकीय इमारतीत कोणते वाहन पडताळणी संदर्भात कोणती कार्यपद्धत आहे त्याबाबत स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**----<u>आदेश</u>-----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी मा.पोलीस उप आयुक्त संरक्षण व सुरक्षा, मुंबई यांचे कार्यालय यांनी अपिलकर्ता यांना नवीन प्रशासकीय इमारतीच्या संदर्भामध्ये लाल, पिवळया दिव्याच्या संदर्भामध्ये तसेच सुरक्षितेच्या संदर्भामध्ये वाहन प्रवेशाबाबत कोणत्या प्रकारची कार्यपद्धत आहे किंवा याबद्दल स्पष्टपणे नोंदणीकृत टपालाने विनामुल्य कळविण्यात यावी.**

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १८-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती,
२) श्री.चौरे,सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/अपिल क्र. १०६९/२००९/पुणे

श्री.नंदकुमार बाबुराव काळे व ...अपिलकर्ता
श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते,
४१/४२ कमर्शियल बिल्डींग नं.१.
आर्केटयार्ड, गुळटेकडी, पुणे ३७.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक,
जुन्नर वन विभाग, तहसील कार्यालयाजवळ,
जुन्नर. ता.जुन्नर. जि. पुणे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (बिल्ट)
जुन्नर वन विभाग, तहसील कार्यालयाजवळ,
जुन्नर. ता.जुन्नर. जि. पुणे. ...उत्तरवादी

---निर्णय---

व्दितीय अपिलाचा दिनांक - २८/०८/२००९
सुनावणीचा दिनांक - १५/०२/२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १९-०२-२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप वन संरक्षक अधिकारी यांच्याकडे, संपुर्ण ग्रामीण हमी योजनेच्या संदर्भामध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व तालुकेतील वनक्षेत्रपाल यांनी सन २००२ - २००८ पर्यंतच्या कालावधी. मृद व जलसंधारण कामे केली ती कामे चालू असताना किंवा काम पुर्ण झाल्यावर जे अनुदान वितरणाचे आदेश तालुक्याला मिळाले त्या आदेशाच्या झेरॉक्स प्रती व त्या संदर्भात त्या कामवर हजर असणाऱ्या मजुरांवर हजेरी पटाच्या (मस्टरच्या) झेरॉक्स प्रती अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती ही ता.जुन्नर, ता. आंबेगाव, ता. खेड, ता. शिरुर च्या क्षेत्रातील दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ३०-०४-२००९ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १२-०६-०२००९ रोजी देण्यात आलेला आहे. परंतु त्यानंतर ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये खर्चाचा भरणा सुद्धा केलेला आहे. परंतु त्यांना अपुर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती अतिशय विस्तृत प्रमाणात असून वनक्षेत्रपालाच्या कार्यक्षेत्रातुन संकलित करुन उपलब्ध करुन देणे हे ३० दिवसांच्या कालावधीमध्ये शक्य नव्हते. परंतु तरीही अर्ज प्राप्त झाल्यावर दिनांक २७-०२-२००९ रोजी अपिलकर्ता यांनी त्यांच्या अर्ज दिनांक २४-०२-२००९ रोजी प्राप्त झाल्यानंतर मागणी केलेली माहिती तपशील हा मोठ्या कालावधीचा असल्याने माहिती संकलित करण्यासाठी बराच अवधी लागणार असल्याने मुदतीत कार्यवाही होणे अशक्य आहे. तरी सदर माहिती संकलित झाल्यानंतर अधिनियमाचे कलम ७ अन्वये माहिती साठी आवश्यक शुल्क भरणा करण्याचे सुचना या कार्यालयाकडून कळविण्यात येईल असे कळविलेले दिसुन येते. त्याचप्रमाणे दिनांक २७-०२-२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी जुन्नर वन विभाग, जुन्नर यांनी एक ज्ञापन काढुन अर्जदाराने मागितलेली माहिती तयार ठेवण्यात यावी तसेच अधिनियाचे कलम ७ अन्वये उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक शुल्काचा तपशील ८ दिवसांचे आत माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५(५) नुसार सादर करावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक ०९-०३-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी ज्ञापन काढुन वन विभाग कार्यालय कक्ष - ६, वन परिक्षेत्र अधिकारी सर्व यांना स्मरण पत्र दिले. त्यानंतर दिनांक १८-०३-२००९ रोजी स्मरण पत्र दिले. पुन्हा दिनांक २४-०३-२००९ रोजी उपवन संरक्षक जुन्नर विभाग यांनी प्रशासकीय प्रमुख म्हणून संबंधितांना माहिती तत्काळ सादर करण्याचा आदेश द्यावेत तसेच भविष्यात अपिल दाखल झाल्यास संबंधितांना माहिती अधिकारी यांना जबाबदार धरण्यात यावेत असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक २५-०३-२००९ रोजी ज्ञापन हे उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर यांनी काढलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना त्यानंतर दिनांक १३-०५-२००९ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली असून खर्चाचा भरणा करण्याच्या संदर्भामध्ये चलन भरणा केल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसुन येते व त्याप्रमाणे अपिलाच्या निर्णयामध्ये सुद्धा चलनाद्वारे शुल्क भरणा करण्याचे कळविले असून त्यानुसार रक्कम भरल्यानंतर विभागीय कार्यालयातील कक्ष - ६ (एस.जी.आर.वाय) यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच मुद्दा क्र.३ व ४ मागणी केलेली माहितीमध्ये हजेरी पत्रकाच्या प्रती ह्या आवश्यक दस्त असल्याने अर्जदार यांनी समक्ष पाहणी करण्यासाठी निकालपत्र प्राप्त झालेपासून १ महिन्यांचे आत जुन्नर वनविभाग कार्यालय कक्ष - ६ (एस.जी.आर.वाय) यांचेकडे उपलब्ध आहे असे कळविलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी तसेच कक्ष - ६ यांच्याकडुन माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नाही म्हणून माहिती त्यांना उपलब्ध करुन देता आलेली नाही. मात्र माहिती कार्यालयाकडे उपलब्ध झ ाली त्याबाबत कार्यालयीन पत्र क्र. ४५६, दिनांक १३-०५-२००९ अन्वये अर्जदार यांना चलनाद्वारे शुल्क

भरण्याचे कळविले. अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, खर्चाचा भरणा करुन सुद्धा माहिती त्यांना अपुर्ण उपलब्ध झालेली आहे. तसे असल्यास अपिलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली नाही त्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना अर्ज करुन विशिष्ट माहिती नमुद करुन कळविणे संयुक्तिक राहील व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

अपिलकर्ता यांनी माहिती विस्तृत प्रमाणात जर मागितलेली होती तर जन माहिती अध्किारी यांनी ती संकलित करण्याकरीता विहित मुदतीत संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी यांना कळविलेले होते म्हणजेच वन परिक्षेत्र अधिकारी यांच्याकडुन माहिती पुरविण्यासाठी त्यांनी सहाय्य अधिनियमाचे कलम ५ (४) प्रमाणे घेतलेले होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा प्रशासकीय अधिकारी म्हणून ज्ञापन काढलेले होते. परंतु तरी सुद्धा माहिती ज्या संदर्भामध्ये विलंबाने कळविण्यात आलेली होती व त्यामुळे अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे जे अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी सहाय्य घेण्यात आलेले होते त्यांना कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजुन विलंबाच्या कारणास्तव त्यांच्या विरुद्ध अधिनमयाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाई करणे संयुक्तिक राहील. जेणेकरुन माहिती ही ३० दिवसांत उपलब्ध करुन देण्याची जबाबदारीची जाणीव त्यांना होईल व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**------आदेश------**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध झ ाली नाही त्या संदर्भात अर्ज करुन कळवावे व तसे कळविल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उर्वरित माहिती उपलब्ध करुन देण्यात यावीत.**

**२) अपिलकर्ता यांचे दिनांक १९-०२-२००९ रोजीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजी कळविणे सुद्धा त्या सर्व वन परिक्षेत्र अधिकारी व रोजगार हमी योजना कक्ष - ६ यांना अधिनियमाचे कलम ५(४) प्रमणे सहाय्य करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. परंतु त्यांनी ती मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजुन त्यांच्याविरुद्ध अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येते. सदर शिस्तभंगाची कारवाई ही उप वनसंरक्षक यांनी अथवा योग्य त्या सक्षम अधिकाऱ्यांनी करावयाची आहे.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**पुणे**
**दिनांक : १५-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,

१) निवडनस्ती,

२) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/अपिल क्र. ३९१/२००९/पुणे

श्री.अनंत देऊ गावडे, ...अपिलकर्ता
रा. सर्व्हे नं. ३६/२ विद्यानगर,
लेन नं. ६, वर्ल्ड वॉटर टँक,
पुणे - ४११ ०१५.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रंक,
पुणे विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,
३ रा मजला, पुणे ४११ ००१.

जन माहिती अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग - १ व मुंद्राक जिल्हाधिकारी पुणे शहर,
५ फायनान्स रोड शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत,
२ रा मजला, पुणे - ४११ ००१. ...उत्तरवादी

---निर्णय---

| | |
|---|---|
| व्दितीय अपिलाचा दिनांक | -२५/०५/२००९ |
| सुनावणीचा दिनांक | - १५/०२/२०११ |

**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता गैरहजर आहेत. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी, आपणांस मा.असि. डायरेक्टर ऑफ इन्कमटॅक्स (Inv.) Unit -(२) पुणे यांचे दिनांक २७-१२-२००७ ची पत्रे मुद्रांक शुल्क कमी भरलेबाबत आलेली आहेत. मौजे वाघाली सर्व्हे नं. २३०१ व २३२७ बाबत आहे. कृपया सदर २ पत्राच्या प्रती द्याव्या. फी भरण्यास तयार आहे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०३-२००९ रोजी मागितलेली पत्राच्या प्रती विहित फी पान रु.२/- प्रमाणे भरल्यास या कार्यालयातुन उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळविलेले दिसुन येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २८-०४-२००९ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा अपिल मुदतीबाह्य असल्यामुळे निकाली काढलेले दिसुन येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. अपिलकर्ता गैरहजर आहेत. परंतु अपिलकर्ता यांचे दिनांक १६-०४-२००९ रोजी माहिती उपलब्ध झाली असे लेखी दिलेले असल्यामुळे सदर अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**पुणे**
**दिनांक : १५-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**३) निवडनस्ती,**
**४) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/अपिल क्र. ९८८/२००९/पुणे**

**श्री.बी.एन.शिंदे,**
**...अपिलकर्ता**
**पोस्ट बॉक्स नंबर १३,**
**गणेशखिंड, पुणे ४११ ००७.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,**
**शिवाजीनगर विभाग, एस.बी.रोड, चतृश्रृंगी मंदिरासमोर, पुणे - १६.**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,**
**औंध उपविभाग, औंध, पुणे ७.**
**...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - ०७/०८/२००९**
**सुनावणीचा दिनांक - १५/०२/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-११-२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, पुणे यांच्या कार्यालयामध्ये, स्पायसर कॉलेज-हायस्कूल-इंडस्ट्रीज या संस्थेस करण्यात आलेला विद्युत पूरवठ्याच्या संदर्भामध्ये सन २००० ते ऑक्टोबर २००७ या कालावधीतील तपशीलात माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून

अपिलकर्ता यांनी दिनांक ३१-१२-२००७ प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १२-०३-२००८ रोजी देण्यात आला असून अपिल मान्य करुन माहिती दिनांक ३१-०१-२००८ रोजी अपिलकर्ता यांना देण्यात आलेली आहे असे नमुद केलेले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना तसेच लेखी निवेदनामध्ये ३० दिवसांत माहिती देणे बंधनकारक असताना संबंधित उप अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांनी अर्जाची योग्य ती दखल घेतली नाही व माहिती सुद्धा दिली नाही. अपिल दाखल केल्यानंतर कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित उप कार्यकारी अभियंता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अनेक वेळा लेखी कळविले. त्यानंतर उप कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २८-१२-२००७ व ३०-०१-२००८ माहिती खोटी चुकीची दिलेली आहे ही बाब कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास आणून दिल्यामुळे उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी सूचना दिली. उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांनी दिनांक २८-१२-२००७ व ३०-०१-२००८ यांनी दोन्ही वेळेस खोटी माहिती दिलेली असल्यामुळे रु. ३ कोटी पेक्षा जास्त रक्कमेचे नुकसान होणार होते. उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांचे वैयक्तिक संबंध असल्यामुळे त्यांनी चुकीची माहिती दिली. त्यामुळे या ठिकाणी वीज चोरी होते व अनधिकृत वापर हे सिद्ध झाले व महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा रु. ३ कोटीचा फायदा झाला आहे हे सर्वांना माहिती आहे. चुकीची माहिती दिल्यामुळे दोषी व्यक्ती विरुद्ध कारवाई व्हावी असे त्यांनी युक्तीवादात सांगितले. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-१२-२००७ रोजी माहिती दिली होती परंतु माहिती चुकीची आहे या कारणास्तव पुन्हा उप कार्यकारी अभियंता औंध यांनी दिनांक ३१-०१-२००८ रोजी सविस्तर माहिती दिलेली दिसून येते. प्रथम अपिलाच्या निर्णयात सुद्धा दिनांक ३१-०१-२००८ रोजी सुनावणी घेतली त्याच दिवशी तत्काळ माहिती दिली यावरुन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांना अनेक वेळा सुचना देवून अपिलकर्ता यांना पुर्णपणे माहिती विहित मुदतीत देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले हे दिसून येते. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी खुलासा दाखल केलेला आहे व त्यामध्ये सुद्धा माहिती अधिकारी उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांनी दिनांक ३१-१२-२००७ रोजी अपुर्ण माहिती देवून, दिनांक ३०-०१-२००८ रोजी दिलेली असून त्यासाठी ५२ दिवसांचा विलंब झाल्याचे दिसून येतो असे खुलाशात म्हटले आहे. यावरुनच अपिलकर्ता यांचे म्हणणे हे योग्य असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी श्री.बी.एन.शिंदे यांना जाणीवपुर्वक माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केला आहे असे दिसुन येते व त्यामुळे त्यांच्याविरुद्ध शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादण्यापुर्वी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक आहे. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनीच माहिती विलंबाने दिलेली आहे असा निष्कर्ष काढलेला असल्यामुळे तसे आयोगापुढे सुद्धा तत्कालिन जन माहिती अधिकारी उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांना दूरध्वनी द्वारे त्यांच्या सुनावणीबाबत कल्पना देण्यात आलेली होती. परंतु या सुनावणीस ते हजर राहिलेले नाहीत. यावरुन त्यांना संधी देण्यात आलेली होती व त्यांनी मात्र स्वता:चे म्हणणे मांडण्याची संधी घेतलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुद्ध अधिनियमाचे

कलम २०(१) अन्वये ५२ दिवसांच्या विलंबाकरीता प्रत्येक दिवसाला रु.२५०/- प्रमाणे रु.१३०००/- ची शास्ती लादणे आवश्यक झाले आहे व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना अपिलकर्ता यांचे दिनांक ०७-११-२००७ च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही ५२ दिवसांच्या विलंबाने दिलेली असल्यामुळे प्रती दिवस रु.२५०/- प्रमाणे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे एकूण रु.१३०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीची वसूली ही त्यांच्या दरमहाच्या वेतनातून करण्यात येवून लेखाशिर्ष, " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-१६-१)."या अर्थसंकल्पीय लेखाशिर्षाखाली जमा करावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**पुणे**
**दिनांक : १५-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**
**२) निवडनस्ती, (शास्ती)**
**३) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४९८५३/अपिल क्र. ६२२९/२०१०**

**ॲडव्होकेट श्री.राजेश बिंद्रा,** **...अपिलकर्ता**
**एच.ओ. १९२-ए, केनी हाऊस,**
**धारावी, कोळीवाडा, मुंबई ४०० ०१७.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव,**
**विधी व न्याय विभाग, अ शाखा,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (विधी),**
**विधी व न्याय विभाग, अ शाखा,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२०/०९/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १८/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १५-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उप सचिव विधी व न्याय विभाग यांच्या कार्यालयामध्ये, "Advice given by the Law & Judiciary Department & Govt. Resolution passed by Tribal Development Department of Maharashtra State Government" च्या संदर्भात आदिवासी विकास विभाग क्रमांक 423/2430/Civil/Confl..A dated 19-12-2005, signed by Mr.A.Z.Mohod, तसेच आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य शासन निर्णय परिपत्रक दिनांक १५-०६-१९९५ ची प्रमाणित प्रत ज्या अन्वये अनुसुचित जमातींना संरक्षण देण्यात आले होते व सदर संरक्षण नोव्हेंबर २००० पर्यंत वाढविण्यात आला त्याच्या प्रती उपलब्ध करुन द्यावेत. सदरची प्रत नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद कलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक २९-०३-२०१० रोजी उत्तर दिलेले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०४-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयात जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्तास दिनांक १९-१२-२००५ चे अभिमताची प्रमाणित प्रत व शासन निर्णय / परिपत्रक दिनांक १५-०६-१९९५ चे प्रमाणित प्रत

द्यावी. परंतु अपिलकर्ता यांना त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक २९-०३-२०१० रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती प्रत वाचता येण्याजोगी नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी जी प्रत उपलब्ध करुन दिली त्यावरुन माहिती अधिकारी यांनी त्या मुद्दांच्या संदर्भात अभिप्राय कळविलेला दिसून येतो. त्यावर अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अभिप्रायातील मुद्दांची प्रत मागितलेली होती. तसेच दिनांक १५-०६-१९९५ चे शासन निर्णयान्वये कर्मचारी व अधिकारी यांनो संरक्षण देण्यात आलेले होते व असे संरक्षण ते नोव्हेंबर २००० पर्यंत वाढविण्यात आले अशा शासन निर्णयाची प्रत मागितलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारचे शासन निर्णय नाही असे आयोगापुढे सांगितले. जर असे असल्यास अपिलकर्ता यांना विधी व न्याय विभागतील उपसचिव यांच्या अभिमताची प्रत व आदिवासी विकास विभागात अशाप्रकारचा शासन निर्णय असेल त्याबाबतची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना कागदपत्रांच्या स्वरुपात व उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील व त्या करीता सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**------आदेश------**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून प्रथम अपिलीय अधिकारी त्यांच्या निर्णयात दिल्याप्रमाणे विधी व न्याय उपसचिवांचे दिनांक १९-१२-२००५ अभिमताची प्रमाणित प्रत व आदिवासी विकास विभागतील शासन निर्णय दिनांक १५-०६-१९९५ चे नोव्हेंबर २००० पर्यंत संरक्षण वाढविण्यात आलेले आहे अशा शासन निर्णयाची प्रत जो पारित केला असल्यास उपलब्ध करुन द्यावा व पारित केला नसल्यास तसे स्पष्टपणे कळविणे. सदरची माहिती विधी व न्याय विभागाकडे उपलब्ध नसल्यास आदिवासी विकास विभागाकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलकर्ता यांना तसे विनामुल्य हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत कळविण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १८-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०२२९/अपिल क्र. ६२३२/२०१०**

**श्री.जयंतीलाल शाह व** **...अपिलकर्ता**
**श्री.सुधाकर निटेकर,**
**शॉप नं. ४०, शास्त्रीनगर, म्युनिसिपल मार्केट,**
**संत ज्ञानेश्वर मार्ग, बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी -३ अभियांत्रिकी कक्ष,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१..** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२९/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १८/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १८-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या कार्यालयामध्ये, SRA scheme CTS No.६२९ (pt) सर्व्हे नं.३४१ बांद्रा (पूर्व) व परिश्रम को-ऑप.हौ.सोसायटी आणि शास्त्रीनगर म्युनसिपल मंडई व्यापारी सेवा संघ, सन २००० ते आता पर्यंतचा कालावधीतील माहिती म्हणजे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण महाराष्ट्र slum area (Improvement, Clearnce & Redevelopment) Act १९७१ कलम ३(c) in Government Gazzate as per circular ४२ date १२-०६-२००० issued by CEO, SRA about SRA scheme mention in above subject matter and copy of same Government Gazzete, Information the order issued by CEO, SRA regarding meeting/ hearing held on १७-०२-२०१० in CEO office for greavences of Shastri nagar Municipal Mandai Vypari Seva Sangh as per the Direction of High Power Committee SRA (copy of said notice for hearing on १७-०२-२०१० is attached herewith) & copy of order, Inoformation about allotment of A-१ & A-२ Basld as per Circular ५५ date ०५-०९-२००३ issued by Executive Engineer SRA and copy of the Entirely

paper/document\nt/noting/C.D./photograph related to allotment of A१ & A२ building as per circulars आणि २ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही त्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०५-१०-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसुन येत नाही व त्यामुळेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, मागितलेली माहिती त्यांना आतापर्यंत मिळालेली नाही व दिनांक १२-०६-२००९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण परिपत्रक क्र.४२ प्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राची घोषणा करण्यात आली किंवा नाही याबद्दलची माहिती मिळालेली नाही व प्रथम अपिलाचा निर्णय सुद्धा देण्यात आलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दिनांक ०३-०७-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तसे पत्र श्री.जयंतीलाल शाह व श्री. सुधाकर निटेकर, शॉप नं. ४०, शास्त्रीनगर, म्युनिसिपल मार्केट,संत ज्ञानेश्वर मार्ग, बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ या पत्त्यावर पाठविलेले आहे. तसेच त्यामध्ये मुद्दा क्रमांक ३(iii)(a) च्या संदर्भामध्ये उपजिल्हाधिकारी, (झोपुप्रा) यांच्याशी संबंधित असल्याने त्यांच्याकडे हस्तांतरीत केलेला आहे. तसेच मुद्दा क्रमांक ३(iii)(b) विधी सल्लागार या विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडे अर्ज हस्तांतरीत केलेला आहे. अपिलकर्ता यांनी ज्या परिपत्रकाचा नं.४२ चा आधार घेतलेला आहे त्यामध्ये १७ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांखालील क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घोषित केलेले आहे. त्यामध्ये अपिलकर्ता यांना ज्या क्षेत्राची माहिती हवी आहे त्या क्षेत्राचा समावेश नाही. तसेच अपिलकर्ता यांना ज्या क्षेत्राची माहिती पाहिजे आहे ती Censused slum (गणणाकृत) वा Notified slum असल्यास त्या करीता पुनर्वसनाची घोषणा करणे आवश्यक नसते. मात्र खाजगी भूखंड असेल तर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राची घोषणा करणे आवश्यक असते व त्यामुळेच अपिलकर्ता यांनी संबंधित पुनर्वसन योजना ही उपजिल्हाधिकारी (झोपुप्र) यांच्याशी संबंधित असल्याने अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला होता व त्या विभागाशी संपर्क साधुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले होते. त्यावर अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे जर एकच असेल तर इतर विभागांकडे माहिती अर्ज वर्ग करणे हे योग्य नाही व अर्ज वर्ग करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु जन माहिती अधिकरी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण जर एक असेल तर त्या त्या क्षेत्रात करीता पुनर्वसनाची योजना असते. त्या त्या योजनेकरीता स्वतंत्र उपजिल्हाधिकारी नियुक्त केले जातात व माहिती अधिकारी सुद्धा असतात व त्यामुळे त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक असते अन्यथा ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन देणे हे शक्य होणार नाही. अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०७-२०१० रोजी याच विषयाबाबत अपिलकर्ता / अर्जदारांनी सादर केलेल्या दुसऱ्या अर्जाच्या संदर्भात नस्तीचे निरीक्षणासाठी त्यांना बोलविण्यात आले होते. दिनांक ०५-१०-२०१० रोजी अपिल अर्जदार हे कार्यालयात उपस्थित होते तेव्हा अपिल अर्जदारांनी अपेक्षिलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या नस्तीचे निरीक्षण करण्यास सांगितले असता त्यांनी नस्तीचे निरीक्षण नंतर करतो असे सांगुन निघून गेले. त्यानंतर अद्यापपावेतो सदर नस्तीचे निरीक्षण करण्यासाठी ते आलेले नाहीत. अपिलकर्ता / अर्जदार हे वेळोवेळी नगर भू.क्र.६२९ (भाग), शास्त्रीनगर गृहनिर्माण संस्था या योजनेबाबत माहिती मागवित असतात. या कार्यालयात त्यांनी सादर केलेल्या विविध अर्जाच्या अनुषंगाने त्यांना प्रत्येक वेळी माहिती पुरविली जाते. अपिलकर्ता /अर्जदार यांना आवश्यक असणारी माहिती वेळोवेळी

देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणी करीता दिनांक १२-१०-२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी - ३ यांनी दिनांक २६-१०-२०१० रोजी दुपारी ३.३० वाजता अपिलीय अधिकारी / कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, अभियांत्रिकी यांच्या कक्षात सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे असे पत्र त्याच पत्त्यावर दिलेले आहे. परंतु अपिलकर्ता हे सुनावणीस हजर झालेले नाही व त्यामुळेच प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही. त्याबाबतचे पत्र, सर्व कागदपत्रे आयोगापुढे सादर केलेले आहे. असे असेल तर अपिलकर्ता यांचा दिनांक ०३-०७-२०१० रोजीचा अर्ज हा उपजिल्हाधिकारी (झोपुप्र) यांच्याकडे वर्ग केलेला असेल तर त्यांनी मागितलेली माहिती SRA scheme CTS No.६२९ (pt) सर्व्हे नं.३४१ बांद्रा (पूर्व) व परिश्रम को-ऑप.हौ.सोसायटी आणि शास्त्रीनगर म्युनसिपल मंडई व्यापारी सेवा संघ च्या संदर्भामध्ये गणणाकृत झोपडपट्टी असेल तर सदर अधिनियमांतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची घोषणा किंवा शासन निर्णय राजपत्रात प्रसिद्ध केले असल्यास किंवा तशी घोषणा प्रसिद्ध करणे आवश्यक नसलयास स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना SRA scheme CTS No.६२९ (pt) सर्व्हे नं.३४१ बांद्रा (पूर्व) व परिश्रम को-ऑप.हौ.सोसायटी आणि शास्त्रीनगर म्युनसिपल मंडई व्यापारी सेवा संघ च्या संदर्भामध्ये महाराष्ट्र slum area (Improvement, Clearnce & Redevelopment) Act १९७१ कलम ३(c) प्रमाणे राजपत्रात घोषणा केलेली असल्यास त्या घोषणेची राजपत्राची छायांकित प्रती घोषणा करण्याची आवश्यकता नसल्यास त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेऊन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १८-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**

**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४९८५१/अपिल क्र. ६२३१/२०१०**

**श्री.शेखर सदाशिव कांबळे,** **...अपिलकर्ता**
**सी -२०४, शरयु बिल्डिंग, सेक्टर - ९,**
**वसंत नगरी, वसई (पूर्व), जि. ठाणे.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलिस उप आयुक्त,**
**पश्चिम परिमंडळ, लोहमार्ग मुंबई,**
**वरिष्ठ अनुभाग अभियंता (पॉवर), जुनी इमारत,**
**१ ला माळा, घासबाजार, विभागीये रेल्वे व्यवस्थापक,**
**पश्चिम रेल्वे,मुंबई सेंट्रल कार्यालयाजवळ,मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,**
**बांद्रा लोहमार्ग पोलीस ठाणे,**
**बांद्रे, मुंबई.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२०/०९/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १८/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ, लोहमार्ग मुंबई यांच्या कार्यालयामध्ये, १) बांद्रा लोहमार्ग पोलीस ठाणेचा माहे ८/०७ ते ३/१० या कालावधीतील प्रत्येक महिन्याचा ड्युटी बटवडा तक्त्याची झेरॉक्स प्रती (पोलस ठाणेकडून सांक्षाकित करुन), २) माझे रुग्ण कालावधी संदर्भातील मा.वरिष्ठ पोलीस निरिक्षक, बांद्रा लोहमार्ग पो.ठाणे यांनी सादर केलेला माझ्या विरुद्धचे प्राथमिक चौकशी संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अशी माहिती मागितलेली दिसुन येते. सदर माहिती व्यक्तीशः हवी असे नमुद केलेले दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १५-०४-२०१० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई अपिलकर्ता यांनी आपले मागणी प्रमाणे ड्युटी बटवडा तक्ताच्या छांयाकित प्रतीचे शुल्क रु.७,७८४/- एवढी होत असलेने आपण त्वरीत भरणा करावी असे कळविण्यात आलेले होते. त्यावर अपिलकर्ता यांनी दिनांक २०-०४-२०१० रोजी आक्षेप घेणरे पत्र दिलेले होते व त्यानंतर दिनांक २४-०४-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. दिनांक २८-०४-२०१० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई यांनी पोलीस उपआयुक्त लोहमार्ग, मुंबई यांच्याकडे अर्जदार यांना खर्चाचा भरणा करण्याची समज देण्यात यावी अशा प्रकारचे पत्राद्वारे कळविण्यात आले होते. प्रथम अपिलाचा निर्णय सुनावणीस जन माहिती अधिकारी हे हजर राहिले नसल्यामुळे पोलीस उप आयुक्त, (पश्चिम) लोहमार्ग मुंबई, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदरची माहिती नि:शुल्क देण्याबाबत सुचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी

यांनी निःशुल्क दिली तरी सुद्धा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले असुन जन माहिती अधिकारी नसताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई यांनी लेखी पत्राद्वारे रु.७,७८४/- रक्कमेची मागणी केली. परंतु सदर रक्कम किती पृष्ठांची व कोणत्या दराने कळविली आहे याचा उल्लेख स्पष्ट केला नाही. सदरचे अपिल हे ८ दिवस उशिराने सादर होते कारण वरिष्ठ पोलीस अधिकारी या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. गणपती बंदोबस्त असल्यामुळे असे कारण त्यांनी दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जदाराचा अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती तयार करण्यात आली होती व ती मान्यते करीता वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे देण्यात आली होती. परंतु श्री.राजीव सावंत हे पोलीस निरीक्षक तथा जन माहिती अधिकारी रजेवर असल्याने दुसऱ्या माहिती अधिकाऱ्याची नेमणूक या करीता श्री. सुर्वेगंध, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे हे जन माहिती अधिकारी नसताना अर्जदार व कार्यालयाशी चुकीच्या पद्धतीने पत्रव्यवहार केलेला आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता रु.७,७८४/- कळविण्यात आली होती. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ३१ पृष्ठांची होती व त्याप्रमाणे त्यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु श्री. सुर्वेगंध, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे यांनी ते जन माहिती अधिकारी नसताना अर्जदार व या कार्यालयाशी चुकीच्या पद्धतीने पत्रव्यवहार केला त्या कार्यालयाकडून दिनांक १७-०५-२०१० रोजी खुलासा करण्यास सांगितले असता सदरबाबत त्यांनी खुलासा केलेला नाही. परंतु दिनांक २६-०५-२०१० रोजी श्री. सुर्वेगंध यांनी स्वतःची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केल्याचे आदेश निर्गमित केले. परंतु श्री.राजीव सावंत, पोलीस निरीक्षक, यांचे रजेच्या काळात कोणही माहिती अधिकाऱ्याची नेमणूक न करता व अपिलाचे कामकाजात अडथळा निर्माण होईल अशा तऱ्हेने कामकाजाची पद्धत अबलंबलिली आहे. प्रस्तृत प्रकरणात श्री.राजीव सावंत, पोलीस निरीक्षक व जन माहिती अधिकारी, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे यांनी दिनांक ०८-०६-२०१० रोजी सादर केलेल्या खुलाश्याचे अवलोकन करता श्री.राजीव सावंत, पोलीस निरीक्षक व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांना मुदतीत माहिती देण्यासाठी तयार केली होती. परंतु श्री. सुर्वेगंध, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे यांनी ती स्वतःजवळ अनाधिकारे ठेवून घेतली वर नमुद केल्याप्रमाणे आयोगापुढे सांगितले व त्याबाबत त्यांच्याविरुद्ध योग्य ती कारवाई व्हावी म्हणून दिनांक १९-०७-२०१० रोजी मा.पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांच्याकडे श्री.अनिल तमायचेकर, प्रथम अपिलीय अधिकारी, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ, लोहमार्ग मुंबई यांनी स्वंयस्पष्ट असे पत्र दिले. त्यांचा तो बेफिकीर व बेजाबाबदार उर्मट भाषेत पत्रव्यवहाराबद्दल व केंद्रिय माहितीच्या अधिनिमयाची पायमल्ली केली याकसुरीबद्दल त्यांना योग्य ते शासन होणेस विनंती आहे असे कळविलेले असून सुद्धा त्यांच्या विरुद्ध अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. यावरुन अपिलकर्ता यांचे द्वितीय अपिल मेमो मध्ये वरील आरोप सुयंक्तिक वाटतो व त्यामुळे सदर प्रकरणामध्ये पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांनी योग्य ती चौकशी करुन योग्य तो निर्णय घेणे संयुक्तिक राहील. जेणेकरुन माहितीचा अधिकार अधिनिमय २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्जदाराला माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून अशाप्रकारचे चूकीची व दिशाभूल करणारे पत्रव्यवहार केला जाणार नाही व विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली जाईल. परंतु अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

-----<u>आदेश</u>-----

१) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यांत येत असून अपिलकर्ता यांना दिशाभूल करणारा खर्चाचा आकडा कळवून माहिती देण्याचे टाळाटाळ करणाऱ्या, अडथळा उत्पन्न करणाऱ्या पोलीस निरिक्षक यांस अधिनियमाचे कलम ५(४) व ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुद्ध कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यांत येते. शिस्तभंगाची कारवाई ती आयुक्त किंवा सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.
२) सदर निर्णयाची एक प्रत पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांच्याकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १८-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांजकडे योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२) निवडनस्ती,
३) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५००३६/अपिल क्र. ६२६४/२०१०

**श्री.गुलाम वारीश शेख,** **...अपिलकर्ता**
**रुम नं.२, घनश्यामदास कि चाळ,**
**कालाकिल्ला धारावी, मुंबई ४०० ०१७.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्र (पूर्व), मुंबई ४०० ०५१.**
**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्र (पूर्व), मुंबई ४०० ०५१.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -१२/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०८-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी उप मुख्य अभियंता झोपडपट्टी सुधार मंडळ,गृहनिर्माण भवन, वांद्र (पूर्व), मुंबई यांच्याकडे सन १९९८ ते २००४ पर्यंत या कालावधीतील आमदार एकनाथ गायकवाड यांच्या आमदार म्हणून धारावी ३५ या विधानसभा क्षेत्रात निवडून आल्यानंतर त्यांच्या फंडातून किती विकास कामे करण्यात आली याबद्दलचा संपुर्ण तपशील व कोणत्या ठिकाणी विकास कामे केली त्याची तपशिलावार माहिती मिळणेबाबत एकूण ७ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक २२-०६-२०१० रोजी मागणी केलेली माहिती जुनी असून ती देण्याकरीता कार्यालयात उपलब्ध असलेली साधनसामग्री प्रमाणबाहेर वळवावी लागणार आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(९) अन्वये आपण मागितलेली माहिती ही त्या स्वरुपात सादर करता येत नाही. कार्यालयातील नस्ती / दस्तऐवज आपणांस पाहणी करीता उपलब्ध करुन देण्यात येतील. पहाणी केल्यानंतर नस्तीतील आपणांस आवश्यक असलेल्या पृष्ठ क्रमांकची यादी आपण तयार करुन संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात सादर करावी व त्यानंतर रक्कमेचा भरणा करण्या संदर्भात ७ दिवसांत कळवतील. सदर रक्कमेचा भरणा केल्यानंतर छायांकित प्रती देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ३१-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, मागितलेल्या माहितीचे अभिलेखे व दस्तऐवज पाहणी सुरु आहे परंतु माहिती अतिशय कमी प्रमाणात उपलब्ध होत आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहिती ही १२ वर्ष पुर्वीपासूनची आहे व त्यांच्याकडे एकूण १० आमदार आहे. या १० आमदाराचे संदर्भातील सर्व माहिती ही गोडाऊन मध्ये

ठेवण्यात आलेली आहे व गोडाऊन मधून संपुर्ण माहिती काढून अपिलकर्ता यांना निरीक्षणाकरीता द्यावयाची असेल तर कार्यालयातील अनेक कर्मचारी यांचे दैनंदिन कामकाज बाजूला ठेवून ती काढून द्यावी लागते. त्याकरीता रजिस्टर सुद्धा Maintain केलेले आहे. त्यांना अधिनिमयाचे कलम ७ (९) अन्वंये सुद्धा माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले होते. परंतु तपासणी अंती उपलब्ध करुन देता येईल असे कळविले. यावरुन वास्तविक अपिलकर्ता यांनी मोघम व अति व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली असल्याने ती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नव्हती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे निश्चित वर्णन करुन माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. कोणत्याही माहितीचे निश्चित वर्णन न करता कोणत्याही कागदपत्राची, दस्तऐवज किंवा अभिलेखे किंवा एखाद्या कामाचे निश्चित वर्णन न करता माहिती मागणे अपेक्षित नाही. एखादी मागितलेली माहिती करीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याने माहिती काढुन देणे अपेक्षित नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी विहिती मुदतीत माहिती नाकरलेली नसताना प्रथम अपिल किंवा द्वितीय अपिल दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. अशाप्रकारे मोघम व व्यापक प्रमाणात अनियमित कालावधीची माहिती मागणे म्हणजेच अधिनियमाच्या तरतूदींचा गैरवापर करणे होय. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १९-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**

**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५००९०/अपिल क्र. ६२६३/२०१०**

**श्री.संजय परशुराम पाटील, ...अपिलकर्ता**
**ई-१२२-९ शिवसागर गृहनिर्माण संस्था,**
**सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई ४१० २१०.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक मुंबई विद्यापीठ,**
**पात्रता प्रमाणपत्र विभाग (Eligibility Department),**
**डॉ.आंबेडकर भवन,मुंबई विद्यापीठ, कलीना परिसर,**
**सांतक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०९८.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कुल सचिव,**
**पात्रता प्रमाणपत्र विभाग (Eligibility Department)**
**डॉ.आंबेडकर भवन मुंबई विद्यापीठ कलीना,**
**सांतक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०९८.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -१०/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १८-०५-२०१० रोजी उस्मानिया विद्यापीठातून पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठामार्फत एलएलबीसाठी प्रवेश देण्यात आला असल्यास, त्याची साक्षांकित माहिती व त्याच संदर्भामध्ये एकूण २० मुद्दांवर नियम असल्यास किंवा नसल्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारची माहिती सन १९९६ ते १५ मे २०१० कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १७-०६-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २९-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २३-०७-२०१० रोजी देण्यात आला असून मुद्दा क्रमांक ७, १०, ११, १३, १४, १५ यांच्या संदर्भामध्ये नवीन सुधारित उत्तर द्यावे असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक २४-०८-२०१० रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी लेखी खुलासा दाखल केलेला आहे व तोंडी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे त्यांनी त्या संदर्भातील इतर अशी सर्व माहिती मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे लेखी खुलासा खालील प्रमाणे केलेला आहे.

श्री.संजय परशुराम पाटील यांनी दिनांक १८-०५-२०१० रोजीच्या माहितीचा कायदा २००५ अन्वये माहिती मागितलेली होती. त्याप्रमाणे त्यांना हवी असलेली माहिती देण्यात आली आहे. (प्रत पताका अ जोडत आहोत) श्री.संजय परशुराम पाटील यांनी सन २००९-२०१० रोजी पदयुत्तर तीन वर्षीय एल.एल.बी. च्या अभ्यासक्रमासाठी रिझवी लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेला होता. तसेच

शैक्षणिक वर्ष २००८-२००९ पासून मुंबई विद्यापीठाव्यतीरिक्त इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना पात्रता प्रमाण पत्रासाठी अर्ज देणे व ते स्विकारण्याचे काम सर्व संलग्न महाविद्यालयांना सोपविण्यात आले आहे.

तदनुसार रिझवी लॉ कॉलेजमधुन जेव्हा श्री.संजय परशुराम पाटील यांचा पात्रता प्रमाणपत्र प्राप्तीचा अर्ज सदर विभागात सादर करण्यात आल्यानंतर या विभागाने सदर अर्जाची पडताळणी केली असता असे निदर्शनास आले की श्री.संजय परशुराम पाटील यांनी उस्मानिया विद्यापीठातून एक वर्षीय शैक्षणिक पदवी घेतलेली आहे.

सदर प्रकरणी असे नमूद करण्यात येते की, मुंबई विद्यापीठातील प्रचलीत नियमानुसार तीन वर्षीय एल.एल.बी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (१०+२+३) म्हणजेच माध्यमिक, उच्च माध्यमिक व तीन वर्षाची पदवी परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रकरणे असे नमूद करण्यात येते की, श्री.संजय परशुराम पाटील यांना त्याप्रमाणे त्यांनी रिझवी विधी महाविद्यालयात एल.एल.बी. च्या अभ्यासक्रमासाठी घेतलेला प्रवेश ग्राह्य नसल्याचे या विभागाच्या पत्र क्रमांक Elg./7612 of 2010 Dated 21st January, 2010 नुसार कळविण्यात आले होते.(प्रत पताका ब जोडत आहोत.)

तरीही श्री.संजय परशुराम पाटील यांनी पात्रता प्रमाण पत्रासाठी सतत सदर विभागाकडे तगादा लावल्याने त्याचे प्रकरण विद्यापीठाच्या समकक्षता समितीची दिनांक २३-०२-२०१० च्या बैठकित ठेवण्यात आले आणि त्या प्रकरणी समकक्षता समितीने देखील एल.एल.बी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तीन वर्षाचा अभ्यासक्रम अनिवार्य आहे असा निर्णय दिलेला आहे. (निर्णयाची प्रत पताका क जोडत आहोत)

त्यानंतरही श्री.संजय परशुराम पाटील यांनी सदर प्रवेशाच्या पात्रतेसाठी पुन्हा माहितीच्या अधिकारा मार्फत अर्ज केला असता त्यांच्या पत्राचे उत्तर पत्र क्रमांक Elg./8037 of 2010, dated 12th April, 2010 रोजी वरील समकक्षता समितीने दिलेल्या निर्णयाच्या आधारे देण्यात आले व त्यानेही श्री. पाटील यांचे समाधान झाले नाही व त्यांनी ॲपिलेट अधिकाऱ्याकडे तशी तक्रारी केली असता श्री पाटील यांना ॲपिलेट अधिकाऱ्यांसमोर दिनांक २०-०७-२०१० रोजी बोलावण्यात आले आणि योग्य ती समज देण्यात आली आणि त्यांना हवी असलेली कागदपत्रे देण्यात आली. (क्रमांक Elg./9131 A of 2010 दिनांक २४.०८.२०१०) (प्रत पताका ड जोडत आहोत)

शिवाय दिनांक २२-०८-२०१० च्या पत्रात श्री. पाटील यांनी उस्मानिया विद्यापीठातुन पदयुत्तर झालेल्या श्री.कृष्णा यांना एल.एल.बी. च्या अभ्यासक्रमासाठी पात्र ठरविल्याचे लिहिले आहे. परंतु श्री.कृष्णा यांना उस्मानिया विद्यापीठातुन दिलेल्या प्रमाण पत्रात त्यांनी तीन वर्षाची पदवी पुर्ण केल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे त्यांना पात्रता प्रमाणपत्र दिले गेले.

श्री.कृष्णा यांना देण्यात आलेल्या पात्रता प्रमाणपत्रा अगोदरच्या उस्मानिया विद्यापीठातुन एका वर्षात पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष एल.एल.बी. च्या प्रवेशासाठी पात्रता प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत. परंतु समकक्षता समितीच्या दिनांक २३-०२-२०१० च्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार एका वर्षात पदवी घेतलेल्या कुठल्याही विद्यापीठाच्या पदवीला प्रवेश घेण्यासाठी लागणारे पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले नसून श्री.पाटील यांची विनंती या निर्णयानुसार मान्य करण्यात आलेली नाही.

पात्रता प्रमाणपत्र विभागातील कर्मचारी हे विद्यापीठाच्या नियमानुसार विविध प्रवेशांची पात्रतेची पडताळणी करीता व काही प्रवेशाबाबत संभ्रम असल्यास त्यासंबधीत शाखेच्या प्रमुखांकडे

ती प्रकरणे पाठविली जातात त्या प्रमाणे श्री. पाटील यांचेही प्रकरण विधी शाखेचे अधिष्ठाता प्राध्यापक श्री. नारायण राज्याध्यक्ष यांच्याकडे पाठविण्यात आले व त्याबाबत त्यांनी खालील प्रमाणे शेरा दिला आहे.

" As the B.A. Degree Programs (course) Completed by the applicant is not equivalent with in number of years of study and the course coutents of the (12+3) 3 years Degree Program (course) of our University and other University's eligibility cannot be granted for admission to the 3 years LL.B. Programme (course) of our University."

मुंबई विद्यापीठातील सर्व कार्यालयीन कामकाज हे परिनियमात दिलेल्या तरतुदीनुसार चालते व श्री. पाटील हे भावनाविवश करुन नियमबाह्य कार्य करण्यास भाग पाडत आहेत. तसेच २२-०८-२०१० च्या पत्रात श्री.संजय परशुराम पाटील यांनी जर त्यांना पात्रता प्रमाणपत्र मिळाले नाही तर ते मुंबई विद्यापीठाच्या परिसरातच आत्महत्या करणार असल्याची धमकी दिली आहे व त्यास सदर विभागातील कर्मचारी जबाबदार असतील असे म्हटले आहे. आत्महत्या करणे हे कायद्याने गुन्हा असल्याने ही गंभीर बाब लक्षात घेऊन मा.कुलगुरुंना च्या आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरिक्षक, बी.के.सी. पोलीस ठाणे, बांद्रा कुर्ला संकुल, मुंबई यांना श्री.संजय परशुराम पाटील यांनी कर्मचाऱ्यांना दिलेल्या धमकी विषयी पत्र (प्रत पताका इ जोडत आहोत ) देऊन श्री.संजय परशुराम पाटील यांना समज देण्यात यावी अशी विनंती केली. सदर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांनी श्री.संजय परशुराम पाटील आणि विभागातील कर्मचारी यांना पोलीस ठाण्यात बोलावून सर्व चौकशी केली व श्री. संजय परशुराम पाटील यांना त्याप्रमाणे समज दिली आणि सांगितले की विभागाच्या समकक्षता समितीच्या दिनांक २३-०२-२०१० च्या बैठकीत झालेल्या निर्णयानंतर जर एखाद्या विद्यार्थ्याला पात्रता प्रमाणपत्र दिले असल्यास त्याची माहिती घेऊन यावी पण अशी चूक विभागाकडून न झाल्याने श्री.संजय परशुराम पाटील निरुत्तर झाले.

यावरुन अपिलकर्ता यांना आतापर्यंत त्यांच्या प्रवेशा संदर्भातील नियम व आदेशाच्या बद्दल सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली असताना सुद्धा विनाकारण १०-१५ वर्षाची माहिती मागणे हे अनाठायी आहे व त्यापेक्षा अपिलकर्ता यांनी त्यांचा प्रवेश नाकारला त्या संदर्भात व असलेले नियमाची तरतूद उपलब्ध करुन घेऊन योग्य त्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे किंवा न्यायालयाकडे तक्रार करणे संयुक्तिक झाले असते. सर्व पुर्ण कागदपत्रे व खुलाशात उपलब्ध करुन दिलेली माहिती यांचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे सदर अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**

दिनांक : १९-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
१) निवडनस्ती,
२) श्री.चौरे, सहाय्यक.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.**

क्रमांक : मुमाआ२०१०/९५/तक्रार क्र.१५६७

श्री. वैभव नरवडे,
अधिसभा सदस्य-मुंबई विद्यापीठ,
ए/३०१, शिवप्रेरणा सोसायटी, वीर सावरकर नगर,
साकीनाका, मुंबई -४०० ०७२. ----तक्रारदार

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (प्रबंध्र विभाग)
मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ परिसर,
महात्मा गांधी रोड,मुंबई -४०० ०३२. ----गैरतक्रारदार

---निर्णय----

**सुनावणीचा दिनांक :१८.०२.२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक ११-०१-२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे, मुंबई विद्यापीठातील अपिलीय माहिती अधिकारी श्री.कृ.व्यंकररमाणी यांच्या उध्दट व बेशिस्त वागणुकीबाबत तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीचे अवलोकन केले असता त्यामध्ये माहिती मिळाली किंवा नाही याबद्दल कोणतीही तक्रार नाही. तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी घेताना वेळी जी वागणूक दिली त्याबद्दल तक्रार केलेली आहे.

सदर तक्रारीच्या संदर्भामध्ये प्रभारी कुल सचिव यांनी आयोगाकडे खुलासा करताना तक्रारदार यांचे दिनांक २८-०३-२००९ रोजी अर्जाच्या संदर्भात दिनांक ११-०५-२००९ नुसार माहिती दिली. परंतु प्रश्न क्रमांक ४ व ५ यांची माहिती व्याप्त स्वरुपाची असल्यामुळे ती त्यांना पुरविण्यात आली नाही व त्याबाबत तक्रारदार यांचे दिनांक ०६-०६-२००९ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांना प्रश्न क्रमांक ४ व ५ बाबतचा खुलासा केला व प्रश्न क्रमांक ६ व ९ मधील माहिती बाबत स्पष्टिकरण दिले. परंतु त्यानंतर प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा तक्रारदार यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून सुद्धा विभागात येऊन माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत आदेश द्यावेत असे सुचवले. परंतु तत्पुर्वी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या सुनावणी दिनांक ०८-०१-२०१० रोजी पुन्हा ठेवण्यात आली. परंतु माहिती अधिकारी, परीक्षा नियंत्रक नागपूर विद्यापीठ परीक्षा बाबतच्या बैठकीस गेल्याने हजर राहू शकले नाहीत. श्री.नरवडे हे श्रीयुत नांगिया यांना घेऊन सदर सुनावणीस हजर झाले. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी त्याच्या अपिलाबाबत योग्य तो खुलासा करु शकले नाहीत व त्यामुळेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश क्रमांक आर.एस./९७-अ/५७, दिनांक ०४-०३-२०१० च्या आदेशानुसार माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्या दिनांक २१-१२-२००९ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांना हवी असलेली माहिती प्रबंध विभागात स्वत: येऊन उपलब्ध करुन घ्यावी असा आदेश पारित केला. तसेच आयोगापुढे खुलासा सादर करताना जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे श्री.मधुकर बाईंग हे सुनावनीला उपस्थित होते. सुनावणीला श्री.नरवडे हे उशिरा तसेच सोबत श्री. नांगिया यांना बिनापरवानगी घेऊन आल्याने अपिलीय अधिकारी यांनी आक्षेप घेतला व त्यामुळे प्रथम अपिलाचा निर्णय घेतला त्यावर तक्रारदार यांनी विनाकारण युक्तीवाद करण्यास सुरवात केली. परंतु त्यावर उगाच वाद करत व उद्धट भाषा वापरत श्री.नरवडे हे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या कक्षाबाहेर गेले असा खुलासा केलेला आहे. तक्रारदार यांनी माहिती काय मागितलेली होती याबद्दलचा माहितीचा अर्ज आयोगापुढे सादर केलेला नाही व त्यामुळे तक्रारदार यांचा प्रश्न क्रमांक ४ व ५ खुलासा, प्रश्न क्रमांक ६ व ९ बाबतचा कोणताही निर्णय आयोगास देता येत नाही व त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) तक्रार निकाली काढण्यांत येते.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १८-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१०४/अपिल क्र. ६२६१/२०१०

श्री.संतोष कचरुजी घेगडमल, ...अपिलकर्ता
३१/ई, नंदादीप एव्हरेस्ट को.ऑ.हौ.सो.
शेल कॉलनी रोड, चेंबूर,मुंबई ४०० ०७१.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ ६,
चेंबूर,मुंबई ४०० ०७१.
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
पुर्व प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष,
चेंबूर,मुंबई ४०० ०७१. ...उत्तरवादी

---निर्णय---

व्दितीय अपिलाचा दिनांक -१५/१०/२०१०

**सुनावणीचा दिनांक - १९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याकडे, दिनांक ३१-०५-२०१० रोजी, दिनांक १८-११-२००९ रोजी ४/७९ शिवजन को.हौ.सो. शेल कॉलनी, चेंबूर ह्या सदनिकेचा फ्लॅटचा फ्रन्ट ग्रील सेफ्टी डोअर तोडून उघडणे कामी नेहरु नगर पोलीस ठाण्यातून देण्यात आलेल्या आदेशबद्दल सविस्तर माहिती व प्रत आणि आदेशाची अंमजबजावणी प्रत्यक्ष हाती कटावणी घेऊ करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचा हुद्दा व नाव मिळणेस अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने दिनांक ०१-०७-२०१० रोजी टपालाद्वारे माहिती पाठविण्यात येवून ती दिनांक २१-०७-२०१० रोजी स्वीकारलेली आहे. त्यामध्ये दिनांक १८-११-२००९ रोजी फ्लॅटचा फ्रन्ट ग्रील सेफ्टी डोअर तोडून उघडणेकामी नेहरुनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.जगदाळे, दिवसपाळी पोलीस निरीक्षक चंदनशिवे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नेहरु नगर पोलीस ठाणे, अग्निशामक दल, चेंबूर येथील अधिकारी यांचे उपस्थित सदरची कारवाई करण्यात आली असून सदर घटनेबाबत यातील अपिलकार व त्यांचे कुंटुबिय यांच्या विरुद्ध फिर्यादी श्रीमती वैशाली दर्शक घेगडमल यांच्या तक्रारीवरुन गुरक ३१९/२००९ क ४५२, ३५४, ३२३, ४९८(अ), ५०६(२), ३४ भादवि अन्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा. ३४ वे न्यायालय, विक्रोळी, मुंबई येथे कोर्ट केस क्र.३०३/पीडब्ल्यू/२०१० दिनांक २६-०३-२०१० अन्वये सादर केलेले असून गुन्हा सद्या मा.न्यायालयात न्यासप्रविष्ठ आहे. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १३-०८-२०१० प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०८-०९-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलार्थी यांनी प्रत्यक्ष कटावणी कोणी हाती घेतली, ग्रील / दरवाजा तोडण्याचे आदेश / निर्णय व प्रत्यक्ष दरवाजा कोणी तोडला याबाबत नेहरुनगर पोलीस ठाण्यास माहिती उपलब्ध असल्यास अपिलार्थीस देण्यात हरकत नाही असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलार्थीने आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलार्थी यांच्या विरुद्ध जो गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे तो वास्तविक दिवाणी स्वरुपाचा भाग आहे. त्यांची सुन त्यांच्याकडे सुमारे ५ वर्षे राहत नसताना सदनिका मालकी हक्काबाबत व ताब्याचा वादाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे पोलीसांनी हा दिवाणी स्वरुपाचा वाद आहे असे असून सुद्धा त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला व पंचनाम्यामध्ये दरवाजा तोडून त्यांना अटक करण्यात आली अशी कारवाई केल्यामुळे व त्यांनी पोलीस स्टेशन कडून दरवाजा तोडण्याचाआदेश होता किंवा नाही याबद्दलीची माहिती मागितलेली आहे. तसेच दरवाजा तोडण्याकरीता जी कटावणी त्यांच्या हातात होती त्याची नावे मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे. त्यामध्ये अपिलकर्ता यांना आतापर्यंत सर्व प्रकारची माहिती कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे असे लेखी नमुद केलेले असून आरोपी क्रमांक १ ते ३ (अपिलकार) यांनी आतुन दरवाजा बंद केल्याने घटनास्थळी पोलीस अधिकारी व अग्निशामक दलाचे अधिकारी यांनी दरवाजा उघडण्याची विनंती केली असता अपिलकार यांनी बंद दरवाजातून मी वकील व जेष्ठ नागरीक असून स्वत:चे बरेवाईट करुन घेवून पोलीस आयुक्त यांचेकडे तक्रारी करुन स्थानिक पोलीसाना तसेच अग्निशामक दलाच्या अधिकाऱ्यांना खोट्या केस करण्याची धमकी दिली त्यानंतर विनंती करुनही अपिलकार यांनी दरवाजा उघडला नाही म्हणून कटावनीच्या सहयाने दरवाजा उघडून आत प्रवेश केलेला आहे व त्याबाबत अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या संदर्भामध्ये ग्रील / दरवाजा तोडण्याचा आदेश / निर्णय व प्रत्यक्ष दरवाजा कोणी तोडला याबाबतची माहिती नेहरुनगर पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर मिळून येत नाही अशी माहिती अपिलकार यांना देण्यात आलेली आहे. तोंडी युक्तीवाद करताना जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, गुन्हा दाखल झालेला असल्यास गुन्हा तपासणीचे काम फौजदारी संहिता १९७३ च्या प्रमाणे तपास अधिकाऱ्यास शक्य त्या सर्व मार्गाचा अवलंब करता येते व तसे अधिकार त्यांना प्राप्त असल्यास व त्यामुळेच दरवाजा तोडण्याचा आदेश पोलीस कार्यालयातून देण्याची आवश्यकता नसते. तरी सुद्धा पोलीस कार्यालयाने दरवाजा तोडण्याचा आदेश दिला होता काय याबाबतचा आदेश उपलब्ध असल्यास व उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे कळवावे अशाप्रकारे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**-----आदेश----**

१) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक ३१-५-२०१० रोजी चे अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पोलीस स्टेशनमधुन दरवाजा तोडण्याचे आदेश दिलेला असल्यास त्या आदेशाची प्रत व दिलेला नसल्यास "दरवाजा तोडण्याचा आदेश दिला नव्हता" अशाप्रकारे स्पष्टपणे हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांच्या आत स्पष्टपणे कळविण्यात यावा.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १९-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
१) निवडनस्ती,
२) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१२६/अपिल क्र. ६३४३/२०१०

श्री.विलास आसाराम साळवे, ...अपिलकर्ता
शिवनेरी टुडे, पोस्ट बॉक्स न.११८८२,
भांडूप (पूर्व),मुंबई ४०० ०४२.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
एल विभाग कार्यालय, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,
स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पश्चिम),मुंबई ४०० ०७०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण)
एल विभाग कार्यालय, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,
स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पश्चिम),मुंबई ४०० ०७०. ...उत्तरवादी

---निर्णय---

**व्दितीय अपिलाचा दिनांक -१५/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १७/०२/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १७-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, एल वार्ड, परिरक्षण यांच्याकडे, वार्डात काही कॉंक्रीटीकरणाचे काम झाले आहे त्याबद्दल एकून १३ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०९-०६-२०१० रोजी सहाय्यक अभियंता यांनी आपण कार्यालयात मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाची तपासणी कार्यालयीन कामकाजांदिवशी दुपारी ३ ते ५ या कार्यालयीन वेळेत करावी. तदनंतर आपल्या गरजे नुसार अभिलेखाच्या छायांकित (ए-४) प्रती योग्य त्या शुल्काचा (प्रती प्रतीस रु.२/-) भरणा केल्यानंतर दोन दिवसानंतर उपलब्ध केल्या जातील याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न करता दिनांक १०-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी निर्णय दिलेला असून आपण मागितलेली माहिती व्यापक स्वरुपातील असल्यामुळे निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली नाही. मात्र कागदपत्रांचे निरीक्षण करण्याकरीता त्यांना बोलविण्यात आले. वास्तविक त्यांनी मागितलेली माहिती ३० दिवसांत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना जी माहिती मागितलेली आहे ती अतिशय व व्यापक व विस्तृत प्रमाणात आहे. त्या बद्दलची कागदपत्रेही शेकडो आहे व त्यातील कोणती माहिती उपलब्ध करुन द्यावी याबद्दल निश्चित कागदपत्रे देता येणार नाही व त्यामुळेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २(ञ)** अन्वये **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्ये प्रमाणे त्यांना कागदपत्रांच्या निरिक्षणाकरीता व निरिक्षणा अंती छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्याकरीता कळविण्यात आले होते. छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्याकरीता अधिनियमाचे कलम ७(३) अन्वये अतिरिक्त खर्च कळविणे आवश्यक असते. परंतु निश्चित प्रती ते सांगता येत नाही. त्यामुळे त्यांना प्रती प्रत रु.२/- प्रमाणे देणे आवश्यक असतील त्या द्याव्यात. प्रती प्रत खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविले व त्यामुळे त्यांनी तशी कार्यवाही न करता प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलात त्याचप्रमाणे आदेश देण्यात आला व त्याही नंतर ते निरीक्षण न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांना सदर मागितलेली माहितीचे कागदपत्रांच्या प्रती किती होतील असे आयोगाने विचारले असता अंदाजे ५००-६०० प्रती होऊ शकतील असे त्यांनी सांगितले. परंतु निश्चित असे सांगता येणार नाही. यावरुन अपिलकर्ता यांनी माहिती नाकरलेली नाही व मुदतीत कळविलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांना अधिनियमाचे कलम ७(३) अन्वंये अतिरिक्त खर्चाचा

भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१३३/अपिल क्र. ६३८९/२०१०**

**श्री.शिवनाथ अमृत अहिरे, ...अपिलकर्ता**
**मगन धनजी चाळ, पटेलवाडी, जुना नागरदास रोड,**
**अंधेरी (पूर्व),मुंबई ४०० ०६९.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/पूर्व विभाग, आझाद रोड,**
**गुंदवली, अंधेरी (पूर्व),मुंबई ४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/पूर्व विभाग, आझाद रोड,**
**गुंदवली, अंधेरी (पूर्व),मुंबई ४०० ०६९. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -१२/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १८/०२/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण) यांच्याकडे , नवीन नागरदास छेदित मार्ग अमरतरु बिल्डींग ३ समोर असलेल्या रस्त्यावर खोदण्यात आलेल्या बोअरवेल बाबतची माहिती, माहितीचा कालावधी ०७-०४-२०१० ते २८-०६-२०१० आजपर्यंत एकूण ५ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली असून माहिती स्वतः घेऊन जाणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३०-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यावर त्यांनी दिनांक २५-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलामध्ये काही अंशी चुकीची माहिती पुरविली असे त्यांनी कारण दिले व त्या संदर्भामध्ये प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १८-०९-२०१० रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली परंतु चुकीची मिळाली. मेंटेनन्स अधिकारी अर्दळे यांनी ज्या ठिकाणी कचरा पेटी आहे व तो रस्ता डेवलपमेंट मध्ये असताना रस्त्याच्या मध्यभागी खोदण्यात आलेली अपूर्ण अवस्थेतील बोअरवेल मागणी नसताना फंड खर्च करावा व अपुर्ण अवस्थेत का आहे, बोअरवेलचे स्थानिक लोकांनी अद्यापी पाणी मिळाले नाही अथवा उपयोगात आणले नाही, आजपर्यंत बोअरवेलचे किती काम झाले? किती बाकी आहे, केव्हा पूर्ण होणार माहिती दिलेली नाही व त्यामुळेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करताना आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या वस्तीमध्ये स्थानिक रहिवाशांना पाण्याचा तुटवडा भासत असल्याकारणाने स्थानिक नगरसेवकांनी त्या वस्तीजवळ कुपनलिकेचे काम करण्यास सुचविले होते. त्याचप्रमाणे भूजल सर्वेक्षक श्री.एस.के.गुप्ता यांच्याकडून सदर वस्तीत भूजल सर्वेक्षण करुन घेण्यात आले होते व त्यांनी सुचविलेल्या ठिकाणीच कुपनलिकेचे काम सुरु करण्यात आले होते. सदर कुपनलिका कचरा पेटीपासून दूर असून ती रस्त्याच्या बाजूला आहे. सदर कामांसाठी करण्यात आलेल्या भूजल सर्वेक्षणासाठी रु.१७४५१/- इतके देयके देण्यात आले. तसेच तेथील स्थनिक रहिवाशी व जवळच्या सोसायटीतर्फे विद्युतीकरण्याचे काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे ठेकेदारास इतर कोणत्याही प्रकारचे देयके देण्यात आलेले नाही. तसेच अर्जात मागितल्या प्रमाणे माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध माहिती वरुनच त्यांनी प्रथम व द्वितीय अपिलामध्ये नवीन मुद्दा उपस्थित केलेला आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अपिल निकली काढण्यास पात्र आहे.

**-----<u>आदेश</u>-----**

१) अपिल निकाली काढण्यात येते.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १८-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
१) निवडनस्ती,
२) श्री.चौरे, सहाय्यक.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.**

क्रमांक : मुमाआ२०१०/२४१७/तक्रार
क्र.१५७०

श्री. वंसतकुमार आर. कुंभारीया,
५९/ए, न्यू खोजा चाळ, रुम नं.१५,
३ रा मजला, डॉ.डी.बी.मार्ग,मुंबई -४०० ००८. ----तक्रारदार

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
८९/९५, रजनी महल,
ताडदेव,मुंबई -४०० ०३४. ----गैरतक्रारदार

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१८.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक १७-०९-२०१० रोजी त्यांचे दिनांक २०-०१-२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे दिनांक २०-०१-२०१० रोजीच्या अर्जांच्या अनुषंगाने ८ महिने झाले तरी त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. त्याकरीता त्यांनी दिनांक ३०-०३-२०१०, १३-०५-२०१० व १७-०८-२०१० रोजी स्मरण पत्र दिलेले होते. परंतु नस्ती आढळून येत नाही. नस्ती शोधत आहोत असे उत्तर त्यांना दिले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अर्जादाराने दिनांक २०-०१-२०१० रोजी दिलेल्या माहितीचा अर्जांच्या अनुषंगाने इमारत क्रमांक ५३-५९, न्यु खोजा चाळ या इमारतीचे नस्ती निरीक्षण करणेकरीता अर्जदारास दिनांक २७-०१-२०१० रोजी पत्र दिले होते. त्यानंतर अर्जदाराने कार्यकारी अभियंता / डी-२ यांच्या कार्यालयात स्वत: येऊन सदर इमारतीची नस्ती पाहिली. अर्जदाराने वकीलातर्फे दिनांक ३०-०३-२०१० रोजी पत्र दिले. दिनांक ०९-०६-२०१० रोजी पुन्हा कार्यकारी अभियंता / डी-२ यांनी माहिती उपलब्ध करुन घेणेसाठी पत्र दिले. दिनांक २०-०७-२०१० रोजी सहाय्यक लेखाधिकारी (दक्षिण), मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांचे कडून सदर नस्ती अर्जदारास माहिती देण्यासाठी मागविली. सदर नस्ती या कार्यालयात आल्यानंतर अर्जदारास दिनांक ३१-०७-२०१० रोजी ती उपलब्ध करुन दिली व त्यातील माहिती अर्जदाराने घेतली व त्यानंतर उपमुख्य अभियंता / परिमंडळ-२ यांच्याकडे दिनांक १७-०८-२०१० रोजी अर्ज केला. त्याप्रमाणे दिनांक २५-१०-२०१० रोजी पुन्हा अर्जदारास उपलब्ध माहिती घेणेस पत्र देण्यात आले. दिनांक ०२-०२-२०१० रोजी पुन्हा पत्र दिले. तसे कार्यालयाकडून दिनांक ०३-०२-२०११ अन्वये उत्तर देण्यात आले आहे. यावरुन तक्रारदार यांना माहिती तर उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु वेळोवेळी त्यांच्या पत्रांना उत्तरे सुद्धा दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सर्व कागदपत्रे पत्रोत्तरे आयोगापुढे दाखल केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता कोणत्याही पत्रोत्तरांमध्ये नस्ती आढळून येत नाही किंवा शोध घेतात असे कळविलेले दिसून येत नाही. उलट नस्तीचे निरीक्षण करण्याकरीता यावे असे कळविलेले दिसून येते. मात्र दिनांक ०३-०२-२०११ रोजी कार्यकारी अभियंता / डी-२ यांनी दिलेल्या पत्रामध्ये, " You have already inspected this file but you are insisting copies of the letter which are not in this office file, this office is always ready to provide available information. Hence, yor are hereby informed that the available information is supplied to you by this office." यावरुन तक्रारदार यांना संपुर्ण माहिती मिळालेली असल्याने सदरची तक्रार ही निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----<u>आदेश</u>-----**

**१) तक्रार निकाली काढण्यात येते.**
**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १८-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.**

**क्रमांक : रामाआ२०१०/तक्रार क्र.१२७५**

**श्री. प्रविण दत्तात्रय तळेकर,**
**ब्लॉक नं.१, साफल्य बिल्डिंग,**
**पाडुरंगवाडी रस्ता क्र.२,**
**गोरेगाव (पुर्व),मुंबई -४०० ०६२.** **----तक्रारदार**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन),**
**आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत,**
**अब्दुल गफारखान मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा नियंत्रक, गुरे नियंत्रण यांचे कार्यलय,**
**गुरांचा बाजार, गोरेगाव (पूर्व),**
**मुंबई -४०० ०६३.** **----गैरतक्रारदार**

**---निर्णय----**

तक्रारदार यांनी अपिल क्रमांक ४७७३/०२ चे दिनांक ०७-०५-२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून नियंत्रक, गुरे नियंत्रण यांचे कार्यलय,गुरांचा बाजार जन माहिती अधिकारी

यांच्याकडे तक्रार दाखल पत्र दिलेले दिसून येते व त्यात त्याची प्रत  माहिती आयुक्त यांना दिलेले आहे. त्यामध्ये आदेश देवून देखील मला माहिती दिली नाही तसेच बरोबर कागदपत्रांच्या प्रती दिलेल्या नाही. याला आपण प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन) श्री.गायकवाड हे जबाबदार आहे असे म्हटलेले आहे. त्यामध्ये तक्रारदार यांनी सुद्धा कार्यालयात येऊन सुनावणी नको असे सांगितले. त्यामुळे सुनावणी रद्द करण्यात आलेली आहे असे दिसून येते व त्यामुळे सदर तक्रारीची सुनावणी घेण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक :२९-१२-२०१०**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**
**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१०८/अपिल क्र. ६३४७/२०१०**

**श्री.गोपीचंद काशिनाथ सानप,** **...अपिलकर्ता**
**वरळी पोलीस कॅम्प, बि.नं.२७, रुम नं.११,**
**वरळी,मुंबई ४०० ०३०.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता (सा.बां.),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई (सार्वजनिक बांधकाम) मंडळ,**
**मझेबन रोड, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक मुंबई (सा.बां.) मंडळ,**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई (सार्वजनिक बांधकाम) मंडळ,**
**मझेबन रोड, मुंबई ४०० ००१.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -१५/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १७/०२/२०११**

**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, कारकुन यु.टी.कदम यांचेविरुद्ध वरळी पोलीस कॅम्पांतील सुमारे १००० लोकांची सह्यानिशी तक्रारीबाबतचा तक्रार अर्ज मा.अधिक्षक, अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांना सादर केला होता. तरी यु.टी.कदम यांची वरळी पोलीस कॅम्प येथील सार्वजनिक बांधकाम विभाग चौकी येथुन बदली का करण्यात आलेली नाही? याबाबतची सविस्तर माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी सन १९९४ ते अद्यापपर्यत असुन माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहिती मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक मे, २०१० मध्ये प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र अपिलकर्ता यांना दिनांक १८-१०-२०१० रोजी माहिती देण्यात आलेली होती. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, यु.टी.कदम हे एकाच कार्यालयामध्ये वर्षोनुवर्षे आहे त्यांची केव्हाही बदली करीत नाहीत त्याकरीता दिनांक १२-११-२००९ रोजी १०० लोकांनी कार्यालयाकडे तक्रारी केलेल्या होत्या त्या तक्रारीची दखल घेतलेली नव्हती व त्यामुळे माहिती अधिकारात माहिती मागितली परंतु ती सुद्धा विलंबाने देण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, यु.टी.कदम यांच्या विरुद्ध दिनांक १२-११-२००९ रोजी तक्रार दाखल झाली ती तक्रार दिनांक १९-०१-२०१० रोजी कार्यकारी अभियंता, एमात्मिकृम घटक विभाग, भायखळा मुंबई यांच्याकडे चौकशी करण्यासाठी पाठविण्यात आलेली होती. सदर कार्यालयाकडून अद्यापही अहवाल प्राप्त झालेला नाही. सदरचा अहवाल प्राप्त करुन घेणेसाठी या कार्यालयाने स्मरणपत्रे पाठवून तक्रीरीचा अहवाल प्राप्त करुन घेणेसाठी प्रयत्न करणेत आला. तरी सुद्धा तक्रारीचा अहवाल अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. त्यामुळेच तक्रारीच्या संदर्भामध्ये कार्यालयात कोणतीही माहिती उपलब्ध नसल्यामुळे अपिलकर्ता यांना ती देण्यात आलेली नव्हती व स्मरणपत्रे पाठविल्यावर अहवाल प्राप्त झाल्यास अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. याकरीता पुन्हा पुन्हा स्मरणपत्रे दिली त्यामुळे माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिलेली आहे. असे असेल तर जन माहिती अधिकारी यांनी तक्रार चौकशीचा पाठपुरावा करुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत तक्रारीच्या संदर्भामध्ये पुन्हा पाठपुरावा करुन**

अहवाल उपलब्ध झाल्यास अपिलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावा.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती,

२) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४९८६४/अपिल क्र. ६९९२/२०१०

श्री.अर्जुनलाल छाब्रिया, ...अपिलकर्ता
बेले व्हिस्टा, फ्लॅट नं.१५, ३ रा मजला,
तलाव आणि एल.आय.सी.ऑफीस समोर,
एस.व्ही.रोड, बांद्रा (पश्चिम),मुंबई ४०० ०५०.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, पणन यांचे कार्यालय,
मुंबई गुहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, कलानगर,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा संचालक, पणन यांचे कार्यालय,
मुंबई गुहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, कलानगर,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक -२,
मुंबई गुहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, कलानगर,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१. ...उत्तरवादी

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२०/०९/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १७/०१/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा संचालक, पणन, म्हाडा यांच्याकडे, श्री.अक्तर अली अन्सारी यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झ ाली याबद्दलची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २०-०२-२०१० रोजी अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक ०९-११-२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती दिनांक ०८-१२-२००९ रोजी अपिलकर्तास कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून माहिती घेऊन जावी असे कळविलेले आहे. त्यानुसार दिनांक १७-०२-२०१० रोजी सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती देण्यात आलेल्या आहेत असे दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०४-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांच्या तर्फे प्राधिकृत श्री.कापसे हे हजर आहेत. अपिल दाखल केलेले सर्व कागदपत्रे यांची नस्ती व अर्ज यांचे अवलोकन केले असता अपिलकर्ता हे सुद्धा वकील आहेत व कोणती माहिती स्वत: मागत नाही तर त्यांचे पक्षकाराने केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मागत असतात तशी तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नाही. वास्तविक ते वकील असल्यामुळे ह्या बाबतचे स्पष्ट ज्ञान असणे आवश्यक आहे. अर्जाचे अवलोकन केले असता माहितीचे वर्णन योग्यरित्या न करता विनाकारण अनेक परिच्छेदामध्ये नको ते शब्द घेऊन माहिती मागण्याचा प्रयत्न त्यांचा असतो. सुनावणीस ते कधीही हजर राहत नाही व त्यांच्यातर्फे श्री.कापसे नावाचे प्रतिनिधी येतात याचा अर्थ माहिती अधिकाराचा वापर ते वकील व्यवसायाकरीता करतात असे दिसून येते म्हणजेच कोणत्याही सार्वजनिक हिता करीता ते माहिती मागत आहेत असे दिसून येत नाही. हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचा गैरवापर आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये दिनांक ०३-०५-२०१० रोजी माहिती अर्जाच्या प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यामध्ये अत्यंत मोघम स्वरुपात वर्णन केलेले आहे. निश्चित कोणाकडे तक्रार केली याबद्दल त्यांनी काहीही वर्णन केलेले नाही. ती तक्रार आहे ती म्हाडा, Hon'ble Mantralaya Ministers, Hon'ble Mantralaya Bureaucrats, Hon'ble Police Authorities and Hon'ble Housing Authorities, including M.H.A.D.A. दिनांक १७-०३-२०१० रोजी दाखल केलेल्या संदर्भामध्ये ते माहिती मागतात. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (च) व (ञ)** मध्ये **"माहिती"** व **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियत्रंणात असलेली साहित्याच्या स्वरुपात असलेले कागदपत्रे, दस्तऐवज, ज्ञापने, अभिलेखे इत्यादीचे छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे व सार्वजनिक प्राधिकारणाच्या नियत्रंणात असलेले त्या सार्वजनिक प्राधिकारणाच्या संबंधित माहिती अधिकाऱ्याकडे अधिनियमाचे कलम ५(६) प्रमाणे अर्ज करणे अपेक्षित असते. परंतु अपिलकर्ता यांनी जर तक्रारीची माहिती मागितलेली असेल तर सदर तक्रार कोणाकडे केली, कोणत्या

कार्यालयात केली त्याबद्दलचे निश्चित काही वर्णन करीत नाही व अनावश्यक असे वर्णन करत असतात व त्यांच्या अशा शेकडो अशा अर्जामध्ये अशाच प्रकारची कार्यपद्धतीचा ते अबलंब करीत असतात. त्यांचे प्रतिनिधी यांना त्यांच्या या शेकडो अर्जाच्या संदर्भामध्ये निश्चित असे कोणतीही माहिती नसते. मिळकत व्यवस्थापक यांनी आयोगापुढे दाखल केलेला खुलासा वरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांची यापूर्वी तीच माहिती मागण्या करीता अर्ज केलेले दिसून येतात व त्यानूसार त्या कार्यालयाने दिनांक १७-०२-२०१० रोजी नस्ती उपलब्ध असलेले सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती दिलेल्या आहेत व त्या प्रमाणे दिनांक २०-०२-२०१० रोजी आयोगास सुद्धा कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे सदरहू मूळ नस्ती ही मिळकत व्यवस्थापक कार्यालय यांनी संचालक पणन / मुंबई मंडळ यांना दिनांक २५-०६-२०१० रोजीच्या पत्राद्वारे पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेली आहे. अद्याप नस्ती या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही. दिनांक २०-०२-२०१० रोजी राज्य माहिती आयोग बृहन्मुंबई यांच्याकडे खुलासा केलेला आहे. श्री.ए.एम.छाब्रिया यांनी दिनांक ०९-११-२००९ च्या माहितीचा अधिकार २००५ अन्वये दिंडोशी मालाड येथील रो-हाऊस क्र. डी ४६/००४ चे गाळेधारक श्री.अन्सारी अक्तर अली अहमद यांचे सदरहू रो-हाऊस वितरणाबाबतची माहिती मागितलेली होती. या कार्यालयाने पत्र क्र. दिनांक ०८-१२-२००९ अन्वये अर्जदारास कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून माहिती घेऊन जाणेबाबत कळविले होत व त्यानुसार सदरहू नस्तीतील सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती दिनांक १७-०२-२०१० रोजी देण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या तक्रारीबाबत प्रस्तुत प्रकरण हे मिळकत व्यवस्थापक - २ यांचे तर्फे हाताळण्यात येत होते. श्री.अर्जुनलाल छाब्रिया यांनी श्री.अख्तर अली अहमद अंसारी यांच्या वितरण नस्तीतील माहिती वरुन त्यांनी बनावट कागदपत्रे सादर करुन रो-हाऊस मिळविले असल्याबाबत तक्रार असल्याने मूळ नस्ती मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्रा. यांच्या कार्यालयात सादर करण्यात आलेली आहे. अपिलकर्ता किंवा त्यांच्या प्राधिकृत व्यक्तीने प्रत्यक्ष उपस्थित राहिल्यास या कार्यालयात प्रतिनिधीसह मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्रा. यांचे कार्यालयात मूळ नस्ती पहाणीकरीता देण्यात येऊन आवश्यक ती कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येतील असे संचालक पणन मुंबई मंडळ यांनी आयोगापुढे सादर केलेले आहे. असे असेल तर अपिलकर्ता यांनी अर्जात जो तक्रारीचा संदर्भ देण्यात आलेला आहे त्या तक्रारीचे निष्कर्ष कळविणे एवढीच माहिती मागितलेली आहे. परंतु त्यांच्या अर्जाचे स्वरुप असे असते की त्यांना काय माहिती हवी आहे हे शोधुन काढण्यास बराच वेळ वाया घालवयाला लागतो व त्यामुळेच त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध होत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक १७-०३-२०१० रोजीच्या तक्रारीवर काय कार्यवाही केली ही माहिती उपलब्ध असल्यास कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र असून त्यांचे पक्षकाराने केलेला दिनांक १७-०३-२०१० रोजीच्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध असल्यास कळविण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७-०१-२०११**

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

**क्रमांक : मुमाआ२०१०/१०५/तक्रार क्र.१५६६**

**श्री. निलेश उल्हास खरात,**
**आरे मिल्क कॉलनी युनिट नं.३२,**
**गोरेगाव (पूर्व) मुंबई -४०० ००६४.** **----तक्रारदार**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी,**
**मुंबई शहर, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा वसतिगृह प्रमुख,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतीगृह,**
**बी.डी.डी.चाळ-११६, वरळी,मुंबई -४०० ०१८.** **----गैरतक्रारदार**

**---निर्णय----**

**सुनावणीचा दिनांक :१८.०२.२०११**
**तक्रारदार - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक १३-०१-२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ प्रमाणे त्यांचे दिनांक ११-०१-२०१० राजीच्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी दिनांक ११-०१-२०१० रोजी माहिती अधिकारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह, वरळी यांच्याकडे, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई शहर यांचे आदेश

क्रमांक विजिसकअ/मुंश/वसतिगृह प्रवेश रद्द/०९-१०/१९३२ दिनांक १७-१२-२००९ च्या आदेशाची झ ेरॉक्स प्रत मिळण्याबाबत माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २८-०१-२०१० रोजीच्या पत्रान्वये फी भरुन माहिती घेऊन जाण्याबद्दल कळविले परंतु त्यापूर्वीच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार गैरहजर आहेत. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई शहर तथा अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अर्जदार श्री.खरात हे शासकीय वसतीगृहाचे विद्यार्थी होते. वसतिगृहाच्या त्यांना देण्यात आलेल्या रुम मध्ये एक तरुण मुलगा व एक तरुण मुलगी हे अशोभनिय स्थितीत आढळले. या व अन्य कारणास्तव श्री. निलेश खरात यांचा वसतिगृहातील प्रवेश रद्द करण्यात आला होता. ही बाब प्रशासकीय स्वरुपाची आहे. त्यांना आदेशाची प्रत घेऊन जाण्यास कळविलेले होते. जन माहिती अधिकारी यांनी संपुर्ण आदेशाची प्रत आयोगाच्या निदर्शनास आणली व आदेश हा कारणमिमांसा देणारा आहे व त्यावरुन तक्रारदार यांनी जी माहिती मागितलेली आहे ती सार्वजनिक व्यापक हिताकरीता मागितलेली नसून स्वः हिता करीता मागितलेली आहे व विशेषः त्यांना सर्व माहिती असून सुद्धा कार्यालयास वेठीस धरण्याकरीता मागितलेली असल्यामुळे सदर तक्रार ही निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) तक्रार निकाली काढण्यात येते.**

**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १८-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०७९७/अपिल क्र. ६३५६/२०१०**

**श्री.अशोक विष्णू कणसे, ...अपिलकर्ता**
**मु.पो. सोने सांगवी, ता.केज.जि.बीड.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्या-१),**
**पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,**
**क्रॉफर्ड मार्केट समोर, डी.एन.रोड,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस उपआयुक्त (मुख्या-१),**
**पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,**
**क्रॉफर्ड मार्केट समोर, डी.एन.रोड,**
**मुंबई ४०० ००१. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -३०/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २८/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय यांच्याकडे दिनांक ०८-०३-२०१० च्या मुंबईच्या पोलीस भरती प्रक्रियेत ५% प्रकल्पग्रंस्ता व इतर प्रवर्गातील प्रकल्पंग्रंस्ताच्या मार्काच्या तपशीलाबाबत एकूण ५ मुद्दांवर माहिती मागितलेली दिसून येते. त्याकरीता त्यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी तक्रार सुध्दा दाखल केलेली आहे व तक्रारीची माहिती स्वतः सुध्दा मागितलेली दिसून येते.

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०२-०८-२०१० रोजी अर्जातील मुद्दे हे पोलीस भरती शाखा कक्ष -९, पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई या कार्यालयाशी संबंधित आहेत. नमुद कार्यालयाकरीता वेगळे माहिती अधिकारी आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात येत आहेत. परस्पर माहिती त्यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले आहे. त्याप्रमाणे दिनांक २५-०८-२०१० रोजी अर्जदारास माहितीचे शुल्क रु.१२/- चा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले. त्याप्रमाणे अर्जदाराने दिनांक १४-१०-२०१० रोजी माहितीचे शुल्क रु.१२/- चा भरणा शासकीय कोषागरात करुन पावती दाखल करुन दिनांक १८-१०-२०१० रोजी त्यांस माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तत्पूर्वी अपिलकर्ता यांनी दिनांक १६-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले होते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ३०-१०-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना दिनांक १८-१०-२०१० रोजी माहिती दिली आहे. या कारणास्तव सदरचे अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ११-११-२०१० रोजी मिळालेल्या माहितीच्या आधारावर गुणवत्तेच्या संदर्भामध्ये प्रश्न विचारुन पत्र दिलेले दिसून येते व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली. परंतु भरती प्रक्रियेमध्ये योग्य तो निर्णय घेतला गेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, भरती प्रक्रियेच्या संदर्भामध्ये जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपिलकर्ता यांना भरती प्रक्रियेतील गुणवत्तेच्या संदर्भामध्ये तक्रार माहिती अधिकारात केलेली आहे. त्याबाबत मात्र कोणत्याही प्रकारची माहिती ही जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देणे शक्य नाही. त्याकरीता अपिलकर्ता यांना मिळालेल्या माहितीच्या आधारावर त्यांचे काही तक्रार असल्यास पोलीस आयुक्त यांच्याकडे स्वतंत्रपणे तक्रार करणे संयुक्तिक राहील. माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २८-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०७९३/अपिल क्र. ६३५७/२०१०**

**श्री.प्रतापसिंह हिरासिंह चंदेल,** **...अपिलकर्ता**
**निशात, वैभव नगर,**
**जिंतूर रोड, परभणी -४३१ ४०१.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव,**
**अल्पसंख्यांक विकास विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**अल्पसंख्यांक विकास विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२५/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २८/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित..**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित**

अपिलकर्ता यांनी दिनांक १८-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रधान सचिव महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे, राजपूत भामटा जात प्रमाणप्रत्राबाबत माहिती मागितल्याचे दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २३-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अल्पसंख्याक विकास विभाग यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहिती मिळणेबाबत केलेल्या अर्जाची प्रत त्यांच्या विभागाकडे प्राप्त झाल्याचे कार्यालयीन अभिलेखावरुन आढळून येत नाही. या संदर्भात अनौपचारिकरित्या माहिती घेतली असता श्री.चंदेल यांनी केलेला अर्ज मुख्य सचिव कार्यालयाकडून प्रधान सचिव (अल्पसंख्याक विकास विभाग) यांचेकडे दिनांक ०५-०२-२०१० रोजी प्राप्त झाल्याचे तसेच प्रधान सचिव (अल्पसंख्याक विकास विभाग) यांचेकडून परस्पर कक्ष अधिकारी (का.६), सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे दिनांक २२-०३-२०१० रोजी पाठविण्यात आल्याचे DJMS ''सहज'' या संगणक प्रणालीवरील नोंदीवरुन आढळून येते. यावरुन श्री.चंदेल यांचा अर्ज जन माहिती अधिकारी अथवा अपिलीय अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग यांचेकडे प्राप्त झालेला नाही. तसेही ''राजपूत, भामटा'' जात प्रमाणपत्राबाबत आयोगाच्या कार्यालयाकडून आलेल्या सहपत्राचे अवलोकन केले असता माहिती मागितल्याचे दिसून येते. तसेच याबाबतीत राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांनी अपिल फेटाळल्याचे त्यांच्या अर्जावरुन सकृतदर्शनी दिसून येते व त्यांचे ''राजपूत, भामटा'' जातप्रमाणप्रत्र देण्याचा विषय अल्पसंख्याक विकास विभागाशी संबंधित नाही. असे असल्यास सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २८-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०८००/अपिल क्र. ६३५८/२०१०**

**श्री.हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, ...अपिलकर्ता**
**निशात, वैभव नगर,**
**जिंतूर रोड, परभणी -४३१ ४०१.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय,**
**लातूर.**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय,**
**लातूर. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -०५/१२/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २८/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक २४-०९-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्याकडे, सेवा निवृत्ती दिनांक २८-०२-१९९९ ला अर्जदार विशेष भूसंपादन अधिकारी स्वर्णा प्रकल्प, लातूर यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रलंबित किंवा प्रस्तावित असल्यास कळवावे, माहितीचा कालावधी मे १९९५ ते फेब्रुवारी, १९९९ पासून अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे U.P.C. ने घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ३०-०९-२०१० रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये एकूण १ ते १०४, १ ते ४१४ व १ ते ९९४ पृष्ठ असलेल्या संचिका पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. त्याची पहाणी करावी व आवश्यक कागदपत्राची प्रतिपेज रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा

असे कळविलेले दिसून येते. त्यावर अर्जदाराने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देत नाही व इतर माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता खर्चाचा भरणा करावयास सांगुन माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली आहे असा आक्षेप दिलेला दिसून येतो व त्यामुळे दिनांक १६-१०-२०१० रोजी प्रथम अपिल दाखले केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा विभागीय चोकशी कोणकोणत्या कागदपत्राच्या आधारे प्रस्तावित केली किंवा कोणत्या बाबीच्या आधारे प्रस्तावित केली याविषयीचे कागदपत्र पाहिजे असे दिसून येते व त्यामुळे विहित फी आकारुन पुरवावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर असलेतरी त्यांनी द्वितीय अपिल मेमोमध्ये अर्जदाराने अपिलात दिनांक २८-०२-१९९९ रोजी सेवा निवृत्त झाले आहे. त्याचे सेवा निवृत्तीनंतर दिड वर्षाने जिल्हाधिकारी लातूरने अर्जदाराविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी पत्र दिनांक १३-११-२००० रोजी प्रस्ताव विभागीय आयुक्त विभाग, औरंगाबाद मार्फत राज्य शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबईकडे मंजूरीसाठी सादर केला. महालेखापाल नागपूर कार्यालयाला या दोन्ही कार्यालयाने वारंवार कळविले आहे की, श्री.चंदेल यांचे सेवानिवृत्तीच्या दिनांकास २८-०२-१९९९ ला त्याचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित होती व त्यामुळे त्यांनी अशी माहिती मागितलेली होती. परंतु त्यांना नको असलेले नस्तीचे निरीक्षण करण्यास कळविण्यात आले होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी संदर्भामध्ये **ना चौकशी प्रमाणपत्र** श्री. राजीव जलोटा, जिल्हाधिकारी, लातूर यांनी दिनांक २७-११-२००१ रोजी दिलेले होते व त्यामुळे त्यांचे सर्व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आलेले होते. परंतु अपिलकर्ता यांना दिनांक ३०-०९-२०१० च्या पत्रावर घेतलेला आक्षेप स्वंयस्पष्ट आहे व त्यांनी दिनांक २२-०२-१९९९ रोजी त्यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्थावित नाही ही वस्तुस्थिती पत्राद्वारे मागणी केलेली असल्यामुळे मर्यादित पर्यंत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्या करीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या माहिती अर्जात मागितलेल्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २८-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**

**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०३५४/अपिल क्र. ६४८८/२०१०**

**श्री.गजानन विष्णू राणे, ...अपिलकर्ता**
**१/१०१, कृष्णा विहार, सी.एच.एस.लि.,**
**डॉ.एस.एस.राव रोड,**
**लालबाग, मुंबई ४०० ०१२.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**(बी.पी.), ई वार्ड, मुन्सिपल कार्यालय इमारत,**
**३ रा मजला, शेख हाफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**(बीपी), ई वार्ड, मुन्सिपल कार्यालय इमारत,**
**३ रा मजला, शेख हाफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई ४०० ००८.**
**...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -०८/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक २९-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), सिटी -III, 'ई' वार्ड यांच्याकडे, "Cancellation of assessment bearing property ward No. FS/1043/(3A).233J, A/C No.03-0105-004 C.S.12/50 (Part) of Parel-Sewri Division due Plan approved by EBBP (City-

III) U/No.RB/8454/8455 dated 12-10-2001.” या संदर्भामध्ये त्यांनी एकूण ४ मुद्दांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. दिनांक २८-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये नस्तीचे निरीक्षण करावे व प्रक्रियेची फी भरावी व फी दर कळविण्यात आलेला दिसून येतो. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०५-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २५-०८-२०१० रोजी देण्यात आलेला आहे. परंतु त्यानंतरही कार्यकारी अभियंता यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही व माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ई वॉर्ड, तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता यांना आयोगाने दिनांक २२-०२-२०११ रोजी आज दिनांक २९-०३-२०११ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याकरीता नोटीस काढण्यात आलेली होती. अपिलकर्ता यांना नोटीस मिळाली परंतु उप मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता आज सुनावणीस हजर झाले नाही व हजर न राहण्याकरीता कोणत्याही प्रकारचे कारण सुद्धा पाठविलेले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी व उप मुख्य अभियंता यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपिलकर्ता यांचे कागदपत्राचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांची मालमत्तेच्या संदर्भामध्ये महानगरपालिकेने मालमत्तेचे मालक न विचारताच सदर मालमत्ते संदर्भामध्ये कार्यवाही केलेली दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी माहिती मागितलेली दिसून येते.

अपिलकर्ता हजर आहेत. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे मालकीची चाळ त्यांना न विचारता महानगरपालिकेने पाडून टाकली व त्यांची समंती न घेता त्या जागेवर SPIO वापरुन नवीन इमारत उभी केले व त्याबाबत कोणत्याही प्रकारचे नंतर त्यांनी कराच्याबाबत देयके पाठविण्यात आलेली नाही. मात्र त्यांच्या मालमत्ते संदर्भामध्ये कराचा भरणा झालेला आहे असे त्यांना माहिती मिळाली. दिनांक १० जुलै २००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामध्ये त्यांनी ११ मालमत्ता एकत्रित केल्यास एकच इमारत तयार केली त्याची संपुर्ण माहिती मागितलेली होती. पुन्हा माहिती देण्याची टाळाटाळ सर्व अधिकारी व वरिष्ठांनी केलेली आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या विरुद्ध शास्ती लादण्यात यावी अशी विनंती त्यांनी केलेली आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव) यांना हा निर्णय मिळाल्यापासून मागितलेली माहिती १० दिवसांच्या आत कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपामध्ये विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता हे शास्तीस पात्र राहील यांची नोंद घ्यावी.**

**अपिलकर्ता यांचे दिनांक २९-०६-२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुद्ध अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रु.२५०००/-**

ची शास्ती का लादण्यांत येवू नये याबद्दलचा खुलासा राज्य माहिती आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत समक्ष करावा. तसे न केल्यास सदर शास्ती कायम करण्यात येईल व ती त्यांच्या दर महाच्या वेतनातून वसूल करण्याचा आदेश देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा निर्णय देताना **"Furnish the documents desired by the Appellant."** असा आदेश दिलेला आहे व माहिती देण्यात आलेली नाही. याबद्दलचा कोणत्याही प्रकारचे विवेचन व कारणमिमांसा निर्णयात दिलेला नाही.

सदर निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगरपालिका यांना स्वतंत्रपणे पोस्टाने माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २९-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०३५३/अपिल क्र. ६४८७/२०१०**

**श्री.गजानन विष्णू राणे,** **...अपिलकर्ता**
**१/१०१, कृष्णा विहार, सी.एच.एस.लि.,**
**डॉ.एस.एस.राव रोड,**
**लालबाग, मुंबई ४०० ०१२.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय,**
**एफ/साऊथ, दुसरा माळा,**
**डॉ.बी.ए.रोड,**
**परेल, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक,**
**सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय,**
**एफ/साऊथ, दुसरा माळा,**
**डॉ.बी.ए.रोड,**
**परेल, मुंबई ४०० ०१२.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -०८/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ११-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा करनिर्धारक, एफ/दक्षिण वॉर्ड, ऑफीसर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) Please supply to me copy of T.W.R. No. 207/2009-2010 with effect from 01.01.2010 and the grounds on which assessment of the property

bearing Ward No. FS/1043 (3A), 2335, A/C No. 03-0105-004 has been restored.

2) Please supply to me copy of the Tabulated Ward Report for the fortnight ended 01-04-2010 in Form No.13 showing the particulars of the proposal.

3) I had paid the assessment taxes of the property bearing Ward No.FS/1043(3A), 233J, A/C no. 03-0105-004 upto 1983 and the last Assessment was paid vide Receipt No.044764 dated 26th Feb.1983. I did not receive the Assessment Taxes Bills from the Corporation form 31st June, 2001 and therefore, I could not pay the said taxes from the year 1984 till 2010. You have by your letter dated 17th May, 2010 informed me that the outstanding Property taxes from the year 2001-2002 to 31st March, 2010 are amounting to Rs.10,367/- however, you have not inform the outstanding property taxes for the period from 1984 to 2001.
4) Therefore, please inform me what are the outstanding property taxes for the period 1984 to 2001? If the taxes are paid, please inform me the name and address of the person who has paid the taxes and also explain how the said taxes were accepted by the Corporation from third party.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०६-०७-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २१-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १८-०८-२०१० रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध झाली आहे या कारणास्तव सदरचे अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या मालमत्तेच्या संदर्भामध्ये त्यांची समंती नाही. समंती शिवाय पाडून टाकण्यात आली. त्यानंतर एकच मालमत्तेबरोबर एकूण १२ मालमत्ता पाडून टाकण्यात आल्या व त्या एकत्रित करुन त्या मालमत्तेची SPIO वापरुन नवीन इमारत तयार केली. पुर्वी त्यांनी कर भरणा केलेला आहे. सन १९८३ त्यांनी कर भरणा केलेला आहे व त्यामुळे सन १९८३ पासून सन २०१० पर्यंत त्यांनी कर भरणा केलेल्या पावत्यांचे छायांकित प्रती तसेच त्यांना जी देयके पाठविण्यात आली त्या देयकाचे प्रती हे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु त्यांना देयके पाठवली, ती कोणत्या पत्त्यावर पाठविली याबाबतचे कोणतेही उत्तर माहिती अधिकारी देण्यास तयार नाही. अधिकारी प्रत्यक्ष माहिती दाखवत नाही ती लिहुन देतात व ती तशी दिशाभूल करणारी असते किंवा संपुर्ण छायांकित प्रती टिपण्या सहित उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करतात. यावरुनच जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती लपवली आहे असे स्पष्ट दिसून येते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी

आयोगापुढे असे सांगितले की, सन १९८४ पासूनची देयके व कर भरणा केल्याच्या पावत्या आहेत. परंतु अपिलकर्ता यांची मालमत्ता ही पाडून टाकल्यानंतर त्या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचे देयके अपिलकर्ता यांना पाठविण्यात आलेले नाही. परंतु नवीन इमारत उभी राहिल्यानंतर त्या संदर्भात पुन्हा कराचा भरणा झालेला आहे. त्या कराचा भरणा कोणी केलेला आहे हे मात्र सांगता येत नाही व तसे अपिलकर्ता यांना कळविलेले आहे. असे असले तरी कराचा भरणा जर केलेला आहे तर देयके ही निश्चितपणे कोणाला तरी पावत्या मिळाले दिसून येते व त्या शिवाय कराचा भरणा केला जाणार आहे व त्यांना देयके पाठविण्यात आले आहे त्या देयकाच्या छायांकित प्रती ही अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**-----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांचे दिनांक ११-०६-२०१० रोजीच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती लिहून न देता किंवा तयार करुन न देता संपुर्ण सन १९८४ पासूनची देयके व देयकाचा भरणा केलेल्या पावत्या यांच्या सर्व छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने व इतर मुद्दांची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे रु.२५०००/- शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२) सदर निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे पुढील अवलोकन व कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २९-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०३५१/अपिल क्र. ६४८५/२०१०**

**श्रीमती अर्चना श्रीवास्तव,** **...अपिलकर्ता**
**६९, न्यू मळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,**
**खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**जी/उत्तर विभाग कार्यालय,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जलकामे),**
**जी/उत्तर विभाग कार्यालय,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - निरंक**
**सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १०-०२-२०१० रोजी, राजीव गांधी नगर झोपडपट्टी धारावी बस डेपो के सामने झोपडपट्टी में जी राजाराम नामक व्यक्ति को मनपा अधिनियम के अनुसार नल कनेक्शन दिये गये है क्या यदी नल कनेक्शन दिये गये तो इन नल कनेक्शन कि मनपा अभिलेखानुसार जानकारी एवं दस्तावेजो कि नकल प्रती दे | यदि अवैध चोरी का नल कनेक्शन यहां जोडा गया है तो अवैध नल कनेक्शन के संबंध में शासन अध्यादेशानुसार क्या कारवाई कि गयी उसका अहवाल एवं

दस्तावेजो कि नकल प्रती दें | अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १९-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती नूसार ती राजाराम या व्यक्तिस कुठल्याही प्रकार जलजोडणी दिलेली नाही. तरी येथे असे नमुद करण्यात येते की, राजीव गांधी नगर येथे दिनांक १५-०३-२०१० रोजी अनधिकृत जलजोडण्या निष्कांसित करण्यात आल्या. सदरच्या माहिती मुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १०-०८-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना माहिती दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे. परंतु अपिलकर्ता यांनी निश्चित राजाराम व्यक्तीचा पत्ता व इतर तपशील जन माहिती अधिकारी यांनी अवगत करुन घेतला व त्यानूसार योग्य ती कार्यवाही केली जाईल असे सांगितले. त्याप्रमाणे कार्यवाही केली व अपिलकर्ता यांना माहिती सुद्धा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांनी त्याची पोच सुद्धा दिलेली आहे. अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिलावर कोणतीही तारीख न टाकता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-११-२०१० रोजी द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. वास्तविक दिनांक २८-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे. तसेच पूर्वी सुद्धा त्यांना माहिती विहित मुदतीत करुन दिलेली दिसून येते. राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून अपिलकर्ता यांचा ६९, न्यू मळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२ या पत्त्यावर नोटीस काढण्यात आलेली होती. परंतु त्यांची नोटीस ही परत आलेली आहे. अपिलकर्ता श्रीमती अर्चना श्रीवास्तव यांनी सदरच्या अपिलामध्ये गुलाम वारिश शेख (पत्रकार) यांच्या सोबत द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. दोघांचा पत्ता ६९, न्यू मळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२ असा दिलेला आहे. त्या दोघांचे आज कार्यालयामध्ये अपिल क्रमांक ६४८३/०२ व ६४८४/०२ झोपुप्र. म्हाडा मंडळ यांचे दोन्ही अपिले सुनावणीस होती. त्या अपिलामध्ये सुद्धा अपिलकर्ता यांनी माहितीचा अर्ज जोडपत्र-अ मध्ये, प्रथम अपिल जोडपत्र-ब मध्ये, ६९, न्यू मळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२ असा पत्ता दिलेला आहे. द्वितीय अपिल दाखल झालेले आहे त्यामध्ये रुम नं. २, घनश्यामदास की चाळ, संत रोहीदास मार्ग, कालाकिल्ला, धारावी, मुंबई ४०० ०१७ असा पत्ता दिलेला आहे. वरील दोन्ही अपिलावर त्यांना आयोगाची नोटीस मिळालेली आहे. परंतु सदरचे अपिल क्रमांक ६२८५/०२ मध्ये आयोगाने पाठविलेली नोटीस ही परत आलेली आहे. असे असेल तर अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती मध्ये माहिती मागण्या पेक्षा त्यांना कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते व त्यामुळेच त्यांनी महानगरपालिकेकडून तशी कार्यवाही करुन घेतली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

-----<u>आदेश</u>-----

**अपिल निकाली काढण्यात येते.**
**अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २९-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,

१) निवडनस्ती,
२) श्री.चौरे, सहाय्यक.

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/अपिल क्र. ६४९२/२०१०**

**श्री.मुकेश धिरजलाल कोठारी, ...अपिलकर्ता**
**१०४, ओम महावीर अपार्टमेंट को.ऑ.हौ.सो.लि.,**
**मामलेदार वाडी, रोड नं.३,**
**मालाड (पश्चिम), मुंबई ४०० ०६४.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक महानगरपालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई मनपा, आर/सेंट्रल वॉर्ड,**
**२ रा मजला, म्युनिसिपल मार्केट इमारत, एस.व्ही.रोड,**
**बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी (आरोग्य),**
**बृहन्मुंबई मनपा, आर/सेंट्रल वॉर्ड,**
**२ रा मजला, म्युनिसिपल मार्केट इमारत, एस.व्ही.रोड,**
**बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १२-११-२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ३०-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, बृहन्मुंबई मनपा कार्यालय, आर-मध्य विभाग, ३ रा मजला, बोरीवली (पश्चिम), मुंबई यांच्याकडे, 1) The application for Birth Certificate was filed on 14-06-2010. 2) The date if Birth 5th June, 1957 at Kandivali (West), Mumbai 400 067. 3) The Name of the Hospital Radhabai G.Dalvi Hospital, Dr.Dalvi Road, Kandivali (W) Mumbai 400 067. 4) The Birth Certificate not yet receive. 5) The Status Co.

of Application for Birth Certificate. 6) Time Period 15 days. अशी माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १३-०८-२०१० रोजी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी आपण माहितीच्या अधिकाराखाली मुकेश धिरजलाल कोठारी यांच्या जन्मदाखला प्राप्तीसाठी केलेला अर्ज या कार्यालयात दिनांक ३०-०७-२०१० रोजी प्राप्त झालेला आहे. आर/मध्य विभाग १९५८ साली स्थापन करण्यात आला आहे. आपण अर्जामध्ये नमूद केलेल्या तारखेप्रमाणे पाहणी म्हणजेच ५ जून, १९५७ सालची पाहणी केली असता जन्म नोंदणी रजिस्टरमध्ये सदरहू जन्माची नोंद अस्तिवात नाही असे त्यांनी कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक २१-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. जन्म तारीख दाखला हा मुलाच्या महाविद्यालयीन प्रवेशाकरीता domicile certificate काढण्याकरीता हवे आहे असे त्यांनी नमूद केलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १८-०९-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली असल्यामुळे सदरची अपिल हे निकाली काढण्यात आलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांच्याकडे जन्माच्या संदर्भामध्ये पुरावे आहे व ते त्यांना दाखवून सुद्धा माहिती अधिकारात जन्माचा दाखला वितरीत करीत नाहीत त्यामुळेच सदरची माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जन्माच्या संदर्भामध्ये जे पुरावे दिलेले आहेत ते दिनांक ०५-०६-१९५७ रोजीचे आहेत. जन्म नोंदणी रजिस्टर तपासले असता त्यामध्ये नोद आढळून येत नाही. माहितीच्या अधिकारामध्ये कोणतीही कार्यवाही करुन माहिती मिळत नाही. त्यांनी मूळ जन्म तारखेचे प्रमाणप्रत्र तयार करुन द्यावे अशी जी मागणी केलेली आहे ती मागणी मान्य करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २(च)** प्रमाणे **"माहिती"** याचा अर्थ **सार्वजनिक प्राधिकरणात** साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज, शासन निर्णय या स्वरुपाची माहिती उपलब्ध आहे त्यांचे निरिक्षण करुन व छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. अपिलकर्ता यांनी दिनांक ०५-०६-१९५७ सालच्या जन्म नोंदणी रजिस्टर संदर्भामध्ये छायांकित प्रती उपलब्ध असतील परंतु सदरची नोंद आढळून येत नसल्यामुळे छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे शक्य नाही. मात्र अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे जन्म तारीखेप्रमाणे पत्र उपलब्ध करुन देता येत नाही किंवा हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नसल्यामुळे राज्य माहिती आयोगास जन्म तारीख दाखलाप्रमाणे पत्र उपलब्ध करुन द्यावे असा आदेश देता येणार नाही. मात्र स्वतंत्रपणे (माहिती अधिकारात नाही) जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील सक्षम अधिकारी यांनी त्यावर त्या नियमाप्रमाणे निर्णय देणे योग्य राहील. त्यामुळे त्यांची मागणी मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपिल अमान्य करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**अपिल अमान्य करण्यात येते.**
**अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २९-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**
**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र/ ५०३५५/अपिल क्र. ६४८९/२०१०**

**श्री.अर्जुनलाल एम. छाब्रिया, ...अपिलकर्ता**
**बेले व्हिस्टा, फ्लॅट नं.१५, ३ रा मजला,**
**तलाव आणि एल.आय.सी.ऑफीस समोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (पश्चिम),मुंबई ४०० ०५०.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त परिमंडळ -३,**
**मध्य नियंत्रण कक्ष,**
**बावला कंपाऊंड,**
**भायखळा, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष,**
**बावला कंपाऊंड,**
**भायखळा, मुंबई. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १०-११-२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांचे पक्षकार (अपिलकर्ता हे वकील आहेत मात्र वकीलाच्या तर्फे पक्षकाराने दिलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मागणे हा त्यांचा व्यवसाय आहे.) श्री. अशोक शिवाजी खांडेकर यांनी मंत्री महोदय Hon’ble Mantralaya, Hon’ble Bureacrats, Hon’ble Police Bureacrats

and Polic Administration यांचे दिनांक १०-०५-२०१० रोजी व अन्य अधिकाऱ्यांकडे दिनांक १८-०५-२०१० रोजी श्रीमती तहसीन अनीस वाघू आणि A.P.I. नाईकवाडे डोंगरी पोलीस स्टेशन यांच्या विरुद्ध दिलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली याबद्दलची एकूण १४ मुद्दांमध्ये वर्णन करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २७-०८-२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदर माहिती मुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०४-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल त्याच पद्धतीने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१-१०-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना माहिती दिनांक २८-०९-२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. नेहमी प्रमाणे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता हे नेहमी प्रमाणे गैरहजर आहेत. त्यांच्या तर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री.कापसे हजर आहेत. यावरुन अपिलकर्ता यांचा पक्षकारातर्फे माहिती मागण्याचा व्यवसाय दिसून येतो. अपिलकर्ता माहितीचा अर्ज करताना त्यात एकच मुद्दा हा वेगवेगळ्या पद्धतीने व कारणमिमांसा विचारुन १५-१६ मुद्यांमध्ये मागताना विचारतात. प्रथम अपिलात त्याच पद्धतीने निरर्थक असे १५-१६ परिच्छेद देतात व द्वितीय अपिलात सुद्धा १५-१६ निरर्थक परिच्छेद देत असतात या वरुन वकील असून सुद्धा त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे तरतुदी प्रमाणे माहितीची मागणी कशा पद्धतीने करावी याचे सुद्धा ज्ञान दिसून येत नाही किंवा जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी किंवा राज्य माहिती आयोगास दिशाभूल करण्याकरीता किंवा संभ्रमात टाकण्याकरीता विद्वत्तापूर्वक अपिल दाखल केला आहे हे दाखविण्याकरीता ते अशा प्रकारचे अर्ज करत आहे असे आयोगाचे मत इ ालेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचे सर्व पक्षकार मंत्रालयापासून सर्वच कार्यालयामध्ये एकच तक्रार दाखल करत असतात त्यामुळे त्या सर्व तक्रारीच्या संदर्भात प्रक्रिया करताना शासन यंत्रणेचा पुर्ण वेळ खर्ची पडतो व अशा अर्जांचे अर्जदारामुळे त्यांना खरोखर त्यांचे काम व्हावयाचे आहे अशा नागरीकांचे काम होत नाही कारण निरर्थक अर्जाची सुद्धा प्रक्रिया ही कोणत्याही अधिकाऱ्याला कोणत्याही कार्यालयात करावीच लागते. असे असले तरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे आयोगापुढे त्यांनी सांगितले. आयोगापुढे सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपिल निकली काढण्यास पात्र आहे.

-----आदेश-----

**अपिल निकाली काढण्यात येते.**
**अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २९-०३-२०११**

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,

१) निवडनस्ती,
२) श्री.चौरे, सहाय्यक.

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र/ ५०३५६/अपिल क्र. ६४९०/२०१०**

**श्री.सी.पी.सिंग, ...अपिलकर्ता**
**०२, क्लासिक पॉवर रेसिडन्सी,**
**टी.पी.एस.-४, सबवे रोड नं.२,**
**सांताक्रुझ (पश्चिम),मुंबई ४०० ०५४.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विधी सल्लागार (झो.पु.प्रा.),**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**प्रशासकीय इमारत, अनंत कानेकर मार्ग,**
**बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति /निष्का),**
**अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का)**
**पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,**
**बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १६-११-२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०२-०३-२००९ रोजी जन माहिती अधिकारी SRA बांद्रा (पूर्व) यांच्याकडे, मुद्दा क्र. A व C मध्ये, फाईनल प्लॉट नं.१०६, मौजे- विलेपार्ले, ता.अंधेरी, खोतवाडी, भिमवाडा, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई या संदर्भामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच मा.मुंबई उच्च न्यायालय या सदंर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १७-०३-२००९ रोजी राज्य जन माहिती अधिकारी श्री. वाकोडे यांनी मागितलेली माहिती विधी सल्लागार, अभियांत्रिकी विभाग, अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी पश्चिम उपनगरे यांच्या विभागाशी संबंधित असल्याने आपला अर्ज संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येत आहे. तसेच मुद्दा G हा महानगरपालिकेशी संबंधित असल्याने आपण सदर बाबत संबंधित सहाय्यक महापालिका आयुक्त यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे कळविलेले

दिसून येते. परंतु त्यानंतर दिनांक ०२-०४-२००९ रोजी जन माहिती अधिकारी झोपडट्टी पुनर्वसन प्राधिकारी श्रीमती नलिनी साठे यांनी अपिलकर्ता यांना सदर अर्जातील माहितीच्या मुद्दांची छाननी केली असता असे आढळुन आले आहे की, मुद्दा क्र. A व C मध्ये मागणी केलेली सदरची माहिती ही अभिप्राय प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. ही माहिती, माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील **कलम २ (च)** मध्ये समाविष्ट नसल्यामुळे, जे प्रश्न विचारलेले आहेत ते माहिती अधिकाराच्या **"माहिती"** या संज्ञेत बसत नसल्यामुळे आपणास माहिती पुरविता येत नाही. सबब आपला संदर्भाधिन अर्ज निकाली काढणेत येत आहे. परंतु ३० दिवस पुर्ण होण्यापुर्वीच दिनांक ३०-०३-२००९ रोजी प्रथम अपिल प्रथम अपिलीय अधिकारी SRA यांच्याकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. मात्र अपिलावर निर्णय घेण्यासाठी अनेक नोटीस काढलेल्या दिसून येतात. तसेच दूरध्वनी वरुन त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु ते हजर राहिले नसल्यामुळे प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी श्रीमती नलिनी आ. साठे यांनी तोंडी युक्तीवाद केला व त्यामध्ये अपिलकर्ता यांनी जो तक्रारीचा अर्ज केलेला आहे त्या अर्जामध्ये जे मुद्दे उपस्थित केलेले आहे ते सुरवातीला श्री. वाकोडे यांनी वेगवेगळया विभागाकडे हस्तांतरीत केलेला होता. महानगरपालिके संदर्भामध्ये सुद्धा काही मुद्दे होते. त्यामुळे महानगरपालिकेकडे सदरचा अर्ज हस्तांतरीत केला होता. त्यामध्ये मुद्दा क्रमांक A व C च्या माहिती देण्याच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांचे बहुतांश मुद्दे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांचे सदर प्रकरणातील गुणवत्तेच्या निष्कर्ष बाबत अभिप्राय मागितलेला आहे. कागदपत्रांच्या स्वरुपात त्यांनी कोणतीही माहिती मागितलेली नाही व त्यामुळेच त्यांनी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (च)** मध्ये त्यांनी मागितलेली माहितीचा समावेश होत नाही असे त्यांनी कळविलेले दिसते व त्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज हस्तांतरीत झाला आहे त्या संदर्भामध्ये विधी सल्लागार तथा अपिलीय अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी आयोगापुढे खुलासा खालीलप्रमाणे दिलेला आहे.

१) दिनांक ०२-०४-२००९ रोजी श्री.व्ही.डी.वाकोडे, नायब तहसिलदार, तथा राज्य जन माहिती अधिकारी, झोपुप्रा यांचे कडून अपिलकार श्री.सी.पी.सिंग यांचा शासकीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत या (विधी विभाग) झोपुप्रा यांचे कडे प्राप्त झाला. सदर पत्राची प्रत सुलभ संदर्भासाठी सोबत जोडली आहे. सदर पत्रामध्ये अपिलकार श्री.सी.पी.सिंग यांनी मुद्दा क्र.३(a) व (c) मध्ये मागणी केलेली माहिती विधी विभाग, झोपुप्रा यांचेशी संबंधित होती.

२) सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विधी सल्लागार झोपुप्रा यांनी त्यांचे पत्र क्र. झोपुप्रा/ कार्या-२/ टे-२/ विस/ शामाअ/ १२अ/ २००९ दिनांक ०२-०४-२००९ अन्वये उत्तर दिले. (सदर अर्जामधील मुद्दा क्र. ३(a) व (c) मध्ये मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे दिसून आले.) व सदर अर्ज शासकीय माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील **कलम २(च)** मध्ये माहितीच्या संज्ञेत बसत नसल्यामुळे सदर अर्ज मुद्दा क्र.३(a) व (c) चे बाबत निकाली काढला. मूळ अर्जातील इतर मुद्दे विधी विभागाशी संबंधित नव्हते.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, शासकीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, नियत्रंक (अती/निष्का.), बृहन्मुंबई यांनी सहाय्यक आयुक्त, महानगरपालिका के-पूर्व विभाग यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे तसेच खोतवाडी, भिमवाडा ही जमीन बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे मालकीची असल्याने माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते व त्या पत्राची प्रत अपिलकर्ता यांना दिलेली आहे. तसेच पुन्हा उप जिल्हाधिकारी (अती/निष्का.) व स.प्रा.बांद्रा यांनी सुद्धा सदर माहिती संबंधित कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अर्ज हस्तांतरीत केलेला आहे. झोपडपट्टी प्राधिकारी यांनी दिनांक २३-०३-२००९ रोजी अपिलकर्ता यांना नस्तीचे निरीक्षणासाठी उपस्थित व्हावे असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपिलकर्ता हे सुद्धा वकील आहेत असे कागदपत्रांवरुन दिसून येत असले तरी त्यांना माहिती अधिकारामध्ये जी माहिती मागितलेली आहे ती अनेक कार्यालयाशी संबंधित अशी माहिती एकाच अर्जात मागितलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय सुद्धा त्यांनी मागितलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(च) प्रमाणे **"माहिती"** याचा अर्थ **सार्वजनिक प्राधिकरणात** साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज, शासन निर्णय, परिपत्रके इत्यादी स्वरुपात माहिती उपलब्ध असते त्यांचे निरिक्षण करुन व छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे तसेच अधिनियमाचे **कलम ५(१)** प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये तसेच उप कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे व सदरची माहिती ही **कलम ७(१)** प्रमाणे ३० दिवसांत उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. यावरुन ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये अनेक विषयांच्या संदर्भामध्ये जी माहिती मागितलेली आहे त्यामुळेच माहिती ३० दिवसांमध्ये उपलब्ध करून देणे शक्य नाही. प्रत्येक अधिकाऱ्यांस सदरचा अर्ज हा हस्तांतरीत करुन ह्या प्रक्रियमध्ये वेळ खर्ची घालवायला लागतो व हस्तांतरित झाल्यानंतरसुध्दा त्या अर्जास वेळेत माहिती मिळेलच याबद्यल खात्री देता येत नाही. त्यामुळे माहितीच्या कार्यालयात असेल त्याच कार्यालयाचे संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करणे अपेक्षित असते व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

-----<u>आदेश</u>-----

अपिल निकाली काढण्यात येते.
अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २९-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती,
२) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र/३९३४८/अपिल क्र. २७७८/२०१०

श्री.विहार शिवाजीराव दुर्वे, ...अपिलकर्ता
५७३/१, पवन विहार, साई पंपाजवळ,

**जे.एम. रोड, पुणे ४११ ००४.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव कार्य-९**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव कार्य-९**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १२/०३/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १७/०२/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १५-११-२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे, 1) Inform and furnish me property declarations all details submitted by all the State Information Commissioners. 2) Inform and furnish me all details of property declarations submitted by Election Commissioner. 3) Furnish me all the relevant details in the subject matters. The period to which the information relates 1959 to 15-11-2008. तसेच माझ्या अर्जावर कोणत्या प्रकारची कार्यवाही झाली व कोणत्या अधिकाऱ्यांकडे ते सादर झाले तसेच संबंधित अधिकाऱ्यांची नावे त्या सदर अर्जाच्या संदर्भातील टिपणी अशा प्रकारचा अर्जाच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी किती कालावधी आहे, ज्या अधिकाऱ्यांने विलंब केला असेल त्या अधिकाऱ्यांविरुद्ध काय कार्यवाही केली व ७ दिवसांचा कालावधी अशा प्रकारचे किती अर्ज आले त्याबद्दलची माहिती, माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते.

२. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक २४-१२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव कार्यसन -९ सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांनी "आपला उपरोक्त संदर्भाधिन अर्ज कार्यासन क्रमांक -६ यांच्याकडे दिनांक ०३-१२-२००८ रोजी प्राप्त झाला. १) राज्य माहिती आयुक्त तसेच निवडणूक आयुक्त, यांच्या मत्ता व दायित्वाबाबतच्या आपण मागितलेल्या विवरणपत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सध्या कार्यरत असलेले राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.श्री.सुरेश जोशी, राज्य माहिती आयुक्त श्री. रामानंद तिवारी व श्री नवीन कुमार, तसेच सध्या कार्यरत असलेले निवडणूक आयुक्त श्री.नंदलाल हे भारतीय प्रशासन सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहे. सदर अधिकारी भारतीय प्रशासन सेवेत कार्यरत असतांना त्यांनी सादर केलेल्या त्यांच्या मालमत्ता व दायित्वाच्या विवरणपत्राच्या अनुषंगाने या कार्यासनाचा संबंध येतो. या अनुषंगाने कार्यासनातील दस्ताऐवज तपासले असता असे आढळून आले आहे की, श्री.सुरेश जोशी व श्री.नंदलाल यांची मालमत्ता विवरणपत्रे त्यांच्या सेवानिवृत्ती नंतर नष्ट करण्यात आलेली आहेत.

३. श्री. नवीन कुमार हे दिनांक ३१-०८-२००६ व श्री. रामानंद तिवारी हे दिनांक २८-०२-२००८ रोजी भारतीय प्रशासन सेवेतून सेवानिवृत्त झाले ओत. त्याच्या मालमत्ता व दायित्वाच्या विवरणपत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नियम ८ (ञ) प्रमाणे जी माहिती प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नसेल किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील अशी वैयक्तिक तपशीलासंबंधीतील माहिती देण्यास अपवाद केलेला आहे. आपण मागितलेली माहिती याच स्वरुपाची आहे. तसेच भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी शासनाकडे दिलेली त्यांच्या वार्षिक मालमत्ता विवरणपत्रविषयक माहिती सीलबंद लिफाफ्यामध्ये असल्याने ती जन माहिती अधिकाऱ्यांस उपलब्ध नाही. त्यामुळे श्री.नवीन कुमार व श्री. रामानंद तिवारी यांनी भारतीय प्रशासन सेवेत कार्यरत असतांना दिलेली व या कार्यासनाकडे उपलब्ध असलेली माहिती देता येत नाही. २) आपला अर्जातील मुद्दा क्र.३ (iii) च्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपले नमुद अर्ज जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव / सा.प्र.वि. ९ कडे दिनांक ०३-१२-२००८ रोजी प्राप्त झाले. त्यावर कार्यवाही करण्यात येऊन आपणांस प्रस्तुत पत्रान्वये दिनांक २४-१२-२००८ रोजी उत्तर पाठविण्यात येत आहे. आपल्या अर्जातील नमूद मुद्दाच्या अनुषंगाने माहिती देण्याबाबत निर्णय घेण्यास श्रीमती रो.स.भालेकर, जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव / सा.प्र.वि.९ सक्षम आहेत. त्यामुळे टिप्पणी मान्यतेसाठी सादर करण्याचा प्रश्न नाही. यास्तव टिप्पणी लेखन करण्याचाही प्रश्न नाही. माहितीचा अधिकार अधिनियमानुसार अर्ज मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत माहिती देणे आवश्यक आहे. आपल्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करण्यात आली असल्याने विलंबाचा व त्यासाठी अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवू नये. आपला अर्ज प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या अर्जाप्रमाणे इतर अर्ज प्राप्त झालेले नाहीत" असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०५-०१-२००९ रोजी प्रथम अपिल दाखल करुन माहिती उपलब्ध झालेली नाही किंवा माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे कारण दिले. सदर प्रथम अपिलाच्या संदर्भाधिन अपिल अर्ज विनास्वाक्षरी असल्याने त्यावर कार्यवाही करता येणार नाही, आपणाला अपिल दाखल करावयाचे झाल्यास आपला अपिल अर्ज स्वाक्षरी सह दाखल करावा असे प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव वि.ना.मोरे यांनी कळविलेले आहे. त्यानंतर दिनांक ०५-०१-२००९ रोजी त्या अपिलाच्या संदर्भातच दिनांक ०९-०२-२००९ रोजी अपिलाचा निर्णय दिलेला असून जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भूमिका योग्य आहे असा निर्णय देवून प्रथम अपिल हे फेटाळेलेले आहे व त्यामुळे समाधान न झ ााल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०३-२००९ रोजी माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले दिसून येते.

४. सदर अपिलांच्या सुनावणी संदर्भामध्ये दिनांक २०-०५-२००९ रोजीच्या पत्रान्वये व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे दिनांक ११-०६-२००९ रोजी सुनावणी घेण्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी  तसेच प्रथम अपिलीय अधिकारी व अपिलकर्ता यांनी उपस्थित राहण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. परंतु दिनांक २८-०५-२००९ रोजी सदर सुनावणी रद्द करण्यात आली अशा प्रकारचे पत्र अपिलकर्ता यांना देण्यात आले. त्यावर अपिलकर्ता यांनी दिनांक २८-१२-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी त्यांच द्वितीय अपिल क्रमांक २७७८ च्या संदर्भात निर्णय देण्यासाठी **मा.उच्च न्यायालय कलकत्ता यांचे पुढील याचिका क्रमांक ११९३३(W) of २०१० श्री.अखिल कुमार रॉय विरुद्ध पश्चिम बंगाल माहिती आयोगाच्या** निर्णयाची प्रत त्यांनी मुख्य आयुक्तांना त्याच दिवशी

पाठविलेली आहे. त्यामध्ये मा.उच्च न्यायालय कलकत्ता यांनी राज्य माहिती आयोगाचे द्वितीय अपिल प्राधिकाऱ्यांनी ४५ दिवसांमध्ये दुसरे अपिलाचा निर्णय द्यावा असे नमुद केलेले आहे व ते आयोगाच्या निदर्शनास आणले होते. परंतु दरम्यान बऱ्याच अपिलाची सुनावणी ही झालेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे याचिका क्रमांक ४६९ of २०११ दाखल केली त्यामध्ये राज्य माहिती आयोगाने द्वितीय अपिल क्रमांक २७७८/२००९ मध्ये शक्य तितक्या लवकरात लवकर व शक्य असेल तर ४ आठवड्याचा कालावधी मध्ये निर्णय द्यावा असा दिनांक ०२-०२-२०११ रोजी आदेश दिलेला आहे. तो आदेश आयोगाच्या निदर्शनास आणला. त्याप्रमाणे सदर अपिल हे दिनांक १७-०२-२०११ किंवा १८-०२-२०११ सुनावणीस लावावे असा आदेश मा.मुख्य आयुक्त यांनी आयोगाचे सचिव यांनी दिले व त्याप्रमाणे सदर अपिलाची सुनावणी ही दिनांक १७-०२-२०११ रोजी सकाळी ११.३० वा. ठेवण्यात आली. अपिलाच्या सुनावणीस अपिलकर्ता व उत्तरवादी / विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. के.आर.कुलकर्णी, अवर सचिव व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. एम.एस.चौधरी, सह सचिव सामान्य प्रशासन विभाग हे हजर होते.

५. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे लेखी युक्तीवाद सादर केलेला आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे युक्तीवाद त्यांनी दिलेला आहे.

"It is routine matter to get the property declaration form concerned officers. Every Public servant has to disclose all his assets and members of his family. In fact the said disclosure has been made by the office in the usual course. The particulars sought for is with reference to the said particulars which he has already disclosed. Therefore, as is clear such information is not exempted therefore, the property declaration be furnished to me. “The property declaration is to be find out property details in case there were any allegations against them. Since it was to be used for official purposes, it is formal information & in public domain.

(i) Such disclosures would promote honesty and deter those prone to conceal their assets.
(ii) It will improve the image of public administration and will contribute to good governance.
(iii) It will check the tendency towards corruption, especially among those who are risk- takers believing that the risk of concealing incomes and assets was so minimal that it was worth taking.
(iv) The honest public employee has no fears if his assets details are brought out into the public domain while the hesitancy of the dishonest servants cannot be a basis for not disclosing asset details.
(v) There is no reason why the asset details of public employees should be withheld from disclosure whereas Members of parliament and State Legislatures and their assets, including cash holdings, jewellery, etc.
(vi) The theory of harm that may be caused to the civil servants and public employees by busybodies and blackmailers who may colourably use the disclosed assets-related information, is far too exaggerated to merit consideration.
(vii) Disclosure of assets of civil servants in the context of endemic and embedded corruption is undoubtedly in public interest.

It is revealed during investigation of Adarsh Scam that Shri Omkar Ramanand Tiwari (Son o Shri. Ramanand Tiwari, information Commissioner, Maharashtra State Information, Mumbai) had acquired a flat in Adarsh Society, Colaba Mumbai which was meant for Kargil war Heroes. The market price of the said

flat is several crores. It appears that son of Shri. Ramanand Tiwari has no source of income for paying such a huge amount

Also Social Crusader Shri Annaji Hazare has instructed all the concerns to publish all the property details of web site."

६. तसेच सोबत त्यांनी केंद्रिय माहिती आयोग श्री. शैलेश गांधी यांनी दिनांक ०६-१०-२००९ रोजी श्री.अशोक रावत D.H.O. (श्रद्धा नॉर्थ झोन) यांच्या संदर्भामध्ये अचल संपत्तीच्या सदंर्भामध्ये जी माहिती मागितलेली होती त्या संदर्भात निर्णय दिलेला आहे. त्यामध्ये, **"Therefore we can state that disclosure of information such as assets of a Public servant,- which is routinely collected by the Public authority and routinely provided by the Public servants,- cannot be construed as an invasion on the privacy of an individual. There will only be a few exceptions to this rule which might relate to information which is obtained by a Public authority while using extraordinary powers such as in the case of a raid of phone-tapping.** Any other exceptions would have to be specifically justified. Besides the Supreme Cort has clearly ruled that even people who aspire to be public servant by getting elected have to declare their property details. If people who aspire to be public servants must declare their property details it is only logical that the details of assests of those who are public servants must be considered to be disclosable. Hence the exemption under Section 8(1)(j) cannot be applied in the instant case.

Hence the information sought by the Appellant at query 1,4,5,6,7,8 & 9 would have to be provided."

७. तसेच त्यांनी श्रीयुत शैलेश गांधी केंद्रिय माहिती आयुक्त व मध्यप्रदेशचे माहिती आयुक्त यांनी सुद्धा मालमत्ता जाहीर केल्याचे नमुद केलेले आहे. तसेच मिझोरम येथील निवडणूक आयुक्त यांनी सुद्धा मत्ता जाहीर केल्याचे नमुद केलेले आहे व मा. मुख्य न्या.श्रीयुत एस.एच. कापाडीया, न्या.श्री. कबीर सर्वोच्च न्यायालय तसेच ज्या ज्या न्यायमूर्तीनी स्वतःची मालमत्ता जाहीर केलेली आहे त्यांची नावे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणली. तसेच पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालय, गुजरात उच्च न्यायालय यांचा निर्णय सुद्धा आयोगाच्या निदर्शनास आणला आहे व त्याप्रमाणे श्रीयुत रामानंद तिवारी आणि श्री. नवीन कुमार यांच्या संदर्भामध्ये मालमत्ता विवरण उपलब्ध करुन द्यावीत अशी विनंती आयोगापुढे केलेली आहे. पुन्हा तोंडी युक्तीवाद करताना त्यांनी आयोगापुढे असे प्रतिपादन केले की, शासकीय कर्मचाऱ्यांस मालमत्ता विवरण हे शासनाच्या नियमाप्रमाणे दाखल करणे अनिवार्य असल्यामुळे व आदर्श घोटाळा संदर्भामध्ये ज्याप्रमारे माहिती बाहेर आलेली आहे त्या दृष्टिने मालमत्ता विवरण हे जाहीर करणे आवश्यक आहे. शासकीय अधिकारी हे लोक सेवक असतात व लोक सेवक असल्यामुळे त्यांचे ती मालमत्ता आहे ती कशा प्रकारे मिळविली आहे हे जाहीर करणे हे सार्वजनिक हिताच्या तत्वात बसते व त्यामुळे त्यांनी त्यांचा अर्जामध्ये मागितल्याप्रमाणे त्यांना मालमत्ता विवरण पत्र उपलब्ध करुन देण्यात यावीत.

८. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी अपिल संबंधित सुनावणी आयोजित न करता अपिल निकाली काढले. यामुळे अपिलकारास वाजवी संधी न दिल्याची बाब अपिलकरुन द्वितीय अपिलाच्या वेळी निदर्शनास आणले. या संदर्भामध्ये असे नमुद करण्यात येते की, प्रथम अपिलाची वेळीच सुनावणी घेणे अनिवार्य आहे अशा आशयाची तरतूद माहिती अधिकाराच्या कायद्यामध्ये आढळून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी अपिल निकाली काढून दिलेला आदेशाचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यांनी अर्जदाराची माहिती अधिकारा संबंधित मूळ अर्ज, जन माहिती अधिकारी यांनी

दिलेले उत्तर, अपिलकाराने अपिल अर्जात नमुद केलेले मुद्दे व कार्यासन संबंधितील दस्तऐवज यांचे अवलोकन करुन त्या संदर्भामध्ये कारणमिमांसा सहित उत्तर दिलेले आहे.

९. अपिलकर्ता यांनी ज्यावेळेस माहिती मागितली त्यावेळेस डॉ.सुरेश जोशी, श्री.नंदलाल, श्री. रामानंद तिवारी, श्री. नवीनकुमार हे अधिकारी शासन सेवेतून सेवा निवृत्त झाले होते व त्यामुळे ते भारतीय प्रशासन सेवेचे सदस्य नव्हते. तद्नंतर सदर अधिकारी माहिती आयुक्त, मुंबई व निवडणूक आयुक्त या संविधानिक पदावर कार्यरत होते. सबब त्यांच्या संबंधित प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाच्या कार्य-९ मधून कार्यवाही करण्याचा प्रश्न येत नाही. त्याकरीता त्यांनी मा. उच्च न्यायालय **कर्नाटक यांचे पुढील याचिका क्र. १०२७९/२००८** श्रीयुत वी.एन.नागराज विरुद्ध कर्नाटक शासन माहिती आयुक्ता इ. च्या संदर्भामध्ये मा.मुख्य न्या.डी.पी.दिनकरन, न्या.वी.जी.सभाहित दिनांक ०५-११-२००८ मध्ये दिलेला निर्णय आयोगाच्या निदर्शनास आणला. त्यामध्ये **"It is no doubt, true that the "Information Commissioner" is appointed by the Governor which means in effect and substance, by be Government of Karnatka, but that is only a mode of appointment and it does not make the "Information Commissioner" an employee or servant of Government Every person appointed by the Governor is not necessarily an employee of the Government of Karnatka." "However office of the State Information Commission is not an office of profit and same is not subject to the control of Government of Karnataka."** असा निर्णय दिलेला असल्यामुळे राज्य माहिती आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त यांनी शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडे कोणत्याही प्रकारचे मालमत्ता विवरण दाखल करण्याचा प्रश्नच उद्धवत नाही. त्यांनी मालमत्ता विवरणे दाखल केलेले होते तेव्हा ते भारतीय प्रशासन सेवचे सदस्य होते. त्यावेळेस त्या सेवेच्या नियमाप्रमाणे दाखल केलेले होते व ते भारतीय सेवेतुन निवृत्त झाल्यानंतर त्या सेवेच्या नियमांप्रमाणे दाखल केलेले विवरणपत्रांची माहिती राज्य माहिती आयुक्त म्हणून किंवा निवडणूक आयुक्त म्हणून माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक नाही व तसेही डॉ.सुरेश जोशी व श्री.नंदलाल यांच्या संदर्भामध्ये त्यांची मालमत्ता विवरण पत्र नष्ट करण्यात आली असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. श्री. रामानंद तिवारी व श्री.नवीन कुमार हे अपिलकर्ता यांनी माहितीचा अर्ज केला त्यावेळेस राज्य माहिती आयुक्त या पदावर असल्यामुळे राज्य माहिती आयोग हे शासनाच्या अधिन येत नाही असा निर्णय मा.उच्च न्यायालय कर्नाटक यांनी दिलेला असल्याप्रमाणे राज्य माहिती आयुक्त म्हणून शासनाकडे मालमत्ता विवरण पत्र दाखल करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही व जी त्यांची मालमत्ता विवरण पत्रांबद्दल कळविले आहेते. सुध्दा भारतीय प्रशासन सेवेत होते, त्या नियमांप्रमाणे मालमत्ता विवरणपत्रे सादर केलेली होती व अपिलकर्ता यांनी मात्र राज्य माहिती आयुक्त व निवडणूक आयुक्त म्हणून दाखल केलेले मालमत्ता विवरण पत्र मागितलेले असल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाकडून ती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी त्यांची मालमत्ता विवरणपत्रे ही कार्यालयात सीलबंद लिफाफ्यात सादर करणे अपेक्षित आहे अशा सिलबंद लिफाफ्यात सादर केलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यास उघड करण्याचा अधिकार नसल्याने ती माहिती अधिकारात उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच शासकीय माहिती अधिकारी / कर्मचारी त्यांनी शासनाकडे सादर केलेली मालमत्ता विवरण पत्र माहिती अधिकारात उपलब्ध होवू शकणार नाही कारण अशी माहिती एखाद्या व्यक्तीच्या खाजगी जीवनात हस्तक्षेप करणारी ठरते अशा स्वरुपाचा निर्णय केंद्रिय माहिती आयोग, राज्य माहिती

आयोग व मा.उच्च न्यायालय, दिल्ली यांनी दिलेला आहे व अशा काही निर्णयाच्या प्रती आयोगापुढे दाखल करून निदर्शनास आणलेल्या आहेत.

➢ **Assets and Liabilities statements-**

(J. P. Sharma Vs P. M. O. dt 15.03.2007 CIC Digest (Vol.II) 1307(43)

In respect of item No. (b) regarding assts and liabilities statement submitted by Shri. R. A Gupta, it is purely a personal information and this can not be disclosed as per section 18(1) (i) of the Right To Information Act.

➢ **Property returns information is pertaining to personal information which cannot be given under section 18(1) (j)**

(D. R. Singh Vs Central Warehousing Corporation dt. 12.06.2008 CIC Digest(Vlo.II) 2240(1291)

As far as the appellant is concerned he is entitled to know the official details of the public authority. In respect of the property returns submitted by the said official, in case if the appellant had got any apprehension that they acquired certain properties illegally he has to give those particular to the concerned office of the CWC to look into the matter by the concerned division. Otherwise this information is pertaining to personal information which cannot be given under section 8(1)(j).

➢ **Property Returns have been rightly withheld form disclosure**

(Surendra Sharma Vs New India Assurance Company Limited dt. 14.07.2008., CIC Digest (Vol. II) 2307(1400)

Property Returns have been rightly withheld form disclosure as the information is personal to the third-party and given to the respondents confidentially on an assurance that its confidentially shall not be breached except under specific circumstances such as disciplinary/ vigilance enquire against the third-party. Since this information is covered by the Commission decision in the above referred case, this information need not be disclosed.

➢ **Property Returns filed by employees do not constitute public action and are barred form disclosure**

(S. Saram Vs Rastriya Ispat Nigam Limited, Vishakhapatnam Steel plant, dt. 11.09.2006 CIC Digest (Vol) 452

The property filed by the employees do not constitute public action, as these are submitted under fiduciary capacity, Which is exempt u/s 8(1)(e) & (j) of the Act from disclosure of information.

➢ **Disclosure of Annual Immovable property returns may cause unwarranted invasion of privacy**

(Mukesh Kumar Vs Department of Revenue, Ministry of Finance, dt. 22.02.2006 CIC Digest (Vol. I) 450

The information requested for is in the nature of personal information, the disclosure of which may cause unwarranted invasion of privacy of the individual office.

तसेच त्यांनी पुन्हा मा.उच्च न्यायालय दिल्ली यांचे पुढील याचिका क्रमांक ८०३/२००९ श्री.विजय पारेख विरुद्ध केंद्रिय शासन या मध्ये मा.न्यायमूर्ती रविद्र भट्ट यांनी दिलेला निर्णय आयोगाच्या निदर्शनास आणला आहे. त्यामध्ये मा.न्यायमूर्ती रविद्र भट्ट यांनी, In the last paragraph

of the judgment it is observed that, "The CIC has held that there is no public interest element in the disclosure of such personal information, in the possession of the information provider, i.e. the Indian Air Force. This court concurs with the view, application of the principles discussed. The petitioner has, not been able to justify how such disclosure would be in "public interest": the litigation is, pure and simple, a private one. The basis protection afforded by virtue of the exemption (from disclosure) enacted under Section 8(1) (j) cannot be lifted or disturbed.

In view of the above discussion, the writ petition fails, and is dismissed."

तसेच केंद्रिय माहिती आयोग यांचे पुढील अपिल क्रमांक CIC/80/AT/A/2010 /000993-DS श्रीमती आभा शुक्ला, श्री.लोकेश चंद्रा न्यू दिल्ली, DOP या संदर्भात दिनांक २०-०१-२०११ रोजी श्री.दिपक इसरानी, केंद्रिय माहिती आयुक्त यांनी दिलेला निर्णय आयोगाच्या निदर्शनास आणला. त्यामध्ये निर्णयाची परिच्छेद ७ मध्ये खालील प्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"A Perusal of this Commission's order of 24 June 2009 states, "DOPT had been advised by the Department of Legal Affairs that property Statements were to be treated as private information exempted from disclosure under section 8 (1) (j). However, now departmental policy is that they are free to disclose the property statement after obtaining clearance of the third party under section 11(1). Shri Mishra on the order hand submitted that the annual property statement submitted by a government official became government property and, therefore, not information held in trust for the third party."

After hearing both parties and examining the facts on record the Commission upholds the order of the CPIO dated 25 July 2009 and endorses his decision in favor of non-disclosure on the grounds stated in his order.

Accordingly appeal preferred before the Central Information Commission by Shri Lokesh Chandra and Smt Abha Shukla is upheld."

१०. त्यावर अपीलकर्ता यांनी मा.दिल्ली उच्च न्यायालयाचा याचिका क्र.W.P (C) 288/2009 the CPIO, SC V/s Subhashchandra Agarwal, decided on 02.09.2009 मधील निर्णय निदर्शनास आणला.

The original applicant/appellant had sought for information relating, to the declaration of assets by the Hon'ble Judges of the Supreme Court as well as the Chief Justice of the States. मा.न्यायमूर्ती रविंद्र भट यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"In view of the findings recorded above, the first petitioner CPIO shall release the information sought by the respondent-applicant about the declaration of assets, (and not the contents of the declarations, as that was not sought for) made by judes of the Supreme Court, within four weeks."

या आदेशात सुध्दा मालमत्ता विवरणपत्रे दाखल केली किंवा नाहीत हे प्रकट करावे परंतु त्यांतील तपशील प्रकट करू नये असा निर्णय आहे.

वरील निर्णय देण्यापूर्वी मा.सर्वोच्य न्यायालयाच्या सर्व न्यायमूर्तींनी त्यांची मालमत्ता जाहीर करण्याच्या संदर्भात सर्वोच्य न्यायालयाच्या संकेतस्थळावर ती जाहीर करण्याचा निर्णय घेतला तसेच काही उच्च न्यायालयांतील मा.न्यायमूर्तींनी सुध्दा तसा निर्णय घेतला हे मा.उच्च न्यायालय दिल्ली यांचे पुढील LPA No.501/2009 च्या निर्णयामध्ये म्हटलेले आहे.

नुकतेच केंद्रीय माहिती आयोगाचे मा.मुख्य माहिती आयुक्त व इतर आयुक्तांनीसुध्दा स्वतःहून त्यांचे मालमत्तेचे विवरणपत्र केंद्रीय माहिती आयोगाचे संकेत स्थळावर जाहीर केलेले आहे. केंद्र शासनाने सुध्दा अखिल भारतीय प्रशासकीय व इतर सेवांच्या सदस्यांच्या संदर्भामध्ये एक परिपत्रक काढून त्यांत अखिल भारतीय सेवांच्या सदस्यांनी त्यांचे मालमत्ता व दायित्वाच्या संदर्भात

माहिती केंद्रशासनाकडे सादर करावी व ती संकेतस्थळांवर प्रकट केली जाईल असे आदेश नुकतेच काढलेले आहेत.

अखिल भारतील सेवांच्या संदर्भात All India Services Act, 1951 च्या तरतुदींखाली केलेल्य नियमांप्रमाणे त्यांच्या सेवा कालावधीमध्ये मालमत्ता व दायित्वची विवरणपत्रे दरवर्षी दाखल करणे बंधनकारक असते व त्या नियमाप्रमाणे विवरणपत्रे दाखल केलेली नसल्यास ती सार्वजनिक सेवक असल्याने त्याच नियमांप्रमाणे शिस्तभंगाची कारवाईस पात्र असतात व त्यामुळे नियमांच्या पूर्ततेकरीता दाखल केलेली कागदपत्रे / विवरणपत्रे ही त्यांची वैयक्तिक माहिती किंवा स्वतःहून विश्वासाने दाखल केलेली नसून व्यापक सार्वजनिक हिताचे दृष्टीने दाखल केलेली असतात.

त्याकरीता Evidence Act, 1872 च्या कलम ७४ मध्ये "Public Documents" ची व्याख्या केलेली आहे, तो तपासणे आवश्यक आहे.

"74 Public Documents: - The following documents are public documents: -

i) Documents forming the acts or records of the acts –
ii) Of the sovereign authority;
iii) Of official bodies and tribunal and;
iv) Of public officers, legislative, judicial and executive of any part of India, or the common wealth or of a foreign country;

2) Public records kept in any State of private documents या व्याख्येवरून All India Services Act च्या तरतुदींप्रमाणे दाखल केलेली विवरणपत्रे ज्या अधिका-याकडे पर्यायाने शासनाकडे दाखल केलेली असतात ती सार्वजनिक अभिलेख्याचा भाग होत असल्याने व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (झ) मधील "अभिलेख" यामध्ये: -

(क) कोणताही दस्तऐवज, हस्तलिखीत व फाईल;

(ख) एखाद्या एस्तऐवजची कोणतीही मायक्रो फिल्म, मायक्रो फिश आणि प्रतिरूप प्रत;

(ग) अशा मायक्रो फिल्ममध्ये संग्रहित केलेल्या प्रतिमेची किंवा प्रतिमांची कोणतीही नक्कल (मग ती परीक्षित केलेली असो वा नसो)

(घ) संगणकाव्दारे किंवा कोणत्याही अन्न उपकरनांव्दारे तयार केलेले कोणतेही अन्न साहित्य यांचा समावेश होतो" अशी तरतूद आहे.

व

कलम २ (च) व (ज) मध्ये 'माहिती' व 'माहितीचा अधिकार' या दोन संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे अभिलेख्यांचा समावेश 'माहिती'त होतो व त्या अभिलेख्यांची पाहणी करून छायाकित प्रती घेणे असा 'माहितीचा अधिकार' आहे. त्यामुळे सदरची विवरणपत्रे हा सार्वजनिक अभिलेख्यांचा भाग होत असल्याने प्रकट करणे बंधकनकारक आहे, परंतु बंद लिफाफ्यात असल्यानें व तो लिफाफा हा अवर सचिव यांना उघडण्याचा अधिकार नसल्याने माहिती अधिकारी यांना विवरणपत्रे प्रकट करता येणार नाहीत असेही माहिती अधिकारी यांनी म्हटले असल्याने याबाबत माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २२ प्रमाणे अधिनियमाच्या तरतुदींशी कोणत्याही अमलात असलेल्या कायद्याच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्यामध्ये विसंगती असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी त्या प्रभावी राहतील अशा प्रकारचा अधिभाबी परिणाम दिलेला असल्याने गोपनीयतेचे कारण लागू होणार नाही व माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन प्रक्रिया करून माहिती प्रकट करणे आवश्यक झाले असते.

यावरून सार्वजनिक सेवकाची मालमत्तेचे विवरण ही माहिती त्यांची वैयक्तिक माहिती राहिली नसुन ती सार्वजनिक क्षेत्रात येते व गोपनीय नाही व अधिनियमाचे कलम ८(१) (जे) प्रमाणे प्रकट करण्यास अपवाद करता येणार नाही असा निष्कर्ष काढावा लागतो.

११. परंतु भा.प्र.से च्या सेवेतील अधिका-यांच्या संदर्भात श्री. सुनिल मिश्रा यांनी श्री.लोकेशचंद्र IAS व श्रीमती आभा शुक्ला IAS यांच्या मालमत्ता विवरणाची माहिती मागितली होती. त्यासंदर्भात राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांनी माहिती प्रकट करावी असा आदेश जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना दिला होता. त्या निर्णयाविरूध्द श्री.लोकेशचंद्र व श्रीमती आभा शुक्ला यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर पुढील याचिका क्र.३१५२ of २००८, १) श्री.लोकेशचंद्र IAS, २) श्रीमती आभा शुक्ला, IAS १) मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई २) मा.राज्य माहिती आयुक्त, नागपूर / अमरावती ३) श्री.सुनिल जी मिश्रा ४) श्री.व्ही.एन.मोरे प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव ५) श्री.डी.बी.कुडाळे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे दाखल केली होती.

या याचिकेच्या निर्णयामध्ये मा.न्यायमूर्ती श्री.बी.डी.धर्माधिकारी यांनी दि.०७.१०.२००८ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"I view of these findings, I feel it proper to direct the respondent no 3 to give opportunity of hearing to the petitioners in the matter and also hear the respondent no.4 in relation to this objection, so that appropriate order on merits is available on record.

In view of this the impugned order dated 25.06.2008 at annexure-A with the Writ Petition is hereby quashed and set aside."

त्याकरीता व्दितीय अपीलाचा निर्णय देतांना कलम १९ (४) प्रमाणे "ज्याच्या संबंधात अपील दाखल करण्यांत आले असेल असा राज्य जन माहिती अधिका-याचा निर्णय हा, त्रयस्थ पक्षाच्या माहितीच्या संबंधात असेल तर राज्य माहिती आयोग त्या त्रयस्थ पक्षाला आपले म्हणणे मांडण्याच्या वाजवी संधी देईल" अशी तरतूद आहे.

परंतु राज्य माहिती आयोगाचे वरील तरतुदींप्रमाणे व्दितीय अपीलाचे चौकशी संदर्भात श्री.नवीन कुमार व श्री.रामांनद तिवारी यांचे म्हणणे राज्य माहिती आयोगाने ऐकुन घेउन निर्णय दिल्यास त्यांना प्रथम अपील, व्दितीय अपील करण्याची संधी राहाणार नाही. याबाबत मा.गुजरात उच्च न्यायालयाने S.C.A. No. 23103 of 2007 मध्ये मा.उच्च न्यायालय V/s राज्य मुख्य माहिती आयुक्त या याचिकेत निर्णय दिलेला आहे तो खालीलप्रमाणे: -

"If the information is pertaining to third party, is ordered to be supplied without hearing third party, third party is loosing his right to prefer first appeal under section 19 (2) of the Act, 2005 and third party is also loosing a right to prefer a second appeal under section 19(4) of the Act of 2005 and therefore, third party ought to be joined as party as respondent, which has not joined by present as respondent No.2 in his first appeal as well as in his second appeal and therefore also the order passed by second appellant authority deserves to be quashed and set aside (AIR 2007 Guj 203)"

१२. मात्र अपीलकर्ता / अर्जदाराने जी माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे मागितली आहे ती माहिती ही मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयुक्त व निवडणूक आयुक्त म्हणून दाखल

केलेले मालमत्ता विवरणपत्रे मागितलेली आहेत. वर नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोग हे स्वायत प्राधिकरण असून शासनाच्या अधिनिस्त नाही व राज्य माहिती आयोग किंवा निवडणूक आयुक्तांचे बाबतीत मालमत्ता विवरणाचे कोणतेही नियम नाहीत व नियम केले तरी सामान्य प्रशासन विभागाकडे मालमत्ता विवरणपत्रे दाखल करणे हे संयुक्तीक राहाणार नाही. अशा परिस्थितीत सामान्य प्रशासन विभागाने जी माहिती अपीलकर्ता यांनी दिली आहे ती डॉ.सुरेश जोशी, श्री.नंदलाल, श्री.नवीन कुमार व श्री. रामनंद तिवारी यांनी जी विवरणपत्रे दाखल केलेली आहेत ती ते भारतीय प्रशासन सेवेचे सदस्य असतांना त्या सेवेच्या नियमांप्रमाणे दाखल केलेली आहेत व त्या सेवेतून ते निवृत्त झालेले आहेत व वैधानिक पदांवर निश्चित कालावधीसाठी नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे जी मालमत्तेची विवरणपत्रे ही अधिनियमाचे कलम ८(१) (जे) प्रमाणे जाहीर करता येणार नाही असे कळविलेले असल्याने संबंधित माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने म्हणजेच सदरची माहिती त्यांनी भारतीय प्रशासन सेवेत असतांना मालमत्ता विवरणपत्रे दाखल केलेले असल्याने, माहिती आयुक्त या पदावर असतांना ती प्रकट करावी किंवा कसे याबाबत लेखी किंवा मौखिक निवेदन करण्यासाठी अधिनिमाचे कलम ११ (१) प्रमाणे विचारणा करणे आवश्यक राहील.

१३. म्हणून जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे सदरचे अपील हे परत पाठविणे आवश्यक आहे व जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी श्री.नवीन कुमार व श्री.रामानंद तिवारी यांनी राज्य माहिती आयुक्त म्हणुन नव्हे तर भा.प्र.से. मध्ये असतांना मालमत्ता व दायित्व विवरणपत्रे सादर केली होती, परंतु अपीलकर्ता यांचे अर्जात मा.राज्य माहिती आयुक्त म्हणुन मालमत्ता विवरणपत्रे सादर केली असल्यास माहिती द्यावी अशी माहिती मागीतली असल्याने ती माहिती त्रयस्थ पक्षाची होते व त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती असल्याने कलम ११(१) प्रमाणे माहिती प्रकट करावी किंवा कसे यासंबंधी लेखी निवेदन सादर करण्यासाठी विचारणा कराणे व माहिती प्रकट करण्याचा निर्णय घेतांना त्यांचे निवेदन विचारात घेण्यांत येउन योग्य तो निर्णय घेणे संयुक्तीक राहील.

**------आदेश-----**

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यांत येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि.१५.११.२००८ चे अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे प्रक्रिया करून हा निर्णय मिळाल्यापासून १ महिन्याचे आंत योग्य तो निर्णय घ्यावा.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती द्याव्यात.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १३.०४.२०११**

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार

क्र- मुमाआ/नोंदणी क्र.२०११/७१/तक्रार क्र.२५/२०१०
क्र - मुमाआ/अपील क्र ६३३६/२०१०
क्र. मुमाआ/नोंदणी क्र.५०१४४/अपिल क्र.६३३६

श्री.भास्कर प्रभू, तक्रारदार
ए-३१, रॉयल इंडस्ट्रीयल इस्टेट,
एम.एम.जी.एस. मार्ग, वडाळा,मुंबई ४०००३१

श्री. एस.के. नांगिया
७०४ गोल्डन चॅरिट को.ऑ.सोसायटी १३३/ सेक्टर-६
चारकोप, कांदिवली वेस्ट, मुंबई ६७

श्री. चेतन कोठारी,
५२ ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजाबली पटेल लेन ऑफ बी.देसाई रोड,
मुंबई ४०००२६

श्री. दिलिप बी. नेवाटिया
शशी दीप ५-अे, वरळी सीफेस,
मुंबई ४००० ०३०

विरुध्द

१. अतिरिक्त आयुक्त

**सामान्य प्रशासन विभाग, बृहन्मुंबई मुख्यालय, मुंबई ०१**

**२. उपायुक्त** **गैरतक्रारदार**

**सामान्य प्रशासन विभाग, बृहन्मुंबई मुख्यालय, मुंबई ०१**

***---निर्णय---***

**तक्रारीचा दिनांक १८.१०.२०१०**

**सुनावणीचा दिनांक २/२/२०११.**

**तक्रारदार उपस्थित, गैरतक्रारदार अनुपस्थित, प्रतिनिधी उपस्थित.**

**१.** श्री.भास्कर प्रभू व श्री.एस.के.नांगिया यांनी दि.३.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेतील जन माहिती अधिकारी हे राज्य माहिती आयोगाच्या दि.१६.२.२००९ व दि.९.७.२०१० रोजीच्या निर्णयानंतर सुध्दा कागदपत्रांच्या संदर्भामध्ये अवाजवी फीची आकारणी करतात अशी तक्रार माहितीचा अधिकार २००५ च्या कलम १८(१)प्रमाणे केलेली आहे.

२. सोबत श्री. चेतन कोठारी यांनी त्यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये आकारण्यांत आलेल्या दि.२३.११.२०१०रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्या पत्राची छायाप्रत सोबत जोडण्यांत आलेली आहे.

३. श्री. दिलिप नेवाटिया यांनी सुध्दा राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.१०.२०१० रोजी व्दितीय अपील अवाजवी फी आकारणीबद्दल दाखल केलेले आहे त्यामुळे त्याची सुनावणी दि.९.२.२०११ रोजी एकत्रितपणे घेतलेली आहे.

४. तक्रारीमध्ये व अपीलामध्ये महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे नमूद केलेल्या फी पेक्षा जास्त फी आकारली जाते. तसेच राज्य माहिती आयोगाने अपिल क्र.२१५/०२ अपील क्र.२९७७/०२, तक्रार क्र.३५२/०२, २७७/०२ मध्ये दिलेल्या निर्णयाचे सुध्दा पालन केले जात नाही, असे म्हटलेले आहे.

५. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये दि.२.२.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यांत आलेली होती. त्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेतील जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर निर्धारक, एच/वेस्ट यांच्याकडून खुलासा मागविण्यांत आलेला होता. परंतू धोरणात्मक निर्णय त्यांना घेता येत नाही असे त्यांनी आयोगास सांगितल्यामुळे सुनावणीस बृहन्मुंबई महानगरपालिका सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.एमओए/८४ दि.२७.४.२००९ चे परिपत्रक ज्या अधिका-यांनी मंजूर केले होते त्या अधिका-यांनी सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी आयोगाकडून आदेश काढण्यांत आलेले होते. त्यामध्ये प्रमुख कर्मचारी/अधिकारी, उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग, अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) यांनी उपस्थित रहावे, असे आदेश करण्यांत आलेले होते. परंतू सुनावणीस संबंधित अधिकारी उपस्थित न राहता पुन्हा त्यांनी कर निर्धारक व संकलक (एच/पश्चिम)तसेच इतर सहाय्यक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी उपस्थित रहावे असे त्यांना कळविल्यामुळे सहा.अभियंता व कार्यकारी अभियंता उपस्थित होते. **परंतू त्यांनी आयोगापुढे लेखी दाखल केलेला खुलासा व तोंडी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिका-यांनी केलेल्या नियमांचेच पालन त्यांनी केलेले आहे असे सांगितले व ते धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नाहीत असे आयोगापुढे सांगितले. फी ची आकारणी कोणत्या आधारावर करावी याबाबत सामान्य प्रशासन विभागाचेच वरिष्ठ अधिकारी सांगू शकतात ते त्यांनी सांगितले.**

**६.** श्री.चेतन कोठारी यांच्या तक्रारी व अपिलाच्या सुनावणीच्या वेळेसच कार्यकारी अभियंता यांनी आयोगापुढे असे कथन केले होते की, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे फी आकारण्यांत येते व त्यामुळे वरील अधिकारी यांनी उपस्थित राहण्याविषयी आयोगाने आदेश दिलेले होते. तरी सुध्दा जे अधिकारी निर्णय घेऊ शकत नाहीत पुन्हा तक्रारीत सुनावणीस उपस्थित राहण्यास आदेश केलेले होते. यावरुन प्रमुख कर्मचारी अधिकारी, प्रभारी उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग, अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे)यांना विषयाचे गांभार्य तरी नाही किंवा त्यांची मग्रुरी तरी दिसून येते. त्यामुळे यांनी आयोगाच्या नोटीशीचा अवमान केलेला असून मुंबई महानगरपालिका यांच्या अधिका-यांना राज्य माहिती आयोगाच्या दर्जा व मुख्य माहिती आयुक्तांच्या दर्जाबद्दल अज्ञान दिसून येते.

**राज्य मुख्य आयुक्तास केंद्रिय निवडणूक आयुक्त पदाचा दर्जा असून आयोगास कोणत्याही तक्रारीच्या चौकशीसाठी अधिनियमाचे कलम १८(३) प्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ प्रमाणे कोणत्याही व्यक्तिस/अधिका-यास सुनावणीस हजर राहण्यासाठी वारंट काढण्याचे अधिकार आहेत.** त्यामुळे आयुक्त, महानगरपालिका यांनी राज्य माहिती आयोगाच्या संदर्भामध्ये त्यांच्या अधिका-यांना समज देणे आवश्यक आहे व सदरच्या तक्रारीच्या संदर्भात सुनावणी घेण्यांत आलेली असली तरी निर्णय प्रक्रियेतील अधिकारी उपस्थित नसल्यामुळे एकतर्फी अंतिम निर्णय देण्यांत येत आहेत व यापुढे राज्य माहिती आयोगाच्या निर्णयाचेच पालन झाले नाहीतर सार्वजनिक प्राधिकरणास तक्रारदार/अर्जदार यांना नुकसान भरपाई देण्याचे आदेश द्यावे लागतील.

७. तक्रारदार श्री.भास्कर प्रभु हयांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी राज्य माहिती आयोगाच्या दि.९.७.२०१० रोजीच्या निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे. तसेच महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचे उल्लघंन केलेले आहे. श्री. चेतन कोठारी यांनी माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२३.११.२०१० रोजी '**Further expenses toward Xeroxing and conveyance to make xeroxing will have to be borne by you**' अशा प्रकारे आकारणी करण्यांत आलेली आहे हे आयोगाच्या निदर्शनास आणले. त्याप्रमाणे श्री. लेस्ली अल्मेडा यांना कर सहा.निर्धारक तथा जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.१०.२०१०च्या संदर्भामध्ये **inspection extrace of the property for the 2009-10 made year will be available on payment made of Rs 230/- per property per year** थेट फी ठरविण्यांत आलेली आहे ती फी भरावी असे सदर पत्रान्वये कळविण्यांत आलेले आहे व ते आयोगाच्या निदर्शनास आणलेले आहे. श्री. दिलिप नेवाटिया यांनी सुध्दा आयोगापुढे वरीलप्रमाणे युक्तीवाद केला आहे व असे अनेक अपीलकर्ता तक्रारदार यांच्या तक्रारी वरील मुद्यांसाठी आयोगाकडे तक्रारी दाखल झालेल्या आहेत व येत असतात. त्यामुळे हा एकत्रित व सर्वसमावेशक निर्णय देण्यांत येतो.

८. तक्रारदार यांचे म्हणणे असे की,जन माहिती अधिकारी यांनी तसेच श्री.नांगिया यांनी दि.१७.५.२००९ रोजी मुख्य माहिती आयुक्तांना दिलेले पत्र सुध्दा आयोगाचे निदर्शनास आणले **महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे फी आकारणी करणे हे संयुक्तिक राहील.** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत/प्रस्ताव, बांधकाम व कारखाने या दोन विभागामध्ये वाहतूक खर्च आकारला जातो त्याबाबत अधिनियमात किंवा नियमात तरतूद नाही व त्यामुळे अशा प्रकारची खर्च आकारणी ही अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन करणे होय, असे त्यांनी सुनावणीच्या वेळी युक्तीवाद करताना सांगितले. **तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका ही**

**अधिनियमाचे कलम २८ प्रमाणे सक्षम प्राधिकारी/प्राधिकरण नसल्याने त्यास स्वत:चे नियम करण्याचा अधिकार नाही.**

बृहन्मुंबई महानगरपालिका, सामान्य प्रशासन विभागाने दि.१८.९.२०१० रोजी जारी केलेले परिपत्रक अर्जदारास उत्तर देण्यापूर्वी सहाय्यक कर निर्धारक व संकलक एच/वेस्ट यांना प्राप्त न झाल्यामुळे या पूर्वीच्या पध्दतीनुसार रु.२३०/- शुल्क भरण्यासाठी कळविण्यांत आले. अर्जदाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील सादर न केल्यामुळे या संबंधीचा खुलासा करणे शक्य झाले नाही असे जन माहिती अधिकारी व करनिर्धारक यांनी आयोगापुढे सांगितले.

९. वाहतुक खर्चाच्या संदर्भामध्ये कार्यकारी अभियंता यांनी आयोगापुढे असा युक्तीवाद केला की, अर्जदार हे ज्या आराखडयाची माहिती मागत आहेत ते आराखडे हे नियमित आकारात नाहीत त्यापेक्षा मोठया आकारात प्लॅन असतात व ते संपूर्ण आराखडे,नकाशे हे एका मोठया नस्तीमध्ये बांधून ठेवलेले असतात व सदरची नस्ती ही नकाशे, आराखडे, प्लॅन यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्याकरिता महापालिकेच्या कार्यालयातून तेवढया आकाराचे छायांकित प्रती काढण्यासाठी झ ेरॉक्स मशिन उपलब्ध नसल्याने सदरची नस्ती ही जिथे बाजारात अशा प्रकारच्या झेरॉक्स मशिन उपलब्ध आहेत तेथून टॅक्सीने त्या नस्ती घेऊन जावे लागते व तेथून त्या झेरॉक्स काढून उपलब्ध करुन द्याव्या लागत असल्याने जो जाण्या-येण्याचा टॅक्सी खर्च अंर्तभूत नसल्यामुळेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी हा खर्च सोसावा असे कळविलेले आहे. बांधकाम विभाग, कर निर्धारक विभाग प्रत्येक माहिती अधिकारी यांचेकडे शेकडो अर्ज आलेले असतात व त्या अर्जाच्या संदर्भामध्ये वाहतूक खर्च हा जन माहिती अधिकारी यांना करणे सुध्दा सर्वस्वी अशक्य आहे. महापालिका प्रशासनाने कोणत्याही प्रकारची त्यासाठी तरतूद केलेली नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्या खर्चाच्या बाबत अपिलकर्ता यांचेकडे घेणे गैर असले तरी शेकडो अर्ज माहितीकरिता दाखल होत असल्याने त्यासाठी दुसरा कोणताही पर्याय त्यांचेकडे नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले.

त्यानंतर निरिक्षण उता-याची छायांकित प्रत हवी असल्यास रुपये २/- प्रती पृष्ठ देय आहे व साक्षांकित प्रतहवी असलयास रुपये ५०/- शुल्क देय आहे असेही खुलाशात म्हटलेले आहे.

तसेच महानगरालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने आतापर्यत दि.२७.४.२००९ दि.१४.९.२०१०, दि.१४.९.२०१० रोजी माहिती अधिकार २००५ अंतर्गत सुधारित शुल्क आकारण्याबाबत परिपत्रके काढलेली दिसून येतात. त्यामध्ये (१) "विशिष्ट दस्तऐवज नकाशे इत्यादिबाबत संबंधित खात्याने अगोदरच दर निश्चित केले असतील तर निश्चित केलेली किंमत अधिक टपाल खर्च"आकारण्यांत येईल असे म्हटले आहे. (२)**साक्षांकित करुन** मागितल्यास संबंधित खात्याने साक्षांकित करण्याचे दर अगोदरच निश्चित केले असतील तर त्याप्रमाणे शुल्क आकारावे, अन्यथा साक्षांकित करण्यासाठी वेगळे शुल्क आकारण्यांत येऊ नये. अर्जदारास माहिती सदर प्रत " माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यांत आली आहे असा शिक्का मारुन जन माहिती अधिकारी यांचे नांव, पदनाम, स्वाक्षरी करुन द्यावी याकरिता वेगळे शुल्क आकारण्यांत येऊ नये. अशी कार्यवाही करावी अशा सूचना दिलेल्याआहेत.

तसेच दि.२९.११.२००८ रोजी महानगरपालिकेच्या उपविधी अधिकारी यांनी सांक्षाकित करुन देण्याकरिता कोणतेही शुल्क आकारण्यांत येऊ नये असे अभिप्राय दिलेले आहेत.

आयोगाने सुध्दा दि.९.७.२०१० व ४.९.२०१० रोजी शुल्क आकारण्याच्या संदर्भात निर्णय दिलेले आहेत. परंतू तरीही कार्यकारी अभियंता यांनी दि.२५.११.२०१० रोजी श्री चेतन कोठारी यांस

**(b) payment for certification of files**

**1) for IOD/CC/Approved letter Rs. २५ per page**

**2) for approved plan Rs. ६० per size plan**

**Further zeroxing and conveyance to make Xeroxing will have be borne by you** असे कळविले.

दि..१८.१०.२०१० रोजी माहिती अधिकारी यांनी श्री.लेस्ली अल्मेडा यांना

**"Inspection for the property for the year 2009-10 will be made available on payment of Rs.230 (per properly per year)as shelduled fee "** असे कळविले तसेच श्री. दिलीप नेवाडिया यांना **"the required information will be provided on payment of schedule fee Rs.1146 (i.e. Rs 230 per properly per year for inspection Extract and Rs.२ for zerox per copy and Rs.50 for certification )अ**से कळविले आहे.

**<u>यावरुन महानगरपालिकेमध्येच कोणत्याही प्रकारचे एकच धोरण दिसून येत नाही व समन्वय सुध्दा नाही.</u>**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१)प्रमाणे राज्य जन माहिती अधिकारी, कलम ६ प्रमाणे माहिती मिळण्याचा अर्ज मिळाल्यावर शक्य तितक्या शिघ्रतेने/कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्याच्या दिवसांपासून ३० दिवसाचे आत एकतर विहित केलेल्या फीचे प्रदान केल्यावर माहिती देईल

२. . . . . . .

३.माहिती देण्याचा खर्च दर्शविणारी कोणतीही जादा फी प्रदान केल्यावर माहिती देण्याचा निर्णय घेण्यांत आला असेल त्याबाबतीत, विनंती करणा-या व्यक्तिचा राज्य जन माहिती अधिकारी (क)पोटकलम (१)अन्वये विहित केलेल्या फी नुसार ही जादा रक्कम त्यांने कशाच्या आधारे ठरविली त्या हिशोबासह, माहिती पुरविण्याचा त्याने निर्धारित दिलेला खर्च दर्शविणारा जादा फी चा तपशिल नमूद करणारी सूचना पाठविल व त्याव्दारे तिला ती भरण्याची विनंती करील, अशी तरतूद आहे व त्यामुळे शासनाने खालीलप्रमाणे फी चे नियम केलेले आहेत. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ मधील-

**नियम क्र ४ माहितीबद्दल फी- (१)कलम ७ च्या पोट-कलम(१)अन्वये माहिती पुरविण्यासाठी, सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरुपात, तिची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बॅकेचा धनादेश या स्वरुपात किंवा मनीऑर्डरच्या स्वरुपात पुढील दरानी आकारण्यांत येईल.**

| | |
|---|---|
| (अ)(क)संबंधित विभागाने विशिष्ट दस्तऐवज, नकाशे इत्यादिची किंमत अगोदरच निश्चित केली असेल त्याबाबतीत | अशी निश्चित केलेली किंमतअधिक टपाल खर्च |
| (ख) माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात किंवा अन्य (प्रतींच्या)स्वरुपात चटकन मिळण्याजोगी असेल त्याबाबतीत | (एक)तयार केलेल्या किंवा छायांकित केलेल्या प्रत्येक पृष्ठासाठी (ए-४ किंवा ए आकारातील कागद) दोन रुपये अधिक टपाल खर्च, किंवा<br>(दोन) मोठया आकारातील कागदाच्या प्रतीचा प्रत्यक्ष आकार किंवा परिव्यय किंमत अधिक टपालखर्च |

(ब) अभिलेख पाहण्यासाठी, पहिल्या तासाकरिता कोणतीही फी नाही, आणि त्यानंतरच्या प्रत्येक पंधरा मिनिटांकरिता (किंवा त्याच्या भागाकरिता) रुपये पाच इतकी फी :

परंतू अर्जदार व्यक्तिशः येऊन माहिती घेऊन जाईल. त्याबाबतीत कोणताही टपालखर्च आकारण्यांत येणार नाही.

(२)कलम ७ च्या पोट कलम (५)अन्वये माहिती पुरविण्यासाठी, सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरुपात, तिची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बॅंकेचा धनादेश या स्वरुपात किंवा मनी ऑर्डरच्या स्वरुपात पुढील दरांनी आकरण्यांत यांईल.

(क)डिस्केट्स किंवा फ्लॉपी या स्वरुपातील माहिती पुरविण्यासाठी प्रत्येक डिस्केटस किंवा फ्लॉपीकरिता पन्नास रुपये अधिक टपाल खर्च : आणि

(ख) मुद्रित स्वरुपातील माहिती पुरविण्यासाठी, अशा प्रकाशनासाठी निश्चित केलेली किंमत किंवा त्या प्रकाशनातील उता-यांच्या प्रत्येक छायांकित पृष्ठासाठी दोन रुपये अधिक टपाल खर्च :

परंतू अर्जदार व्यक्तिशः येऊन माहिती घेऊनजाईल त्याबाबतीत, कोणताही टपालखर्च आकारण्यांत येणार नाही.

वरिल नियमात (अ)(क) संबंधित विभागाने विशिष्ट दस्तऐवज, नकाशे इ.ची किंमत अगोदरच निश्चित केली असेल त्याबाबतीत अशी तरतूद आहे.

सदरचे नियम ११ ऑक्टोबर २००५ रोजी पारित झाले म्हणजे त्या अगोदर ठरविण्यांत/निश्चित करण्यांत आली असेल असा त्याचा अर्थ होतो.

परंतू असे नियम महानगरपालिकेने ऑक्टोबर २००५ पूर्वी केले होते असे आयोगाचे निदर्शनास आणण्यांत आलेले नाहीत.

राज्य माहिती आयोगाचे दि.९.७.२०१० चे निर्णयामध्ये "४. साक्षांकित प्रतिसाठी महानगरपालिकेचे दर लागू होतील " असे आदेश दिलेले आहेत. त्याबाबत सुध्दा महानगरपालिकेने साक्षांकित प्रतिसाठीचे दरपत्रक आयोगपुढे सादर केलेले नाही व त्यामुळे साक्षांकित करुन द्यावयाची असल्यास रु.५०/- फी आकारणी करण्यांत येईल असे अर्जदारांना कळविण्यांत येते ते अवाजवी आहे. "

माहितीचा अधिकार अनियम २००५ चे कलम २ (ञ)मध्ये "माहितीचा अधिकार" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये " (एक) एखादे काम दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे

(दोन) दस्त्ऐवजांच्या किंवा अभिलेख्यांच्या टिप्पण्या उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमूने घेणे

(चार) डिस्केट,फ्लॉपी इ. मार्फत माहिती मिळविणे अशी तरतूद आहे.

मात्र महाराष्ट्र शासनाने " प्रमाणित प्रतीसाठी" फीचे नियम केलेले नाहीत. "certified copy" "प्रमाणित प्रती" याबाबत Evidence Act. 1872 च्या कलम ७६ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यांत आलेली आहे.

"**Certified copies of public doucuments - Every public officer having th custody of a public document which any person has a right to inspect, shall give that person on demand a copy of it on payment of the legal fees therefore, together with a certificate written at the foot of such copy that it is true copy of such document or part thereof, as the case may be,and such certificate shall be dated and subscribed by such officer with**

**his name and his official title and shall be sealed, whenever such officer is authoried by law to make use of seal and such copies so certified shall be called certified copies.**

**Explanation - Any officer who by the ordinary course of official duty, is authorized to deliver such copies, shall be deemed to have to custody of such documents within the meaning of this section. "**

वरील प्रमाणे तरतूदीमुळे २००५ पूर्वी सर्वच शासकिय/निमशासकिय कार्यालयामध्ये " प्रमाणित प्रती " **Certified copies** हा हस्तलिखित किंवा टंकलिखित तयार करुन पुन्हा मूळ प्रतिवरुन शब्दशः तपासून प्रमाणित करुन देण्यासाठी लागणारा खर्च व मानवी वेळ गृहीत धरुन फी ठरविण्यांत आल्या होत्या.

परंतू फोटो मशिन/झेरॉक्स मशिन आल्यावर हस्तलिखित किंवा टंकलिखित करुन तपासून देण्याचा खर्च व मानवी वेळ आवश्यक नसल्याने ५ सेकंदात फोटोप्रत मूळ प्रत जशी आहे तशी उपलब्ध होत असल्याने प्रत तयार करण्यास लागणारा वेळ व खर्च येत नाही व त्यामुळेच शासनाने **"छायांकित प्रतीच्या स्वरुपात किंवा अन्य (प्रतीच्या)स्वरुपात चटकन मिळण्याजोगी असेल त्याबाबतीत प्रत्येक पृष्ठांसाठी (ए-४ किंवा ए-३ आकारातील कागद) दोन रुपये अधिक टपाल खर्च "** अशी तरतूद दिलेली आहे.

छायांकित प्रत काढल्यावर (प्रामाणिकपणे छायांकित प्रत काढली आहे असे गृहीत धरुन) त्यातील शब्दशः तपासण्याची आवश्यकता नसल्याने वरीलप्रमाणे Evidance Act ची तररूद लागू होत नसल्याने पूर्वीची प्रमाणित फी आकारण्याची आवश्यकता नाही.

त्याऐवजी. **" माहितीच्या अधिकारात उपलब्ध करुन दिली** "अशा प्रकारे खरेपणा शाबीत करण्यासाठी **authenticate** करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता फी आकारण्याची आवश्यकता राहणार नाही.

" सदर प्रत माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यांत आली आहे. "विभागाचे नांव " असा शिक्का तयार करुन प्रत्येक प्रत साक्षांकित करुन दिल्यास फी आकारण्याची आवश्यकता राहणार नाही. किंवा व्यापक प्रमाणात प्रति असल्यास एका प्रमाणपत्रात प्रत्येक विषयाच्या किती प्रत उपलब्ध करुन दिल्या, याचा उल्लेख करणे संयुक्तिक राहील.

**" Inspection extract of the property for the year २००९ - १० will be made available on payment of Rs.२३० ([per properly per year) as scheduled fee**. याबाबत सुध्दा महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ चे नियम ४ (b) प्रमाणे पुर्ननिर्णय घेणे व त्याप्रमाणे आकारणी करणे संयुक्तिक राहील.

**" Further expenses toward xeroxing and conveyance to make zeroxing will have to be borne by you "**या संदर्भात माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, इमारत व प्रस्ताव, इमारत व कारखाने किंवा इतर काही विभागात जी नकाशे, किंवा आराखडे असल्यास त्याचे पुस्तक फार मोठया आकारात व वजनदार असते. त्याप्रमाणे झेरॉक्स मशिन हया कार्यालयात उपलब्ध नाहीत व त्या द स्तऐवजाचे झेरॉक्स करावयाचे असल्यास बाजारात त्या आकाराचे झेरॉक्स मशिन असतील त्या दुकानात टॅक्सीने घेऊन जाऊन झेरॉक्स प्रती काढून आणाव्या लागतात व टॅक्सीचा खर्च हा महानगरपालिका माहिती अधिका-यास प्रतिपूर्ता करुन देत नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी/कर्मचारी यांनी किती वेळा स्वतः असा खर्च करावा म्हणून तो zerox काढण्याचा खर्च समजूनच आकारणी दिली जाते मात्र अधिनियमात त्याबाबत कोणतीही तरतूद नाही व त्यामुळे

महाराष्ट्र शासनाने नियमात सुध्दा तरतूद केलेली नाही परंतू त्याबाबत आज जबाबदार अधिकारी सुनावणीस हजर राहिले असते तर त्याबाबत योग्यतो निर्णय आयोगास देता आला असता.

**अधिनियमाचे कलम ६(१)मध्ये -**

माहितीचा अर्ज सादर करण्यासाठी -" विहित करण्यांत येईल अशा फी सह " अशी तरतूद आहे याचा अर्थ महाराष्ट्र शासन नियमाच्या नियम ३ अन्वये रु.१०/- चे कोर्ट फी स्टॅम्प नमूद केलेली आहे. त्याप्रमाणे आहे.

कलम ६(१)प्रमाणे माहितीचा अर्ज मिळाल्यावर कलम ७(१)प्रमाणे ३० दिवसांचे आत एक तर विहित करण्यात येईल अशा फीचे प्रदान केल्यावर माहिती देईल अशी तरतूद आहे. व त्याप्रमाणे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ च्या नियम -४ मध्ये फी विहित केलेली आहे.

**अधिनियमाचे कलम ७(३)मध्ये -**

" पोटकलम (१) अन्वये विहित केलेल्या फी नुसार ही जादा रक्कम त्याचे कशाचे आधारे ठरविली त्या हिशोबासह माहिती पुरविण्याचा त्याने निर्धारित केलेला खर्च दर्शविणारा जादा फीचा तपशिल नमूद करणारे सूचना पाठविल.

याचा अर्थ महाराष्ट्र शासनाच्या नियम ४ (१)मध्ये विहित केलेल्या फी प्रमाणे विशिष्ट दस्तऐवज,नकाश इ.ची एकूण पृष्ठ वगैरेची तपशिलात फी आकारणीचा हिशोब करुन कळविणे बंधनकारक आहे व अभिलेख तपासणीकरिता नियम ४(१)(ब)प्रमाणे फी आकारणे आवश्यक आहे.

या व्यतिरिक्त पोटकलम (५)मध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरुपात माहिती पुरवावयाची असेल तर नियम २ प्रमाणेआकारणी आवश्यक आहे.

**त्यावरुन इतर कोणत्याही प्रकारचाआधार घेऊन जादा फी कारणी करणे अवैध आहे. त्यामुळे conveyance खर्च हा महानगरपालिकेस आकारता येणार नाही.**

महाराष्ट्र माहिती अधिकारी नियम २००५ च्या प्रमाणेच महानगरपालिकेस माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचा खर्च/फी आकारावी लागेल. नियम ४ अ(क) " संबंधित विभागाने विशिष्ट दस्तऐवज, नकाशे इ. ची किंमत अगोदरच निश्चित केली असेल त्याबाबत अशी निश्चित केलेली किंमत + टपाल खर्च " तसेच पोट नियम ४(१)अ (ख)पोटनियम २ चा समावेश करुन याबाबत सर्व समावेशक नियम सर्व जन माहिती अधिकारी यांना वितरित करुन त्याप्रमाणे सर्व माहिती अधिकारी यांनी uniform आकारणी करावी असे आदेश पारित करावेत.

जन माहिती अधिकारी यांना स्वत:च्या अधिकारात वेगवेगळी फी आकारण्याचे अधिकार नाहीत. **अधिनियमाचे कलम ७(३) प्रमाणे निश्चित खर्चाची आकारणी करुन आकारणी कशाच्या आधारावर केली याबाबतचे विवरण देणे बंधनकारक आहे. त्यामुळे सध्या जन माहिती अधिकारी हे निरिक्षण करुन प्रति पृष्ठ रु.२ किंवा निरिक्षणाअंती खर्चाचा भरणा करुन छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात असे कळवितात ते योग्य नाही. निश्चित पृष्ठ संख्या रु.२ अशी आकारणी कळवावी किंवा मोघम माहिती मागितली असल्याने अंदाजे पृष्ठ संख्या** x **प्रतिपृष्ठ रुपये २/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा किंवा अंतिमत: पृष्ठ संख्या कमी जास्त झाल्यास त्याप्रमाणे आकारणी केली जाईल. व त्यानंतर छायांकित प्रती काढून देण्यांत येतील असे कळविणे संयुक्तिक राहील. खर्चाचा भरणा करण्याचे पत्र अर्ज आल्यानंतर ५/७ दिवसातच निर्गमित केल्यास खर्चाचा भरणा केल्यानंतर छायांकित प्रती काढून मिळतील असे कळवावे खर्चाचे विवरणाचे पत्र दिल्यानंतर खर्चाचा भरणा करेपर्यतचा कालावधी ३०**

दिवसांतून वगळून मिळत असल्याने ३० दिवसांतील पत्र दिल्याच्या तारखेपासून उर्वरित कालावधी छायांकित प्रती काढून पुरविणे शक्य होईल.

**वरीलप्रमाणे आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई यांनी संबंधित विभागास नियम किंवा परिपत्रक काढण्याचे आदेश द्यावेत व महानगरपालिकेतील सर्व विभाग/शाखा यांना वितरीत करुन त्याप्रमाणेच आकारणी करावी असे आदेश द्यावेत.**

**आदेश**

१. तक्रार /अपील मंजूर करण्यांत येतात.
२. हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई यांनी नियमांचे सुसूत्रीकरण करुन सर्व माहिती अधिकारी यांना वितरीत करण्याचे आदेश द्यावेत.
३. आयुक्त, महानगरपालिका,बृहन्मुंबई यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यांत यावी.

मुंबई
दि.३१/३/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१८८/अपिल क्र. ६४६३/२०१०**

**श्री. सुभाष एन.पुत्रन, ....अपिलकर्ता**
**रुम नं.३१, बि.एम.सी.स्टाफ कॉलनी,**
**दुसरा मजला, यारी रोड, कल्याण कॉम्प्लेक्स समोर,**
**वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०६१.**

**----विरुध्द----**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**कार्यकारी अभियंता बृ.म.न.पा.यांचे कार्यालय,**
**पहिला मजला, के/पूर्व विभाग कार्यालय,**
**गुंदवली, आझाद रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**कार्यकारी अभियंता बृ.म.न.पा.यांचे कार्यालय,**
**पहिला मजला, के/पूर्व विभाग कार्यालय,**
**गुंदवली, आझाद रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.** **... उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - २१/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ०७/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता हजर आहेत, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

अर्जदाराने ह्या आयोगासमोर असे सांगितले की, प्रथम अपिलामध्ये आर्डर झालेली असताना अजूनही मागणी पुर्ण करण्यात आलेली नाही म्हणून अपिल दाखल करण्यात आलेले आहे. सदरचे अपिल दिनांक २१-१०-२०१० रोजी अर्जदार / अपिलार्थीने दाखल केलेले आहे व त्याची सुनावणी आज रोजी दिनांक ०७-०३-२०११ रोजी ठेवण्यात आली असून जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी सुद्धा गैरहजर आहेत. अर्जदाराने अशी तक्रार केलेली आहे की, अर्जदाराला अजून माहिती मिळालेली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०८-२०१० रोजीला जन माहिती अधिकारी यांनी ३ दिवसांच्या आत अर्जदाराला माहिती देण्यात यावी असा आदेश करुन सुद्धा जवळजवळ ५ महिन्यांचा कालावधी झाला असून अर्जदाराला माहिती मिळालेली नाही व त्यामुळे अर्जदाराचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(१) नुसार निकाली काढले नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (SWM), के/पूर्व विभाग यांच्या विरुद्ध अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे त्यांना लागू असलेल्या सेवा विषयक नियमांचा भंग केल्याच्या कारणावरुन शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येते व अपिलीय अधिकारी यांना असे सुचित करण्यात येते की, त्यांनी नियमानुसार जन माहिती अधिकारी यांच्या विरुद्ध अपिलीय अधिकारी यांनी ३ महिन्याच्या आत कार्यवाही करावी व तसा अहवाल आयोगाला पाठवावा. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (SWM), के/पूर्व विभाग यांना निर्देश देण्यात येतो की, हा आदेश मिळाल्यापासून ८ दिवसांच्या आत पंजीबद्ध डाकेने त्यांनी दिलेल्या पत्त्यावर माहिती विनाशुल्क पाठवावी व तसा अहवाल आयोगाला पाठवावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**----आदेश----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(श्री. भास्कर पाटील)**
**प्रभारी, राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक :- ०७/०३/२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक/मुमाआ/नोंदणी क्र./५०१८३/अपिल क्र. ६४६४/२०११**

**श्री.जैसवार आर.ॲलेक्स जोसेफ,**
**४/१२ आंबेडकर नगर, समाज मंदिर सभागृहाजवळ,** **....अपिलकर्ता**
**टागोर नगर - ८अ, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०० ०८३.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक,**
**बृहन्मुंबई उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,**
**बृहन्मुंबई उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.** **.... उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - २१/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ०७/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

सदर प्रकरणात अर्जदार / अपिलार्थी यांच्या म्हणण्यानूसार व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या म्हणण्यानूसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला दिलेल्या माहिती मुळे समाधान झाले नाही म्हणून अर्जदाराने द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानूसार अर्जदार हा संबंधित शाळेत (प्रयोगशाळा परिचर ह्या पदासाठी) पदोन्नतीसाठी पात्र असून व संबंधित शाळा सुद्धा अर्जदाराला पदोन्नती देण्यास तयार असून शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग यांचे कार्यालय,चेंबूर, मुंबई ४०० ०७१ अर्जदाराच्या पदाला मान्यता देण्यास तयार नाहीत.

उत्तरवादी यांच्या म्हणण्यानूसार दिनांक २५-११-२००५ चे शासन निर्णयानुसार अर्जदाराचे पद मान्य नसल्यामुळे त्या पदावर अर्जदाराला पदोन्नती देण्याबद्दल मान्यता देण्यात येत नाही. अर्जदार / अपिलार्थी यांच्या म्हणण्यानूसार शासन निर्णय दिनांक ६ फेब्रुवारी, २००९ नुसार दिनांक २५ नोव्हेंबर, २००५ शासन निर्णय रद्दबातल होवून त्या जागी दिनांक ६ फेब्रुवारी, २००९ सुधारित शासन निर्णय काढण्यात आलेले आहे. त्यानुसार राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः / पूर्णतः अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग / कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकेतर पदे अनुज्ञेय करण्याबाबत सुधारित निकष विहित करण्यात आले होते. परंतु काही

कारणस्तव या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीत अडचणी निर्माण झालेल्या आहेत. मात्र, सद्यस्थितीत शाळामधील दैनंदिन कामामध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदामुळे मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे. तसेच शिक्षेकेतर कर्मचाऱ्यांसाठी माध्यमिक शाळा संहितेनुसार पद अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचारधीन आहे. शासन निर्णय दिनांक २५-११-२००५ नुसार व माध्यमिक शाळा संहितेमधील निकषानुसार या दोन्ही देय व अनुज्ञेय पदे ठरत असतील व ती पदे मंजूर व रिक्त असेल तर ती मंजूर असलेली रिक्त पदे भरण्यास व भरलेल्या पदाना मान्यता देण्यास शासनाची मान्यात देण्यात येत आहे. म्हणून अर्जदाराच्या म्हणण्यानूसार या शासन परिपत्रकानुसार दिनांक ०६-०२-२००९ नुसार अर्जदाराला ह्या परिपत्रकाचा लाभ मिळण्याची गरज आहे. परंतु उत्तरवादी यांच्या म्हणण्यानूसार तरीही अर्जदाराला ह्या शासन निर्णयाचा लाभ घेता येत नाही. ह्यासाठी अर्जदाराला जन माहिती अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग यांचे कार्यालय,चेंबूर, मुंबई यांनी लेखी देण्याचे ठरविलेले आहे व त्यासाठी अर्जदाराला दुपारी २.०० वाजता शिक्षण निरीक्षकांशी संर्पक साधुन त्यांना लेखी पत्र अर्जदाराला देण्याचे कबूल केलेले आहे.

वरील आदेश व सुचना देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**----आदेश----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**
**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(श्री. भास्कर पाटील)**
**प्रभारी, राज्य मुख्य माहिती**

**आयुक्त**
**मुंबई**
**दिनांक :- ०७/०३/२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त,**

**मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२८८/अपिल क्र. ६४६६/२०१०**

**श्री. शैलेश आर. घेडिया, ....अपिलकर्ता**
**बी / २०२, लाभ आशिष, जुनी पोलीस क्वार्टर्स लेन,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी,**
**मुंबई शहर जिल्हा, जूने जकात घर**
**श.भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.**

**जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग -२ (अभिलेख विभाग)**
**मुंबई शहर जिल्हा, जूने जकात घर**
**श.भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - २९/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - ०७/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

श्री. शैलेश आर. घेडिया विरुद्ध सह जिल्हा निबंधक वर्ग -२ (अभिलेख विभाग) मुंबई शहर ह्या प्रकरणात जन माहिती अधिकारी आहेत. अर्जदार / अपिलार्थी हे आज गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या खुलासा दिनांक ०७-०३-२०११ चे अवलोकन करण्यात आले. त्यांच्या म्हणण्यानूसार अर्जदाराला पाहिजे असलेले मुळ दस्त क्र. बबज /३३८३ / ९५ बाबत करण्यात आलेल्या व येणाऱ्या कार्यवाहीची माहिती पुरविण्यात यावी या स्वरुपात आदेशपारित करण्यात आले आहेत. सदर यादी शासकीय छायाचित्रण कार्यालयाने दिनांक १४-०२-२०११ रोजी स्वीकारली असून मुळ दस्त अद्यापपर्यंत छायाचित्रण होऊन परत आलेला नाही. परंतु सदर प्रकरणी पाठपुरावा करुन मुळ दस्त अपिलकर्ता यांना लवकरात लवकर देण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्यांना सुनावणी दरम्यान विचारले असता अर्जदाराला ४ आठवड्याच्या आत सदर दस्तऐवज येणे अपेक्षित आहे व त्यासाठी पाठपुरावा करुन अर्जदाराला सदर दस्तऐवज उपलब्ध झाल्यानंतर लेखी कळवून उपस्थित करुन देण्याबाबत कळवतील.

वरील बाबी लक्षात घेवून ४ आठवड्याच्या आत अर्जदाराला दस्त उपलब्ध करुन देण्यात येईल असे आयोगासमोर कबूल केल्यामुळे अर्जदाराचे अपिल निकाली काढले आहे. त्यानंतरही अर्जदाराला ह्या संबंधीत काही तक्रार असल्यास अर्जदार कलम १८ खाली तशी ह्या आयोगासमोर तक्रार करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**----आदेश----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**
**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(श्री. भास्कर पाटील)**
**प्रभारी, राज्य मुख्य माहिती**

**आयुक्त**
**मुंबई**
**दिनांक :- ०७/०३/२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त,**

**मुंबई**

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०१६९/अपील क्र.६३६२/२०१०
क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०१६७/अपील क्र.६३६३/२०१०

श्रीमती अर्चना श्रीवास्तव, ...अपिलकर्ता
रुम नं. २, घनश्यामदास की चाळ,
संत रोहीदास मार्ग, कालाकिल्ला,
धारावी, मुंबई ४०० ०१७.

----विरुद्ध-----

१) प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
जी/उत्तर विभाग कार्यालय, बृमनपा,
हरिश्चंद्र येलवे मार्ग,
दादर (पश्चिम ), मुंबई ४०० ०२८.
२) प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (एफ / उत्तर ),
एफ / उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
भावूदावी रोड, मांटुगा रोड, मुंबई ४०० ०१९.
१) जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,
जी/उत्तर विभाग कार्यालय, बृमनपा,
हरिश्चंद्र येलवे मार्ग,
दादर (पश्चिम ), मुंबई ४०० ०२८.
२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण ) (एफ / उत्तर ),
एफ / उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
भावूदावी रोड, मांटुगा रोड, मुंबई ४०० ०१९.
...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपीलांचे दिनांक -२०-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - १५-०३-२०११

अपिल क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०१६९/अपील क्र.६३६२/२०१०

अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिल क्रमांक ६३६२ मध्ये अपिलकर्ता यांनी दिनांक ०१-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, धारावी पुनवर्सन प्राधिकरण के लिए धारावी झोपडपट्टी धारको का सर्वेक्षण मशाल संस्था द्वारा किया गया है | Sector no. ५, location plan & Annexure - II , की नकल प्रती दे | तथा सेक्टर नं ५, कहा से कहॉतक के झोपडपट्टी वासीयों कि जानिनपर विकास कार्य किया जानेवाला है उसका पुर्ण विवरण अहवाल दे | तथा सेक्टर नं.५ के झोपडपट्टी धारको के पुनवर्सन के लिए ट्रान्झिस्ट कॅम्प, कि व्यवस्था कहा कहा कि गयी है | और सेक्टर नं.५, के झ ोपडपट्टी को अस्थाई रुपसे ट्रान्झिस्ट कॅम्प में कहा कहा और कैसे हस्तांतरी किये जायेंगे व किन किन झोपडपट्टीया के सेक्टर ५ मे समावेश है इसकी पुर्ण जानकारी और अहवाल दे | अशी माहिती मागितलेली दिसून येते.

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २७-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २३-०९-२०१० रोजी देण्यात आला असून धारावी पुनर्वसन प्रकल्प हा विशेष कार्यकारी अधिकारी, धारावी पुनर्वसन प्रकल्प यांचे मार्फत राबविण्यात येत असल्यामुळे अपिलकर्त्यास सदरहू माहिती देता येत नाही व त्यामुळे प्रथम अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झ ाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या संदर्भामध्ये माहिती मागितली परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या संदर्भामध्ये अंतिमः कोणताही निर्णय झालेला नाही. मात्र धारावी पुनर्वसन प्रकल्प हा विशेष कार्यकारी अधिकारी धारावी पुनर्वसन प्रकल्प यांचे मार्फत राबविण्यात येत असल्यामुळे सदरहू माहिती देता येत नाही असे त्या निर्णयात म्हटले आहे. ते विसंगत दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय माहिती अधिकारी वरिष्ठ वसाहत अधिकारी, सहाय्यक मनपा आयुक्त, जी / उत्तर विभाग यांच्याकडे माहिती मागितली. माहिती उपलब्ध नसेल तर त्यांना तसे कळविणे आवश्यक होते. परंतु प्रकल्प अन्य अधिकारी राबवित आहेत म्हणून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही व आयोगापुढे मात्र अंतिम मंजूरी झाली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही अशी विसंगत उत्तर देणे ही योग्य नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये योजना कार्यान्वित झाली असेल तर मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. योजनेस मंजुरी झाली नसेल तर त्याप्रमाणे कळविणे संयुक्तिक राहील किंवा योजना ही प्राधिकरण राबवित असेल तर त्यांच्याकडे अर्ज हस्तांतरण करणे संयुक्तिक झाले असते व तसे कळविणे संयुक्तिक राहील व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०१६७/अपील क्र.६३६३/२०१०**

**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी  व प्रथम अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.**

अपिल क्रमांक ६३६३ मध्ये अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०५-२०१० रोजी यांच्याकडे, दिनांक ०२-०३-२००६ ते माहिती मिळेपर्यंत या कालावधीतील वार्ड क्र. १७०,१७१ ची नगरसेविका श्रीमती नियाज अहमद फरीदा बानू यांचा विभाग क्षेत्रात निधी वापरुन लादीकरण,गटारे, शौचालय, समाजसेवा हॉल व जी काही कामे ठेकेदारामार्फत रिपेरिंग व नविनरीकरण करुन सुरु आहेत किंवा झाली आहेत त्या सर्व कामाबाबत एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २७-०८-२०१० रोजी (निरंक तारीख ) प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २०-०९-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी संबंधित विषयाबाबतची सर्व कागदपत्रे दाखविण्यात यावीत व अपिलकर्त्यांनी निर्देशित केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विहित शुल्क भरल्यानंतर द्याव्यात असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्या निर्णयाने सुद्धा समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय मोघम स्वरुपाची व विस्तृत प्रमाणात होती व त्यामुळे अपिलकर्तो यांना विहित मुदतीतच दिनांक १४-०६-२०१० रोजी मागितलेली माहिती कार्यालयामध्ये सॅप प्रणालित उपलब्ध असून विस्तृत स्वरुपात असल्याने आपण या कार्यालयास कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष भेट देऊन उपलब्ध माहितीची पाहणी करु शकता व आवश्यक त्या कागदपत्रांचे रु.२/- प्रती प्रत प्रमाणे भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेवू शकता असे कळविलेले होते. परंतु तसे त्यांनी न करता प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पत्र पाठविलेले होते ही बाब निर्दशनास आणण्यात आलेली होती व त्यामुळे प्रथम अपिलाचा निर्णय हा योग्य आहे असे दिसून येते. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०१-२०१० रोजी प्रत्यक्ष येऊन कार्यालयीन दस्ताऐवज दाखविण्यात आले, त्यांनी तपासून पाहिले व त्यांचे समाधान झाले असे त्यांनी लेखी दिलेले आहे व  त्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**४) अपिल क्रमांक ६३६२ हे अंशतः मंजूर करण्यास पात्र असून अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात प्रकल्प मंजूर झाले असेल किंवा अन्य प्राधिकरण राबवित असेल तर व अंतिम मंजूरी झाली नसल्यास त्याप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत विनाशुल्क रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावी.**

**५) अपिल क्रमांक ६३६३ हे निकाली काढण्यात येते.**

**६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १५-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.
क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१६६/अपिल क्र.
६३६४/२०१०

ॲड.पल्लवी अ. कुलकर्णी,
केनि निवास, नवघरपाडा, पहिली गल्ली, ....अपिलकर्ता
मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०८१.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय कार्यकारी अभियंता,
एफ / दक्षिण विभाग कार्यालय, बृमनपा,
रुम नं. ३२, दुसरा मजला, डॉ.बी.ए.रोड,
परळ, मुंबई ४०० ०१२.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पर्यावरण),
एफ / दक्षिण विभाग कार्यालय, बृमनपा,
रुम नं. ३२, दुसरा मजला, डॉ.बी.ए.रोड,
परळ, मुंबई ४०० ०१२.
...उत्तरवादी

---निर्णय---

व्दितीय अपिलाचा दिनांक - १९/१०/२०१०
सुनावणीचा दिनांक - १५/०३/२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक (निरंक ) रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, एफ / दक्षिण विभाग यांच्याकडे, एफ / दक्षिण विभागात विद्युत / यांत्रिकी स्वरुपाच्या पार पाडण्यात आलेल्या कामाबाबत तपशीलात दिलेल्या तक्तानुसार सन २००८-२००९ व २००९-२०१० या दरम्यान कामे जसे - विद्युत कामे, हाय मास्ट, पोल्स, बोअर वेल्स, खेळाची साहित्ये, उद्यानातील कामे व इतर याप्रमाणे अतिशय तपशिलात माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. मात्र अर्ज कोणत्या तारेखेला दाखल केला किंवा अर्जाचा उर्वरित भाग छायांकित प्रती आयोगाकडे दाखल केलेल्या नाहीत. अर्जदार वकील आहे व वकील अशाप्रकारचे कागदपत्रे दाखल न करणे हा बेजाबदारपणा आहे. अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ०२-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २६-०७-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केलेला आहे. त्यांच्या प्रती त्वरीत द्याव्यात तसेच उर्वरित सर्व प्रती उपलब्ध करुन द्याव्यात असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्याही मुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिल दाखल केले.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती मोघम, विस्तृत प्रमाणात आहे व वेगवेगळ्या विषयांची आहे व त्यांनी तक्तात माहिती मागितलेली आहे. त्या तक्तात माहिती उपलब्ध करुन देणे याचा अर्थ माहिती तयार करुन देण्याचे आहे व तसे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही व त्यामुळेच त्यांना दिनांक २६-०५-२०१० रोजी विहित मुदतीत रु.१३०/- भरणा करावा असे कळविलेले होते. परंतु अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत खर्चाचा भरणा केला तरी जन माहिती अधिकारी यांना पावती दाखविलेली नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नव्हती. प्रथम अपिलाची सुनावणीमध्ये खर्चाचा भरणा केला असे सांगण्यात आले परंतु स्वतः अपिलकर्ता हे हजर नव्हते व त्यांनी प्रतिनिधी पाठविलेला होता.परंतु प्रतिनिधी यांनी कोणतेही प्राधिकृत पत्र व त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुद्धा त्याबाबत काहीही कळविलेले नव्हते व त्यामुळेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिला तरी माहिती उपलब्ध करुन देणे अधिकार पत्राशिवाय माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नव्हते व त्यानंतरही मात्र अधिकार पत्रात नमुद केलेल्या प्रतिनिधीस श्री. खेमराज ना. सोळंखी यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे उर्वरित सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २(च)** मध्ये **"माहिती"**व . **कलम २ (ञ)** मध्ये **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या मध्ये **सार्वजनिक प्राधिकरणात** साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज, शासन निर्णय या स्वरुपाची माहिती उपलब्ध आहे त्यांचे निरिक्षण करुन व छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. कोणतीही माहिती संकलित करुन तयार करुन देणे हे अपेक्षित नाही व त्यामुळे तक्तामध्ये माहिती तयार करुन देणे हे अपेक्षित नाही. तसेच माहिती ही मोघम, विस्तृत व अनेक विषयांची असल्यामुळे त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे सुद्धा अपेक्षित नाही. अर्जदाराने एका अर्जामध्ये एकाच विषयाची निश्चित वर्णन करुन माहिती मागणे अपेक्षित असल्यामुळेच ती ३० दिवसांत उपलब्ध करुन देणे शक्य होते. मोघम, विस्तृत प्रमाणात व अनेक विषयांची माहिती एकाच अर्जात व ती ही विशिष्ट तक्यात मागितल्यास ती सार्वजनिक प्राधिकरण अधिनियमाचे **कलम ७ (९)** प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर

वळवावी लागेल व त्यामुळेच अशाी माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. परंतु सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे व आज अपिलकर्ते व प्रतिनिधी गैरहजर असल्यामुळे सदर अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**
**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १५-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत :-**
**३) निवडनस्ती,**
**४) श्री. चौरे.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**
**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१७१/अपिल क्र. ६३६१/२०१०**

**श्री. नामदेव सु.अहिरे,**
**..अपिलकर्ता**
**सुंदरलाल अहिरे चाळ, रुम नं.१, मकरानी पाडा,**
**जितेंद्र रोढ,मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता, इमारत प्रस्ताव (पश्चिम उपनगरे),**
**बृमनपा पी विभाग, लॉरेन्स हाईस्कूल समोर, संस्कृती कॉम्पलेक्स,**
**९० फिट रोड,कांदिवली (पूर्व ), मुंबई ४०० १०१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव (पश्चिम उपनगरे),**
**बृमनपा पी विभाग, लॉरेन्स हाईस्कूल समोर, संस्कृती कॉम्पलेक्स,**
**९० फिट रोड,कांदिवली (पूर्व ), मुंबई ४०० १०१.**
**...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - निरंक**
**सुनावणीचा दिनांक - १५/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १४.०६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी इमारत प्रस्ताव (पश्चिम उपनगरे ) कांदिवली (पूर्व ) यांच्याकडे, नगर भूमापन क्र. ७३A, ७३A/१ ते ३, ७३A/४A आणि ५A, विलेज-चिंचोली, गोरेगांव सदर ठिकाणी प्रस्तावित केलेल्या फाईल मधून मला (१) अप्रुवड प्लानची आणि (२) सी.सी. ची सर्टीफाय कॉपी देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी सन २००० ते आजमितीपर्यंतचा आहे. माहिती साध्या टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १२-०७-२००९ रोजी विकासकाने हरकत घेतली म्हणून उपलब्ध करुन देता येणार नाही असे अपिलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०५.१०.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे असा निर्णय देवून अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे तारीख न टाकत द्वितीय अपिल दाखल केलेले दिसून येते. सदरचे अपिल हे राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयामध्ये २०.१०.२०१० रोजी स्वीकरलेले दिसून येते.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, विकासकाने हरकत घेतल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. एकूणच जन माहिती अधिकारी यांचे उत्तर व प्रथम अपिलाचा निर्णय यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, विकासकाला विचारणा करण्यात आलेली दिसून येते. परंतु मागितलेल्या माहितीच्या स्वरुपात पाहिले असता महानगरपालिकेकडुन बांधकामास जी परवानगी देण्यात आली त्याकरीता मंजूर केलेले आराखडे व बांधकामाच्या परवानगीचे प्रमाणपत्र ही विकास नियमावली प्रमाणे मंजूर करण्यात येत असल्यामुळे व तसे करणे हे महानगरपालिकेस बंधनकारक असल्यामुळे मंजूर आराखडे व बांधकामाची परवानगी ही सार्वजनिक अभिलेखांचे भाग होते. ते विकासाशी संबंधित किंवा विकासकाची माहिती नाही म्हणजेच ती त्रयस्थ पक्षाची माहिती, आराखडे किंवा प्रमाणपत्र हे पडताळणी करुन दिलेले नसेल तर ती जबाबदारी

महानगरपालिकेची आहे व त्यावरुन ती सार्वजनिक प्राधिकरणाची जबाबदारी असेल, सार्वजनिक अभिलेखाचा भाग असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणेही संयुक्तिक झाले असते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा जो निर्णय दिलेला आहे तो निर्णय ही अत्यंत चुकीचा आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**४) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांनी त्यांचे दिनांक १४-०६-२०१० च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**५) सदर निर्णयाची एक प्रत आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना स्वतंत्रपणे पोस्टाने अवलोकनार्थ पाठविण्यात यावी.**

**६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १५-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४९२४७/अपिल क्र. ६३८५/२०१०**

**श्री.विलास आसाराम साळवे, ...अपिलकर्ता**
**शिवनेर टुडे, पोस्ट बॉक्स नं. ११८८२,**

**भांडुप (पूर्व), मुंबई ४०० ०४२.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
**पंचायत समिती सिंदखेड राजा,**
**ता. सिंदखेड राजा, जिल्हा- बुलढाणा.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत उमरद,**
**ता.सिंदखेड राजा, जिल्हा- बुलढाणा.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १०/०७/२०१०**

**सुनावणीचा दिनांक - १६/०३/२०११**

**अपिलकर्ता - उपस्थित.**

**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी आयोगासमोर सुनावणीच्या वेळेस माहिती उपलब्ध झालेली आहे असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यात येते.

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १६-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४८५६४/अपिल क्र. ६३८८/२०१०**

**श्रीमती समिक्षा सुधाकर चौधरी,** **...अपिलकर्ता**
**अे-१०३, मोहक चेंबर्स, मनवेलपाडा रोड,**
**विरार (पूर्व),ता.वसई, जिल्हा - ठाणे ४०१ ३०३.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (परि.क्र.४),**
**बजाज रोड, महानगरपालिका शालेय इमारत, १ला मजला,**
**कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),**
**आर / उत्तर विभाग, जयवंत सावंत मार्ग,**
**दहिसर (पश्चिम ), मुंबई ४०० ०६८.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १५/१०/२००८**
**सुनावणीचा दिनांक - १६/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा), आर / उत्तर विभाग, दहिसर (पश्चिम), मुंबई ४०० ०६८ यांच्याकडे, पुर्वीचा म.वि.क्र.२९ चे विभाग निरीक्षक श्री. राऊत देत असलेल्या शाररीक, मानसिक जाचासंबंधी जून २००५ ते मार्च २००७ कालावधीतील तपशील, १) चौकशी समिती नियुक्ती केल्याबाबतचा आदेश, २) चौकशी समितीने ज्या व्यक्तींची साक्ष घेतली अथवा जबाब घेतले त्या व्यक्तींची नावे, साक्षीसंबंधी कागदपत्रे आणि जबाबाच्या प्रती, ३) चौकशी समितीने काढलेल्या निष्कर्षाच्या प्रती, ४) चौकशी समितीच्या कार्यवाही संबंधीची सर्व कागदपत्रे (रोजनाम्यासहित ) माहिती स्वहस्ते घेणार अशी माहिती मागितलेली दिसुन येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १८-०३-२००८ रोजी प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांनी आपण मागितलेली माहितीची चौकशी या कार्यालयामार्फत दिलेली नसल्याने त्याबाबतची कागदपत्रे या कार्यालयात उपलब्ध नाहीत असे कळविलेले दिसून येते. दिनांक १९-०३-२००८ रोजी अपिलकर्ता यांना माहिती बद्दल वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०४-२००८ रोजी

प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांना मुख्यध्यापक श्री.रणछोडदास मराठी यांना प्रशिक्षिका श्रीमती चौधरी यांच्या संदर्भामध्ये सदर चौकशी कोणत्या कार्यालयात झाली व चौकशी अधिकारी कोण होते त्यांचे नांव या कार्यालयाला कळविण्याबाबत श्रीमती चौधरी यांना कळवावे असे पत्र दिलेले दिसून येते व त्या नंतर अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०६-२००८ रोजी प्रथम अपिल दाखल केले. परंतु प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य मुख्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखले केलेले आहे. द्वितीय अपिलाचा निर्णय दिनांक २५-०९-२००९ रोजी देण्यात आला असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय द्यावे असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे पुन्हा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१०-२००८ प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती दिनांक २२-०२-२००८ रोजी मागितली त्या संदर्भामध्ये माहितीच उपलब्ध नाही असे त्यांना कळविण्यात आले व त्यानंतर कार्यस्थळी महिला अत्याचार लैगिक छळवणूक समिती बृहन्मुंबई विभाग, शिक्षण विभाग यांनी तक्रार समिती कडून कार्यकारी समितीकडे व त्यानंतरही स्वयंसेवी संस्था सदस्यासह पुन्हा चौकशी करण्यास सूचित केल्याविरुद्ध अशा प्रकारची माहिती व त्यात प्रथम अपिलीय अधिकारी कोण आहे हे काहीही कळविलेले नव्हते. माहिती त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिल दाखल करुन मागितले. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा काहीही निर्णय दिलेला नाही. आयोगाने आदेश देवून ही प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई त्याबाबतीत केली नाही व त्यामुळे पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल करणे भाग पडले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही असे सांगितले अशा प्रकारची चौकशीही प्रशासकीय अधिकारी यांच्या कार्यालयात होत नाही तर ती तक्रार समितीकडे होते व त्यानंतर संपुर्ण बृहन्मुंबई करीता कार्यकारी समिती स्थापन केलेली असते त्या कार्यकारी समितीकडे उपलब्ध होते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला नाही असे दिसून येते व आयोगाचा आदेशानंतरही दिलेला नाही असे दिसून येते म्हणजे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर निर्णयाबाबत टाळाटाळ केलेली आहे. वास्तविक शिक्षण अधिकारी याबाबत वरील अधिकाऱ्यांना जबाबदारीने अर्जदारास योग्य ती माहिती उपलब्ध करुन देणे किंवा त्याबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक असते. परंतु या प्रकरणामध्ये तत्कालिन शिक्षण अधिकारी (दिनांक ०६-०८-२००८) यांनी अपिलाची प्रक्रीया करण्याची टाळाटाळ केलेली आहे असे दिसून येते. मात्र राज्य माहिती आयोगाची नोटीस दिनांक १५-०१-२०११ रोजी निर्गमित केल्यानंतर विद्यमान शिक्षण अधिकारी यांनी सदर प्रकरणातील संपुर्ण माहिती उपलब्ध करुन घेवून ती आयोगापुढे सादर केली. आयोगापुढे माहिती सादर झाली, ती माहिती अद्यापपर्यंत अपिलकर्ता यांना उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. विद्यमान शिक्षण अधिकारी यांनी सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. त्याप्रमाणे ती त्यांना आज आयोगापुढे उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती अधिकाऱ्याने त्यांची माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले होते ते योग्य होते व

त्यामुळे त्यांच्या विरुद्ध कारवाईची आवश्यकता नव्हती. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्याबाबत मार्गदर्शन किंवा माहिती कोणत्या कार्यालयात उपलब्ध होईल असे जरी सांगितले असले तरी अपिलकर्ता यांनी २ वेळेचे द्वितीय अपिल दाखल करण्याची आवश्यकता राहिली नसती व त्यामुळे दिनांक ०६-०७-२००८ रोजी जे माहिती अधिकारी होते त्यांच्या विरुद्ध योग्य ती प्रशासकीय कारवाई महानगरपालिका प्रशासनाकडून होणे आवश्यक आहे. परंतु माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**४) अपिल निकाली काढण्यात येते.**
**५) सदर निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**
**६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १६-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**४) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांजकडे योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रषित.**
**५) निवडनस्ती,**
**६) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०११२/अपिल क्र. ६२५२/२०१०**

**श्री. महम्मद हमीद शेख, ...अपिलकर्ता**
**नेहरु नगर, चाळ क्र. ५, शॉप नं.११,**
**संत ज्ञानेश्वर नगर,**
**बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष ),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, टी विभाग कार्यालय,**
**लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुंलुंड (पश्चिम), मुंबई ४०० ०८०.**
**जन माहिती अधिकारी तथा साहय्यक अभियंता (परिरक्षण),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, टी विभाग कार्यालय,**
**लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुंलुंड (पश्चिम), मुंबई ४०० ०८०. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १४/१०/२००८**
**सुनावणीचा दिनांक - १७/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी राज्य मुख्य माहिती आयोगाकडे, टी विभाग कार्यालयाकडून मागितलेली माहिती मिळालेली असल्या कारणाने दिनांक १७-०३-२०११ रोजी ठरविण्यात आलेली सुनावणी रद्द

करुन, अपिल रद्द करण्यात यावे. अपिल अर्जाबाबत माझी कुठलीही तक्रार नाही असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यात येते.

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१७९/अपिल क्र. ६३८६/२०१०

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१८०/अपिल क्र. ६३८७/२०१०

श्री. चतुरसेन टी. डावरे, ...अपिलकर्ता
रमजान भटार चाळ २६३/५,
डॉ.आंबेडकर चौक, तक्यावाडी,
कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग कार्यालय,
लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, ४ था मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जलकामे),
बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग कार्यालय,
लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, ४ था मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०. ...उत्तरवादी

---निर्णय---

व्दितीय अपिलाचा दिनांक - २१/१०/२००८
सुनावणीचा दिनांक - १६/०३/२०११

**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१७९/अपिल क्र. ६३८६/२०१०**

अपिल क्रमांक ६३८६ मध्ये दिनांक ०९-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, पाणी खाते यांच्याकडे, आंबेडकर चौकातील किती बैठ्या चाळीना घरामध्ये नळाचे कनेक्शन घेण्याबाबत कायदेशीर कागदपत्रांची माहिती मिळणेबाबत, माहितीचा कालावधी सन २००५ ते आजतागायत आहे, अशा प्रकारची माहिती अनेक मुद्या संदर्भामध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०८-२०१० रोजी खर्चाचा भरणा करावे असे कळविण्यात आले होते. परंतु खर्चाचा भरणा न करता अपिलकर्ता यांनी दिनांक ११-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, आंबेडकर चौकी या भागामध्ये अनेक अवैध पाण्याची जोडणी आहे व त्यामुळेच त्या संदर्भामध्ये त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०७-०८-२०१० रोजी खर्चाचा भरणा करावा व माहिती पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल असे त्यांना कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी अद्यापपर्यंत खर्चाचा भरणा केलेला नाही. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ते खर्चाचा भरणा करण्यास तयार होते परंतु त्यांना संपुर्ण माहिती उपलब्ध होवू शकेल का? असे विचारले असता त्यांनी योग्य ते उत्तर न मिळाल्यामुळे त्यांनी खर्चाचा भरणा केलेला नाही. परंतु खर्चाचा भरणा केल्याशिवाय व माहिती उपलब्ध करुन घेतल्याशिवाय माहिती संपुर्ण आहे किंवा नाही हे ठरविता येत नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. खर्चाचा भरणा हा अधिनियमाचे कलम ७ (३) अन्वये देण्याची तरतूद आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना आधी खर्च भरावा व माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तीक राहील. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय दिला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लघंन केलेले आहे. तसेच शासन निर्णयाचे परिपत्रकाचे उल्लघंन केले असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. मात्र सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१८०/अपिल क्र. ६३८७/२०१०**

अपिल क्रमांक ६३८७ मध्ये जन माहिती अधिकारी पाणी खाते, एल विभाग यांच्याकडे दिनांक २४-०५-२०१० रोजी सन २००९ ते आजतागायत पर्यंत डॉ.आंबेडकर चौक या विभागातील कायदेशीर व बेकायदेशीर कनेक्शनच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २४-०५-२०१० रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये रु.२८४ इतका खर्च अपेक्षित आहे असे कळविलेले होते. परंतु खर्चाचा भरणा न करताच अपिलकर्ता यांनी दिनांक ०९-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १०-०८-२०१० रोजी अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो व तसेच फेरुल साफ करण्याचा आदेश दिलेला होता. त्यावर समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. मात्र प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर एका पृष्ठावर त्रोटक माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना रु.२८४ इतका अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे विहित मुदतीत कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी खर्चाचा भरणा न केल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र प्रथम अपिलामध्ये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती संपुर्ण माहिती नाही व त्यामुळे खर्चाचा भरणा केल्यास त्यांना संपुर्ण कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील. यावरुन अपिलकर्ता यांनी प्रथम खर्चाचा भरणा करावा व नंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्यामुळे सदर अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**४) अपिल क्रमांक ६३८६ व अपिल क्रमांक ६३८७ हे निकाली काढण्यात येते.**
**५) सदर निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**
**६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १६-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४९५३६/अपिल क्र. ६३८२/२०१०

श्री.शशिकांत विठ्ठल मोरे, ...अपिलकर्ता
एन.एल.-१-४-१२/५, सेक्टर -१०,
नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती जावली,
मेढा, जिल्हा - सातारा.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्राम पंचायत कुसुंबी,
ता.जावली, जिल्हा - सातारा. ...उत्तरवादी

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - २७/०८/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १६/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक २१-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती मार्फत राबविले जाणाऱ्या बोअर वेल मंजुरीच्या सविस्तर माहिती बाबत, मौजे.कुसुंबी (बालदारवाडी) येथे टंचाईग्रस्त गांव म्हणून पंचायत समिती मार्फत बोअरवेल मंजूर करण्यात आली त्याची ग्रामपंचायत ठरावासह सविस्तर माहिती मिळीवी अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने / स्पीड पोस्टाने मिळावी अशी विनंती केलेली दिसून येते. मात्र माहितीच्या अर्जामध्ये अपिलकर्ता यांनी त्यांच्या स्वतःचा पत्ता मु.पो.कुसुंबी (बालदारवाडी) ता. जावली, जिल्हा सातारा व त्याच पत्त्यावर दिनांक ०१-०६-२०१० रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जावली (मेढा) यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झ ााल्यामुळे त्यांनी दिनांक २१-०६-२०१० रोजी ग्रामविकास अधिकारी सो. ग्रामपंचायत- कुसुंबी, ता.जावली, जि.सातारा यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले. परंतु अपिलकर्ता हे सुनावणी साठी हजर झ ााले नाही म्हणून प्रथम अपिलाचा निर्णय त्यांना पोस्टाने पाठविण्यात आला परंतु अपिलकर्ता सदर ठिकाणी नसल्याने पाठविलेला निर्णय उलट टपाली माघारी आला असे विस्तार अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी जावली यांनी आयोगापुढे सांगितले आहे व यावरुन प्रथम अपिलाचा निर्णय दिला नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. मात्र द्वितीय अपिलामध्ये त्यांनी एन एल -१-अे-१२/५, सेक्टर १०, नेरुळ - ७०६, नवी मुंबई ४०० ७०६ असा पत्ता दिलेला असल्यामुळे सदरचे अपिल हे राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात त्यांनी दाखल केले व त्यामुळे आज या कार्यालयामध्ये ग्रामसेवक, ग्राम पंचायत कुसुंबी, ता.जावली, जिल्हा सातारा, विस्तार अधिकारी / गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी मुंबई कार्यालयामध्ये सुनावणीस हजर राहावे लागले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती मिळाली परंतु मंजूरीचे पत्र मिळाले नाही. त्यावर गट विकास अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ती जागा पांदणची आहे मुळातच ती सरकारी जागा आहे व त्यामुळे मंजूरी पत्राची आवश्यकता नाही. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ती जागा त्यांच्या मालकीची आहे म्हणून त्यांना मंजूर पत्राची मागणी माहिती मागितलेली होती अर्थातच या गुणवत्तेबाबत माहिती आयोगात चौकशी करण्याचा अधिकार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेले त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. माहिती उपलब्ध नसेल त्याबाबत तसे स्पष्टपणे कळविणे आवश्यक असते व तसे मंजूर

पत्र नाही असे त्यांना कळविलेले आहे. अपिलकर्ता यांनी मात्र माहितीचा अर्ज हा गट विकास अधिकारी यांच्याकडे केला, स्वतःचा पत्ता हा गावाकडचा दिला. प्रथम अपिल करताना त्यांच्या पेक्षा कनिष्ठ अधिकारी ग्राम सेवकांकडे केला व त्यावरील पत्ता गावचा दिला. मात्र द्वितीय अपिल करताना स्वतःचा पत्ता हा मुंबईचा दिला. यावरुन अपिलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचा वापर स्वतःच्या सोयीनुसार केला आहे व हे गैर आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदर अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**
**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १६-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**
**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१११/अपिल क्र. ६२५३/२०१०**

**श्री.महंमद हमीद शेख,** **...अपिलकर्ता**
**नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,**
**संत ज्ञानेश्वर नगर,**
**बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (दक्षता),**
**३ रा मजला, विस्तारीत इमारत, बृहन्मुंबई मनपा. कार्यालय,**
**महानगरपालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियंता (दक्षता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ५४६, अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प इमारत,**
**सिमेंट गोडाऊन इमारत, २ रा मजला, बकरी अड्डा,**
**एन.एम.जोशी मार्ग, भायखळा,मुंबई ४०० ०११.**
**...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १४/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १७/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०२-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियंता (दक्षता) अधिकारी यांच्याकडे, टी वार्ड, विभाग कार्यालय, मुंलूड, परिरक्षण खात्यातर्फे झालेल्या कामाचे सर्वे इनस्पेक्शन चौकशी करुन मराठीत लेखी स्वरुपात मला माहिती द्यावी. तसेच आपल्या दक्षता खात्यातर्फे आपण जे वार्ड, विभागवार प्रत्येक वर्षाला कामाची चौकशी करीता (विजीलंस राऊड) त्याप्रमाणे दिनांक ०१-०४-२००८ ते १९-०४-२०१० पर्यंत कामाची तपासणी कार्यपद्धती कशा प्रकारी केली आहे त्याबाबत मला प्रत्येक बीटमधील एका वर्क ऑर्डरचे तपासणी इनस्पेक्शन केलेली लेखी स्वरुपात तुमच्या सहीसह संबंधीत अधिकारी, वरीष्ठ अधिकारी यांच्या सहीसह मराठीत लेखी स्वरुपाची माहिती देण्यात यावी. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०७-२०१० रोजी टी विभागतील विविध भागांच्या दिनांक ०१-०४-२००८ ते १९-०४-२००८ पर्यंत केलेल्या पाहणीबाबतचे अभिलेखे आपणास पूर्वसूचना देऊन या कार्यालयात पाहता येतील व सदर पाहणीनंतर ज्या कागदपत्रांच्या प्रति आपणांस हव्या असतील त्या विहित शुल्क रु.२/- प्रति प्रत भरुन उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु कर्तव्यावर असणारे अधिकारी जागेवर भेटत नाही असे कारण देवून अपिलकर्ता यांनी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक ०३-०९-२०१० रोजी दिलेला असून अपिलकर्ता यांनी तपासणी केलेली आहे आणि त्यांना प्रती सुद्धा दिलेल्या आहेत. परंतु त्यांना आणखी अधिक माहिती पाहिजे आहे. ती जन माहिती अधिकारी यांनी द्यावी व आवश्यक ते शुल्क आकारावे असा आदेश देवून सदरचे अपिल हे निकाली काढण्यात

आलेले दिसून येते. मात्र अपिलकर्ता यांनी त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. द्वितीय अपिल मेमो मध्ये त्यांना माहिती मिळाली परंतु मराठी भाषेत मिळाली नाही व ती मराठी भाषेत द्यावी. याकरीता माहिती मराठीत द्यावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

अपिलकर्ता हे आज गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महानगरपालिके तर्फे जो तपासणी अहवाल तयार होता तो इंग्रजी भाषेत आहे व त्यामुळे तपासणी अहवाल मराठीत करुन देणे अपेक्षित नाही. माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असते त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (च) (ञ)** प्रमाणे अपेक्षित आहे व त्यामुळे इंग्रजी भाषेत माहिती असल्यास तशीच उपलब्ध होईल. त्याचे कोणत्याही प्रकारे भाषातंर करुन देता येणार नाही.

जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे **"माहिती"** या संज्ञेची व्याख्या व **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या तपासली असता असे दिसून येते की, कागदपत्रे ज्या स्वरुपात उपलब्ध असतील त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्यामुळे महाराष्ट्र राज्याची राजभाषा ही मराठी असल्यामुळे महानगरपालिकेने सुद्धा त्यांचे सर्व कामकाज मराठी भाषेमध्ये करणे आवश्यक आहे व पुढील कामकाज त्यांनी मराठी भाषेत करण्याचा प्रयत्न करावा. मात्र या अर्जाच्या तारखेस ज्याप्रमाणे माहिती उपलब्ध असले त्याप्रमाणे ती उपलब्ध होईल. माहिती उपलब्ध झ ाली नाही असे अपिलकर्ता यांची तक्रार नाही. त्यामुळे सदरच अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**
**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०११६/अपिल क्र. ६२५४/२०१०**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१३५/अपिल क्र. ६२५५/२०१०**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१३४/अपिल क्र. ६२५६/२०१०**

**श्री.उत्तमकुमार वालजीभाई पटेल, ...अपिलकर्ता**
**द्वारा, श्रीमती अरुणा के. टांक,**
**पन्हाळ गड, व्ही-७, २ रा मजला, रुम नं. २०२,**
**अशोक वन, बोरीवली (पूर्व),मुंबई ४०० ०६६.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता नगर रचना (I),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८.**
**...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १३/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १७/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०११६/अपिल क्र. ६२५४/२०१०**

अपिल क्रमांक ६२५४ मध्ये अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (नगर रचना) यांच्याकडे, Reference Letter No. Asst/gn/१५०६०/Estate dt. ३०-०७-२०१०, माहितीचा कालावधी १९९७ ते आजतागायत अशा प्रकारीची माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जा सोबत अपिलकर्ता यांनी प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता), जी / उत्तर यांना दिनांक ३०-०७-२०१० रोजीची प्रत जोडलेली आहे. परंतु त्यांनी दिनांक १९-०७-२०१० रोजी जो माहितीचा अर्ज केला होता त्याबाबतची प्रत जोडलेली नाही. सदर अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०४-०९-२०१० रोजी उत्तर दिले असून मागितलेली माहितीचे वर्णन स्पष्ट नाही. त्यामुळे ती देता येत नाही असे त्यांनी कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १३-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ११-१०-२०१० रोजी देण्यात आला असून सुनावणी मध्ये अपिलकर्ता यांचे दिनांक १७-०७-२०१० रोजीच्या संदर्भामध्ये जो मुळ अर्ज त्यांनी अग्निशामक दल यांच्याकडे केलेला होता. त्याबद्दलची माहिती घेवून Equation Record जर उपलब्ध नसेल त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना कळवावे असा आदेश देवून सदरचे अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झ ााल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जो माहितीचा अर्ज केलेला आहे त्या अर्जामध्ये स्पष्टपणे कोणत्याही प्रकारे माहितीचे वर्णन केलेले नाही. त्यांनी अग्निशामक दलाकडे पूर्वी जो अर्ज केला होता त्या संदर्भामध्ये प्रशासकीय अधिकारी ( मालमत्ता) यांनी जे उत्तर दिलेले आहे त्याचा फक्त संदर्भ दिलेला आहे व त्या अर्जात सुद्धा काय माहिती मागितली याबद्दल कोणताही उल्लेख नाही असे असून सुद्धा अपिलकर्ता हे अधिकार फिरवतात म्हणून आरोप करतात. अपिलकर्ता यांनी स्पष्टपणे मागितलेल्या माहितीचे वर्णन केल्यास माहिती उपलब्ध आहे किंवा नाही हे तपासून देता येईल व माहिती उपलब्ध नाही त्याबद्दल स्पष्टपणे कळविल्यावर सुद्धा अपिलकर्ता हे विनाकारण आरोप करत असतात. एकाच विषयाच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांचे वेगवेगळ्या पद्धतीने केलेले अनेक अर्ज त्यांच्याकडे आहेत. माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. माहितीचा अर्ज किती ही केला तरी  तयार करुन उपलब्ध होवू शकत नाही. अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती मुळात सन १९६३ च्या T.P.Scheme च्या प्रमाणे आहे. त्या वेळीचा सध्याच्या अंमलात असलेल्या नगर रचना कायदा सुद्धा नव्हता असे असेल तर पूर्वीच्या सन १९५० च्या नगर रचना कायद्याप्रमाणे T.P.Scheme तयार झालेला असेल व त्यात आरक्षण दाखविण्यात आलेले असेल तर आरक्षित भूखंड हा कशाप्रकारे संपादित करण्यात आलेला आहे. या बद्दल महानगरपालिकेत जर माहिती उपलब्ध नसल्यास संचालक नगर रचना, पुणे किंवा सह संचालक नगर रचना, बृहन्मुंबई यांच्याकडे संर्पक साधुन पूर्वीच्या संबंधित माहिती उपलब्ध आहे किंवा नाही याबद्दल विचारणा करणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१३५/अपिल क्र. ६२५५/२०१०**

अपिल क्र.६२५५ मध्ये अपिलकर्ता यांनी दिनांक १०-०८-२००८ रोजी जन माहिती अधिकारी आयुक्त महानगरपालिका यांच्या कार्यालयामध्ये, घरंदाज बिल्डर्स यांना श्री. गणसिद्धिविनायक, एस.आर.ए. को.ऑप.हौ.सो.लि., TPS II, माहिम डिव्हिजन, ओरिजनल प्लॉट नं.९०. लेट. दिलीप गुप्ते मार्ग, माहिम यांनी दिलेला भूखंड नं.९५ किंवा ९५ (pt) (Rehab Bldg. No.२C and १B) under DCR ३३(१०) च्या संदर्भात संपुर्ण कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १३-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ११-१०-२०१० रोजी देण्यात आला असून सदर विषय हा मुख्य कार्यकारी प्राधिकरण ( झोपडपट्टी पुनर्वसन) यांचा असल्यामुळे त्यांच्याकडे पाठविलेला आहे व तसे अपिलकर्ता यांना असे कळविलेले आहे. त्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, झापेडपट्टी प्राधिकरणाकडून त्यांना दिनांक १८-११-२०१० रोजी माहिती उपलब्ध झाली. परंतु प्लॉट नं. ९५ च्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे झोपडपट्टी पुनवर्सन म्हणून कोणतीही आधी सुचना दिलेली नाही असे त्यांना कळविण्यात आले व त्यामुळे त्यांनी पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, भूखंड नं.९५ वर झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरणाने कोणत्याही प्रकारे आधिसूचना दिलेली नाही असे सांगितले परंतु त्या भूखंडावर दोन इमारती उभ्या आहेत. याचा अर्थ महानगरपालिकेकडुन त्या इमारती संदर्भामध्ये निश्चितच बांधकाम परवानगी दिलेली असावेत म्हणून त्यांना त्याबद्दलची माहिती महानगरपालिकेकडून मिळणे अपेक्षित आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, म्हणून भूखंड नं.९२ वर महानगरपालिकेकडून कोणत्याही बांधकामाची परवानगी देण्यात आलेली नाही. तसे असल्यास अपिलकर्ता यांना स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१३४/अपिल क्र. ६२५६/२०१०**

अपिल क्र. ६२५६ मध्ये अपिलकर्ता यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, जी / एन वार्ड ऑफिसर यांच्याकडे, भूखंड नं. अवैध बांधकाम केल्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कारवाई केली त्या संदर्भात SRA यांच्याकडून आलेला दिनांक ३१-०७-२०१० रोजीची प्रत व दिनांक १८-०२-२०१० चे पत्र त्यांनी जोडलेले आहे. त्यावर

जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही असे दिनांक ३१-०८-२०१० रोजी कळविले. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १३-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ११-१०-२०१० रोजी देण्यात आला असून सदर विषय हा कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन यांचे असल्यामुळे त्यांचा अर्ज हा त्या प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे व महानगरपालिके तर्फे कोणत्याही प्रकारे कारवाई केलेली नाही हे सुद्धा त्यांना दिनांक ३१-०८-२०१० च्या पत्रात कळविलेले आहे व त्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, भूखंड नं.९७ वर जे SRA Scheme अवैध आहे व त्या संदर्भामध्ये महानगरपालिकेने कारवाई करणे आवश्यक होते व त्यामुळेच तशी माहिती मागितली परंतु माहिती अधिकारी यांनी त्याबाबत काहीही माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, भूखंड नं.९७ वर झोपडपट्टी जाहीर झाल्यानंतर त्या करीता नियोजन प्राधिकरण आहे व त्या बाबतचे सर्व अधिकारी हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास असल्यामुळे व महानगरपालिकेचा कोणताही अधिकार नसल्यामुळे कारवाई करता येत नसल्यामुळे ती करण्यात आलेली नाही व ही बाब अपिलकर्ता यांना दिनांक ३१-०८-२०१० च्या पत्रान्वये स्पष्टपणे कळविण्यात आलेले असल्याने सदरचे अपिल हे निकाली काढण्याची विनंती केली आहे. दिनांक ३१-०८-२०१० च्या पत्राचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**५) अपिल क्र. ६२५४ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांना १९६३ चे** T.P.Scheme **योजनेप्रमाणे आरक्षित भूखंड संपादन करण्याच्या संदर्भामध्ये जे अभिलेखे, दस्तऐवज मागितले जातात त्याकरीता संचालक नगर रचना, पुणे व सह संचालक, बृहन्मुंबई विभाग यांच्याकडे संदर्भ करुन सदरचे अभिलेखे उपलब्ध असल्यास ती महानगरपालिकडे उपलब्ध करुन देण्यात यावीत अशी विचारणा करावी व त्याप्रमाणे अभिलेखे उपलब्ध झाल्यास अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत व उपलब्ध न झाल्यास तसे अपिलकर्ता यांना स्पष्टपणे कळविण्यात यावी.**

**६) अपिक क्र. ६२५५ मध्ये भूखंड नं. ९५ च्या संदर्भामध्ये बांधकाम परवानगी दिल नसल्यास तसे स्पष्टपणे अपिलकर्ता यांना कळवावे.**

**७) अपिल क्र.६२५६ हे निकाली काढण्यात येते.**

८) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १७-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०११६/अपिल क्र. ६२६५/२०१०

श्री.मुस्तफा याकूब बागलकोटे, ...अपिलकर्ता
१६६/१०, प्लेझंट पार्क, ३ रा माळा,
A विंग प्लॅटट क्र. ३०२, जव्वाद हॉटेलसमोर,
४ था निजामपूर, २रा बौद्ध वाडा, भिंवडी, जि. ठाणे - ४२१ ३०२.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन - विभागीय कार्यालय, ठाणे.

**जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक (वरिष्ठ),**
**रा.प.भिंवडी आगार, भिंवडी - ४२१ ३०२.**
**जि. ठाणे.**
**...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १३/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित. (प्रतिनिधी)**

अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०२-२०१० रोजी जन माहिती अधिकारी आगार व्यवस्थापक, भिंवडी आगार यांच्याकडे, त्यांचा मुलगा जावेद मुस्तफा बागलकोटे याचे सन २००७ व २००९ मध्ये वय २५ वर्षे पेक्षा जास्त असल्याने त्याला कॉलेजच्या सुट्टीमध्ये गावी जाण्याकरीता प्रवास सवलत नाकारण्यात आली होती. परंतु माझ्या मुलाचे सन २००७ मध्ये वय २५ वर्षे असताना व प्रवास सवलत लागू असताना ती का नाकरण्यात आली याबद्दलची माहिती व या संदर्भात त्यांनी एकूण ३ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १३-०३-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०४-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक निरंक रोजी देण्यात आलेला दिसून येतो व त्यानंतरही अपिलकर्ता यांना संबंधित आदेशाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली तरी सुध्दा अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे दिशाभूल करणारी माहिती दिली या कारणास्तव द्वितीय अपिल दाखल कलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांचा मुलगा वय २५ वर्षाच्या आत असताना सवलत नाकरण्यात आली होती. त्याबाबतची माहिती विचारलेली आहे. माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी नाकरण्याच्या प्रकीयेबद्दल कारणमिमांसा विचारलेली आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध होते तसे त्यांना आगार व्यवस्थापक यांनी दिनांक १३-०७-२०१० रोजी कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना प्रचलित नियमाची प्रती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळेच माहिती अधिकारात माहिती उपलब्ध झालेली आहे. गुणवत्तेच्या बाबत माहिती अधिकारात कोणत्याही प्रकारे तपासणी करता येत नाही. अपिलकर्ता यांना मुलगा सवलत नाकरण्याचा आदेश, त्या वेळेस त्यांच्या मुलाचे असलेले वय व नियमाची प्रती यावरुन अपिलकर्ता यांना संबंधित योग्य त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात येईल. माहिती मिळाली असल्यामुळे सदर अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

३) अपिल निकाली काढण्यात येते.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १९-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.**

क्रमांक : मुमाआ२०११/२५७-अ/तक्रार
क्र.१३४

**क्रमांक : मुमाआ२०११/२५७-अ/तक्रार क्र.१३५**

**क्रमांक : मुमाआ२०११/२५७-अ/तक्रार क्र.१३६**

**क्रमांक : मुमाआ२०११/२५७-अ/तक्रार क्र.१३७**

**श्री. राजन रामचंद्र गेरा,**
**७१८/२, राधा निवास, ५ वा मजला,**
**पी.डी. हिंदुजा मार्ग,**
**खार (पश्चिम), मुंबई -४०० ०५२.** **----तक्रारदार**

**---विरुद्ध---**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**एच / पश्चिम वार्ड, सेंट मार्टिनस रोड,**
**बांद्रा (पश्चिम),मुंबई -४०० ०५०.** **----गैरतक्रारदार**

**---निर्णय----**

| | |
|---|---|
| **सुनावणीचा दिनांक** | **:१९.०३.२०११** |
| **तक्रारदार** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारी सोबत त्यांनी माहितीचा अर्जाची प्रत दाखल केलेली नाही. प्रथम अपिल केलेले दिसून येते. प्रथम अपिल मेमोची प्रत दाखल केलेली नाही. मात्र प्रथम अपिलाचा आदेश दाखल केलेला दिसून येते. प्रथम अपिल दाखल केलेले असून प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला असला तरी त्या निर्णयाविरुद्ध अधिनियामाचे कलम १९ (३) प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल करावे लागते. परंतु अपिलकर्ता यांनी कलम १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (१) अन्वये अर्जाप्रमाणे ३० दिवसांत माहिती उपलब्ध झाली नाही तर माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम १८ प्रमाणे तक्रार दाखल करणे संयुक्तीक असते. प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर कलम २१ प्रमाणे द्वितीय अपिल दाखल करणे कायदेशीर असते. या सर्व तक्रारीच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांनी कोणत्याही प्रकारे अधिनियमाचे पालन केलेले नाही.

तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी ज्या तक्रारी आयोगापुढे दाखल केलेल्या आहेत त्या त्यांचे दिनांक २४-०२-२०१० च्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये विभागाने कोणत्या प्रकारे कारवाई केली याबद्दलची माहिती मागितलेली होती व माहिती मिळाली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार केलेली आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे ४ ही अर्जांच्या संदर्भामध्ये विभागाने त्यांचे दिनांक ०९-०२-२०१० रोजी गॅरेजच्या भिंती तोडण्याच्या संदर्भामध्ये जी नोटिस दिनांक १७-०१-२००५ आणि आदेश दिनांक २५-०२-२००५ रोजी देण्यात आला होता. कोणत्या प्रकारची कारवाई केली ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच दिनांक १५-०१-२०१० रोजी तक्रार केली. इलेक्ट्रीक कॅबीन ही दुकानामध्ये रुपातंर केल्याच्या संदर्भामध्ये आणि ते अनधिकृत फेरफार केलेले आहे. त्या फेरफारीच्या संदर्भामध्ये जी कारवाई करण्यात आलेली आहे त्या कारवाईची माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच दिनांक २९-०८-२००५ रोजीच्या गॅरेज संदर्भामध्ये Change of user ची तक्रार केलेली आहे. त्या संदर्भामध्ये कोणत्या प्रकारची कारवाई केली ती सुद्धा त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच दिनांक ०९-०२-२०१० रोजी तक्रार केलेली आहे. त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये सुद्धा कोणत्या प्रकारची कारवाई केली याबद्दलची माहिती उपलब्ध करुन देता येईल जन माहिती अधिकारी यांनी असे आयोगापुढे सांगितल्यामुळे या निर्णयापासुन १० दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना वरील प्रमाणे त्यांच्या ४ ही तक्रारीच्या संदर्भामध्ये केलेली कारवाई कागदपत्रांच्या स्वरुपात छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे त्या कारवाईच्या संदर्भामध्ये अंतिम कारवाई ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगितले. सदर कारवाई ३० दिवसांच्या आत करुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याकरीता तक्रारदार यांचे ४ ही तक्रार ही मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**३) तक्रारदार यांची तक्रार क्रमांक १३४, १३५, १३६ व १३७ ह्या मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांचे दिनांक २४-०२-२०१० च्या ४ ही अर्जामध्ये त्यांनी केलेल्या दिनांक ०९-०९-२०१०, १५-१०-२०१०, ०९-०८-२००५ व १८-०१-२०१० रोजी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेल्या कारवाईची माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावीत. तसे झालेल्या कारवाईच्या संदर्भात ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १९-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**
**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०२२५/अपिल क्र. ६२२८/२०१०**

श्री.दिलीप बी. नेवाटिया, ...अपिलकर्ता
शशी दीप, ५-ए, वरळी, सी फेस,
मुंबई ४०० ०३०.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(संरक्षण व सुरक्षा)
२८, वजू कोटक मार्ग,
बॅलार्ड पियर, मुंबई.

जन माहिती अधिकारी तथा सह पोलीस आयुक्त (प्रशासन),
२८, वजू कोटक मार्ग,
बॅलार्ड पियर, मुंबई. ...उत्तरवादी

---निर्णय---

व्दितीय अपिलाचा दिनांक -२८/१०/२०१०
सुनावणीचा दिनांक - १८/०३/२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यसन अधिकारी मुख्य सचिवांचे कार्यालयामध्ये, Information on vehicles coming to Mantralaya and new Administrative Builing which are fitted with Red / Amber lights and

vechicles fitted with sirens / multi-tones horns. List of vechicles या सर्व वाहनांच्या संदर्भामध्ये त्यांनी वाहन नोंदणी क्रमांक, वाहनाचे मॉडेल इत्यादी माहिती तसेच त्यांना मंजूरी नाही अशी वाहने तसेच माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २८-०७-२०१०रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरची माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना सुरक्षितेच्या दृष्टिने लाल किंवा अंबर बत्ती व सायरन व विविध आवाजाचे वाहनांना अधिकृतरित्या परवानगी आहे किंवा नाही. तसेच मंत्रालयामध्ये जी वाहने येतात त्यांना अधिकृतरित्या परवानगी आहे किंवा नाही व नवीन प्रशासकीय भवनामध्ये जी वाहने येतात त्यांना अधिकृतरित्या परवानगी आहे किंवा नाही याबद्दलची माहिती मागितलेली होती. त्यांच्या निरीक्षणाप्रमाणे बहुतांश वाहनांना लाल किंवा अंबर दिवाच बसविण्यात आलेला आहे त्या वाहनांनी ही अधिकृतरित्या परवानगी घेतलेली नाही. त्यांनी परिवहन विभागाकडून त्याबाबतची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे व त्यानंतर ज्या ज्या वाहनांवर लाल किंवा अंबर बत्ती आहे त्याचे निरीक्षण करुन क्रमांकासहित नोंद केलेली आहे व त्या वाहनांची त्यांनी परिवहन आयुक्तांच्या कार्यालयातून पडताळणी सुद्धा केलेली आहे. त्यात त्यांना अशा बरीच वाहने आहेत की त्यांचे पुर्वी ॲटोरिक्षा किंवा स्कूटर किंवा मोटार सायकला जो क्रमांक दिला होता त्यांचा क्रमांक हा बहुतांश वाहनांना दिलेला आहे असे आढळून आले व त्यांनी ती माहिती मागितलेली होती. त्याप्रमाणे त्यांना जी माहिती मिळाली ती अपुर्ण मिळाली. त्यांनी माहिती मागितलेली होती मुख्य सचिवांच्या कार्यालयात परंतु माहिती ही मंत्रालय सुरक्षा कार्यालयातून दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, अपिलकर्ता यांनी मुळात मंत्रालय, नवीन प्रशासन भवन येथे येणाऱ्या लाल व अंबर गाड्याचे वाहतूक आयुक्तांचे कार्यालयाने मान्यता दिलेल्या काळात माहितीसह उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच मंत्रालयात जे शासकीय वाहने येतात त्यांना मंत्रालयातील सुरक्षिता विभागातुन दिलेले Speaker असणे आवश्यक आहे. अंबर किंवा लाल दिवा अधिकृत आहे किंवा नाही यापेक्षा मंत्रालयात प्रवेश करणाऱ्या वाहनांवर मंत्रालय सुरक्षा विभगात Speaker असल्याशिवाय प्रवेश करता येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती तपशीलात मंत्रालय सुरक्षा विभगात देता येत नाही. नवीन प्रशासकीय इमारतीत अशी कोणतीही Speaker ची तरतूद नाही व त्यामुळे नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये दाखल केलेल्या वाहनांच्या बाबतीत तशी पडताळणी केली जात नाही व त्याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. असे असल्यास अपिलकर्ता यांना मंत्रालयात प्रवेश करणाऱ्या वाहनाची तशी माहिती दिलेली आहे. तसे नवीन प्रशासकीय इमारतीत कोणते वाहन पडताळणी संदर्भात कोणती कार्यपद्धत आहे त्याबाबत स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश-----**

**३) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी मा.पोलीस उप आयुक्त संरक्षण व सुरक्षा, मुंबई यांचे कार्यालय यांनी अपिलकर्ता यांना नवीन प्रशासकीय इमारतीच्या संदर्भामध्ये लाल,**

पिवळया दिव्याच्या संदर्भामध्ये तसेच सुरक्षितेच्या संदर्भामध्ये वाहन प्रवेशाबाबत कोणत्या प्रकारची कार्यपद्धत आहे किंवा याबद्दल स्पष्टपणे नोंदणीकृत टपालाने विनामुल्य कळविण्यात यावी.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १८-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

३) निवडनस्ती,
४) श्री.चौरे,सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/अपिल क्र. १०६९/२००९/पुणे

श्री.नंदकुमार बाबुराव काळे व ...अपिलकर्ता
श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते,
४१/४२ कमर्शियल बिल्डींग नं.१.
आर्केटयार्ड, गुळटेकडी, पुणे ३७.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक,
जुन्नर वन विभाग, तहसील कार्यालयाजवळ,
जुन्नर. ता.जुन्नर. जि. पुणे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (बिल्ट)
जुन्नर वन विभाग, तहसील कार्यालयाजवळ,
जुन्नर. ता.जुन्नर. जि. पुणे. ...उत्तरवादी

---निर्णय---

**व्दितीय अपिलाचा दिनांक - २८/०८/२००९**
**सुनावणीचा दिनांक - १५/०२/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १९-०२-२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप वन संरक्षक अधिकारी यांच्याकडे, संपुर्ण ग्रामीण हमी योजनेच्या संदर्भामध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व तालुकेतील वनक्षेत्रपाल यांनी सन २००२ - २००८ पर्यंतच्या कालावधी. मृद व जलसंधारण कामे केली ती कामे चालू असताना किंवा काम पुर्ण झाल्यावर जे अनुदान वितरणाचे आदेश तालुक्याला मिळाले त्या आदेशाच्या झेरॉक्स प्रती व त्या संदर्भात त्या कामवर हजर असणाऱ्या मजुरांवर हजेरी पटाच्या (मस्टरच्या) झेरॉक्स प्रती अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती ही ता.जुन्नर, ता. आंबेगाव, ता. खेड, ता. शिरुर च्या क्षेत्रातील दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ३०-०४-२००९ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १२-०६-०२००९ रोजी देण्यात आलेला आहे. परंतु त्यानंतर ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये खर्चाचा भरणा सुध्दा केलेला आहे. परंतु त्यांना अपुर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती अतिशय विस्तृत प्रमाणात असून वनक्षेत्रपालाच्या कार्यक्षेत्रातुन संकलित करुन उपलब्ध करुन देणे हे ३० दिवसांच्या कालावधीमध्ये शक्य नव्हते. परंतु तरीही अर्ज प्राप्त झाल्यावर दिनांक २७-०२-२००९ रोजी अपिलकर्ता यांनी त्यांच्या अर्ज दिनांक २४-०२-२००९ रोजी प्राप्त झ ाल्यानंतर मागणी केलेली माहिती तपशील हा मोठ्या कालावधीचा असल्याने माहिती संकलित करण्यासाठी बराच अवधी लागणार असल्याने मुदतीत कार्यवाही होणे अशक्य आहे. तरी सदर माहिती संकलित झाल्यानंतर अधिनियमाचे कलम ७ अन्वये माहिती साठी आवश्यक शुल्क भरणा करण्याचे सुचना या कार्यालयाकडून कळविण्यात येईल असे कळविलेले दिसुन येते. त्याचप्रमाणे दिनांक २७-०२-२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी जुन्नर वन विभाग, जुन्नर यांनी एक ज्ञापन काढुन अर्जदाराने मागितलेली माहिती तयार ठेवण्यात यावी तसेच अधिनियाचे कलम ७ अन्वये उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक शुल्काचा तपशील ८ दिवसांचे आत माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५(५) नुसार सादर करावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक ०९-०३-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी ज्ञापन काढुन वन विभाग कार्यालय कक्ष - ६, वन परिक्षेत्र अधिकारी सर्व यांना स्मरण पत्र दिले. त्यानंतर दिनांक १८-०३-२००९ रोजी स्मरण पत्र दिले. पुन्हा दिनांक २४-०३-२००९ रोजी उपवन संरक्षक जुन्नर विभाग यांनी प्रशासकीय प्रमुख म्हणून संबंधितांना माहिती तत्काळ सादर करण्याचा आदेश द्यावेत तसेच भविष्यात अपिल दाखल झाल्यास संबंधितांना माहिती अधिकारी यांना जबाबदार धरण्यात यावेत असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक २५-०३-२००९ रोजी ज्ञापन हे उप

वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर यांनी काढलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना त्यानंतर दिनांक १३-०५-२००९ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली असून खर्चाचा भरणा करण्याच्या संदर्भामध्ये चलन भरणा केल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसुन येते व त्याप्रमाणे अपिलाच्या निर्णयामध्ये सुद्धा चलनाद्वारे शुल्क भरणा करण्याचे कळविले असून त्यानुसार रक्कम भरल्यानंतर विभागीय कार्यालयातील कक्ष - ६ (एस.जी.आर.वाय) यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच मुद्दा क्र.३ व ४ मागणी केलेली माहितीमध्ये हजेरी पत्रकाच्या प्रती ह्या आवश्यक दस्त असल्याने अर्जदार यांनी समक्ष पाहणी करण्यासाठी निकालपत्र प्राप्त झालेपासून १ महिन्यांचे आत जुन्नर वनविभाग कार्यालय कक्ष - ६ (एस.जी.आर.वाय) यांचेकडे उपलब्ध आहे असे कळविलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी तसेच कक्ष - ६ यांच्याकडुन माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नाही म्हणून माहिती त्यांना उपलब्ध करुन देता आलेली नाही. मात्र माहिती कार्यालयाकडे उपलब्ध झाली त्याबाबत कार्यालयीन पत्र क्र. ४५६, दिनांक १३-०५-२००९ अन्वये अर्जदार यांना चलनाद्वारे शुल्क भरण्याचे कळविले. अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, खर्चाचा भरणा करुन सुद्धा माहिती त्यांना अपुर्ण उपलब्ध झालेली आहे. तसे असल्यास अपिलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली नाही त्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना अर्ज करुन विशिष्ट माहिती नमुद करुन कळविणे संयुक्तिक राहील व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

अपिलकर्ता यांनी माहिती विस्तृत प्रमाणात जर मागितलेली होती तर जन माहिती अध्किारी यांनी ती संकलित करण्याकरीता विहित मुदतीत संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी यांना कळविलेले होते म्हणजेच वन परिक्षेत्र अधिकारी यांच्याकडुन माहिती पुरविण्यासाठी त्यांनी सहाय्य अधिनियमाचे कलम ५ (४) प्रमाणे घेतलेले होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा प्रशासकीय अधिकारी म्हणून ज्ञापन काढलेले होते. परंतु तरी सुद्‌धा माहिती ज्या संदर्भामध्ये विलंबाने कळविण्यात आलेली होती व त्यामुळे अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे जे अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी सहाय्य घेण्यात आलेले होते त्यांना कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजुन विलंबाच्या कारणास्तव त्यांच्या विरुद्ध अधिनिमयाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाई करणे संयुक्तिक राहील. जेणेकरुन माहिती ही ३० दिवसांत उपलब्ध करुन देण्याची जबाबदारीची जाणीव त्यांना होईल व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**------आदेश------**

**४) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध झाली नाही त्या संदर्भात अर्ज करुन कळवावे व तसे कळविल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उर्वरित माहिती उपलब्ध करुन देण्यात यावीत.**

**५) अपिलकर्ता यांचे दिनांक १९-०२-२००९ रोजीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजी कळविणे सुद्धा त्या सर्व वन परिक्षेत्र अधिकारी व रोजगार हमी योजना कक्ष - ६ यांना अधिनियमाचे कलम ५(४)**

प्रमणे सहाय्य करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. परंतु त्यांनी ती मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजुन त्यांच्याविरुद्ध अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येते. सदर शिस्तभंगाची कारवाई ही उप वनसंरक्षक यांनी अथवा योग्य त्या सक्षम अधिकाऱ्यांनी करावयाची आहे.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

पुणे
दिनांक : १५-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

५) निवडनस्ती,
६) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.
क्रमांक :मुमाआ/अपिल क्र. ३९१/२००९/पुणे

**श्री.अनंत देऊ गावडे,** **...अपिलकर्ता**
**रा. सर्व्हे नं. ३६/२ विद्यानगर,**
**लेन नं. ६, वर्ल्ड वॉटर टँक,**
**पुणे - ४११ ०१५.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रंक,**
**पुणे विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,**
**३ रा मजला, पुणे ४११ ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सह जिल्हा निबंधक वर्ग - १ व मुंद्राक जिल्हाधिकारी पुणे शहर,**
**५ फायनान्स रोड शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत,**
**२ रा मजला, पुणे - ४११ ००१.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२५/०५/२००९**
**सुनावणीचा दिनांक - १५/०२/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता गैरहजर आहेत. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी, आपणांस मा.असि. डायरेक्टर ऑफ इन्कमटॅक्स (Inv.) Unit -(२) पुणे यांचे दिनांक २७-१२-२००७ ची पत्रे मुद्रांक शुल्क कमी भरलेबाबत आलेली आहेत. मौजे वाघाली सर्व्हे नं. २३०१ व २३२७ बाबत आहे. कृपया सदर २ पत्राच्या प्रती द्याव्या. फी भरण्यास तयार आहे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०३-२००९ रोजी मागितलेली पत्राच्या प्रती विहित फी पान रु.२/- प्रमाणे भरल्यास या कार्यालयातुन उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळविलेले दिसुन येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २८-०४-२००९ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा अपिल मुदतीबाह्य असल्यामुळे निकाली काढलेले दिसुन येते व त्यामुळे समाधान न झ ाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. परंतु अपिलकर्ता यांचे दिनांक १६-०४-२००९ रोजी माहिती उपलब्ध झ ाली असे लेखी दिलेले असल्यामुळे सदर अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**
**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**पुणे**
**दिनांक : १५-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**७) निवडनस्ती,**
**८) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**
**क्रमांक :मुमाआ/अपिल क्र. ९८८/२००९/पुणे**

**श्री.बी.एन.शिंदे,**
**...अपिलकर्ता**
**पोस्ट बॉक्स नंबर १३,**
**गणेशखिंड, पुणे ४११ ००७.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,**
**शिवाजीनगर विभाग, एस.बी.रोड, चतृश्रुंगी मंदिरासमोर, पुणे - १६.**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,**
**औंध उपविभाग, औंध, पुणे ७.**
**...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - ०७/०८/२००९**
**सुनावणीचा दिनांक - १५/०२/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-११-२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, पुणे यांच्या कार्यालयामध्ये, स्पायसर कॉलेज-हायस्कूल-इंडस्ट्रीज या संस्थेस करण्यात आलेला विद्युत पूरवठ्याच्या संदर्भामध्ये सन २००० ते ऑक्टोबर २००७ या कालावधीतील तपशीलात माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ३१-१२-२००७ प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १२-०३-२००८ रोजी देण्यात आला असून अपिल मान्य करुन माहिती दिनांक ३१-०१-२००८ रोजी अपिलकर्ता यांना देण्यात आलेली आहे असे नमुद केलेले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना तसेच लेखी निवेदनामध्ये ३० दिवसांत माहिती देणे बंधनकारक असताना संबंधित उप अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांनी अर्जांची योग्य ती दखल घेतली नाही व माहिती सुद्धा दिली नाही. अपिल दाखल केल्यानंतर कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित उप कार्यकारी अभियंता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अनेक वेळा लेखी कळविले. त्यानंतर उप कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २८-१२-२००७ व ३०-०१-२००८ माहिती खोटी चुकीची दिलेली आहे ही बाब कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास आणून दिल्यामुळे उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी सूचना दिली. उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांनी दिनांक २८-१२-२००७ व ३०-०१-२००८ यांनी दोन्ही वेळेस खोटी माहिती दिलेली असल्यामुळे रु. ३ कोटी पेक्षा जास्त रक्कमेचे नुकसान होणार होते. उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांचे वैयक्तिक संबंध असल्यामुळे त्यांनी चुकीची माहिती दिली. त्यामुळे या ठिकाणी वीज चोरी होते व अनधिकृत वापर हे सिद्ध झाले व महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा रु. ३ कोटीचा फायदा झाला आहे हे सर्वांना माहिती आहे. चुकीची माहिती दिल्यामुळे दोषी व्यक्ती विरुद्ध कारवाई व्हावी असे त्यांनी युक्तीवादात सांगितले. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-१२-२००७ रोजी माहिती दिली होती परंतु माहिती चुकीची आहे या कारणास्तव पुन्हा उप कार्यकारी अभियंता औंध यांनी दिनांक ३१-०१-२००८ रोजी सविस्तर माहिती दिलेली दिसून येते. प्रथम अपिलाच्या निर्णयात सुद्धा दिनांक ३१-०१-२००८ रोजी सुनावणी घेतली त्याच दिवशी तत्काळ माहिती दिली यावरुन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांना अनेक वेळा सुचना देवून अपिलकर्ता यांना पुर्णपणे माहिती विहित मुदतीत देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले हे दिसून येते. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी खुलासा दाखल केलेला आहे व त्यामध्ये सुद्धा माहिती अधिकारी उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांनी दिनांक ३१-१२-२००७ रोजी अपुर्ण माहिती देवून, दिनांक ३०-०१-२००८ रोजी दिलेली असून त्यासाठी ५२ दिवसांचा विलंब झाल्याचे दिसून येतो असे खुलाशात म्हटले आहे. यावरुनच अपिलकर्ता यांचे म्हणणे हे योग्य असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी श्री.बी.एन.शिंदे यांना जाणीवपुर्वक माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केला आहे असे दिसुन येते व त्यामुळे त्यांच्याविरुद्ध शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादण्यापुर्वी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक आहे. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनीच माहिती विलंबाने दिलेली आहे असा निष्कर्ष काढलेला असल्यामुळे तसे आयोगापुढे सुद्धा तत्कालिन जन माहिती अधिकारी उप कार्यकारी अभियंता श्री. एम.एस.नन्हे यांना दूरध्वनी द्वारे त्यांच्या सुनावणीबाबत कल्पना देण्यात आलेली होती. परंतु या सुनावणीस ते हजर राहिलेले नाहीत. यावरुन त्यांना संधी देण्यात आलेली होती व त्यांनी मात्र स्वता:चे म्हणणे मांडण्याची संधी घेतलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुद्ध अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये ५२ दिवसांच्या विलंबाकरीता

प्रत्येक दिवसाला रु.२५०/- प्रमाणे रु.१३०००/- ची शास्ती लादणे आवश्यक झाले आहे व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना अपिलकर्ता यांचे दिनांक ०७-११-२००७ च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही ५२ दिवसांच्या विलंबाने दिलेली असल्यामुळे प्रती दिवस रु.२५०/- प्रमाणे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे एकूण रु.१३०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीची वसूली ही त्यांच्या दरमहाच्या वेतनातून करण्यात येवून लेखाशिर्ष, " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-१६-१)."या अर्थसंकल्पीय लेखाशिर्षाखाली जमा करावी.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**पुणे**
**दिनांक : १५-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**४) निवडनस्ती,**
**५) निवडनस्ती, (शास्ती)**
**६) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४९८५३/अपिल क्र. ६२२९/२०१०**

**ॲडव्होकेट श्री.राजेश बिंद्रा, ...अपिलकर्ता**
**एच.ओ. १९२-ए, केनी हाऊस,**
**धारावी, कोळीवाडा, मुंबई ४०० ०१७.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव,**
**विधी व न्याय विभाग, अ शाखा,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (विधी),**
**विधी व न्याय विभाग, अ शाखा,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२०/०९/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १८/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १५-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उप सचिव विधी व न्याय विभाग यांच्या कार्यालयामध्ये, "Advice given by the Law & Judiciary Department & Govt. Resolution passed by Tribal Development Department of Maharashtra State Government" च्या संदर्भात आदिवासी विकास विभाग क्रमांक 423/2430/Civil/Confl..A dated 19-12-2005, signed by

Mr.A.Z.Mohod, तसेच आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य शासन निर्णय परिपत्रक दिनांक १५-०६-१९९५ ची प्रमाणित प्रत ज्या अन्वये अनुसुचित जमातींना संरक्षण देण्यात आले होते व सदर संरक्षण नोव्हेंबर २००० पर्यंत वाढविण्यात आला त्याच्या प्रती उपलब्ध करुन द्यावेत. सदरची प्रत नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद कलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक २९-०३-२०१० रोजी उत्तर दिलेले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०४-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयात जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्तास दिनांक १९-१२-२००५ चे अभिमताची प्रमाणित प्रत व शासन निर्णय / परिपत्रक दिनांक १५-०६-१९९५ चे प्रमाणित प्रत द्यावी. परंतु अपिलकर्ता यांना त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक २९-०३-२०१० रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती प्रत वाचता येण्याजोगी नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी जी प्रत उपलब्ध करुन दिली त्यावरुन माहिती अधिकारी यांनी त्या मुद्दांच्या संदर्भात अभिप्राय कळविलेला दिसून येतो. त्यावर अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अभिप्रायातील मुद्दांची प्रत मागितलेली होती. तसेच दिनांक १५-०६-१९९५ चे शासन निर्णयान्वये कर्मचारी व अधिकारी यांनो संरक्षण देण्यात आलेले होते व असे संरक्षण ते नोव्हेंबर २००० पर्यंत वाढविण्यात आले अशा शासन निर्णयाची प्रत मागितलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारचे शासन निर्णय नाही असे आयोगापुढे सांगितले. जर असे असल्यास अपिलकर्ता यांना विधी व न्याय विभागतील उपसचिव यांच्या अभिमताची प्रत व आदिवासी विकास विभागात अशाप्रकारचा शासन निर्णय असेल त्याबाबतची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना कागदपत्रांच्या स्वरुपात व उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील व त्या करीता सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**------आदेश------**

**३) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून प्रथम अपिलीय अधिकारी त्यांच्या निर्णयात दिल्याप्रमाणे विधी व न्याय उपसचिवांचे दिनांक १९-१२-२००५ अभिमताची प्रमाणित प्रत व आदिवासी विकास विभागतील शासन निर्णय दिनांक १५-०६-१९९५ चे नोव्हेंबर २००० पर्यंत संरक्षण वाढविण्यात आलेले आहे अशा शासन निर्णयाची प्रत जो पारित केला असल्यास उपलब्ध करुन द्यावा व पारित केला नसल्यास तसे स्पष्टपणे कळविणे. सदरची माहिती विधी व न्याय विभागाकडे उपलब्ध नसल्यास आदिवासी विकास विभागाकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलकर्ता यांना तसे विनामुल्य हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत कळविण्यात यावी.**

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १८-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

३) निवडनस्ती,
४) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०२२९/अपिल क्र. ६२३२/२०१०

श्री.जयंतीलाल शाह व ...अपिलकर्ता
श्री.सुधाकर निटेकर,
शॉप नं. ४०, शास्त्रीनगर, म्युनिसिपल मार्केट,
संत ज्ञानेश्वर मार्ग, बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी -३ अभियांत्रिकी कक्ष,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,
बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,
बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.. ...उत्तरवादी

---निर्णय---

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२९/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १८/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १८-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या कार्यालयामध्ये, SRA scheme CTS No.६२९ (pt) सर्व्हे नं.३४१ बांद्रा (पूर्व) व परिश्रम को-ऑप.हौ.सोसायटी आणि शास्त्रीनगर म्युनसिपल मंडई व्यापारी सेवा संघ, सन २००० ते आता पर्यंतचा कालावधीतील माहिती म्हणजे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण महाराष्ट्र slum area (Improvement, Clearnce & Redevelopment) Act १९७१ कलम ३(c) in Government Gazzate as per circular ४२ date १२-०६-२००० issued by CEO, SRA about SRA scheme mention in above subject matter and copy of same Government Gazzete, Information the order issued by CEO, SRA regarding meeting/ hearing held on १७-०२-२०१० in CEO office for greavences of Shastri nagar Municipal Mandai Vypari Seva Sangh as per the Direction of High Power Committee SRA (copy of said notice for hearing on १७-०२-२०१० is attached herewith) & copy of order, Inoformation about allotment of A-१ & A-२ Basld as per Circular ५५ date ०५-०९-२००३ issued by Executive Engineer SRA and copy of the Entirely paper/document\nt/noting/C.D./photograph related to allotment of A१ & A२ building as per circulars आणि २ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही त्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०५-१०-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसुन येत नाही व त्यामुळेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, मागितलेली माहिती त्यांना आतापर्यंत मिळालेली नाही व दिनांक १२-०६-२००९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण परिपत्रक क्र.४२ प्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राची घोषणा करण्यात आली किंवा नाही याबद्दलची माहिती मिळालेली नाही व प्रथम अपिलाचा निर्णय सुद्धा देण्यात आलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दिनांक ०३-०७-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तसे पत्र श्री.जयंतीलाल शाह व श्री. सुधाकर निटेकर, शॉप नं. ४०, शास्त्रीनगर, म्युनिसिपल मार्केट,संत ज्ञानेश्वर मार्ग, बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ या पत्त्यावर पाठविलेले आहे. तसेच त्यामध्ये मुद्दा क्रमांक ३(iii)(a) च्या संदर्भामध्ये उपजिल्हाधिकारी, (झोपुप्रा) यांच्याशी संबंधित असल्याने त्यांच्याकडे हस्तांतरीत

केलेला आहे. तसेच मुद्दा क्रमांक ३(iii)(b) विधी सल्लागार या विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडे अर्ज हस्तांतरीत केलेला आहे. अपिलकर्ता यांनी ज्या परिपत्रकाचा नं.४२ चा आधार घेतलेला आहे त्यामध्ये १७ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांखालील क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घोषित केलेले आहे. त्यामध्ये अपिलकर्ता यांना ज्या क्षेत्राची माहिती हवी आहे त्या क्षेत्राचा समावेश नाही. तसेच अपिलकर्ता यांना ज्या क्षेत्राची माहिती पाहिजे आहे ती Censused slum (गणणाकृत) वा Notified slum असल्यास त्या करीता पुनर्वसनाची घोषणा करणे आवश्यक नसते. मात्र खाजगी भूखंड असेल तर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राची घोषणा करणे आवश्यक असते व त्यामुळेच अपिलकर्ता यांनी संबंधित पुनर्वसन योजना ही उपजिल्हाधिकारी (झोपुप्र) यांच्याशी संबंधित असल्याने अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला होता व त्या विभागाशी संर्पक साधुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले होते. त्यावर अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे जर एकच असेल तर इतर विभागांकडे माहिती अर्ज वर्ग करणे हे योग्य नाही व अर्ज वर्ग करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु जन माहिती अधिकरी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण जर एक असेल तर त्या त्या क्षेत्रात करीता पुनर्वसनाची योजना असते. त्या त्या योजनेकरीता स्वतंत्र उपजिल्हाधिकारी नियुक्त केले जातात व माहिती अधिकारी सुद्धा असतात व त्यामुळे त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक असते अन्यथा ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन देणे हे शक्य होणार नाही. अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०७-२०१० रोजी याच विषयाबाबत अपिलकर्ता / अर्जदारांनी सादर केलेल्या दुसऱ्या अर्जाच्या संदर्भात नस्तीचे निरीक्षणासाठी त्यांना बोलविण्यात आले होते. दिनांक ०५-१०-२०१० रोजी अपिल अर्जदार हे कार्यालयात उपस्थित होते तेव्हा अपिल अर्जदारांनी अपेक्षिलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या नस्तीचे निरीक्षण करण्यास सांगितले असता त्यांनी नस्तीचे निरीक्षण नंतर करतो असे सांगुन निघून गेले. त्यानंतर अद्यापपावेतो सदर नस्तीचे निरीक्षण करण्यासाठी ते आलेले नाहीत. अपिलकर्ता / अर्जदार हे वेळोवेळी नगर भू.क्र.६२९ (भाग), शास्त्रीनगर गृहनिर्माण संस्था या योजनेबाबत माहिती मागवित असतात. या कार्यालयात त्यांनी सादर केलेल्या विविध अर्जाच्या अनुषंगाने त्यांना प्रत्येक वेळी माहिती पुरविली जाते. अपिलकर्ता /अर्जदार यांना आवश्यक असणारी माहिती वेळोवेळी देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणी करीता दिनांक १२-१०-२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी - ३ यांनी दिनांक २६-१०-२०१० रोजी दुपारी ३.३० वाजता अपिलीय अधिकारी / कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, अभियांत्रिकी यांच्या कक्षात सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे असे पत्र त्याच पत्त्यावर दिलेले आहे. परंतु अपिलकर्ता हे सुनावणीस हजर झालेले नाही व त्यामुळेच प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही. त्याबाबतचे पत्र, सर्व कागदपत्रे आयोगापुढे सादर केलेले आहे. असे असेल तर अपिलकर्ता यांचा दिनांक ०३-०७-२०१० रोजीचा अर्ज हा उपजिल्हाधिकारी (झ ोपुप्र) यांच्याकडे वर्ग केलेला असेल तर त्यांनी मागितलेली माहिती SRA scheme CTS No.६२९ (pt) सर्व्हे नं.३४१ बांद्रा (पूर्व) व परिश्रम को-ऑप.हौ.सोसायटी आणि शास्त्रीनगर म्युनसिपल मंडई व्यापारी सेवा संघ च्या संदर्भामध्ये गणणाकृत झोपडपट्टी असेल तर सदर

अधिनियमांतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची घोषणा किंवा शासन निर्णय राजपत्रात प्रसिद्ध केले असल्यास किंवा तशी घोषणा प्रसिद्ध करणे आवश्यक नसलयास स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना SRA scheme CTS No.६२९ (pt) सर्व्हे नं.३४१ बांद्रा (पूर्व) व परिश्रम को-ऑप.हौ.सोसायटी आणि शास्त्रीनगर म्युनसिपल मंडई व्यापारी सेवा संघ च्या संदर्भामध्ये महाराष्ट्र slum area (Improvement, Clearnce & Redevelopment) Act १९७१ कलम ३(c) प्रमाणे राजपत्रात घोषणा केलेली असल्यास त्या घोषणेची राजपत्राची छायांकित प्रती घोषणा करण्याची आवश्यकता नसल्यास त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेऊन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावी.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १८-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**३) निवडनस्ती,**

**४) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४९८५१/अपिल क्र. ६२३१/२०१०**

**श्री.शेखर सदाशिव कांबळे, ...अपिलकर्ता**
**सी -२०४, शरयु बिल्डिंग, सेक्टर - ९,**
**वसंत नगरी, वसई (पूर्व), जि. ठाणे.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलिस उप आयुक्त,**
**पश्चिम परिमंडळ, लोहमार्ग मुंबई,**
**वरिष्ठ अनुभाग अभियंता (पॉवर), जुनी इमारत,**
**१ ला माळा, घासबाजार, विभागीये रेल्वे व्यवस्थापक,**
**पश्चिम रेल्वे,मुंबई सेंट्रल कार्यालयाजवळ,मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,**
**बांद्रा लोहमार्ग पोलीस ठाणे,**
**बांद्रे, मुंबई.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२०/०९/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १८/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ, लोहमार्ग मुंबई यांच्या कार्यालयामध्ये, १) बांद्रा लोहमार्ग पोलीस ठाणेचा माहे ८/०७ ते ३/१० या कालावधीतील प्रत्येक महिन्याचा ड्युटी बटवडा तक्त्याची झेरॉक्स प्रती (पोलस ठाणेकडून सांक्षाकित करुन), २) माझे रुग्ण कालावधी संदर्भातील मा.वरिष्ठ पोलीस निरिक्षक, बांद्रा लोहमार्ग पो.ठाणे यांनी सादर केलेला माझ्या विरुद्धचे प्राथमिक चौकशी संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अशी माहिती मागितलेली दिसुन येते. सदर माहिती व्यक्तीशः हवी असे नमुद केलेले दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १५-०४-२०१० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई अपिलकर्ता यांनी आपले मागणी प्रमाणे ड्युटी बटवडा तक्ताच्या छांयाकित प्रतीचे शुल्क रु.७,७८४/- एवढी होत असलेने आपण त्वरीत भरणा करावी असे कळविण्यात आलेले होते. त्यावर अपिलकर्ता यांनी दिनांक २०-०४-२०१० रोजी आक्षेप घेणरे पत्र दिलेले होते व त्यानंतर दिनांक २४-०४-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. दिनांक २८-०४-२०१० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई यांनी पोलीस उपआयुक्त लोहमार्ग, मुंबई यांच्याकडे अर्जदार यांना खर्चाचा भरणा करण्याची समज देण्यात यावी अशा प्रकारचे पत्राद्वारे कळविण्यात आले होते. प्रथम अपिलाचा निर्णय सुनावणीस जन माहिती अधिकारी हे हजर राहिले नसल्यामुळे पोलीस उप आयुक्त, (पश्चिम) लोहमार्ग मुंबई, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदरची माहिती निःशुल्क देण्याबाबत सुचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी निःशुल्क दिली तरी सुद्धा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले असुन जन माहिती अधिकारी नसताना वरिष्ठ पोलीस

निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई यांनी लेखी पत्राद्वारे रु.७,७८४/- रक्कमेची मागणी केली. परंतु सदर रक्कम किती पृष्ठांची व कोणत्या दराने कळविली आहे याचा उल्लेख स्पष्ट केला नाही. सदरचे अपिल हे ८ दिवस उशिराने सादर होते कारण वरिष्ठ पोलीस अधिकारी या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. गणपती बंदोबस्त असल्यामुळे असे कारण त्यांनी दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जदाराचा अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती तयार करण्यात आली होती व ती मान्यते करीता वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे देण्यात आली होती. परंतु श्री.राजीव सावंत हे पोलीस निरीक्षक तथा जन माहिती अधिकारी रजेवर असल्याने दुसऱ्या माहिती अधिकाऱ्याची नेमणूक या करीता श्री. सुर्वेगंध, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे हे जन माहिती अधिकारी नसताना अर्जदार व कार्यालयाशी चुकीच्या पद्धतीने पत्रव्यवहार केलेला आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता रु.७,७८४/- कळविण्यात आली होती. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ३१ पृष्ठांची होती व त्याप्रमाणे त्यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु श्री. सुर्वेगंध, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे यांनी ते जन माहिती अधिकारी नसताना अर्जदार व या कार्यालयाशी चुकीच्या पद्धतीने पत्रव्यवहार केला त्या कार्यालयाकडून दिनांक १७-०५-२०१० रोजी खुलासा करण्यास सांगितले असता सदरबाबत त्यांनी खुलासा केलेला नाही. परंतु दिनांक २६-०५-२०१० रोजी श्री. सुर्वेगंध यांनी स्वतःची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केल्याचे आदेश निर्गमित केले. परंतु श्री.राजीव सावंत, पोलीस निरीक्षक, यांचे रजेच्या काळात कोणही माहिती अधिकाऱ्याची नेमणूक न करता व अपिलाचे कामकाजात अडथळा निर्माण होईल अशा तऱ्हेने कामकाजाची पद्धत अबलंबलिेली आहे. प्रस्तृत प्रकरणात श्री.राजीव सावंत, पोलीस निरीक्षक व जन माहिती अधिकारी, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे यांनी दिनांक ०८-०६-२०१० रोजी सादर केलेल्या खुलाश्याचे अवलोकन करता श्री.राजीव सावंत, पोलीस निरीक्षक व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांना मुदतीत माहिती देण्यासाठी तयार केली होती. परंतु श्री. सुर्वेगंध, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे यांनी ती स्वतःजवळ अनाधिकारे ठेवून घेतली वर नमुद केल्याप्रमाणे आयोगापुढे सांगितले व त्याबाबत त्यांच्याविरुद्ध योग्य ती कारवाई व्हावी म्हणून दिनांक १९-०७-२०१० रोजी मा.पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांच्याकडे श्री.अनिल तमायचेकर, प्रथम अपिलीय अधिकारी, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ, लोहमार्ग मुंबई यांनी स्वंयस्पष्ट असे पत्र दिले. त्यांचा तो बेफिकीर व बेजाबाबदार उर्मट भाषेत पत्रव्यवहाराबद्दल व केंद्रिय माहितीच्या अधिनिमयाची पायमल्ली केली याकसुरीबद्दल त्यांना योग्य ते शासन होणेस विनंती आहे असे कळविलेले असून सुद्धा त्यांच्या विरुद्ध अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. यावरुन अपिलकर्ता यांचे द्वितीय अपिल मेमो मध्ये वरील आरोप सुयंक्तिक वाटतो व त्यामुळे सदर प्रकरणामध्ये पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांनी योग्य ती चौकशी करुन योग्य तो निर्णय घेणे संयुक्तिक राहील. जेणेकरुन माहितीचा अधिकार अधिनिमय २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्जदाराला माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून अशाप्रकारचे चूकीची व दिशाभूल करणारे

पत्रव्यवहार केला जाणार नाही व विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली जाईल. परंतु अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**४) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यांत येत असून अपिलकर्ता यांना दिशाभूल करणारा खर्चाचा आकडा कळवून माहिती देण्याचे टाळाटाळ करणाऱ्या, अडथळा उत्पन्न करणाऱ्या पोलीस निरिक्षक यांस अधिनियमाचे कलम ५(४) व ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुद्ध कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यांत येते. शिस्तभंगाची कारवाई ती आयुक्त किंवा सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.**

**५) सदर निर्णयाची एक प्रत पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांच्याकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १८-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**४) पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांजकडे योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.**
**५) निवडनस्ती,**
**६) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५००३६/अपिल क्र. ६२६४/२०१०**

**श्री.गुलाम वारीश शेख, ...अपिलकर्ता**
**रुम नं.२, घनश्यामदास कि चाळ,**
**कालाकिल्ला धारावी, मुंबई ४०० ०१७.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्र (पूर्व), मुंबई ४०० ०५१.**
**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्र (पूर्व), मुंबई ४०० ०५१. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -१२/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०८-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी उप मुख्य अभियंता झोपडपट्टी सुधार मंडळ,गृहनिर्माण भवन, वांद्र (पूर्व), मुंबई यांच्याकडे सन १९९८ ते २००४ पर्यंत या कालावधीतील आमदार एकनाथ गायकवाड यांच्या आमदार म्हणून धारावी ३५ या विधानसभा क्षेत्रात निवडून आल्यानंतर त्यांच्या फंडातून किती विकास कामे करण्यात आली याबद्दलचा संपुर्ण तपशील व कोणत्या ठिकाणी विकास कामे केली त्याची तपशिलावार माहिती मिळणेबाबत एकूण ७ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक २२-०६-२०१० रोजी मागणी केलेली माहिती जुनी असून ती देण्याकरीता कार्यालयात उपलब्ध असलेली साधनसामग्री प्रमाणबाहेर वळवावी लागणार आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(९) अन्वये आपण मागितलेली माहिती ही त्या स्वरुपात सादर करता येत नाही. कार्यालयातील नस्ती / दस्तऐवज आपणांस पाहणी

करीता उपलब्ध करुन देण्यात येतील. पहाणी केल्यानंतर नस्तीतील आपणांस आवश्यक असलेल्या पृष्ठ क्रमांकची यादी आपण तयार करुन संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात सादर करावी व त्यानंतर रक्कमेचा भरणा करण्या संदर्भात ७ दिवसांत कळवतील. सदर रक्कमेचा भरणा केल्यानंतर छायांकित प्रती देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ३१-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, मागितलेल्या माहितीचे अभिलेखे व दस्तऐवज पाहणी सुरु आहे परंतु माहिती अतिशय कमी प्रमाणात उपलब्ध होत आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहिती ही १२ वर्ष पुर्वीपासूनची आहे व त्यांच्याकडे एकूण १० आमदार आहे. या १० आमदाराचे संदर्भातील सर्व माहिती ही गोडाऊन मध्ये ठेवण्यात आलेली आहे व गोडाऊन मधून संपुर्ण माहिती काढून अपिलकर्ता यांना निरीक्षणाकरीता द्यावयाची असेल तर कार्यालयातील अनेक कर्मचारी यांचे दैनंदिन कामकाज बाजूला ठेवून ती काढून द्यावी लागते. त्याकरीता रजिस्टर सुद्धा Maintain केलेले आहे. त्यांना अधिनियमयाचे कलम ७ (९) अन्वंये सुद्धा माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले होते. परंतु तपासणी अंती उपलब्ध करुन देता येईल असे कळविले. यावरुन वास्तविक अपिलकर्ता यांनी मोघम व अति व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली असल्याने ती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नव्हती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे निश्चित वर्णन करुन माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. कोणत्याही माहितीचे निश्चित वर्णन न करता कोणत्याही कागदपत्राची, दस्तऐवज किंवा अभिलेखे किंवा एखाद्या कामाचे निश्चित वर्णन न करता माहिती मागणे अपेक्षित नाही. एखादी मागितलेली माहिती करीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याने माहिती काढुन देणे अपेक्षित नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी विहिती मुदतीत माहिती नाकरलेली नसताना प्रथम अपिल किंवा द्वितीय अपिल दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. अशाप्रकारे मोघम व व्यापक प्रमाणात अनियमित कालावधीची माहिती मागणे म्हणजेच अधिनियमाच्या तरतूदींचा गैरवापर करणे होय. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----<u>आदेश</u>-----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**
**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**

दिनांक : १९-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

३) निवडनस्ती,

४) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५००९०/अपिल क्र.
६२६३/२०१०

श्री.संजय परशुराम पाटील, ...अपिलकर्ता
ई-१२२-९ शिवसागर गृहनिर्माण संस्था,
सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई ४१० २१०.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक मुंबई विद्यापीठ,
पात्रता प्रमाणपत्र विभाग (Eligibility Department),
डॉ.आंबेडकर भवन,मुंबई विद्यापीठ, कलीना परिसर,
सांतक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०९८.

जन माहिती अधिकारी तथा उप कुल सचिव,
पात्रता प्रमाणपत्र विभाग (Eligibility Department)
डॉ.आंबेडकर भवन मुंबई विद्यापीठ कलीना,
सांतक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०९८. ...उत्तरवादी

---निर्णय---

व्दितीय अपिलाचा दिनांक -१०/१०/२०१०
सुनावणीचा दिनांक - १९/०३/२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १८-०५-२०१० रोजी उस्मानिया विद्यापीठातून पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठामार्फत एलएलबीसाठी प्रवेश देण्यात आला असल्यास, त्याची साक्षांकित माहिती व त्याच संदर्भामध्ये एकूण २० मुद्दांवर नियम असल्यास किंवा नसल्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारची माहिती सन १९९६ ते १५ मे २०१० कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १७-०६-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २९-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २३-०७-२०१० रोजी देण्यात आला असून मुद्दा क्रमांक ७, १०, ११, १३, १४, १५ यांच्या संदर्भामध्ये नवीन सुधारित उत्तर द्यावे असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक २४-०८-२०१० रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झ ाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी लेखी खुलासा दाखल केलेला आहे व तोंडी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे त्यांनी त्या संदर्भातील इतर अशी सर्व माहिती मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे लेखी खुलासा खालील प्रमाणे केलेला आहे.

श्री.संजय परशुराम पाटील यांनी दिनांक १८-०५-२०१० रोजीच्या माहितीचा कायदा २००५ अन्वये माहिती मागितलेली होती. त्याप्रमाणे त्यांना हवी असलेली माहिती देण्यात आली आहे. (प्रत पताका अ जोडत आहोत) श्री.संजय परशुराम पाटील यांनी सन २००९-२०१० रोजी पदयुत्तर तीन वर्षीय एल.एल.बी. च्या अभ्यासक्रमासाठी रिझवी लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेला होता. तसेच शैक्षणिक वर्ष २००८-२००९ पासून मुंबई विद्यापीठाव्यतीरिक्त इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना पात्रता प्रमाण पत्रासाठी अर्ज देणे व ते स्विकारण्याचे काम सर्व संलग्न महाविद्यालयांना सोपविण्यात आले आहे.

तदनुसार रिझवी लॉ कॉलेजमधुन जेव्हा श्री.संजय परशुराम पाटील यांचा पात्रता प्रमाणपत्र प्राप्तीचा अर्ज सदर विभागात सादर करण्यात आल्यानंतर या विभागाने सदर अर्जाची पडताळणी केली असता असे निदर्शनास आले की श्री.संजय परशुराम पाटील यांनी उस्मानिया विद्यापीठातून एक वर्षीय शैक्षणिक पदवी घेतलेली आहे.

सदर प्रकरणी असे नमूद करण्यात येते की, मुंबई विद्यापीठातील प्रचलीत नियमानुसार तीन वर्षीय एल.एल.बी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (१०+२+३) म्हणजेच माध्यमिक, उच्च माध्यमिक व तीन वर्षाची पदवी परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रकरणे असे नमूद करण्यात येते की, श्री.संजय परशुराम पाटील यांना त्याप्रमाणे त्यांनी रिझवी विधी महाविद्यालयात एल.एल.बी. च्या अभ्यासक्रमासाठी घेतलेला प्रवेश ग्राह्य नसल्याचे या विभागाच्या पत्र क्रमांक Elg./7612 of 2010 Dated 21st January, 2010 नुसार कळविण्यात आले होते.(प्रत पताका ब जोडत आहोत.)

तरीही श्री.संजय परशुराम पाटील यांनी पात्रता प्रमाण पत्रासाठी सतत सदर विभागाकडे तगादा लावल्याने त्याचे प्रकरण विद्यापीठाच्या समकक्षता समितीची दिनांक २३-०२-२०१० च्या बैठकित ठेवण्यात आले आणि त्या प्रकरणी समकक्षता समितीने देखील एल.एल.बी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तीन वर्षाचा अभ्यासक्रम अनिवार्य आहे असा निर्णय दिलेला आहे. (निर्णयाची प्रत पताका क जोडत आहोत)

त्यानंतरही श्री.संजय परशुराम पाटील यांनी सदर प्रवेशाच्या पात्रतेसाठी पुन्हा माहितीच्या अधिकारा मार्फत अर्ज केला असता त्यांच्या पत्राचे उत्तर पत्र क्रमांक Elg./8037 of 2010, dated 12th April, 2010 रोजी वरील समकक्षता समितीने दिलेल्या निर्णयाच्या आधारे देण्यात आले व त्यानेही श्री. पाटील यांचे समाधान झाले नाही व त्यांनी ॲपिलेट अधिकाऱ्याकडे तशी तक्रारी केली असता श्री पाटील यांना ॲपिलेट अधिकाऱ्यांसमोर दिनांक २०-०७-२०१० रोजी बोलावण्यात आले आणि योग्य ती समज देण्यात आली आणि त्यांना हवी असलेली कागदपत्रे देण्यात आली. (क्रमांक Elg./9131 A of 2010 दिनांक २४.०८.२०१०) (प्रत पताका ड जोडत आहोत)

शिवाय दिनांक २२-०८-२०१० च्या पत्रात श्री. पाटील यांनी उस्मानिया विद्यापीठातुन पदयुत्तर झालेल्या श्री.कृष्णा यांना एल.एल.बी. च्या अभ्यासक्रमासाठी पात्र ठरविल्याचे लिहिले आहे. परंतु श्री.कृष्णा यांना उस्मानिया विद्यापीठातुन दिलेल्या प्रमाण पत्रात त्यांनी तीन वर्षाची पदवी पुर्ण केल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे त्यांना पात्रता प्रमाणपत्र दिले गेले.

श्री.कृष्णा यांना देण्यात आलेल्या पात्रता प्रमाणपत्रा अगोदरच्या उस्मानिया विद्यापीठातुन एका वर्षात पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष एल.एल.बी. च्या प्रवेशासाठी पात्रता प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत. परंतु समकक्षता समितीच्या दिनांक २३-०२-२०१० च्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार एका वर्षात पदवी घेतलेल्या कुठल्याही विद्यापीठाच्या पदवीला प्रवेश घेण्यासाठी लागणारे पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले नसून श्री.पाटील यांची विनंती या निर्णयानुसार मान्य करण्यात आलेली नाही.

पात्रता प्रमाणपत्र विभागातील कर्मचारी हे विद्यापीठाच्या नियमानुसार विविध प्रवेशांची पात्रतेची पडताळणी करीता व काही प्रवेशाबाबत संभ्रम असल्यास त्यासंबधीत शाखेच्या प्रमुखांकडे ती प्रकरणे पाठविली जातात त्या प्रमाणे श्री. पाटील यांचेही प्रकरण विधी शाखेचे अधिष्ठाता प्राध्यापक श्री. नारायण राज्याध्यक्ष यांच्याकडे पाठविण्यात आले व त्याबाबत त्यांनी खालील प्रमाणे शेरा दिला आहे.

“ As the B.A. Degree Programs (course) Completed by the applicant is not equivalent with in number of years of study and the course coutents of the (12+3) 3 years Degree Program (course) of our University and other University’s eligibility cannot be granted for admission to the 3 years LL.B. Programme (course) of our University.”

मुंबई विद्यापीठातील सर्व कार्यालयीन कामकाज हे परिनियमात दिलेल्या तरतुदीनुसार चालते व श्री. पाटील हे भावनाविवश करुन नियमबाह्य कार्य करण्यास भाग पाडत आहेत. तसेच

२२-०८-२०१० च्या पत्रात श्री.संजय परशुराम पाटील यांनी जर त्यांना पात्रता प्रमाणपत्र मिळाले नाही तर ते मुंबई विद्यापीठाच्या परिसरातच आत्महत्या करणार असल्याची धमकी दिली आहे व त्यास सदर विभागातील कर्मचारी जबाबदार असतील असे म्हटले आहे. आत्महत्या करणे हे कायद्याने गुन्हा असल्याने ही गंभीर बाब लक्षात घेऊन मा.कुलगुरुंना च्या आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरिक्षक, बी.के.सी. पोलीस ठाणे, बांद्रा कुर्ला संकुल, मुंबई यांना श्री.संजय परशुराम पाटील यांनी कर्मचाऱ्यांना दिलेल्या धमकी विषयी पत्र (प्रत पताका इ जोडत आहोत ) देऊन श्री.संजय परशुराम पाटील यांना समज देण्यात यावी अशी विनंती केली. सदर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांनी श्री.संजय परशुराम पाटील आणि विभागातील कर्मचारी यांना पोलीस ठाण्यात बोलावून सर्व चौकशी केली व श्री. संजय परशुराम पाटील यांना त्याप्रमाणे समज दिली आणि सांगितले की विभागाच्या समकक्षता समितीच्या दिनांक २३-०२-२०१० च्या बैठकीत झालेल्या निर्णयानंतर जर एखाद्या विद्यार्थ्याला पात्रता प्रमाणपत्र दिले असल्यास त्याची माहिती घेऊन यावी पण अशी चूक विभागाकडून न झाल्याने श्री.संजय परशुराम पाटील निरुत्तर झाले.

यावरुन अपिलकर्ता यांना आतापर्यंत त्यांच्या प्रवेशा संदर्भातील नियम व आदेशाच्या बद्दल सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली असताना सुद्धा विनाकारण १०-१५ वर्षाची माहिती मागणे हे अनाठायी आहे व त्यापेक्षा अपिलकर्ता यांनी त्यांचा प्रवेश नाकारला त्या संदर्भात व असलेले नियमाची तरतूद उपलब्ध करुन घेऊन योग्य त्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे किंवा न्यायालयाकडे तक्रार करणे संयुक्तिक झाले असते. सर्व पुर्ण कागदपत्रे व खुलाशात उपलब्ध करुन दिलेली माहिती यांचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे सदर अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**
**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १९-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

३) निवडनस्ती,

४) श्री.चौरे, सहाय्यक.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.**

क्रमांक : मुमाआ२०१०/९५/तक्रार क्र.१५६७

श्री. वैभव नरवडे,
अधिसभा सदस्य-मुंबई विद्यापीठ,
ए/३०१, शिवप्रेरणा सोसायटी, वीर सावरकर नगर,
साकीनाका, मुंबई -४०० ०७२. ----तक्रारदार

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (प्रबंध्र विभाग)
मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ परिसर,
महात्मा गांधी रोड,मुंबई -४०० ०३२. ----
गैरतक्रारदार

**---निर्णय----**

| | |
|---|---|
| **सुनावणीचा दिनांक** | **:१८.०२.२०११** |
| **तक्रारदार** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |

तक्रारदार यांनी दिनांक ११-०१-२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे, मुंबई विद्यापीठातील अपिलीय माहिती अधिकारी श्री.कृ.व्यंकररमाणी यांच्या उध्दट व बेशिस्त वागणुकीबाबत तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीचे अवलोकन केले असता त्यामध्ये माहिती मिळाली किंवा नाही याबद्दल कोणतीही तक्रार नाही. तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी घेताना वेळी जी वागणूक दिली त्याबद्दल तक्रार केलेली आहे.

सदर तक्रारीच्या संदर्भामध्ये प्रभारी कुल सचिव यांनी आयोगाकडे खुलासा करताना तक्रारदार यांचे दिनांक २८-०३-२००९ रोजी अर्जाच्या संदर्भात दिनांक ११-०५-२००९ नुसार माहिती दिली. परंतु प्रश्न क्रमांक ४ व ५ यांची माहिती व्याप्त स्वरुपाची असल्यामुळे ती त्यांना पुरविण्यात आली नाही व त्याबाबत तक्रारदार यांचे दिनांक ०६-०६-२००९ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांना प्रश्न क्रमांक ४ व ५ बाबतचा खुलासा केला व प्रश्न क्रमांक ६ व ९ मधील माहिती बाबत स्पष्टिकरण दिले. परंतु त्यानंतर प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा तक्रारदार यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून सुद्धा विभागात येऊन माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत आदेश द्यावेत असे सुचवले. परंतु तत्पुर्वी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या सुनावणी दिनांक ०८-०१-२०१० रोजी पुन्हा ठेवण्यात आली. परंतु माहिती अधिकारी, परीक्षा नियंत्रक नागपूर विद्यापीठ परीक्षा बाबतच्या बैठकीस गेल्याने हजर राहू शकले नाहीत. श्री.नरवडे हे श्रीयुत नांगिया यांना घेऊन सदर सुनावणीस हजर झाले. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी त्याच्या अपिलाबाबत योग्य तो खुलासा करु शकले नाहीत व त्यामुळेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश क्रमांक आर.एस./९७-अ/५७, दिनांक ०४-०३-२०१० च्या आदेशानुसार माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्या दिनांक २१-१२-२००९ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांना हवी असलेली माहिती प्रबंध विभागात स्वत: येऊन उपलब्ध करुन घ्यावी असा आदेश पारित केला. तसेच आयोगापुढे खुलासा सादर करताना जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे श्री.मधुकर बाईंग हे सुनावनीला उपस्थित होते. सुनावणीला श्री.नरवडे हे उशिरा तसेच सोबत श्री. नांगिया यांना बिनापरवानगी घेऊन आल्याने अपिलीय अधिकारी यांनी आक्षेप घेतला व त्यामुळे प्रथम अपिलाचा निर्णय घेतला त्यावर तक्रारदार यांनी विनाकारण युक्तीवाद करण्यास सुरवात केली. परंतु त्यावर उगाच वाद करत व उद्धट भाषा वापरत श्री.नरवडे हे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या कक्षाबाहेर गेले असा खुलासा केलेला आहे. तक्रारदार यांनी माहिती काय मागितलेली होती याबद्दलचा माहितीचा अर्ज आयोगापुढे सादर केलेला नाही व त्यामुळे तक्रारदार यांचा प्रश्न क्रमांक ४ व ५ खुलासा, प्रश्न क्रमांक ६ व ९ बाबतचा कोणताही निर्णय आयोगास देता येत नाही व त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

३) तक्रार निकाली काढण्यांत येते.
४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १८-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१०४/अपिल क्र. ६२६१/२०१०

श्री.संतोष कचरुजी घेगडमल, ...अपिलकर्ता
३१/ई, नंदादीप एव्हरेस्ट को.ऑ.हौ.सो.
शेल कॉलनी रोड, चेंबूर,मुंबई ४०० ०७१.

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ ६,**
**चेंबूर,मुंबई ४०० ०७१.**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
**पुर्व प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष,**
**चेंबूर,मुंबई ४०० ०७१.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -१५/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याकडे, दिनांक ३१-०५-२०१० रोजी, दिनांक १८-११-२००९ रोजी ४/७९ शिवजन को.हौ.सो. शेल कॉलनी, चेंबूर ह्या सदनिकेचा फ्लॅटचा फ्रन्ट ग्रील सेफ्टी डोअर तोडून उघडणे कामी नेहरु नगर पोलीस ठाण्यातून देण्यात आलेल्या आदेशबद्दल सविस्तर माहिती व प्रत आणि आदेशाची अंमजबजावणी प्रत्यक्ष हाती कटावणी घेऊ करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचा हुद्दा व नाव मिळणेस अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने दिनांक ०१-०७-२०१० रोजी टपालाद्वारे माहिती पाठविण्यात येवून ती दिनांक २१-०७-२०१० रोजी स्वीकारलेली आहे. त्यामध्ये दिनांक १८-११-२००९ रोजी फ्लॅटचा फ्रन्ट ग्रील सेफ्टी डोअर तोडून उघडणेकामी नेहरुनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.जगदाळे, दिवसपाळी पोलीस निरीक्षक चंदनशिवे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नेहरु नगर पोलीस ठाणे, अग्निशामक दल, चेंबूर येथील अधिकारी यांचे उपस्थित सदरची कारवाई करण्यात आली असून सदर घटनेबाबत यातील अपिलकार व त्यांचे कुंटुबिय यांच्या विरुद्ध फिर्यादी श्रीमती वैशाली दर्शक घेगडमल यांच्या तक्रारीवरुन गुरक ३१९/२००९ क ४५२, ३५४, ३२३, ४९८(अ), ५०६(२), ३४ भादवि अन्वये

गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा. ३४ वे न्यायालय, विक्रोळी, मुंबई येथे कोर्ट केस क्र.३०३/पीडब्ल्यू/२०१० दिनांक २६-०३-२०१० अन्वये सादर केलेले असून गुन्हा सद्या मा.न्यायालयात न्यासप्रविष्ठ आहे. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १३-०८-२०१० प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०८-०९-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलार्थी यांनी प्रत्यक्ष कटावणी कोणी हाती घेतली, ग्रील / दरवाजा तोडण्याचे आदेश / निर्णय व प्रत्यक्ष दरवाजा कोणी तोडला याबाबत नेहरुनगर पोलीस ठाण्यास माहिती उपलब्ध असल्यास अपिलार्थीस देण्यात हरकत नाही असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलार्थीने आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलार्थी यांच्या विरुद्ध जो गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे तो वास्तविक दिवाणी स्वरुपाचा भाग आहे. त्यांची सुन त्यांच्याकडे सुमारे ५ वर्षे राहत नसताना सदनिका मालकी हक्काबाबत व ताब्याचा वादाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे पोलीसांनी हा दिवाणी स्वरुपाचा वाद आहे असे असून सुद्धा त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला व पंचनाम्यामध्ये दरवाजा तोडून त्यांना अटक करण्यात आली अशी कारवाई केल्यामुळे व त्यांनी पोलीस स्टेशन कडून दरवाजा तोडण्याचाआदेश होता किंवा नाही याबद्दलीची माहिती मागितलेली आहे. तसेच दरवाजा तोडण्याकरीता जी कटावणी त्यांच्या हातात होती त्याची नावे मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे. त्यामध्ये अपिलकर्ता यांना आतापर्यंत सर्व प्रकारची माहिती कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे असे लेखी नमुद केलेले असून आरोपी क्रमांक १ ते ३ (अपिलकार) यांनी आतुन दरवाजा बंद केल्याने घटनास्थळी पोलीस अधिकारी व अग्निशामक दलाचे अधिकारी यांनी दरवाजा उघडण्याची विनंती केली असता अपिलकार यांनी बंद दरवाजातून मी वकील व जेष्ठ नागरीक असून स्वतःचे बरेवाईट करुन घेवून पोलीस आयुक्त यांचेकडे तक्रारी करुन स्थानिक पोलीसाना

तसेच अग्निशामक दलाच्या अधिकाऱ्यांना खोट्या केस करण्याची धमकी दिली त्यानंतर विनंती करुनही अपिलकार यांनी दरवाजा उघडला नाही म्हणून कटावनीच्या सहयाने दरवाजा उघडून आत प्रवेश केलेला आहे व त्याबाबत अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या संदर्भामध्ये ग्रील / दरवाजा तोडण्याचा आदेश / निर्णय व प्रत्यक्ष दरवाजा कोणी तोडला याबाबतची माहिती नेहरुनगर पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर मिळून येत नाही अशी माहिती अपिलकार यांना देण्यात आलेली आहे. तोंडी युक्तीवाद करताना जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, गुन्हा दाखल झालेला असल्यास गुन्हा तपासणीचे काम फौजदारी संहिता १९७३ च्या प्रमाणे तपास अधिकाऱ्यास शक्य त्या सर्व मार्गाचा अवलंब करता येते व तसे अधिकार त्यांना प्राप्त असल्यास व त्यामुळेच दरवाजा तोडण्याचा आदेश पोलीस कार्यालयातून देण्याची आवश्यकता नसते. तरी सुद्धा पोलीस कार्यालयाने दरवाजा तोडण्याचा आदेश दिला होता काय याबाबतचा आदेश उपलब्ध असल्यास व उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे कळवावे अशाप्रकारे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**-----आदेश----**

**३) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक ३१-५-२०१० रोजी चे अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पोलीस स्टेशनमधुन दरवाजा तोडण्याचे आदेश दिलेला असल्यास त्या आदेशाची प्रत व दिलेला नसल्यास "दरवाजा तोडण्याचा आदेश दिला नव्हता" अशाप्रकारे स्पष्टपणे हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांच्या आत स्पष्टपणे कळविण्यात यावा.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १९-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,
३) निवडनस्ती,
४) श्री.चौरे, सहाय्यक.

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१२६/अपिल क्र. ६३४३/२०१०**

**श्री.विलास आसाराम साळवे, ...अपिलकर्ता**
**शिवनेरी टुडे, पोस्ट बॉक्स न.११८८२,**
**भांडूप (पूर्व),मुंबई ४०० ०४२.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**एल विभाग कार्यालय, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,**
**स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पश्चिम),मुंबई ४०० ०७०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण)**
**एल विभाग कार्यालय, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,**
**स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पश्चिम),मुंबई ४०० ०७०. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -१५/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १७/०२/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १७-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, एल वार्ड, परिरक्षण यांच्याकडे, वार्डात काही कॉंक्रीटीकरणाचे काम झाले आहे त्याबद्दल एकून १३ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने दिनांक ०९-०६-

२०१० रोजी सहाय्यक अभियंता यांनी आपण कार्यालयात मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाची तपासणी कार्यालयीन कामकाजांदिवशी दुपारी ३ ते ५ या कार्यालयीन वेळेत करावी. तदनंतर आपल्या गरजे नुसार अभिलेखाच्या छायांकित (ए-४) प्रती योग्य त्या शुल्काचा (प्रती प्रतीस रु.२/-) भरणा केल्यानंतर दोन दिवसानंतर उपलब्ध केल्या जातील याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न करता दिनांक १०-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी निर्णय दिलेला असून आपण मागितलेली माहिती व्यापक स्वरुपातील असल्यामुळे निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली नाही. मात्र कागदपत्रांचे निरीक्षण करण्याकरीता त्यांना बोलविण्यात आले. वास्तविक त्यांनी मागितलेली माहिती ३० दिवसांत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना जी माहिती मागितलेली आहे ती अतिशय व व्यापक व विस्तृत प्रमाणात आहे. त्या बद्दलची कागदपत्रेही शेकडो आहे व त्यातील कोणती माहिती उपलब्ध करुन द्यावी याबद्दल निश्चित कागदपत्रे देता येणार नाही व त्यामुळेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २(ञ)** अन्वये **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्ये प्रमाणे त्यांना कागदपत्रांच्या निरिक्षणाकरीता व निरिक्षणा अंती छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्याकरीता कळविण्यात आले होते. छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्याकरीता अधिनियमाचे कलम ७(३) अन्वये अतिरिक्त खर्च कळविणे आवश्यक असते. परंतु निश्चित प्रती ते सांगता येत नाही. त्यामुळे त्यांना प्रती प्रत रु.२/- प्रमाणे देणे आवश्यक असतील त्या द्याव्यात. प्रती प्रत खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविले व त्यामुळे त्यांनी तशी कार्यवाही न करता प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलात त्याचप्रमाणे आदेश देण्यात आला व त्याही नंतर ते निरीक्षण न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांना सदर मागितलेली माहितीचे कागदपत्रांच्या प्रती किती होतील असे आयोगाने विचारले असता अंदाजे ५००-६०० प्रती होऊ शकतील असे त्यांनी सांगितले. परंतु निश्चित असे सांगता येणार नाही. यावरुन अपिलकर्ता यांनी माहिती नाकरलेली नाही व मुदतीत कळविलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांना अधिनियमाचे कलम ७(३) अन्वंये अतिरिक्त खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती,
२) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१३३/अपिल क्र. ६३८९/२०१०

श्री.शिवनाथ अमृत अहिरे, ...अपिलकर्ता
मगन धनजी चाळ, पटेलवाडी, जुना नागरदास रोड,
अंधेरी (पूर्व),मुंबई ४०० ०६९.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पूर्व विभाग, आझाद रोड,
गुंदवली, अंधेरी (पूर्व),मुंबई ४०० ०६९.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पूर्व विभाग, आझाद रोड,
गुंदवली, अंधेरी (पूर्व),मुंबई ४०० ०६९. ...उत्तरवादी

---निर्णय---

व्दितीय अपिलाचा दिनांक -१२/१०/२०१०

**सुनावणीचा दिनांक - १८/०२/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण) यांच्याकडे , नवीन नागरदास छेदित मार्ग अमरतरु बिल्डींग ३ समोर असलेल्या रस्त्यावर खोदण्यात आलेल्या बोअरवेल बाबतची माहिती, माहितीचा कालावधी ०७-०४-२०१० ते २८-०६-२०१० आजपर्यंत एकूण ५ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली असून माहिती स्वतः घेऊन जाणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३०-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यावर त्यांनी दिनांक २५-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलामध्ये काही अंशी चुकीची माहिती पुरविली असे त्यांनी कारण दिले व त्या संदर्भामध्ये प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १८-०९-२०१० रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली परंतु चुकीची मिळाली. मेंटेनन्स अधिकारी अर्दळे यांनी ज्या ठिकाणी कचरा पेटी आहे व तो रस्ता डेवलपमेंट मध्ये असताना रस्त्याच्या मध्यभागी खोदण्यात आलेली अपूर्ण अवस्थेतील बोअरवेल मागणी नसताना फंड खर्च करावा व अपुर्ण अवस्थेत का आहे, बोअरवेलचे स्थानिक लोकांनी अद्यापी पाणी मिळाले नाही अथवा उपयोगात आणले नाही, आजपर्यंत बोअरवेलचे किती काम झ ाले? किती बाकी आहे, केव्हा पूर्ण होणार माहिती दिलेली नाही व त्यामुळेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करताना आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या वस्तीमध्ये स्थानिक रहिवाशांना पाण्याचा तुटवडा भासत असल्याकारणाने स्थानिक नगरसेवकांनी त्या वस्तीजवळ कुपनलिकेचे काम करण्यास सुचविले होते. त्याचप्रमाणे भूजल सर्वेक्षक श्री.एस.के.गुप्ता यांच्याकडून सदर वस्तीत भूजल सर्वेक्षण करुन घेण्यात आले होते व त्यांनी सुचविलेल्या ठिकाणीच कुपनलिकेचे काम सुरु करण्यात आले होते. सदर कुपनलिका कचरा पेटीपासून दूर असून ती रस्त्याच्या बाजूला आहे. सदर कामांसाठी करण्यात आलेल्या भूजल सर्वेक्षणासाठी रु.१७४५१/- इतके देयके देण्यात आले. तसेच तेथील स्थनिक रहिवाशी व जवळच्या सोसायटीतर्फे विद्युतीकरण्याचे काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे ठेकेदारास इतर कोणत्याही प्रकारचे देयके देण्यात आलेले नाही. तसेच अर्जात मागितल्या प्रमाणे माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध माहिती वरुनच त्यांनी प्रथम व द्वितीय अपिलामध्ये

नवीन मुद्दा उपस्थित केलेला आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अपिल निकली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**
**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १८-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.**

**क्रमांक : मुमाआ२०१०/२४१७/तक्रार**
**क्र.१५७०**

**श्री. वंसतकुमार आर. कुंभारीया,**
**५९/ए, न्यू खोजा चाळ, रुम नं.१५,**
**३ रा मजला, डॉ.डी.बी.मार्ग,मुंबई -४०० ००८. ----तक्रारदार**

**---विरुद्ध---**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**८९/९५, रजनी महल,**

**ताडदेव,मुंबई -४०० ०३४.** ----
**गैरतक्रारदार**

**---निर्णय----**

**सुनावणीचा दिनांक :१८.०२.२०११**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक १७-०९-२०१० रोजी त्यांचे दिनांक २०-०१-२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे दिनांक २०-०१-२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने ८ महिने झाले तरी त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. त्याकरीता त्यांनी दिनांक ३०-०३-२०१०, १३-०५-२०१० व १७-०८-२०१० रोजी स्मरण पत्र दिलेले होते. परंतु नस्ती आढळून येत नाही. नस्ती शोधत आहोत असे उत्तर त्यांना दिले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अर्जादाराने दिनांक २०-०१-२०१० रोजी दिलेल्या माहितीचा अर्जाच्या अनुषंगाने इमारत क्रमांक ५३-५९, न्यु खोजा चाळ या इमारतीचे नस्ती निरीक्षण करणेकरीता अर्जदारास दिनांक २७-०१-२०१० रोजी पत्र दिले होते. त्यानंतर अर्जदाराने कार्यकारी अभियंता / डी-२ यांच्या कार्यालयात स्वतः येऊन सदर इमारतीची नस्ती पाहिली. अर्जदाराने वकीलातर्फे दिनांक ३०-०३-२०१० रोजी पत्र दिले. दिनांक ०९-०६-२०१० रोजी पुन्हा कार्यकारी अभियंता / डी-२ यांनी माहिती उपलब्ध करुन घेणेसाठी पत्र दिले. दिनांक २०-०७-२०१० रोजी सहाय्यक लेखाधिकारी (दक्षिण), मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांचे कडून सदर नस्ती अर्जदारास महिती देण्यासाठी मागविली. सदर नस्ती या कार्यालयात आल्यानंतर अर्जदारास दिनांक ३१-०७-२०१० रोजी ती उपलब्ध करुन दिली व त्यातील माहिती अर्जदाराने घेतली व त्यानंतर उपमुख्य अभियंता / परिमंडळ-२ यांच्याकडे दिनांक १७-०८-२०१० रोजी अर्ज केला. त्याप्रमाणे दिनांक २५-१०-२०१० रोजी पुन्हा अर्जदारास उपलब्ध माहिती घेणेस पत्र देण्यात आले. दिनांक ०२-०२-२०१० रोजी पुन्हा पत्र दिले. तसे कार्यालयाकडून दिनांक ०३-०२-२०११ अन्वये उत्तर देण्यात आले आहे. यावरुन तक्रारदार यांना माहिती तर उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु वेळोवेळी त्यांच्या पत्रांना उत्तरे सुद्धा दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सर्व कागदपत्रे पत्रोत्तरे आयोगापुढे दाखल केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता कोणत्याही पत्रोत्तरांमध्ये नस्ती आढळून येत नाही किंवा शोध घेतात असे कळविलेले दिसून येत नाही. उलट नस्तीचे निरीक्षण करण्याकरीता यावे असे कळविलेले दिसून येते. मात्र दिनांक ०३-०२-२०११ रोजी कार्यकारी अभियंता / डी-२ यांनी दिलेल्या पत्रामध्ये, " You have already inspected this file but you are insisting copies of the letter which are not in this office file, this office is always ready to provide

available information. Hence, yor are hereby informed that the available information is supplied to you by this office.” यावरुन तक्रारदार यांना संपुर्ण माहिती मिळालेली असल्याने सदरची तक्रार ही निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) तक्रार निकाली काढण्यात येते.**
**४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १८-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.**

**क्रमांक : रामाआ२०१०/तक्रार क्र.१२७५**

**श्री. प्रविण दत्तात्रय तळेकर,**
**ब्लॉक नं.१, साफल्य बिल्डिंग,**

**पाडुरंगवाडी रस्ता क्र.२,**
**गोरेगाव (पुर्व),मुंबई -४०० ०६२.** **----तक्रारदार**

**---विरुद्ध---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन),**
**आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत,**
**अब्दुल गफारखान मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा नियंत्रक, गुरे नियंत्रण यांचे कार्यलय,**
**गुरांचा बाजार, गोरेगाव (पूर्व),**
**मुंबई -४०० ०६३.** **----**
**गैरतक्रारदार**

**---निर्णय----**

तक्रारदार यांनी अपिल क्रमांक ४७७३/०२ चे दिनांक ०७-०५-२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून नियंत्रक, गुरे नियंत्रण यांचे कार्यलय,गुरांचा बाजार जन माहिती अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल पत्र दिलेले दिसून येते व त्यात त्याचे प्रती माहिती आयुक्त यांना दिलेले आहे. त्यामध्ये आदेश देवून देखील मला माहिती दिली नाही तसेच बरोबर कागदपत्रांच्या प्रती दिलेल्या नाही. याला आपण प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन) श्री.गायकवाड हे जबाबदार आहे असे म्हटलेले आहे. त्यामध्ये तक्ररदार यांनी सुद्धा कार्यालयात येऊन सुनावणी नको असे सांगितले. त्यामुळे सुनावणी रद्द करण्यात आलेली आहे असे दिसून येते व त्यामुळे सदर तक्रारीची सुनावणी घेण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक :२९-१२-२०१०**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०१०८/अपिल क्र. ६३४७/२०१०**

**श्री.गोपीचंद काशिनाथ सानप,** **...अपिलकर्ता**
**वरळी पोलीस कॅम्प, बि.नं.२७, रुम नं.११,**
**वरळी,मुंबई ४०० ०३०.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता (सा.बां.),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई (सार्वजनिक बांधकाम) मंडळ,**
**मझेबन रोड, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक मुंबई (सा.बां.) मंडळ,**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई (सार्वजनिक बांधकाम) मंडळ,**
**मझेबन रोड, मुंबई ४०० ००१.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -१५/१०/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १७/०२/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, कारकुन यु.टी.कदम यांचेविरुद्ध वरळी पोलीस कॅम्पांतील सुमारे १००० लोकांची सह्यानिशी तक्रारीबाबतचा तक्रार अर्ज मा.अधिक्षक, अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांना सादर केला होता. तरी यु.टी.कदम यांची वरळी पोलीस कॅम्प येथील सार्वजनिक बांधकाम विभाग चौकी येथुन बदली का करण्यात आलेली नाही? याबाबतची सविस्तर माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी सन १९९४ ते अद्यापपर्यत असुन माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहिती मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक मे, २०१० मध्ये प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र अपिलकर्ता यांना दिनांक १८-१०-२०१० रोजी माहिती देण्यात आलेली होती. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, यु.टी.कदम हे एकाच कार्यालयामध्ये वर्षोनुवर्षे आहे त्यांची केव्हाही बदली करीत नाहीत त्याकरीता दिनांक १२-११-२००९ रोजी १०० लोकांनी कार्यालयाकडे तक्रारी केलेल्या होत्या त्या तक्रारीची दखल घेतलेली नव्हती व त्यामुळे माहिती अधिकारात माहिती मागितली परंतु ती सुध्दा विलंबाने देण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, यु.टी.कदम यांच्या विरुद्ध दिनांक १२-११-२००९ रोजी तक्रार दाखल झाली ती तक्रार दिनांक १९-०१-२०१० रोजी कार्यकारी अभियंता, एमात्मिकृम घटक विभाग, भायखळा मुंबई यांच्याकडे चौकशी करण्यासाठी पाठविण्यात आलेली होती. सदर कार्यालयाकडून अद्यापही अहवाल प्राप्त झालेला नाही. सदरचा अहवाल प्राप्त करुन घेणेसाठी या कार्यालयाने स्मरणपत्रे पाठवून तक्रीरीचा अहवाल प्राप्त करुन घेणेसाठी प्रयत्न करणेत आला. तरी सुद्धा तक्रारीचा अहवाल अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. त्यामुळेच तक्रारीच्या संदर्भामध्ये कार्यालयात कोणतीही माहिती उपलब्ध नसल्यामुळे अपिलकर्ता यांना ती देण्यात आलेली नव्हती व स्मरणपत्रे पाठविल्यावर अहवाल प्राप्त झाल्यास अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. याकरीता पुन्हा पुन्हा स्मरणपत्रे दिली त्यामुळे माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिलेली आहे. असे असेल तर जन माहिती अधिकारी यांनी तक्रार चौकशीचा पाठपुरावा करुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**३) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत तक्रारीच्या संदर्भामध्ये पुन्हा पाठपुरावा करुन अहवाल उपलब्ध झाल्यास अपिलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावा.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**

**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./४९८६४/अपिल क्र. ६९९२/२०१०**

**श्री.अर्जुनलाल छाब्रिया, ...अपिलकर्ता**
**बेले व्हिस्टा, फ्लॅट नं.१५, ३ रा मजला,**
**तलाव आणि एल.आय.सी.ऑफीस समोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (पश्चिम),मुंबई ४०० ०५०.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, पणन यांचे कार्यालय,**
**मुंबई गुहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक, पणन यांचे कार्यालय,**
**मुंबई गुहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक -२,**
**मुंबई गुहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२०/०९/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - १७/०१/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा संचालक, पणन, म्हाडा यांच्याकडे, श्री.अक्तर अली अन्सारी यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २०-०२-२०१० रोजी अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक ०९-११-२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती दिनांक ०८-१२-२००९ रोजी अपिलकर्तास कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून माहिती घेऊन जावी असे कळविलेले आहे. त्यानुसार दिनांक १७-०२-२०१० रोजी सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती देण्यात आलेल्या आहेत असे दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०४-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांच्या तर्फे प्राधिकृत श्री.कापसे हे हजर आहेत. अपिल दाखल केलेले सर्व कागदपत्रे यांची नस्ती व अर्ज यांचे अवलोकन केले असता अपिलकर्ता हे सुद्धा वकील आहेत व कोणती माहिती स्वत: मागत नाही तर त्यांचे पक्षकाराने केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मागत असतात तशी तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नाही. वास्तविक ते वकील असल्यामुळे ह्या बाबतचे स्पष्ट ज्ञान असणे आवश्यक आहे. अर्जाचे अवलोकन केले असता माहितीचे वर्णन योग्यरित्या न करता विनाकारण अनेक परिच्छेदामध्ये नको ते शब्द घेऊन माहिती मागण्याचा प्रयत्न त्यांचा असतो. सुनावणीस ते कधीही हजर राहत नाही व त्यांच्यातर्फे श्री.कापसे नावाचे प्रतिनिधी येतात याचा अर्थ माहिती अधिकाराचा वापर ते वकील व्यवसायाकरीता करतात असे दिसून येते म्हणजेच कोणत्याही सार्वजनिक हिता करीता ते माहिती मागत आहेत असे दिसून येत नाही. हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचा गैरवापर आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये दिनांक ०३-०५-२०१० रोजी माहिती अर्जाच्या प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यामध्ये अत्यंत मोघम स्वरुपात वर्णन केलेले आहे. निश्चित कोणाकडे तक्रार केली याबद्दल त्यांनी काहीही वर्णन केलेले नाही. ती तक्रार आहे ती म्हाडा, Hon’ble Mantralaya Ministers, Hon’ble Mantralaya Bureaucrats, Hon’ble Police Authorities and Hon’ble Housing Authorities, including M.H.A.D.A. दिनांक १७-०३-२०१० रोजी दाखल केलेल्या संदर्भामध्ये ते माहिती मागतात. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (च) व (ज)** मध्ये **“माहिती”** व **“माहितीचा अधिकार”** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली साहित्याच्या स्वरुपात असलेले कागदपत्रे, दस्तऐवज, ज्ञापने, अभिलेखे इत्यादीचे छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे व सार्वजनिक प्राधिकारणाच्या नियंत्रणात असलेले त्या सार्वजनिक प्राधिकारणाच्या संबंधित माहिती अधिकाऱ्याकडे अधिनियमाचे कलम ५(६) प्रमाणे अर्ज करणे अपेक्षित असते. परंतु अपिलकर्ता यांनी जर तक्रारीची माहिती मागितलेली असेल तर सदर तक्रार कोणाकडे केली, कोणत्या कार्यालयात केली त्याबद्दलचे निश्चित काही वर्णन करीत नाही व अनावश्यक असे वर्णन करत असतात व त्यांच्या अशा शेकडो अशा अर्जामध्ये अशाच प्रकारची कार्यपद्धतीचा ते

अबलंब करीत असतात. त्यांचे प्रतिनिधी यांना त्यांच्या या शेकडो अर्जाच्या संदर्भामध्ये निश्चित असे कोणतीही माहिती नसते. मिळकत व्यवस्थापक यांनी आयोगापुढे दाखल केलेला खुलासा वरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांची यापूर्वी तीच माहिती मागण्या करीता अर्ज केलेले दिसून येतात व त्यानूसार त्या कार्यालयाने दिनांक १७-०२-२०१० रोजी नस्ती उपलब्ध असलेले सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती दिलेल्या आहेत व त्या प्रमाणे दिनांक २०-०२-२०१० रोजी आयोगास सुद्धा कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे सदरहू मूळ नस्ती ही मिळकत व्यवस्थापक कार्यालय यांनी संचालक पणन / मुंबई मंडळ यांना दिनांक २५-०६-२०१० रोजीच्या पत्राद्वारे पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेली आहे. अद्याप नस्ती या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही. दिनांक २०-०२-२०१० रोजी राज्य माहिती आयोग बृहन्मुंबई यांच्याकडे खुलासा केलेला आहे. श्री.ए.एम.छाब्रिया यांनी दिनांक ०९-११-२००९ च्या माहितीचा अधिकार २००५ अन्वये दिंडोशी मालाड येथील रो-हाऊस क्र. डी ४६/००४ चे गाळेधारक श्री.अन्सारी अक्तर अली अहमद यांचे सदरहू रो-हाऊस वितरणाबाबतची माहिती मागितलेली होती. या कार्यालयाने पत्र क्र. दिनांक ०८-१२-२००९ अन्वये अर्जदारास कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून माहिती घेऊन जाणेबाबत कळविले होत व त्यानुसार सदरहू नस्तीतील सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती दिनांक १७-०२-२०१० रोजी देण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या तक्रारीबाबत प्रस्तुत प्रकरण हे मिळकत व्यवस्थापक - २ यांचे तर्फे हाताळण्यात येत होते. श्री.अर्जुनलाल छाब्रिया यांनी श्री.अख्तर अली अहमद अंसारी यांच्या वितरण नस्तीतील माहिती वरुन त्यांनी बनावट कागदपत्रे सादर करुन रो-हाऊस मिळविले असल्याबाबत तक्रार असल्याने मूळ नस्ती मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्रा. यांच्या कार्यालयात सादर करण्यात आलेली आहे. अपिलकर्ता किंवा त्यांच्या प्राधिकृत व्यक्तीने प्रत्यक्ष उपस्थित राहिल्यास या कार्यालयात प्रतिनिधीसह मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्रा. यांचे कार्यालयात मूळ नस्ती पहाणीकरीता देण्यात येऊन आवश्यक ती कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येतील असे संचालक पणन मुंबई मंडळ यांनी आयोगापुढे सादर केलेले आहे. असे असेल तर अपिलकर्ता यांनी अर्जात जो तक्रारीचा संदर्भ देण्यात आलेला आहे त्या तक्रारीचे निष्कर्ष कळविणे एवढीच माहिती मागितलेली आहे. परंतु त्यांच्या अर्जाचे स्वरुप असे असते की त्यांना काय माहिती हवी आहे हे शोधुन काढण्यास बराच वेळ वाया घालवयाला लागतो व त्यामुळेच त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध होत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक १७-०३-२०१० रोजीच्या तक्रारीवर काय कार्यवाही केली ही माहिती उपलब्ध असल्यास कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र असून त्यांचे पक्षकाराने केलेला दिनांक १७-०३-२०१० रोजीच्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध असल्यास कळविण्यात यावी.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १७-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती,
२) श्री.चौरे, सहाय्यक.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/१०५/तक्रार क्र.१५६६

श्री. निलेश उल्हास खरात,
आरे मिल्क कॉलनी युनिट नं.३२,
गोरेगाव (पूर्व) मुंबई -४०० ०६४. ----तक्रारदार

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी,
मुंबई शहर, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.

जन माहिती अधिकारी तथा वसतिगृह प्रमुख,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतीगृह,
बी.डी.डी.चाळ-११६, वरळी,मुंबई -४०० ०१८. ----
गैरतक्रारदार

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१८.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.

**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक १३-०१-२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ प्रमाणे त्यांचे दिनांक ११-०१-२०१० राजीच्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी दिनांक ११-०१-२०१० रोजी माहिती अधिकारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह, वरळी यांच्याकडे, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई शहर यांचे आदेश क्रमांक विजिसकअ/मुंश/वसतिगृह प्रवेश रद्द/०९-१०/१९३२ दिनांक १७-१२-२००९ च्या आदेशाची झेरॉक्स प्रत मिळण्याबाबत माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २८-०१-२०१० रोजीच्या पत्रान्वये फी भरुन माहिती घेऊन जाण्याबद्दल कळविले परंतु त्यापूर्वीच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार गैरहजर आहेत. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई शहर तथा अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अर्जदार श्री.खरात हे शासकीय वसतीगृहाचे विद्यार्थी होते. वसतिगृहाच्या त्यांना देण्यात आलेल्या रुम मध्ये एक तरुण मुलगा व एक तरुण मुलगी हे अशोभनिय स्थितीत आढळले. या व अन्य कारणास्तव श्री. निलेश खरात यांचा वसतिगृहातील प्रवेश रद्द करण्यात आला होता. ही बाब प्रशासकीय स्वरुपाची आहे. त्यांना आदेशाची प्रत घेऊन जाण्यास कळविलेले होते. जन माहिती अधिकारी यांनी संपुर्ण आदेशाची प्रत आयोगाच्या निदर्शनास आणली व आदेश हा कारणमिमांसा देणारा आहे व त्यावरुन तक्रारदार यांनी जी माहिती मागितलेली आहे ती सार्वजनिक व्यापक हिताकरीता मागितलेली नसून स्वः हिता करीता मागितलेली आहे व विशेषः त्यांना सर्व माहिती असून सुद्धा कार्यालयास वेठीस धरण्याकरीता मागितलेली असल्यामुळे सदर तक्रार ही निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) तक्रार निकाली काढण्यात येते.**
**४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १८-०२-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०७९७/अपिल क्र. ६३५६/२०१०

श्री.अशोक विष्णू कणसे, ...अपिलकर्ता
मु.पो. सोने सांगवी, ता.केज.जि.बीड.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्या-१),
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट समोर, डी.एन.रोड,
मुंबई ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस उपआयुक्त (मुख्या-१),
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट समोर, डी.एन.रोड,

**मुंबई ४०० ००१.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -३०/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २८/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय यांच्याकडे दिनांक ०८-०३-२०१० च्या मुंबईच्या पोलीस भरती प्रक्रियेत ५% प्रकल्पग्रंस्ता व इतर प्रवर्गातील प्रकल्पंग्रंस्ताच्या मार्कांच्या तपशीलाबाबत एकूण ५ मुद्दांवर माहिती मागितलेली दिसून येते. त्याकरीता त्यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी तक्रार सुद्धा दाखल केलेली आहे व तक्रारीची माहिती स्वतः सुद्धा मागितलेली दिसून येते.

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०२-०८-२०१० रोजी अर्जातील मुद्दे हे पोलीस भरती शाखा कक्ष -९, पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई या कार्यालयाशी संबंधित आहेत. नमुद कार्यालयाकरीता वेगळे माहिती अधिकारी आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात येत आहेत. परस्पर माहिती त्यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले आहे. त्याप्रमाणे दिनांक २५-०८-२०१० रोजी अर्जदारास माहितीचे शुल्क रु.१२/- चा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले. त्याप्रमाणे अर्जदाराने दिनांक १४-१०-२०१० रोजी माहितीचे शुल्क रु.१२/- चा भरणा शासकीय कोषागरात करुन पावती दाखल करुन दिनांक १८-१०-२०१० रोजी त्यांस माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तत्पूर्वी अपिलकर्ता यांनी दिनांक १६-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले होते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ३०-१०-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना दिनांक १८-१०-२०१० रोजी माहिती दिली आहे. या कारणास्तव सदरचे अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ११-११-२०१० रोजी मिळालेल्या माहितीच्या आधारावर गुणवत्तेच्या संदर्भामध्ये प्रश्न विचारुन पत्र दिलेले दिसून येते व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली. परंतु भरती प्रक्रियेमध्ये योग्य तो निर्णय घेतला गेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, भरती प्रक्रियेच्या संदर्भामध्ये जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपिलकर्ता यांना भरती प्रक्रियेतील गुणवत्तेच्या संदर्भामध्ये तक्रार माहिती अधिकारात केलेली आहे. त्याबाबत मात्र कोणत्याही प्रकारची माहिती ही जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी

देणे शक्य नाही. त्याकरीता अपिलकर्ता यांना मिळालेल्या माहितीच्या आधारावर त्यांचे काही तक्रार असल्यास पोलीस आयुक्त यांच्याकडे स्वतंत्रपणे तक्रार करणे संयुक्तिक राहील. माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**
**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २८-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०७९३/अपिल क्र. ६३५७/२०१०**

**श्री.प्रतापसिंह हिरासिंह चंदेल,** **...अपिलकर्ता**
**निशात, वैभव नगर,**
**जिंतूर रोड, परभणी -४३१ ४०१.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव,**

**अल्पसंख्यांक विकास विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**अल्पसंख्यांक विकास विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -२५/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २८/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित..**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित**

अपिलकर्ता यांनी दिनांक १८-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रधान सचिव महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे, राजपूत भामटा जात प्रमाणप्रत्राबाबत माहिती मागितल्याचे दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २३-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अल्पसंख्याक विकास विभाग यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहिती मिळणेबाबत केलेल्या अर्जाची प्रत त्यांच्या विभागाकडे प्राप्त झाल्याचे कार्यालयीन अभिलेखावरुन आढळून येत नाही. या संदर्भात अनौपचारिकरित्या माहिती घेतली असता श्री.चंदेल यांनी केलेला अर्ज मुख्य सचिव कार्यालयाकडून प्रधान सचिव (अल्पसंख्याक विकास विभाग) यांचेकडे दिनांक ०५-०२-२०१० रोजी प्राप्त झाल्याचे तसेच प्रधान सचिव (अल्पसंख्याक विकास विभाग) यांचेकडून परस्पर कक्ष अधिकारी (का.६), सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे दिनांक २२-०३-२०१० रोजी पाठविण्यात आल्याचे DJMS "सहज" या संगणक प्रणालीवरील नोंदीवरुन आढळून येते. यावरुन श्री.चंदेल यांचा अर्ज जन माहिती अधिकारी अथवा अपिलीय अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग यांचेकडे प्राप्त झालेला नाही. तसेही "राजपूत, भामटा" जात प्रमाणपत्राबाबत आयोगाच्या कार्यालयाकडून आलेल्या सहपत्राचे अवलोकन केले असता माहिती मागितल्याचे दिसून येते. तसेच याबाबतीत राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांनी अपिल फेटाळल्याचे त्यांच्या अर्जावरुन

सकृतदर्शनी दिसून येते व त्यांचे "राजपूत, भामटा" जातप्रमाणप्रत्र देण्याचा विषय  अल्पसंख्याक विकास विभागाशी संबंधित नाही. असे असल्यास सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**३) अपिल निकाली काढण्यात येते.**
**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २८-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०८००/अपिल क्र. ६३५८/२०१०**

**श्री.हिरासिंह गुलाबसिंह चंदेल,** **...अपिलकर्ता**
**निशात, वैभव नगर,**
**जिंतूर रोड, परभणी -४३१ ४०१.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय,**
**लातूर.**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय,**
**लातूर.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक -०५/१२/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २८/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक २४-०९-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्याकडे, सेवा निवृत्ती दिनांक २८-०२-१९९९ ला अर्जदार विशेष भूसंपादन अधिकारी स्वर्णा प्रकल्प, लातूर यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रलंबित किंवा प्रस्तावित असल्यास कळवावे, माहितीचा कालावधी मे १९९५ ते फेब्रुवारी, १९९९ पासून अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे U.P.C. ने घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ३०-०९-२०१० रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये एकूण १ ते १०४, १ ते ४१४ व १ ते ९९४ पृष्ठ असलेल्या संचिका पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. त्याची पहाणी करावी व आवश्यक कागदपत्राची प्रतिपेज रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्यावर अर्जदाराने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देत नाही व इतर माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता खर्चाचा भरणा करावयास सांगुन माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली आहे असा आक्षेप दिलेला दिसून येतो व त्यामुळे दिनांक १६-१०-२०१० रोजी प्रथम अपिल दाखले केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा विभागीय

चोकशी कोणकोणत्या कागदपत्राच्या आधारे प्रस्तावित केली किंवा कोणत्या बाबीच्या आधारे प्रस्तावित केली याविषयीचे कागदपत्र पाहिजे असे दिसून येते व त्यामुळे विहित फी आकारुन पुरवावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर असलेतरी त्यांनी द्वितीय अपिल मेमोमध्ये अर्जदाराने अपिलात दिनांक २८-०२-१९९९ रोजी सेवा निवृत्त झाले आहे. त्याचे सेवा निवृत्तीनंतर दिड वर्षाने जिल्हाधिकारी लातूरने अर्जदाराविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी पत्र दिनांक १३-११-२००० रोजी प्रस्ताव विभागीय आयुक्त विभाग, औरंगाबाद मार्फत राज्य शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबईकडे मंजूरीसाठी सादर केला. महालेखापाल नागपूर कार्यालयाला या दोन्ही कार्यालयाने वारंवार कळविले आहे की, श्री.चंदेल यांचे सेवानिवृत्तीच्या दिनांकास २८-०२-१९९९ ला त्याचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित होती व त्यामुळे त्यांनी अशी माहिती मागितलेली होती. परंतु त्यांना नको असलेले नस्तीचे निरीक्षण करण्यास कळविण्यात आले होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी संदर्भामध्ये **ना चौकशी प्रमाणपत्र** श्री. राजीव जलोटा, जिल्हाधिकारी, लातूर यांनी दिनांक २७-११-२००१ रोजी दिलेले होते व त्यामुळे त्यांचे सर्व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आलेले होते. परंतु अपिलकर्ता यांना दिनांक ३०-०९-२०१० च्या पत्रावर घेतलेला आक्षेप स्वंयस्पष्ट आहे व त्यांनी दिनांक २२-०२-१९९९ रोजी त्यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्थावित नाही ही वस्तुस्थिती पत्राद्वारे मागणी केलेली असल्यामुळे मर्यादित पर्यंत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्या करीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या माहिती अर्जात मागितलेल्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २८-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती,

२) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०३५४/अपिल क्र. ६४८८/२०१०

श्री.गजानन विष्णू राणे, ...अपिलकर्ता
१/१०१, कृष्णा विहार, सी.एच.एस.लि.,
डॉ.एस.एस.राव रोड,
लालबाग, मुंबई ४०० ०१२.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,
(बी.पी.), ई वार्ड, मुन्सिपल कार्यालय इमारत,
३ रा मजला, शेख हाफीजुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई ४०० ००८.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
(बीपी), ई वार्ड, मुन्सिपल कार्यालय इमारत,
३ रा मजला, शेख हाफीजुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई ४०० ००८.
...उत्तरवादी

---निर्णय---

व्दितीय अपिलाचा दिनांक -०८/११/२०१०
सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २९-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), सिटी -III, 'ई' वार्ड यांच्याकडे, "Cancellation of assessment bearing property ward No. FS/1043/(3A).233J, A/C No.03-0105-004 C.S.12/50 (Part) of Parel-Sewri Division due Plan approved by EBBP (City-III) U/No.RB/8454/8455 dated 12-10-2001." या संदर्भामध्ये त्यांनी एकूण ४ मुद्दांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. दिनांक २८-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये नस्तीचे निरीक्षण करावे व प्रक्रियेची फी भरावी व फी दर कळविण्यात आलेला दिसून येतो. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०५-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २५-०८-२०१० रोजी देण्यात आलेला आहे. परंतु त्यानंतरही कार्यकारी अभियंता यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही व माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ई वॉर्ड, तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता यांना आयोगाने दिनांक २२-०२-२०११ रोजी आज दिनांक २९-०३-२०११ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याकरीता नोटीस काढण्यात आलेली होती. अपिलकर्ता यांना नोटीस मिळाली परंतु उप मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता आज सुनावणीस हजर झाले नाही व हजर न राहण्याकरीता कोणत्याही प्रकारचे कारण सुद्धा पाठविलेले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी व उप मुख्य अभियंता यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपिलकर्ता यांचे कागदपत्राचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांची मालमत्तेच्या संदर्भामध्ये महानगरपालिकेने मालमत्तेचे मालक न विचारताच सदर मालमत्ते संदर्भामध्ये कार्यवाही केलेली दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी माहिती मागितलेली दिसून येते.

अपिलकर्ता हजर आहेत. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे मालकीची चाळ त्यांना न विचारता महानगरपालिकेने पाडून टाकली व त्यांची समंती न घेता त्या जागेवर SPIO वापरुन नवीन इमारत उभी केले व त्याबाबत कोणत्याही प्रकारचे नंतर त्यांनी कराच्याबाबत देयके पाठविण्यात आलेली नाही. मात्र त्यांच्या मालमत्ते संदर्भामध्ये कराचा भरणा झालेला आहे असे त्यांना माहिती मिळाली. दिनांक १० जुलै २००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामध्ये त्यांनी ११ मालमत्ता एकत्रित केल्यास एकच इमारत तयार केली त्याची संपुर्ण माहिती मागितलेली होती. पुन्हा माहिती देण्याची टाळाटाळ सर्व अधिकारी व वरिष्ठांनी केलेली आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या विरुद्ध शास्ती लादण्यात यावी अशी विनंती त्यांनी केलेली आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव) यांना हा निर्णय मिळाल्यापासून मागितलेली माहिती १० दिवसांच्या आत कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपामध्ये विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता हे शास्तीस पात्र राहील यांची नोंद घ्यावी.

अपिलकर्ता यांचे दिनांक २९-०६-२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुद्ध अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रु.२५०००/- ची शास्ती का लादण्यांत येवू नये याबद्दलचा खुलासा राज्य माहिती आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत समक्ष करावा. तसे न केल्यास सदर शास्ती कायम करण्यात येईल व ती त्यांच्या दर महाच्या वेतनातून वसूल करण्याचा आदेश देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा निर्णय देताना **"Furnish the documents desired by the Appellant."** असा आदेश दिलेला आहे व माहिती देण्यात आलेली नाही. याबद्दलचा कोणत्याही प्रकारचे विवेचन व कारणमिमांसा निर्णयात दिलेला नाही.

सदर निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगरपालिका यांना स्वतंत्रपणे पोस्टाने माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २९-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०३५३/अपिल क्र. ६४८७/२०१०**

**श्री.गजानन विष्णू राणे,** **...अपिलकर्ता**
**१/१०१, कृष्णा विहार, सी.एच.एस.लि.,**
**डॉ.एस.एस.राव रोड,**
**लालबाग, मुंबई ४०० ०१२.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय,**
**एफ/साऊथ, दुसरा माळा,**
**डॉ.बी.ए.रोड,**
**परेल, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक,**
**सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय,**
**एफ/साऊथ, दुसरा माळा,**
**डॉ.बी.ए.रोड,**
**परेल, मुंबई ४०० ०१२.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**द्वितीय अपिलाचा दिनांक -०८/११/२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ११-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा करनिर्धारक, एफ/दक्षिण वॉर्ड, ऑफीसर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

Please supply to me copy of T.W.R. No.207/2009-2010 with effect from 01.01.2010 and the grounds on which assessment of the property bearing Ward No.FS/1043 (3A), 2335, A/C No.03-0105-004 has been restored.

Please supply to me copy of the Tabulated Ward Report for the fortnight ended 01-04-2010 in Form No.13 showing the particulars of the proposal.

I had paid the assessment taxes of the property bearing Ward No.FS/1043(3A), 233J, A/C no. 03-0105-004 upto 1983 and the last Assessment was paid vide Receipt No.044764 dated 26th Feb.1983. I did not receive the Assessment Taxes Bills from the Corporation form 31st June, 2001 and therefore, I could not pay the said taxes from the year 1984 till 2010. You have by your letter dated 17th May, 2010 informed me that the outstanding Property taxes from the year 2001-2002 to 31st March, 2010 are amounting to Rs.10,367/- however, you have not inform the outstanding property taxes for the period from 1984 to 2001.

Therefore, please inform me what are the outstanding property taxes for the period 1984 to 2001? If the taxes are paid, please inform me the name and address of the person who has paid the taxes and also explain how the said taxes were accepted by the Corporation from third party.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०६-०७-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २१-०७-२०१०

रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १८-०८-२०१० रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध झाली आहे या कारणास्तव  सदरचे अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या मालमत्तेच्या संदर्भामध्ये त्यांची समंती नाही. समंती शिवाय पाडून टाकण्यात आली. त्यानंतर एकच मालमत्तेबरोबर एकूण १२ मालमत्ता पाडून टाकण्यात आल्या व त्या एकत्रित करुन त्या मालमत्तेची SPIO वापरुन नवीन इमारत तयार केली. पुर्वी त्यांनी कर भरणा केलेला आहे. सन १९८३ त्यांनी कर भरणा केलेला आहे व त्यामुळे सन १९८३ पासून सन २०१० पर्यंत त्यांनी कर भरणा केलेल्या पावत्यांचे छायांकित प्रती तसेच त्यांना जी देयके पाठविण्यात आली त्या देयकाचे प्रती हे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु त्यांना देयके पाठवली, ती कोणत्या पत्त्यावर पाठविली याबाबतचे कोणतेही उत्तर माहिती अधिकारी देण्यास तयार नाही. अधिकारी प्रत्यक्ष माहिती दाखवत नाही ती लिहुन देतात व ती तशी दिशाभूल करणारी असते किंवा संपुर्ण छायांकित प्रती टिपण्या सहित उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करतात. यावरुनच जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती लपवली आहे असे स्पष्ट दिसून येते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सन १९८४ पासूनची देयके व कर भरणा केल्याच्या पावत्या आहे. परंतु अपिलकर्ता यांची मालमत्ता ही पाडून टाकल्यानंतर त्या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचे देयके अपिलकर्ता यांना पाठविण्यात आलेले नाही. परंतु नवीन इमारत उभी राहिल्यानंतर त्या संदर्भात पुन्हा कराचा भरणा झालेला आहे. त्या कराचा भरणा कोणी केलेला आहे हे मात्र सांगता येत नाही व तसे अपिलकर्ता यांना कळविलेले आहे. असे असले तरी कराचा भरणा जर केलेला आहे तर देयके ही निश्चितपणे कोणाला तरी पावत्या मिळाले दिसून येते व त्या शिवाय कराचा भरणा केला जाणार आहे व त्यांना देयके पाठविण्यात आले आहे त्या देयकाच्या छायांकित प्रती ही अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**-----आदेश----**

**अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांचे दिनांक ११-०६-२०१० रोजीच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती लिहून न देता किंवा तयार करुन न देता संपुर्ण सन १९८४ पासूनची देयके व देयकाचा भरणा केलेल्या पावत्या यांच्या सर्व छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने व इतर मुद्दांची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांना रु.२५०००/- शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

सदर निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे पुढील अवलोकन व कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २९-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती,
२) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र./५०३५१/अपिल क्र. ६४८५/२०१०

श्रीमती अर्चना श्रीवास्तव, ...अपिलकर्ता
६९, न्यू मळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,
खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
जी/उत्तर विभाग कार्यालय,
हरिश्चंद्र येलवे मार्ग,

**दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जलकामे),**
**जी/उत्तर विभाग कार्यालय,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - निरंक**
**सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १०-०२-२०१० रोजी, राजीव गांधी नगर झोपडपट्टी धारावी बस डेपो के सामने झोपडपट्टी में जी राजाराम नामक व्यक्ति को मनपा अधिनियम के अनुसार नल कनेक्शन दिये गये है क्या यदी नल कनेक्शन दिये गये तो इन नल कनेक्शन कि मनपा अभिलेखानुसार जानकारी एवं दस्तावेजो कि नकल प्रती दे | यदि अवैध चोरी का नल कनेक्शन यहां जोडा गया है तो अवैध नल कनेक्शन के संबंध में शासन अध्यादेशानुसार क्या कारवाई कि गयी उसका अहवाल एवं दस्तावेजो कि नकल प्रती दें | अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १९-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती नूसार ती राजाराम या व्यक्तिस कुठल्याही प्रकार जलजोडणी दिलेली नाही. तरी येथे असे नमुद करण्यात येते की, राजीव गांधी नगर येथे दिनांक १५-०३-२०१० रोजी अनधिकृत जलजोडण्या निष्कांसित करण्यात आल्या. सदरच्या माहिती मुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १०-०८-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना माहिती दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे. परंतु अपिलकर्ता यांनी निश्चित राजाराम व्यक्तीचा पत्ता व इतर तपशील जन माहिती अधिकारी यांनी अवगत करुन घेतला व त्यानूसार योग्य ती कार्यवाही केली जाईल असे सांगितले. त्याप्रमाणे कार्यवाही केली व अपिलकर्ता यांना माहिती सुद्धा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांनी त्याची पोच सुद्धा दिलेली आहे. अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिलावर कोणतीही तारीख न टाकता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-११-२०१० रोजी द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. वास्तविक दिनांक २८-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे. तसेच पूर्वी सुद्धा त्यांना माहिती विहित मुदतीत करुन दिलेली दिसून येते. राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून अपिलकर्ता यांचा ६९, न्यू मळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२ या पत्त्यावर नोटीस काढण्यात आलेली होती. परंतु त्यांची नोटीस ही परत आलेली आहे.

अपिलकर्ता श्रीमती अर्चना श्रीवास्तव यांनी सदरच्या अपिलामध्ये गुलाम वारिश शेख (पत्रकार) यांच्या सोबत द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. दोघांचा पत्ता ६९, न्यू मळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२ असा दिलेला आहे. त्या दोघांचे आज कार्यालयामध्ये अपिल क्रमांक ६४८३/०२ व ६४८४/०२ झोपुप्र. म्हाडा मंडळ यांचे दोन्ही अपिले सुनावणीस होती. त्या अपिलामध्ये सुद्धा अपिलकर्ता यांनी माहितीचा अर्ज जोडपत्र-अ मध्ये, प्रथम अपिल जोडपत्र-ब मध्ये, ६९, न्यू मळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२ असा पत्ता दिलेला आहे. द्वितीय अपिल दाखल झालेले आहे त्यामध्ये रुम नं. २, घनश्यामदास की चाळ, संत रोहीदास मार्ग, कालाकिल्ला, धारावी, मुंबई ४०० ०१७ असा पत्ता दिलेला आहे. वरील दोन्ही अपिलावर त्यांना आयोगाची नोटीस मिळालेली आहे. परंतु सदरचे अपिल क्रमांक ६२८५/०२ मध्ये आयोगाने पाठविलेली नोटीस ही परत आलेली आहे. असे असेल तर अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती मध्ये माहिती मागण्या पेक्षा त्यांना कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते व त्यामुळेच त्यांनी महानगरपालिकेकडून तशी कार्यवाही करुन घेतली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**अपिल निकाली काढण्यात येते.**
**अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २९-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/अपिल क्र. ६४९२/२०१०**

**श्री.मुकेश धिरजलाल कोठारी, ...अपिलकर्ता**

**१०४, ओम महावीर अपार्टमेंट को.ऑ.हौ.सो.लि.,**
**मामलेदार वाडी, रोड नं.३,**
**मालाड (पश्चिम), मुंबई ४०० ०६४.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक महानगरपालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई मनपा, आर/सेंट्रल वॉर्ड,**
**२ रा मजला, म्युनिसिपल मार्केट इमारत, एस.व्ही.रोड,**
**बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी (आरोग्य),**
**बृहन्मुंबई मनपा, आर/सेंट्रल वॉर्ड,**
**२ रा मजला, म्युनिसिपल मार्केट इमारत, एस.व्ही.रोड,**
**बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२.** **...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १२-११-२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ३०-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, बी.एस.सी. (बोरीवली-वेस्ट), ३ रा मजला, बोरीवली (वेस्ट) यांच्याकडे, 1) The application for Birth Certificate was filed on 14-06-2010. 2) The date if Birth 5th June, 1957 at Kandivali (West), Mumbai 400 067. 3) The Name of the Hospital Radhabai G.Dalvi Hospital, Dr.Dalvi Road, Kandivali (W) Mumbai 400 067. 4) The Birth Certificate not yet receive. 5) The Status Co. of Application for Birth Certificate. 6) Time Period 15 days. अशी माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनां १३-०८-२०१० रोजी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी आपण माहितीच्या अधिकाराखाली मुकेश धिरजलाल कोठारी यांच्या जन्मदाखला प्राप्तीसाठी केलेला अर्ज या कार्यालयात दिनांक ३०-०७-२०१० रोजी प्राप्त झालेला आहे. आर/मध्य विभाग १९५८ साली स्थपन करण्यात आला आहे. आपण अर्जामध्ये नमूद केलेल्या तारखेप्रमाणे पाहणी म्हणजेच ५ जून, १९५७ सालची पाहणी केली असता जन्म नोंदणी रजिस्टरमध्य सदरहू जन्माची नोंद अस्तित्वात नाही असे त्यांनी कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक २१-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. जन्म तारीख दाखला हा मुलाच्या महाविद्यालयीन प्रवेशाकरीता domicile certificate

काढण्याकरीता हवे आहे असे त्यांनी नमूद केलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १८-०९-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली असल्यामुळे सदरची अपिल हे निकाली काढण्यात आलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांच्याकडे जन्माच्या संदर्भामध्ये पुरावे आहे व ते त्यांना दाखवून सुद्धा माहिती अधिकारीत जन्माचा दाखला वितरीत करीत नाहीत त्यामुळेच सदरची माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना जन्माच्या संदर्भामध्ये जे पुरावे दिलेले आहेत ते दिनांक ०५-०६-१९५७ रोजीचे जन्म नोंदणी रजिस्टर तपासले असता त्यामध्ये नोद आढळून येत नाही. माहितीच्या अधिकारामध्ये कोणतीही कार्यवाही करुन मिळत नाही. त्यांनी मूळ जन्म तारखेचे प्रमाणप्रत्र तयार करुन द्यावे अशी जी मागणी केलेली आहे ती मागणी मान्य करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २(च)** प्रमाणे **"माहिती"** याचा अर्थ **सार्वजनिक प्राधिकरणात** साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज, शासन निर्णय या स्वरुपाची माहिती उपलब्ध आहे त्यांचे निरिक्षण करुन व छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. अपिलकर्ता यांनी दिनांक ०५-०६-१९५७ सालच्या जन्म नोंदणी रजिस्टर संदर्भामध्ये छायांकित प्रती उपलब्ध असतील परंतु सदरची नोंद आढळून येत नसल्यामुळे छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे शक्य नाही. मात्र अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे जन्म तारीखेप्रमाणे पत्र उपलब्ध करुन देता येत नाही किंवा हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नसल्यामुळे राज्य माहिती आयोगास जन्म तारीख दाखलाप्रमाणे पत्र उपलब्ध करुन द्यावे असा आदेश देता येणार नाही. मात्र स्वतंत्रपणे (माहिती अधिकारात नाही) जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील सक्षम अधिकारी त्यावर त्या नियमाप्रमाणे निर्णय देणे योग्य राहील. त्यामुळे त्यांची मागणी मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपिल मान्य करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**अपिल मान्य करण्यात येते.**
**अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २९-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,

१) निवडनस्ती,

२) श्री.चौरे, सहाय्यक.

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र/ ५०३५५/अपिल क्र. ६४८९/२०१०**

**श्री.अर्जुनलाल एम. छाब्रिया, ...अपिलकर्ता**
**बेले व्हिस्टा, फ्लॅट नं.१५, ३ रा मजला,**
**तलाव आणि एल.आय.सी.ऑफीस समोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (पश्चिम),मुंबई ४०० ०५०.**

**---विरुध्द---**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त परिमंडळ -३,**
**मध्य नियंत्रण कक्ष,**
**बावला कंपाऊंड,**
**भायखळा, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष,**
**बावला कंपाऊंड,**
**भायखळा, मुंबई. ...उत्तरवादी**

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १०-११-२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांचे पक्षकार (अपिलकर्ता हे वकील आहे मात्र वकीलाच्या तर्फे पक्षकाराने दिलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मागणे हा त्यांचा व्यवसाय आहे.) श्री. अशोक शिवाजी खांडेकर यांनी मंत्री महोदय Hon’ble Mantralaya, Hon’ble Bureacrats, Hon’ble Police Bureacrats and Polic Administration यांचे दिनांक १०-०५-२०१० रोजी व अन्य अधिकाऱ्यांकडे दिनांक १८-०५-२०१० रोजी श्रीमती तहसीन अनीस वाघू आणि A.P.I. नाईकवाडे डोंगरी पोलीस स्टेशन यांच्या विरुद्ध दिलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली याबद्दलची एकूण १४ मुद्दांमध्ये

वर्णन करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २७-०८-२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदर माहिती मुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०४-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल त्याच पद्धतीने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१-१०-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना माहिती दिनांक २८-०९-२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. नेहमी प्रमाणे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता हे नेहमी प्रमाणे गैरहजर आहेत. त्यांच्या तर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री.कापसे हजर आहेत. यावरुन अपिलकर्ता यांचा पक्षकारातर्फे माहिती मागण्याचा व्यवसाय दिसून येतो. अपिलकर्ता माहितीचा अर्ज करताना त्यात एकच मुद्दा हा वेगवेगळ्या पद्धतीने व कारणमिमांसा विचारुन १५-१६ मुद्यांमध्ये मागताना विचारतात. प्रथम अपिलात त्याच पद्धतीने निरर्थक असे १५-१६ परिच्छेद देतात व द्वितीय अपिलात सुद्धा १५-१६ निरर्थक परिच्छेद देत असतात या वरुन वकील असून सुद्धा त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे तरतुदी प्रमाणे माहितीची मागणी अशा पद्धतीने करावी याचे सुद्धा ज्ञान दिसून येत नाही किंवा जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी किंवा राज्य माहिती आयोगास दिशाभूल करण्याकरीता किंवा संभ्रमात टाकण्याकरीता किंवा सेवा विद्यापूर्वक अर्ज किंवा अपिल दाखल केला आहे हे दाखविण्याकरीता ते अशा प्रकारचे अर्ज करत आहे असे आयोगाचे मत झालेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचे सर्व पक्षकार मंत्रालयापासून सर्वच कार्यालयामध्ये एकच तक्रार दाखल करत असतात त्यामुळे त्या सर्व तक्रारीच्या संदर्भात प्रक्रिया करताना शासन यंत्रणेची पुर्ण वेळ खर्ची पडतो व अशा अर्जांचे अर्जदारामुळे त्यांना खरोखर त्यांचे काम व्हावयाचे आहे अशा नागरीकांचे काम होत नाही कारण निरर्थक अर्जाची सुद्धा प्रक्रिया ही कोणत्याही अधिकाऱ्याला कोणत्याही कार्यालयात करावीच लागते. असे असले तरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे आयोगापुढे त्यांनी सांगितले. आयोगापुढे सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपिल निकली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**अपिल निकाली काढण्यात येते.**
**अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुंबई
दिनांक : २९-०३-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती,
२) श्री.चौरे, सहाय्यक.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक :मुमाआ/नोंदणी क्र/ ५०३५६/अपिल क्र. ६४९०/२०१०

श्री.सी.पी.सिंग , ...अपिलकर्ता
०२, क्लासिक पॉवर रेसिडन्सी,
टी.पी.एस.-४, सबवे रोड नं.२,
सांताक्रुझ (पश्चिम),मुंबई ४०० ०५४.

---विरुध्द---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विधी सल्लागार (झो.पु.प्रा.),
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, अनंत कानेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति /निष्का),
पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१. ...उत्तरवादी

**---निर्णय---**

**व्दितीय अपिलाचा दिनांक - १६-११-२०१०**
**सुनावणीचा दिनांक - २९/०३/२०११**
**अपिलकर्ता - अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक ०२-०३-२००९ रोजी जन माहिती अधिकारी SRA बांद्रा (पूर्व) यांच्याकडे, मुद्दा क्र. A व C मध्ये, फाईनल प्लॉट नं.१०६, मौजे- विलेपार्ले, ता.अंधेरी, खोतवाडी, भिमवाडा, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई या संदर्भामध्ये वेगवेगळया प्रकारचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच मा.मुंबई उच्च न्यायालय या सदंर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १७-०३-२००९ रोजी राज्य जन माहिती अधिकारी श्री. वाकोडे यांनी मागितलेली माहिती विधी सल्लागार, अभियांत्रिकी विभाग, अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी पश्चिम उपनगरे यांच्या विभागाशी संबंधित असल्याने आपला अर्ज संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येत आहे. तसेच मुद्दा G हा महानगरपालिकेशी संबंधित असल्याने आपण सदर बाबत संबंधित सहाय्यक महापालिका आयुक्त यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर दिनांक ०२-०४-२००९ रोजी जन माहिती अधिकारी झोपडट्टी पुनर्वसन प्राधिकारी श्रीमती नलिनी साठे यांनी अपिलकर्ता यांना सदर अर्जातील माहितीच्या मुद्दांची छाननी केली असता असे आढळुन आले आहे की, मुद्दा क्र. A व C मध्ये मागणी केलेली सदरची माहिती ही अभिप्राय प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. ही माहिती, माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील **कलम २ (च)** मध्ये समाविष्ट नसल्यामुळे, जे प्रश्न विचारलेले आहेत ते माहिती अधिकाराच्या **"माहिती"** या संज्ञेत बसत नसल्यामुळे आपणास माहिती पुरविता येत नाही. सबब आपला संदर्भाधिन अर्ज निकाली काढणेत येत आहे. परंतु ३० दिवस पुर्ण होण्यापुर्वीच दिनांक ३०-०३-२००९ रोजी प्रथम अपिल प्रथम अपिलीय अधिकारी SRA यांच्याकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. मात्र अपिलावर निर्णय घेण्यासाठी अनेक नोटीस काढलेल्या दिसून येतात. तसेच दूरध्वनी वरुन त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु ते हजर राहिले नसल्यामुळे प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी श्रीमती नलिनी आ. साठे यांनी तोंडी युक्तीवाद केला व त्यामध्ये अपिलकर्ता यांनी जो तक्रारीचा अर्ज केलेला आहे त्या अर्जामध्ये जे मुद्दे उपस्थित केलेले आहे ते सुरवातीला श्री. वाकोडे यांनी वेगवेगळया विभागाकडे हस्तांतरीत केलेला होता. महानगरपालिके संदर्भामध्ये सुद्धा काही मुद्दे होते. त्यामुळे महानगरपालिकेकडे सदरचा अर्ज हस्तांतरीत केला होता. त्यामध्ये मुद्दा क्रमांक A व C च्या माहिती देण्याच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांचे बहुतांश मुद्दे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांचे जर

प्रकरणातील गुणवत्तेच्या निष्कर्ष बाबत अभिप्राय मागितलेला आहे. कागदपत्रांच्या स्वरुपात त्यांनी कोणतीही माहिती मागितलेली नाही व त्यामुळेच त्यांनी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (च)** मध्ये त्यांनी मागितलेली माहितीचा समावेश होत नाही असे त्यांनी कळविलेले होते व त्या इतर जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज हस्तांतरीत झाला आहे त्या संदर्भामध्ये विधी सल्लागार तथा अपिलीय अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी आयोगापुढे खुलासा खालीलप्रमाणे दिलेला आहे.

३) दिनांक ०२-०४-२००९ रोजी श्री.व्ही.डी.वाकोडे, नायब तहसिलदार, तथा राज्य जन माहिती अधिकारी, झोपुप्रा यांचे कडून अपिलकार श्री.सी.पी.सिंग यांचा शासकीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत या (विधी विभाग) झोपुप्रा यांचे कडे प्राप्त झाला. सदर पत्राची प्रत सुलभ संदर्भासाठी सोबत जोडली आहे. सदर पत्रामध्ये अपिलकार श्री.सी.पी.सिंग यांनी मुद्दा क्र.३(a) व (c) मध्ये मागणी केलेली माहिती विधी विभाग, झ ोपुप्रा यांचेशी संबंधित होती.

४) सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विधी सल्लागार झोपुप्रा यांनी त्यांचे पत्र क्र. झोपुप्रा/ कार्या-२/ टे-२/ विस/ शामाअ/ १२अ/ २००९ दिनांक ०२-०४-२००९ अन्वये उत्तर दिले. (सदर अर्जामधील मुद्दा क्र. ३(a) व (c) मध्ये मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे दिसून आले.) व सदर अर्ज शासकीय माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील **कलम २(च)** मध्ये माहितीच्या संज्ञेत बसत नसल्यामुळे सदर अर्ज मुद्दा क्र.३(a) व (c) चे बाबत निकाली काढला. मूळ अर्जातील इतर मुद्दे विधी विभागाशी संबंधित नव्हते.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, शासकीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, नियत्रंक (अती/निष्का.), बृहन्मुंबई यांनी सहाय्यक आयुक्त, महानगरपालिका के-पूर्व विभाग यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे तसेच खोतवाडी, भिमवाडा ही जमीन बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे मालकीची असल्याने माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते व त्या पत्राची प्रत अपिलकर्ता यांना दिलेली आहे. तसेच पुन्हा उप जिल्हाधिकारी (अती/निष्का.) व स.प्रा.बांद्रा यांनी सुद्धा सदर माहिती संबंधित कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अर्ज हस्तांतरीत केलेला आहे. झोपडपट्टी प्राधिकारी यांनी दिनांक २३-०३-२००९ रोजी अपिलकर्ता यांना नस्तीचे निरीक्षणासाठी उपस्थित व्हावे असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपिलकर्ता हे सुद्धा वकील आहेत असे कागदपत्रांवरुन दिसून येत असले तरी त्यांना माहिती अधिकारामध्ये जी माहिती मागितलेली आहे ती अनेक कार्यालयाशी संबंधित अशी माहिती एकाच अर्जात मागितलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय सुद्धा त्यांनी मागितलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(च) प्रमाणे **"माहिती"** याचा अर्थ **सार्वजनिक प्राधिकरणात** साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज, शासन निर्णय, परिपत्रके इत्यादी स्वरुपात माहिती उपलब्ध असते त्यांचे निरिक्षण करुन व

छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे तसेच अधिनियमाचे **कलम ५(१)** प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये तसेच उप कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे व सदरची माहिती ही **कलम ७(१)** प्रमाणे ३० दिवसांत उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. यावरुन ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये अनेक विषयांच्या संदर्भामध्ये जी माहिती मागितलेली आहे व त्यामुळेच माहिती ३० दिवसांमध्ये उपलब्ध होवू शकत नाही. प्रत्येक अधिकाऱ्यांस सदरचा अर्ज हा हस्तांतरीत करुन ह्या प्रक्रियमध्ये वेळ खर्ची घालवायला लागतो व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**अपिल निकाली काढण्यात येते.**
**अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २९-०३-२०११**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती,**
**२) श्री.चौरे, सहाय्यक.**